# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक २९५/२०१०.

श्री. अनिल गोपीचंद चांद,
अे - १, जीवन ज्योती कॉलनी,
क्लर्क टाऊन, नागपूर - ४४० ००४. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर

श्रीमती अर्चना
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्या,
सेंट जोसेफ कॉन्व्हेंट गर्ल्स हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय,
मोहन नगर, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३०.३.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.४.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक ७.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता यांचेतर्फे श्री. सी. एस. समुद्र, वकील हे हजर आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. अशोककुमार मदनानी व श्री. राजकुमार मदनानी तर्फे श्री. विकास मदनानी, वकील हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. पंडीत घुगे, लेखाधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.९.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, सेंट जोसेफ कनिष्ठ महाविद्यालय, नागपूर यांचेकडे ज्युनिअर कॉलेज भरतीच्या नोंदवहीमध्ये जातीचे दाखल्याबाबत बाबा बैरागी (एन.टी.-१) च्या फायदा घेतला होता की नाही. सन १९९५ ते १९९८ चा कालावधी. कु. प्रिती अशोक मदनानी १९९४-९५ व कु. रश्मी राजकुमार मदनानी १९९७-९९. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या संदर्भामध्ये दिनांक १२.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी कार्यालय, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी प्राचार्य, सेंट जोसेफ गर्ल्स कनिष्ठ महाविद्यालय यांना सर्व कागदपत्रे घेऊन ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो व अपीलकर्ता यांना प्रतिलिपी दिली. दिनांक २१.१०.२००९ रोजी अपीलकर्ता यांनी प्राचार्य यांना त्यांच्या मुळ अर्ज सादर केला.

शिक्षण उपसंचालकांचे आदेशाप्रमाणे माहिती मागितली. परंतु ती त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे प्राचार्य यांनी संबंधितांच्या पालकांना पत्र देऊन माहिती उपलब्ध करुन द्यावी किंवा नाही याबाबत विचारणा केली. त्याप्रमाणे दिनांक ११.११.२००९ रोजी श्री. अशोककुमार मदनानी व श्री. राजकुमार मदनानी यांनी माहिती उपलब्ध करुन देऊ नये असे प्राचार्य यांना कळविले व प्राचार्य यांनी माहिती अधिकारी तथा शिक्षण उपसंचालक, नागपूर यांना त्याप्रमाणे कळवून सदरच्या पत्राची प्रत ही अपीलकर्ता यांना दिली. पुन्हा दिनांक २२.१२.२००९ रोजी अपीलकर्ता व प्राचार्य यांना दिनांक ३०.१२.२००९ रोजी कार्यालयात उपस्थित राहावे असे कळविले व दिनांक २५.१.२०१० रोजी अपीलवरील सुनावणीचे वेळी प्राचार्य, सेंट जोसेफ कॉन्व्हेंट गर्ल्स उच्च माध्यमिक विद्यालय, मोहननगर, नागपूर यांनी कु. रश्मी मदनानी व कु. प्रिती मदनानी यांचे पालकांनी आमचे लेखी परवानगी शिवाय कोणतीही माहिती देण्यात येऊ नये असे लेखी पत्र दिले आहे. त्यामुळे सदर विद्यार्थ्यांची माहिती पुरविता येत नाही अशा प्रकारचा निर्णय हा शिक्षण उपसंचालक यांनी दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयुक्तांकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे त्रयस्थ पक्षाचे म्हणणे अधिनियमाचे कलम १९(४) अन्वये हे बंधनकारक असल्यामुळे आयोगाचे कार्यालयातून श्री. अशोककुमार टी. मदनानी व श्री. राजकुमार टी. मदनानी यांना दिनांक २९.४.२०१० रोजी नोटीस काढण्यात आली होती व त्याप्रमाणे त्यांनी आयोगाकडे लेखी त्यांचे म्हणणे सुध्दिं दिनांक २४.५.२०१० रोजी सादर केलेले आहे. आज सदरच्या अपीलाचे संदर्भात युक्तिवाद करण्याकरिता तारीख देण्यात आली होती. श्री. अशोककुमार टी. मदनानी व श्री. राजकुमार टी. मदनानी यांचे तर्फे श्री. विकास मदनानी, वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मागितलेली माहितीच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हित नाही. तसेच जात पडताळणीचे प्रमाणपत्र हे वैयक्तिक माहिती असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही. तसेच अधिनियमाचे कलम ८(त्र) अन्वये मागितलेली माहिती सार्वजनिक हिताचे दृष्टिने किंवा सार्वजनिक कामकाजाचे दृष्टिने काहीही संबंध नाही व विनाकारण व्यक्तिच्या खाजगी बाबतीत हस्तक्षेप ठरतो. त्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत आहे असे त्यांनी हरकत घेतली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांचे वकील यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, शैक्षणिक संस्थेत प्रवेश हा गुणवत्तेवर तसेच आरक्षित जागेवर मिळतो व आरक्षित जागा ज्या जाती घेत आहेत त्या जातीचे विद्यार्थी जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करुन प्रवेश मिळतो. त्यामुळे प्रवेश प्रक्रिया ही सार्वजनिक कामकाजच आहे व त्यामध्ये पारदर्शकता असणे आवश्यक आहे. कोणत्याही प्रवेश प्रक्रियेमध्ये पारदर्शकता नसेल तर त्या आरक्षित वर्गातील इतर विद्यार्थ्यांवर अन्याय होऊ शकतो व त्यामुळे सार्वजनिक हित सुध्दा यात आहे व त्यामुळे जात पडताळणी प्रमाणपत्र सुसंगत असणे आवश्यक आहे. त्यावर पुन्हा त्रयस्थ पक्षाचे वकील यांनी युक्तिवाद करतांना ती खाजगी कागदपत्रे आहेत. त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यात येऊ नये असा युक्तिवाद केला.

४. परंतु अपीलकर्ता यांचे वकील यांचा युक्तिवाद योग्य असुन त्याप्रमाणे शैक्षणिक संस्थेतील प्रवेश प्रकिया ही सार्वजनिक कामकाजात व ती प्रवेश प्रकिया ही त्या संस्थेला त्यांचे स्वतःच्या अधिकारात स्वतंत्रपणे करता येत नाही. त्याप्रमाणे शासनाचे जे नियम असतील त्या प्रमाणे ही प्रवेश प्रक्रिया राबवावी लागते. शासनाचे नियमाप्रमाणे प्रवेश प्रक्रियेतून कोणत्या जागेच्या संदर्भात खुला व आरक्षित असे दोन भाग केले असतात व आरक्षित प्रवेश प्रक्रिया करतांना जात पडताळणी प्रमाणपत्र हे आवश्यक केलेले आहे. याचा अर्थ त्याच जातीतील विद्यार्थ्यांना त्याच जातीचे आरक्षण मिळणे आवश्यक राहिल. त्याप्रमाणे त्या जात पडताळणी समितीचे प्रमाणपत्र हे सार्वजनिक अभिलेख आहे व त्यामुळे सार्वजनिक अभिलेख हे पारदर्शकतेच्या दृष्टिने व चांगल्या प्रशासनाचे दृष्टिने प्रकट करणे आवश्यक आहे. जात पडताळणी समितीने दिलेले प्रमाणपत्र हे खाजगी बाब

नाही. तर त्या प्रमाणपत्राचे आधारे व्यावसायिक शिक्षण संस्थेत प्रवेश घेतला जातो व त्यामुळे सदरच्या प्रमाणपत्राची छायांकित प्रती ही उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २४.९.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती व्यक्तिशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) त्याकरिता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी यांचेशी संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी. तसे ती उपलब्ध करुन न दिल्यास जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द तक्रार झाल्यास शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५६८/२०१०, अपील क्रमांक ५६९/२०१० व अपील क्रमांक ५७०/२०१०.

श्री. डॉ. महेंद्रकुमार ऋषिजी धावडे,
२१, द्रोणागिरी, गेडाम ले आऊट, भामटी
नागपूर - ४४० ०२२. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, नागपूर.

श्रीमती सुजाता रेवतकर,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
हिंदुस्थान विद्यालय, लकडगंज,
नागपूर - ४११ ००८. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये ३ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे श्री. श्रावण राऊत, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपिलकर्ता यांनी दिनांक २०.११.२००९, दिनांक ९.११.२००९ व दिनांक १३.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, हिंदुस्थान विद्यालय, लकडगंज, नागपूर यांचेकडे शैक्षणिक संस्थेच्या संबंधित व शाळा संबंधी ३ अर्जामध्ये एकूण २४ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. परंतु विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९, दिनांक १९.१२.२००९ व दिनांक दिनांक १९.१२.२००९ रोजी ३ प्रथम अपीले दाखल केली. तीनही प्रथम अपीलाच्या संदर्भात प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना आपण पुरविलेली माहिती अपूर्ण असल्याने परिपूर्ण माहिती १० दिवसांत अपीलकर्ता यांना देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो व त्यानंतर अपील क्रमांक ५६९/२०१० मधील प्रथम अपीलाची सुनावणी नंतर रुपये २७६/- कार्यालयात रोखपालाकडे जमा करावे व माहिती घेऊन जावी असे अपीलकर्ता यांना कळविले व अपील क्रमांक ५७०/२०१० मध्ये रुपये ११३२/-भरावे व माहिती घेऊन जावी

असे कळविलेले दिसून येते. परंतु सदरच्या रक्कमेचा भरणा न करता राज्य माहिती आयोगाकडे ३ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

३. तिनही द्वितीय अपीलाचे संदर्भामध्ये अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचया दिनांक २०.११.२००९, दिनांक ९.११.२००९ व दिनांक १३.११.२००९ च्या अर्ज त्यांच्या कार्यालयात प्राप्त झालेला नाही व ही सर्व अर्ज प्रथम अपीलाचे निर्णयाचे सोबत प्राप्त झाली असल्यामुळे त्यांना खर्चाचा भरणा करावयास सांगितले. तिसऱ्या अपीलामध्ये अर्जाची प्रत ही राज्य माहिती आयोगाचे कार्यालयातून प्राप्त झाली त्यापुर्वी प्राप्त झाली नव्हती. त्यावर अपीलकर्ता यांनी सदरचा अर्ज कार्यालयात दिल्याचा पुरावा विचारण्यात आला. परंतु अपीलकर्ता यांचे जवळ कोणताही पुरावा मिळाला नाही. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचा अर्ज हा कार्यालयात घेतला गेला नाही. परंतु त्यांनी त्यांना कोणताही अर्ज पोस्टाने सुध्दा पाठविलेला नाही. याचा अर्थ कार्यालयात अर्ज प्राप्त झाला नाही असे दिसून येत नाही. तरी प्रथम अपीलेही सुनावणी घेतली दिसून येत नाही. त्यांनी फक्त आदेश दिलेले दिसून येतात. खर्चाचा भरणा हा प्रथम अपीलाचा निर्णयानंतर दिलेला असल्यामुळे अधिनियमाचे कलम ७(६) प्रमाणे सदरची माहिती त्यांना विनामुल्य उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे जो खुलासा दाखल केलेला आहे. त्या खुलाश्यामध्ये अपीलकर्ता हे त्यांच्याच संस्थेमध्ये शिक्षक म्हणून होते. तसेच अपीलकर्ता श्री. महेंद्रकुमार धावडे, सहाय्यक शिक्षक, हिंदुस्थान विद्यालय, लकडगंज, नागपूर यांच्या विरुध्द पोलीस स्टेशन, लकडगंज येथे दिनांक १३.८.२००९ ते १५.८.२००९ ला कलम १४९/०९ व कलम ४२०/३४ कलमाखाली फसवणूकीच्या सदराखाली अटक झाल्यामुळे अपीलकर्त्याला कारणे दाखवा नोटीस देण्यात आला. त्यात खुलासा मागण्यात आल्यामुळे त्यांनी सुडभावनेतून माहितीच्या अधिकारामध्ये दिनांक २१.१०.२००९ ला केलेला अर्ज, नंतर दिनांक ९.११.२००९ ला केलेल्या अर्जामध्ये ७ मुद्दे विचारण्यात आले. त्याचप्रमाणे दिनांक १३.११.२००९ च्या अर्जामध्ये एकूण ९ मुद्दांची माहिती विचारण्यात आली असून दिनांक ८.१.२०१० च्या सुनावणीच्या वेळीच अपीलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली. अपील क्रमांक ५६८/२०१० मध्ये दिनांक २०.११.२००९ ला १० मुद्दांची माहिती विचारण्यात आली असून तो अर्ज मा.राज्य माहिती आयोग यांच्याकडून दिनांक ७.६.२०१० च्या सुनावणीच्या पत्रासोबत प्राप्त झाली. अपीलकर्ता सुडभावनेतून व त्रास देण्याच्या प्रवृत्तीतून मुद्दाम माहिती अधिकाराच्या कायद्याचे उल्लंघन करुन मला मानसिक, आर्थिक व नैतिक छळ करण्याकरिता वारंवार माहितीच्या अधिकारात माहिती मागत असतात. त्यांना ती माहिती उपलब्ध करुन देते वेळी स्वतःच अडथळे निर्माण करुन माहिती घेण्यास टाळाटाळ करतात. फिर्यादी म्हणून अपीलीय अधिकाऱ्यांसमोर वारंवार माझी पेशी करवून माझा व अपीलीय अधिकाऱ्यांच्या अमूल्य वेळेच्या अपव्यय करतात. त्याचप्रमाणे प्रशासकीय व शैक्षणिक कार्य करण्यास विलंब होतो आणि अडथळे निर्माण होते. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे सुध्दा जनमाहिती अधिकारी यांनी खुलासा दाखल केला त्यामध्ये माहिती अधिकार अंतर्गत बेकायदेशीर खोटी तक्रार पोलीस खात्यात नोंदवून शाळेतून मला पोलीस स्टेशन पर्यंत बोलविण्याचे धाडस सुध्दा हे शिक्षक करतात. असे असल्यास मुख्याध्यापिकेचे म्हणणे अपीलकर्ता यांचे विरुध्द योग्य ती कार्यवाही त्यांनी करणे संयुक्तिक राहिल. असे असले तरी अपीलकर्ता यांना विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. यापुढे अपीलकर्ता यांनी अशा प्रकारे माहिती मागण्याचा प्रयत्न केल्यास सदरची बाब आयोगाचे निदर्शनास सर्वात प्रथम आणावी. अपीलकर्ता यांची तिन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

... ४

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची तिन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत विनामुल्य माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना नोंदणीकृत टपाल खर्चाची रक्कम कळवावी व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी नोंदणीकृत टपाल खर्च भरल्यानंतर त्यांना माहिती नोंदणीकृत टपालाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५६७/२०१०.

श्री. मेघराज पुंडलिकराव डोंगरे,
पिपळा (पुर्नवसन),
ता. आर्वी, जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,
वर्धा.

श्री. वरेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
कृषी उत्पन्न बाजार समिती,
ता. आर्वी, जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ७.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ७.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री, अतुल वानखेडे, सहकार अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. पलीकुंडवार, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, आर्वी, जि. वर्धा यांचेकडे आर्वी कृषी उत्पन्न बाजार समिती अधिकृत व्यापारी संख्या अशा प्रकारे एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१२.२००९ रोजी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आर्वी यांनी सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांना अर्जातील मागविलेली माहिती बाजार समितीचे संदर्भात असल्याने व बाजार समितीचे आपण माहिती अधिकारी असल्याने या कार्यालयास प्रापत झालेल्या संदर्भीय अर्ज मुळ प्रतीत आपणांकडे पुढील कार्यवाहीकरिता पाठविण्यात येत असून सदर अर्जावर मुदतीत कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयांस वेळीच सादर करावा. सहपत्र संदर्भीय मुळ अर्ज क्रमांक २ व सदरच्या पत्राची प्रतिलिपी अपीलकर्ता यांना दिलेली आहे. सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आर्वी यांचे आदेशाप्रमाणे प्रभारी सचिव, कृषि

उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांनी दिनांक १.१.२०१० रोजी माहितीचा अधिकार सदर संस्थेला लागु नाही. शासनाची कोणतेही अनुदान मिळत नाही. माहितीचा अधिकार आम्हास लागत नाही हे आमचे म्हणणे अबाधित ठेवून आम्हास म्हणावयाचे आहे की, आपण माहितीचे अधिकाराखाली वरील संदर्भीय तारखेस या कार्यालयाकडे दोन वेगवेगळे अर्ज करुन अर्जात माहितीचे अधिकाराखाली माहिती मागितलेली आहे. तसेच मागितलेल्या माहितीशी आपला प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष संबंध काय याचाही उलगडा केलेला नाही. तरी तो ७ दिवसांचे आंत स्पष्ट करावा. जेणेकरुन या संबंधात योग्य ती कार्यवाही करता येईल याची कृपया नोंद घ्यावी. असे कळविण्यात आले होते व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २६.२.२०१० रोजी देण्यात आला असून आदेश मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना माहिती द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. सदरच्या आदेशाप्रमाणे दिनांक २६.२.२०१० रोजी प्र. सचिव, कृषि उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांनी जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, वर्धा यांना अपीलाला उत्तर दिलेले आहे. अपीलकर्ता मेघरा हे समितीचे सदस्य नाही व कास्तकारही नाही. त्यांनी आपला हेतु व उद्देश नमुद केला नाही व कोणत्या कामासाठी पाहिजे हयाचा उल्लेख केला नाही. माहितीचे प्रयोजन व उद्देश त्यांनी लिहिला नाही. समितीला शासनाची कोणतेही अनुदान मिळत नाही. त्यामुळे समिती ही माहिती देण्याच्या अधिकारापासून प्रतिबंधित आहे. जळगांव जिल्हा अर्बन को-ऑप. बँक व इतर हयांनी रिट याचिका क्रमांक १३०४/२००८ हयामध्ये औरंगाबाद उच्च न्यायालयाने त्यांचा अंतरिम आदेश दिनांक १७.२.२००९ ने लाभतोटयाचे पत्रक, अंदाजपत्रक हयाशिवाय इतर माहिती मागण्यास प्रतिबंधीत केले आहे. त्याच वेगळी रिट पिटीशनने सहकारी संस्थेला ते सरकारी अनुदान घेत नसल्याने व त्यांचे माहितीचे अधिकाराखाली ज्या बाबी सार्वजनिक नाही व संस्थेचे हितात नाहीत त्या देण्यापासून प्रतिबंधित केले आहे व तो निर्णय दिनांक २३.३.२००९ ला प्रसिध्दिस दिला आहे. सबब हया कारणास्तव अर्जदाराची प्रस्तुत अपील फेटाळण्यास पात्र आहे असा खुलासा त्यांनी दिला होता. परंतु त्यामुळे माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती ही कृषी उत्पन्न बाजार समितीकडे मागितली नाही तर ती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, आर्वी यांचेकडे मागितली आहे व ती सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. परंतु सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांनी तसे न करता कृषी उत्पन्न बाजार समितीकडे अर्ज हस्तांतर करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले आहे व त्यामुळे कृषी उत्पन्न बाजार समितीस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू नाही असे कारण देऊन त्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. वास्तविक जनमाहिती अधिकारी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम २ मधील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे कृषी उत्पन्न बाजार समिती कडून उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक झाले असते. कलम २ (च) यात "माहिती" याचा अर्थ, कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असा असून त्यामध्ये, अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सुचना इत्यादी आणि <u>त्या त्या वेळी अमलात असलेल्या कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती, याचा समावेश होतो.</u> कृषी उत्पन्न बाजार समिती ही महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी विक्री (विकास विनियमन) अधिनियम, १९६३ प्रमाणे कलम ११ प्रमाणे बाजार समित्या स्थापन करण्यात आलेली असतात. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संदर्भात नियंत्रण हे कलम ४० ते ४५ यामध्ये दिलेले आहे. कलम ४० मध्ये निरिक्षण, चौकशी, विवरणपत्रे इत्यादी सादर करणे मध्ये संचालकास किंवा त्याने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास (अ) बाजार समित्यांच्या

लेख्यांचे व कार्यालयाचे निरिक्षण करता येईल किंवा करविता येईल. (ब) बाजार समितीच्या कारभाराची चौकशी करता येईल. (क) जे विवरण, विवरणपत्र, लेखे किंवा प्रतिवृत्त पुरविण्याविषयी अशा समितीला सांगणे त्याला योग्य वाटेल असे कोणतेही विवरणपत्र, लेखे किंवा प्रतिवृत्त मागविता येईल. (ड) पुढील गोष्टी विचारात घेण्यास समितीला सांगता येईल - (एक) अशा समितीकडून किंवा वतीने जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल ती करण्याबाबत काही आहे असे त्याला वाटत असेल असा कोणताही आक्षेप, किंवा (दोन) तो पुरवू शकेल अशा ज्या कोणत्याही माहितीमुळे अशा समितीने एखादी गोष्ट करणे आवश्यक आहे असे त्याला वाटत असेल अशी कोणतीही माहिती, आणि अशी गोष्ट करण्याबद्दल आपली कारणे नमूद करुन त्याला एक लेखी उत्तर वाजवी मुदतीत देण्याविषयी समितीला सांगणे. (ई) उत्तराचा विचार चालू असतांना जी कोणतीही गोष्ट केली जाण्याच्या बेतात असेल किंवा करण्यात येत असेल अशी कोणतीही गोष्ट केली जाऊ नये आणि जी कोणतीही गोष्ट त्यांच्याकडून निदेश देण्यात येईल अशा मुदतीच्या आत केली पाहिजे. परंतु ती केली जात नसेल अशी कोणतीही गोष्ट केली पाहिजे असा निदेश देता येईल. "त्याने सामान्य किंवा विशेष आदेशाद्वारे प्राधिकृत केलेला...." या प्रकरणांची क्रमांक ४०, ४१(१) खालील संचालकाने चालवावयाचे अधिकार डिस्ट्रिक्ट डेप्युटी रजिस्ट्रार ऑफ को-ऑपरेटिव्ह सोसायटीज यांना वापरता येतील. (सरकारी ठराव नं. एपीएम १०६३/२७५४३ सी-१-ता. १५.९.६७) संचालकाने किंवा त्याने अधिकार दिलेल्या अधिकाऱ्यास अ, ब, क, ड, इ मध्ये विचारलेली माहिती न पुरविल्यास व सांगितल्याप्रमाणे कार्यवाही न केल्यास दोषी ठरविले असता अपराध चालू राहिल त्या प्रत्येक दिवसास पराकाष्ठा ५००/- रुपये पर्यंतची शिक्षा होऊ शकेल. तसेच कलम ४१ मध्ये कलम ४० अन्वये बाजार समितीच्या कारभाराचे अन्वेषण करण्यात येईल किंवा कलम ४३ अन्वये अशा समितीच्या कामकाजाची तपासणी करण्यात येईल तेंव्हा अशा समितीच्या सर्व अधिकाऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी व सदस्यांनी समितीच्या कारभारासंबंधी किंवा कामकाजासंबंधी त्यांच्या कब्जात असलेली व संचालक, प्राधिकृत अधिकारी किंवा यथास्थिती, राज्य सरकारला जरुर असेल अशी माहिती पुरविली पाहिजे व त्याकरिता पोट कलम २ अन्वये कलम ४० अन्वये बाजार समितीच्या कारभाराचे अन्वेषण करणाऱ्या अधिकाऱ्याला किंवा कलम ४३ अन्वये अशा समितीच्या कामकाजाच्या तपासणी करणाऱ्या राज्य सरकारला, दिवाणी व्यवहार संहिता, १९०८ अन्वये दिवाणी न्यायालयाच्या बाबतीत ज्या उपायाची व रीतीची तरतुद केली आहे त्याच उपायांची व शक्य असेल तितपत त्याच रितीने बाजार समितीच्या अधिकाऱ्याला समन्स काढून हजर राहण्यास भाग पाडण्याची व तसेच त्याला पुरावा देयास व दस्तऐवज दाखल करण्यास भाग पाडण्याची शक्ती असेल अशी तरतुद केलेली आहे. तसेच कलम ४१(अ) मध्ये समिती इत्यादींने संमत केलेला ठराव किंवा काढलेला आदेश यांच्या अंमलबजावणीस मना करण्यास संचालकांना अधिकार दिलेला आहे. कलम ४२ मध्ये लेखापुस्तके आणि दस्तऐवज जप्त करणे असा अधिकार दिलेला आहे. तसेच कलम ४६ ते ५२(ब) व विशेषतः कलम ४० ते ४३ च्या संदर्भात उल्लंघन केल्यास शास्ती करण्याचे सुध्दा अधिकार दिलेले आहेत. "संचालक" म्हणजे, महाराष्ट्र राज्याचे कृषी पणन संचालक म्हणून नियुक्त केलेली व्यक्ति कलम २(१) मधील (फ) तरतुद करण्यात आलेली आहे. यावरुन शासनाचे तसेच संचालकाचे व उपनिर्दिष्ट सहकारी संस्था यांचे कृषी उत्पन्न बाजार समितीवर संपूर्ण नियंत्रण असून त्यांना कृषी उत्पन्न बाजार समिती कडून सर्व प्रकारची माहिती उपलब्ध करुन घेता येते. अन्यथा शास्तीचे सुध्दा अधिकार आहेत. त्यामुळे वरील "माहिती" या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती माहिती उपनिर्दिष्ट कृषि उत्पन्न बाजार समिती खरेदी विक्री (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ च्या तरतुदीप्रमाणे उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यास पुरविल्यास त्याचीही माहिती या व्याख्येत समाविष्ट होते.

४. यासर्व विवेचनावरुन व अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक यांना माहिती मागितली असल्यामुळे सहाय्यक निबंधक यांनी अपीलकर्ता यांना मागितलेल्या माहिती संबंधात कृषी उत्पन्न बाजार समिती कडून उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक झाले असते व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक उपनिबंधक, सहकारी संस्था यांनी कृषि उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांचेकडून मागितलेली माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य व्यक्तिशः पुरविण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) कृषि उत्पन्न बाजार समिती, आर्वी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नसेल तर वरील संदर्भीय अधिनियमाप्रमाणे त्यांचेवर कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल.

३) अपीलकर्ता यांनी माहिती व्यक्तिशः मागितलेली असल्यामुळे त्यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत जनमाहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था यांचेकडे व्यक्तिशः संपर्क साधून सदरची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घेऊन पोच द्यावी.

४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७३/२०१०.

श्री. विचित्रकुमार दिगंबरजी कटेर,
मु. डोंगरगांव, पो. चिखली,
ता. तिरोडा, जि. गोंदिया - ४४१ ९११. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक व्यवस्थापक,
दि गोंदिया डिस्ट्रीक सेंट्रल को-ऑप. बँक लि.
दुर्गा चौक, ता. जि. गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
दि गोंदिया डिस्ट्रीक सेंट्रल को-ऑप. बँक लि.
दुर्गा चौक, ता. जि. गोंदिया.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २५.२.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा संचालक व्यवस्थापक, दि गोंदिया डिस्ट्रीक सेंट्रल को-ऑप. बँक लि. यांचेकडे दिनांक २६.७.२००९ रोजी झालेल्या लेखी परीक्षेचा संपूर्ण निकाल गुणासहित व निवड झालेल्या उमेदवारांची यादी व तोंडी परीक्षेत दिलेल्या गुणांची संपूर्ण उमेदवारांची यादी मिळण्याबाबत. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ४.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाचे दृष्टिने त्यांचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे व ते आज गैरहजर असल्यामुळे त्यांना कारणे दाखवा नोटीस काढणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे शासनाच्या नियमांचे व अधिनियमाचे तरतुदीचे उल्लघंन केलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक ४.१.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने माहिती ही विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ४.१.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्ती कां लादण्यात येऊ नये याबाबत खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत करण्यात यावा. अन्यथा त्यांचे विरुध्द शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

.

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७१/२०१०.

सौ. रंजना पवनकुमार बडाले,
अरुणोदय बिल्डिंग, रिसामा,
ता. आमगांव, जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. टी. पी. फुंडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
श्री. विद्या गर्ल्स हायस्कूल, सातगांव (साकरीटोला)
ता. सालेकसा, जि. गोंदिया.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. मुनघाटे, उपशिक्षणाधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२ अपीलकर्ती यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री विद्या गर्ल्स हायस्कूल, सातगांव (साखरीटोला) यांचेकडे वर्ष १९९२-९३ ते वर्ष १९९५-९६ या कालावधीतील एकूण ७ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १३.२.२०१० रोजी अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ती यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे दिनांक १८.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले व प्रथम अपीलामध्ये शाळेकडून जी माहिती प्राप्त झाली त्या माहितीमध्ये संपूर्ण माहिती मिळाली नाही व ती मिळावी असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अर्जदारास नेमकी कोणती माहिती मिळाली नाही दिनांक २२.३.२०१० च्या पत्रानुसार विचारणा करण्यात आली. त्यावर त्यांनी २ मुद्यांची माहिती मिळाली नाही

दिनांक ३१.३.२०१० च्या पत्रानुसार कार्यालयास कळविले. परंतु त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती अपूर्ण आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, त्या प्रभारी मुख्याध्यापक आहेत व शाळेच्या कार्यालयामध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु तरीही अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे कार्यालयात माहितीच ठेवत नाही व त्यामुळे ती उपलब्ध करुन देऊ शकत नाही. असे असले तरी अपीलकर्ती यांनी त्यांना उपलब्ध न झालेल्या माहितीकरिता सदरच्या संस्था/शाळेच्या कार्यालयातून अभिलेख्याचे निरिक्षण करणे संयुक्तिक राहिल व निरिक्षणा अंती ज्या कागदपत्राची आवश्यकता आहे त्याच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्यावी त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक यांनी कामकाजाचे दिवशी तारीख व वेळ लेखी पत्राने कळवून त्या दिवशी उपस्थित राहून अभिलेखाचे निरिक्षण करावे व आवश्यक असतील त्या माहितीचे छायांकित प्रती उपलब्ध करुन घ्याव्यात.

२) अपीलकर्ती यांनी लेखी कळविल्यावर प्रभारी मुख्याध्यापक तथा माहिती अधिकारी यांनी संपूर्ण अभिलेखे अपीलकर्ती यांच्या निरिक्षणाकरिता उपलब्ध करुन देण्यात यावी व त्यातून अपीलकर्ती यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य पुरविण्यात याव्यात.

३) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७६/२०१०.

श्री. व्ही. बी. गणवेणवार,
उपसभापती,
ग्राम शिक्षण समिती, कारवाफा,
ता. धानोरा, जि. गडचिरोली.

श्री. बी. डी. मडावी,
निलंबित उच्चश्रेणी मुख्याध्यापक,
पंचायत समिती, चामोर्शी, जि. गडचिरोली. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोंली.

श्री. सुधाकर सुखदेवराव अभ्यंकर,
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, गडचिरोली.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ते व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे श्री. एस. पी. मेश्राम, पदविधर शिक्षक यांच्या विरुध्द ग्रामशिक्षण समिती, कारवाफा तथा गावकऱ्यांचे तक्रार अर्जावरुन चौकशी अधिकाऱ्याने केलेल्या चौकशीचा अहवाल व अभिप्रायाची साक्षांकित प्रत (दिनांक १३.५.२००८). श्री. बी. डी. मडावी, उच्चश्रेणी मुख्याध्यापक यांना ज्या प्राप्त तक्रारीच्या आधारे निलंबन आदेश पारित केले त्यांचे पुरावे व चौकशी अहवालाच्या साक्षांकित प्रती. सदरची माहिती प्रत्यक्षरित्या अर्जदारास ४८ तासाचे आंत घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु ४८ तासाचे आंत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना ४८ तासाचे आंत माहिती मागितली होती त्यांना ती उपलब्ध झाली नाही. ४८ तासांचे आंत माहिती कशाकरिता हवी असे विचारले असता त्यांनी न्यायालयामध्ये प्रकरण दाखल करावयाचे होते असे त्यांचे म्हणणे आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १९.३.२०१० रोजी सदर अर्ज हा दोघांच्या नावाचा संयुक्त असल्याचे दिसून येते, तेंव्हा फक्त एकाच अर्जदाराचे नांव नमुद करुन माहिती मागावी. दुसऱ्या अर्जदारास माहिती हवी असल्यास त्यांनी वेगळा अर्ज करुन रुपये १०/- कोर्ट फी स्टॅम्प लावावा असे कळविले व त्यावर अर्जदार ४८ तासात प्रत्यक्ष या कार्यालयास माहिती घेण्यास उपस्थित न झाल्याने माहिती पत्र पोस्टाने रवाना करण्यात येत आहे. दिनांक २३.३.२०१० व ५:३० मिनिट नमुद केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचे निर्णयाशी सहमत होऊन प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही. यावरुन अपीलकर्ता यांना निवड तांत्रिक कारणासाठी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांचा समज एकाच व्यक्तिने अर्ज करावा व तशी तरतुद असल्यामुळे त्यांनी तसे कळविले असे आयोगास सांगितले. माहिती उपलब्ध आहे व देण्यास अडचण नाही असेही आयोगास सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत त्यांच्या दिनांक १७.३.२०१० च्या अर्जातील माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात दोन्ही अर्जदारास विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७७/२०१०.

श्री. गुलाबराव राघोबाजी जुनोनकर,
मासुम आखाडयाजवळ, अंचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. किशोर गांधी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर.

श्री. अ. श्रा. चहांदे,
नगर रचनाकार,
नगर परिषद, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर परिषद कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे गैरअर्जदार श्री. श्यामसुंदर राघोबाजी जुनोनकर हयांनी कपाऊंड भिंतीवर विटाचे पीलर्स उभे करुन जागा न सोडता उभारलेले अवैध बांधकाम संदर्भामध्ये नगर परिषदेद्वारा गैरअर्जदाराला जारी केलेली नोटीस क्र. चनप/नर/१६०/२००९, दिनांक २५.५.२००९ व त्यानंतर दिनांक २७.७.२००९ ला जारी केलेले

प्रारंभ प्रमाणपत्र व त्यात प्रकर्षाने दिलेली ताकीद अर्जदाराने यापुर्वी बरीच निवेदने दिली आहेत. तरी त्या अनुषंगाने नगर परिषदेद्वारा गैरअर्जदाराचे विरोधात करण्यात आलेल्या कारवाईची माहिती. कारवाई स्थगित ठेवली असल्यास त्याची कारणे हया विषयी माहिती कृपया देण्यात यावी. सदरची माहिती शिघ्र डाकेने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१२.२००९ रोजी मुद्या क्रमांक १ च्या संदर्भात नोटी दिल्यानंतर गैरअर्जदाराने मंजूरी घेतल्यामुळे गैरअर्जदाराचे विरोधात कार्यवाही करण्यांत आलेली नाही. कार्यवाही विषय माहिती मागणे माहिती अधिकारात अभिप्रेत नाही असे कळविण्यात आले व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १२.१.२०१० रोजी देण्यात आला असून गैरअर्जदार श्री. श्यामसुंदर राघोबाजी जुनोनकर यांना अवैध बांधकाम प्रकरणी कार्यालयाचे नोटीस दिनांक २५.५.२००९ चे संबंधात कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची स्वयंस्पष्ट माहिती जनमाहिती अधिकारी यांनी या आदेशापासून ३ दिवसांचे मुदतीत विनामुल्य अपीलार्थीस पुरविण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक १८.१.२०१० रोजी क्रमांक चनप/ममाअनि-०५/माअ/२०१०/६५२ अन्वये माहिती पुरविलेली आहे. त्यानंतर दिनांक ११.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे दिनांक ९.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. पुन्हा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. तरीही अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना जी माहिती दिनांक २१.१२.२००९ रोजी देण्यात आली ती माहिती अर्धवट व अपूर्ण देण्यात आलेली आहे. गैरअर्जदाराने मंजूरी घेतल्यामुळे गैरअर्जदाराचे विरोधात कार्यवाही करण्यात आलेली नाही अशी जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे त्यामुळे त्यांचे म्हणणे असे आहे की, गैरअर्जदारावर कार्यवाही करण्यात आली होती ती अर्धवट कार्यवाही करण्यात आली होती व जी गैरअर्जदाराने मंजूरी घेतली आहे ती कंपाऊंड करीत घेतली आहे. ती पिलर्स न काढता तसे कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी गैरअर्जदारास दिलेली नोटीस ही सादर केलेली आहे व त्या नोटीसातच सदर बांधकाम परवानगी ही फक्त कंपाऊंड वॉलसाठी आहे. त्यात बजावलेली बांधकाम नोटीस क्रमांक चनप/नर/१६०/२००९, दिनांक २५.५.२००९ ची कायम राहिल. याचा अर्थ जी अवैध बांधकामा विरुध्द कार्यवाही आहे ती नोटीस कायम ठेवण्यात आलेली आहे व त्यामुळे कार्यवाही अपूर्ण आहे व माहिती उपलब्ध करुन दिली असे झालेले नाही. अपीलकर्ता यांना प्रत्यक्ष अवैध बांधकाम पाडून माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित आहे असे दिसून येते. परंतु माहितीच्या अधिकारामध्ये जी कार्यवाही झालेली आहे ती आदेशाची माहिती मिळते व बांधकाम परवानगी देतांना प्रारंभ पत्रावरुन मुद्या क्रमांक ३४ प्रमाणे स्पष्ट होते. प्रथम अपीलात जरी झालेल्या कार्यवाहीची स्वयंस्पष्ट माहिती द्या याचा अर्थ आधिची माहिती ही चुकीची दिली आहे असे होत नाही. त्या संदर्भातील कागदपत्रे दिली नाही असे म्हणता येईला व ती कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्यानंतरही अनेक अर्जाचे माध्यमातून अपीलकर्ता यांनी माहिती मागितली आहे व ती माहिती त्यांना वेळोवेळी उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. मुख्याधिकारी यांनी आयोगास भिंत्तीच्या कामाचे फोटो दाखविले त्यात पिल्लर व टिनाचे शेड दिसून येत नाही. याचा अर्थ ते काढण्याची माहिती देण्यात आलेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता  व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५७५/२०१०.

श्री. दिगांबर सिताराम नेवारे,
मु. तुळशी, पो. विसोरा,
ता. वडसा, जि. गडचिरोली. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
ता. भामरागड, जि. गडचिरोली.

श्री. एम. एल.मद्देर्लवार,
जनमाहिती अधिकारी तथा,
अध्यक्ष/सचिव,
धर्मराव शिक्षण मंडळ, अहेरी,
स्थित - नागेपल्ली (आश्रम विभाग)
जि. गडचिरोली.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## निर्णय

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अध्यक्ष/सचिव, धर्मराव शिक्षण मंडळ, अहेरी यांचेकडे सन १९९९ ते २००३ या कालावधीतील लेखा परिक्षणाचे विवरण (ऑडीट स्टेटमेंट) व इतर ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड, जि. गडचिरोली यांनी राजे धर्मराव शिक्षण मंडळ, अहेरी यांच्या अध्यक्षांना माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र दिले व त्यात टपाल खर्च घेऊन त्यांना आवश्यक ती माहिती तात्काळ देण्यात यावी व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. त्यानंतर दिनांक २४.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी झेरॉक्स खर्च ६००/- रुपये व टपाल खर्च २५०/- रुपये असे एकूण ८५०/- रुपये संस्थेचे

सचिव यांचे नावाने मनिऑर्डर पाठविला. परंतु सदर मनिऑर्डर स्विकारण्यास अध्यक्ष/सचिव तयार नसल्यामुळे मनीऑर्डर मला परत करण्यात आले. यावरुन माहिती देण्यास टाळाटाळ करीत आहेत अशी त्यांनी तक्रार केली. दिनांक २३.४.२०१० रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, भामरागड यांनी राजे धर्मराव शिक्षण मंडळ, अहेरी यांना पत्र देऊन दिनांक २४.२.२०१० रोजी पुन्हा आपल्या कार्यालयामध्ये परत पत्र पाठविलेले दिसून येते. अपीलकर्ता यांचे कडुन खर्चाची रक्कम वसुल करुन त्यांनी मागितलेली माहिती देता येईल असे आदेश दिले. त्याप्रमाणे दिनांक ८.६.२०१० रोजी आयोगाकडे खुलासा करतांना अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.१२.२००९ रोजीच्या पत्राद्वारे आणि दुरध्वनीद्वारे प्रत्यक्ष येऊन दस्तऐवज घेऊन जाण्यास सुचविले व संस्थेच्या नावे रुपये ६००/- जमा करावे असे सुचविले. परंतु अपीलार्थी यांनी प्रत्यक्ष येण्यापेक्षा पोस्टाद्वारे कागदपत्र पाठविण्याचा अट्टहास केलेला असल्याने अपीलार्थी यांनी जर पोस्टाचा खर्चासहित झेरॉक्सचा खर्च डिमांड ड्रॉफ्टद्वारे संस्थेच्या नावे (सचिव, धर्मराव शिक्षण मंडळ, अहेरी येथे) पाठविले तर ही रक्कम संस्थेच्या नावे असलेल्या बँकेच्या खात्यात जमा होईल व संस्था ताबडतोब मागणी केलेले दस्ताऐवज पोस्टाद्वारे पाठविण्याची व्यवस्था करील असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर दिनांक १५.१२.२००९ रोजी पुन्हा त्यांना स्मरणपत्र दिलेले दिसून येते.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही. परंतु माहिती व्यापक प्रमाणात असल्यामुळे छायांकित प्रतीचा खर्च येईल व तसे त्यांना मुदतीत खर्चाचा भरणा करण्यास कळविले होते व त्यामुळे आता सुध्दा त्यांनी खर्चाचा भरणा केल्यास संपूर्ण माहिती उपलब्ध करुन देता येईल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत किंवा प्रत्यक्ष खर्चाचा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. माहिती न दिल्यास किंवा अपूर्ण दिल्यास जनमाहिती अधिकारी हे जबाबदार राहतील व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ३६२/२०१०.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी विकास भवन, गिरीपेठ, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ५.५.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर होते. परंतु त्रयस्थ पक्षाची माहिती असल्याने त्रयस्थ पक्षास दिनांक ८.६.२०१० रोजी उपस्थित राहण्यास नोटीस काढली मात्र आज अपीलकर्ता व उत्तरवादी हे गैरहजर आहेत. त्रयस्थ पक्ष श्री. बाबा गणपत कुमरे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांचेकडे श्री. बाबा गणपत कुमरे यांचे संदर्भात दिलेल्या वैधता प्रमाणपत्र दिले त्या संदर्भातील कागदपत्रांची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.१२.२००९ रोजी त्रयस्थ पक्षाची माहिती असल्यामुळे श्री. बाबा गणपत कुमरे यांना विचारणा केली होती व त्याची प्रत दिनांक ९.१२.२००९ अन्वये त्यांनी कोणत्याही प्रमाणपत्राची कागदपत्रे त्यांना देण्यात येऊ नये असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती देण्यास नाकारलेले दिसून येते. श्री. बाबा गणपत कुमरे यांच्या पत्राची छायांकित प्रत सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. त्याचप्रमाणे श्री. बाबा गणपत कुमरे यांचे नस्तीचे अवलोकन केले असता दक्षता पथकाचे चौकशी झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे कागदपत्रे देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलाचे संदर्भामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना माहिती उपलबध करुन दिली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे त्रयस्थ पक्षाची विचारणा करण्यात आली होती. तरी सुध्दा पुन्हा अधिनियमाचे कलम १९(४) अन्वये आयोगाने सुध्दा त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ऐकून घेणे बंधनकारक असल्यामुळे श्री. बाबा गपणत कुमरे यांना नोटीस काढावे असे आदेश दिले होते. त्याप्रमाणे श्री. बाबा गणपत कुमरे यांनी आयोगाकडे दिनांक ८.६.२०१० रोजी त्यांचे लेखी म्हणणे सादर केलेले आहे. ते खालील प्रमाणे आहे. "उपरोक्त आपले संदर्भीय पत्र क्र. ४ चे अनुषंगाने सेवेशी सादर करण्यांत येते की, श्री. मनोहर धकाते हे प्रत्येक कार्यालयातून मुळ आदिवासी कर्मचाऱ्यांचे/अधिकाऱ्यांचे जातीचे प्रमाणपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र जातवैधता प्रमाणपत्र मुळसेवा पुस्तकाच्या पहिल्या पानाची छायांकित प्रती माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत मागवून त्यांचा खालील नमूद केल्याप्रमाणे सुडबुध्दीने दुरुपयोग करीत असतात. १) मुळ आदिवासी कर्मचारी/अधिकाऱ्यांना मानसिक त्रास देणे. २) कर्मचारी/अधिकाऱ्यांना धमकावून हल्ला करणे. ३) ब्लॅंकमेलींग (हर्रास) करणे. ४) अवास्तव पत्र व्यवहार करुन कार्यालयाचा वेळ घालविणे. ५) जातीवाचक शिवीगाळ करणे. संबंधितांनी ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर या कार्यालयातून खालील नमुद केलेल्या कर्मचारी/ अभियंत्याकडून उपनिर्देष्ट कागदपत्रे मागविलेले आहेत. (जानेवारी २००९) १) श्री. बाबा गणपतराव कुमरे (स्वतः) अर्जदार. २) श्री. जगन्नाथ चिंधुजी आत्राम (शाखा अभियंता). ३) श्री. पांडूरंग दौलत मडावी (अनुरेखक). श्री. धकाते यांनी वरील कर्मचाऱ्यांना मानसिक छळ करण्याचा प्रयत्न केलेला आहे. ज्याअर्थी श्री. मनोहर धकाते हे हलबा जातीचे नसून, त्यांची मुळ जात कोष्टी आहे. कोष्टी ही जात विशेष मागास प्रवर्गामध्ये मोडते. तथापी संबंधितांनी जातीचे खोटे कागदपत्र तयार करुन तसेच आदिवासी हलबा समाज समितीचे बोगस लेटर पॅड तयार करुन सुडबुध्दीने दस्ताऐवज मागवून मुळ आदिवासी समाजातील कर्मचारी/अधिकाऱ्यांना मानसिक त्रास देण्यांचा नियमित धंदा करीत आहेत. ज्याअर्थी श्री. मनोहर धकाते हे अनुसुचित जमातीच्या संवर्गात मोडत नाहीत. त्याअर्थी संबंधितांना मुळ आदिवासी अधिकारी/कर्मचाऱ्यांचे वैयक्तिक जातीविषयक दस्ताऐवज मागण्यांचा मुळीच अधिकार नाही. नुकतेच माहिती आयोगाने याबाबत दखल घेतलेली आहे व तसेच आकाशवाणी (रेडिओद्वारे) जे लोक माहितीच्या अधिकाराच्या अधिनियमांतर्गत माहिती मागवून दुरुपयोग करतात किंवा मानसिक छळ करतात. तसेच ब्लॅकमेलींग करतात अशा बोंगस आदिवासी नेत्यांना कोणत्याही कर्मचाऱ्यांचे अथवा अधिकाऱ्यांची माहिती देण्यात येऊ नये असे स्पष्ट मार्गदर्शन दिलेले आहे. तेव्हा श्री. मनोहर धकाते यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी सादर केलेल्या अर्जानुसार माहितीचा अधिकार अधिनियमांतर्गत माझ्या जातीविषयक संपूर्ण दस्ताऐवज, समितीने पारित केलेले आदेश तथा दक्षता पथकाचा अहवाल संबंधितांना देण्यात येऊ नये. संबंधित बोगस लोकांनी अनेक ठिकाणी मुळ आदिवासी कर्मचाऱ्यांवर सुडबुध्दीने व तसेच केवळ आक्सापोटी नियोजित हल्ले केलेले आहेत. त्यामुळे त्यांचेकडून माझ्या जिवीतास धोका निर्माण झालेला आहे. भविष्यात देखील धोका निर्माण होऊ शकतो. कृपया श्री. धकाते यांना जबाबदार धरुन अनुसुचित जाती जमाती अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधीतावर अक्ट्रॉसिटी लावण्यांत यावी. श्री. पी. डी. मडावी, अनुरेखक, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांना अनुसुचित जमाती जात पडताळणी समिती, गडचिरोली या कार्यालयाकडून जातीचे वैधता प्रमाणपत्र दिलेले असल्यामुळे श्री. धकाते यांनी त्यांचे जातीविषयक दस्ताऐवज मिळण्यासाठी अर्ज केलेला होता. तथापी श्री. मडावी यांनी संबंधितांचे संपूण कुटुंबीयांचे जातीविषयक दस्ताऐवज दिल्यावर श्री. धकाते यांनी त्यांचे जातीविषयक संपूर्ण दस्ताऐवज त्यांना देवू न शकल्यामुळे माहिती अधिकारी, अनुसुचित जमातीचे

जात पडताळणी समिती, गडचिरोली या कार्यालयाने श्री. मडावी यांचे जात तपासणी विषयक दस्ताऐवज संबंधितांना दिले नाही. सबब आपले सेवेशी विनंती करण्यांत येते की, श्री. मनोहर धकाते यांनी खालील नमूद केलेले जातीविषयक आवश्यक दस्ताऐवज उपलब्ध करुन दिल्यास माझे जातीविषयक तपासणी दस्ताऐवज देण्याबाबत विचार करता येईल. १) श्री. मनोहर धकाते यांची स्वतःचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र साक्षांकित (वर्ग १० वा). २) जातीचे प्रमाणपत्र साक्षांकित प्रत. ३) जात वैधता प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत. ४) मुलांचे शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र/जातीचे प्रमाणपत्र/जात वैधता प्रमाणपत्र. ५) जातिविषयक १९५० पुर्वीचे दाखल्याची साक्षांकित प्रत. (ज्यामध्ये जातीचा स्पष्ट उल्लेख केलेला आहे). अ.क्र. १ ते ५ मधील अंतर्भुत दस्ताऐवज श्री. धकाते यांनी उपलब्ध करुन न दिल्यास संबंधितांनी त्यांचे संदर्भीय क्र. १ या अर्जानुसार मागणी केल्यानुसार व तसेच माझी जातीविषयक वैयक्तिक माहिती असल्यामुळे संबंधितांच्या अर्जात अंतर्भुत असलेली माहिती त्यांना कोणत्याही परिस्थितीत उपलब्ध करुन देऊ नये".

४. त्रयस्थ पक्ष यांनी त्यांचे स्पष्ट माहिती देण्याबद्यलचे जे आक्षेप घेतले आहेत ते स्वयंस्पष्ट असल्यामुळे सदरची माहिती उपलब्ध करुन देण्यामध्ये कोणते सार्वजनिक हित आहे असे दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५८५/२०१०.

श्री. ज्ञानेश्वर भाऊरावजी माकोडे,
संत तुकाराम वार्ड, रामनगर,
ता. जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. आ. डो. पेंदाराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भूमी अभिलेख, वर्धा.

श्री. पी. एन. मळके,
जनमाहिती अधिकारी तथा,
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख, वर्धा यांचेकडे एकूण ७ मुद्यांमध्ये वर्धा शहर शिट नं. १ ड, न.भु.क्र. ५०८ चे फेरफार क्रमांक ९६५५ व ९६५६ चे स्वयंसूची धारिकेची सत्यप्रतची व त्या अनुषंगाने माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३१.१०.२००९ रोजी मुद्या क्रमांक १, २, ४, ५ व ६ ची माहिती कार्यालयात उपलब्ध आहे. आपण कार्यालयीन वेळेत समक्ष कार्यालयात येऊन नियमानुसार नक्कल फी भरणा करुन नक्कल प्राप्त करुन घ्यावी. मुद्या क्रमांक ३ ची धारिका कार्यालयात आढळत नाही त्यामुळे त्याचा नक्कला आपणास पुरविता येत नाही व मुद्या क्रमांक ७ ही बाब या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.१.२०१० रोजी दिलेला असून उपलब्ध असलेली माहिती अपीलकर्ता यांना पुरविली असून मुद्या क्रमांक ३ ची माहिती

फेरफार क्रमांक ९६५५ व ९६५६ च्या मुळ धारीकाचा शोध घेऊन अर्जदारास ३० दिवसांत माहिती पुरविण्यात यावी व त्याबाबत इकडील कार्यालयास ज्ञात करावे असा आदेश दिलेला दिसून येतो. त्यानंतर सुध्दा नस्ती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांना वेळोवेळी कळविण्यात आलेले आहे. तसेच पोलीस स्टेशन, वर्धा यांचेकडे दिनांक ३१.५.२०१० रोजी अज्ञात इसमावर गुन्हा दाखल करण्यात यावा असे कळविलेले दिसून येते व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, तत्कालीन अधिकारी यांनी २००९ मध्ये सदरच्या धारीकेवरुन नोंद घेतली असून त्यावर तशी नोंद केलेली आहे. त्यामुळे सदरची धारिका उपलब्ध आहे. परंतु उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ करीत आहेत असे दिसून येते. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते आताच नवीन आलेले आहे व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जो निर्णय दिलेला आहे त्या निर्णयामध्ये कोणतेही तथ्य नाही. जनमाहिती अधिकारी यांनी पुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक ३ चीच माहिती उपलब्ध करुन दिली नाही इतर मुद्या क्रमाक ७ वगळता दिलेली आहे. सदरचे पत्र सुध्दा देता येईल. माहिती अधिकारी यांनी सांगितले की, या धारिकेचा कसून शोध केला परंतु उपलब्ध झाली नाही. वास्तविक अधिक्षक, जिल्हा भुमी अभिलेख यांनी सदरची धारिकाची जबाबदारी स्विकारुन ती शोध घेण्याकरिता अत्यंत कठोर उपाय योजना केलेली दिसून येत नाही. तसे त्यांनी केलेले दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना आता पर्यंत माहिती मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी सदरची धारिका उपलब्ध होण्याकरिता सखोल चौकशी करावी व सखोल चौकशी अंती जबाबदारी निश्चित करुन संबंधित कर्मचाऱ्यां विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे करिता अधिक्षक, भुमी अभिलेख तसेच तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांनी रितसर चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी व संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करावी व धारिका उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन द्यावी व तसे न केल्यास तत्कालीन तालुका निरिक्षक, भुमी अभिलेख यांचे विरुध्द तसेच भूमी अभिलेख कार्यालय प्रमुख म्हणून अधिक्षक, भूमी अभिलेख यांचे विरुध्द महाराष्ट्र पब्लीक रेकॉर्ड ॲक्ट, २००५ च्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची शासनास शिफारस करण्यात येईल यांची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५८६/२०१०, अपील क्रमांक ५८७/२०१०, अपील क्रमांक ५८८/२०१० व अपील क्रमांक ५८९/२०१०.

श्री. इंदरसिंह हि. परिहार,
१८२, हनुमाननगर, सरकारी गोडाऊनच्या समोर,
पुलगांव, जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. अजित देशमुख,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक, (उच्च शिक्षण),
जुने मॉरिस कॉलेज इमारत, सिताबर्डी,
नागपूर.

श्री. बी. आर. पनपालिया,
जनमाहिती अधिकारी तथा,
प्राचार्य,
सुवालाल पाटणी कॉलेज, पुलगांव,
जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये चार द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी म्हणून सुवालाल पाटणी महाविद्यालय, पुलगांव यांचेकडे

... २ ...

दिनांक १८.११.२००९ रोजी, दिनांक १७.११.२००९ रोजी, दिनांक १७.११.२००९ व दिनांक १६.११.२००९ रोजी असे एकूण ४ अर्जाचे माध्यमातून वर्ष १९९८ ते वर्ष २००८-०९ पर्यंत सुवालाल पाटणी महाविद्यालयाचे वार्षिक लेखा अहवाल संबंधी माहिती. प्राचार्य श्री. बी. आर. पनपालिया की मान्यता के लिये राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ को जो प्रस्ताव विद्यापीठ को भेजा गया है उसकी माहिती, महाविद्यालयाची इमारत जी भाडयाने घेतली त्याचे वार्षिक भाडे व भाडे कोण घेतो याबद्यल प्रमाणित प्रती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच १ सप्टेंबर २००९ ते अर्जाचे तारखेपर्यंत प्राचार्य बी. आर. पनपालिया ने पाटणी महाविद्यालय के कर्मचारी प्रा. एस. एस. मिश्रा व श्री. बी. एस. रामटेके इनको माहे सप्टेंबर २००९ ला पगार दिला. परंतु इतर कर्मचाऱ्यांना पगार दिला नाही याबाबतचे कारण मागितलेले दिसून येते. तसेच १ ऑक्टोंबर २००९ ते आज पर्यंत प्राचार्य सुवालाल पाटणी कॉलेजने माहे ऑक्टोंबर २००९ का पगार किया उसमे १० प्रतिशत डी.ए. जोडकर किया गया पर मुझे प्रा. परिहार १० प्रतिशत का आधा डी.ए. दिया गया (निलंबन) काल का तो वो डी.ए. का १० प्रतिशत का आधा व एच.आर.ए. का आधा कौन से आधार पर दिया गया सहसंचालक, उच्च शिक्षण द्वारा कोई पत्र या आदेश याबाबतची माहिती. तसेच मार्च २००४ से शितकालीन परिक्षा २००९ तक सुवालाल पाठणी कॉलेज के विद्यार्थी कला व वाणिज्य व खाजगी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ केंद्र क्र. ८३५ की ग्रीष्मकालीन व शितकालीन विद्यापीठ परिक्षा बसलेल्या विद्यार्थ्याची एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सर्व अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक १९.१२.२००९ रोजी १ प्रथम अपील व दिनांक २३.१२.२००९ रोजी ३ प्रथम अपीले दाखल केलेली आहेत. चारही प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२०१० रोजी देण्यात आला असून प्राचार्यांनी मुदतीत माहिती दिली नाही ती देण्याबाबत प्राचार्यांना सांगण्यात आले व प्राचार्यांनी ते मान्य केले. माहिती उशिरा दिल्यामुळे शास्ती लागल्यास त्याची जबाबदारी प्राचार्यांची राहिल असा निर्णय दिलेला दिसून येतो. अपीलकर्ता यांना दिनांक १४.१.२०१० रोजी पत्र दिले होते त्यात माहिती उपलब्ध करुन दिली नाही व त्यामुळेच प्रथम अपीलाचे निर्णयात त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिली नाही असा उल्लेख आलेला दिसून येतो.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या सर्व अर्जाचे संदर्भात त्यांना दिनांक १४.१.२०१० रोजी व दिनांक ३०.१२.२००९ रोजी पत्र दिलेले आहेत. परंतु त्यातही माहिती पुरविता येत नाही अशा प्रकारचे पत्र आहे. त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे प्रथम अपीलात म्हटले व प्रथम अपीलाचे निर्णयात आलेले आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिले आहेत व शास्ती लागल्यास त्याची जबाबदारी प्राचार्यांची राहील असेही त्यांनी आदेशात म्हटले आहे. जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या मागितलेल्या माहितीचा काहीही संबंध नाही व ते त्रास देण्याच्या उद्येशाने माहिती मागत असतात. त्याकरिता त्यांनी अपील क्रमांक ५८९/२०१० मध्ये खुलासा दाखल करतांना आयोगाचे निदर्शनास असे आणले की, श्री. आय. एच. परिहार हयांनी महाविद्यालयाचे विद्यार्थ्याबाबत विचारलेली माहिती ही पुर्वीपासूनच ठेवण्यात येत नाही. याची पुरेपुर जाणकारी व कल्पना श्री. आय. एच. परिहार हयांना व त्यांचे वडील जे याच महाविद्यालयाचे माजी प्राचार्य श्री. एच.बी. परिहार यांना आहे. (आय. एच. परिहार यांचे वडील) सन २००३ पासून सेवानिवृत्त झालेले आहेत. म्हणून श्री. आय. एच. परिहार यांनी सन १९९४ ते शितकालीन परिक्षा २००३ या कालावधीबाबतचे आपणाकडे जाणीवपुर्वक द्वितीय अपील अर्ज सादर केलेला नाही आणि हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याच्या उद्येशानी तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यांची दिशाभूल करण्याच्या हेतुने फक्त मार्च २००४ ते शितकालीन परीक्षा २००९ या कालावधीची विद्यार्थ्यांबाबतच द्वितीय अपील अर्ज आपले समक्ष सादर केले आहे. त्यांनी त्यांचे वडीलांचे कालावधीतील म्हणजे मार्च १९९४ ते शितकालीन २००३ पर्यंतची माहितीबाबत आपणाकडे द्वितीय अपील सादर कां केले नाही यावरुनच स्पष्ट दिसते की, त्यांना माहिती आहे की, सदर प्रकारची माहिती महाविद्यालयात उपलब्ध नाही. जी माहिती त्यांचे वडील प्राचार्य असतांना पासूनच ठेवतच नव्हते करिता पुढेही ती ठेवण्यात

आली नाही. करिता त्यांनी विचारलेली माहिती पुरविणे शक्य नाही असा खुलासा सादर केलेला आहे. अपील क्रमांक ५८८/२०१० मधील मागितलेली माहिती आयोगाचे निदर्शनास आणून अपीलकर्ता हे निलंबीत प्राचार्य आहेत असे जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास सांगितले.

४. जनमाहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक ५८९/२०१० मध्ये केलेला खुलासा व अपील क्रमांक ५८८/२०१० मध्ये अपीलकर्ता यांचे निलंबन आयोगाचे निदर्शनास आणल्यामुळे असे दिसून येते की, अपीलकर्ता यांना निलंबित केल्यामुळे अपीलकर्ता हे सर्व माहिती त्रास देण्याच्या उद्येशाने मागत आहेत. त्याकरिता अपीलकर्ता यांनी आयोगास मागितलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये सार्वजनिक हीत काय आहे असे विचारले असता अपीलकर्ता यांनी आयोगास असे सांगितले की, सन १९९८ पासून या महाविद्यालयामध्ये घोटाळे आहेत. परंतु अपीलकर्ता यांनी मागितलेल्या सर्व माहितीचे स्वरुपावरुन असे दिसून येते की, सदरची माहिती ही सार्वजनिक हिताचे दृष्टिने मागितलेली नसून त्यांचे निलंबन झाले म्हणून महाविद्यालयास वेठीस धरण्याचे दृष्टिने मागितलेली दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांची शास्तीची विनंती मान्य करता येत नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीचा वापर हा अशा प्रकारे कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणास वेठीस धरण्यास गैर आहे व त्या कोणतेही सार्वजनिक हित नसून स्वहित आहे अशा प्रकारे त्रास देणे गैर नाही. तरीही असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले असल्यामुळे या सर्व प्रकरणामध्ये अपीलकर्ता यांना त्यांनी मागितलेली माहिती ही निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची अपील क्रमांक ५८६/२०१०, अपील क्रमांक ५८७/२०१०, अपील क्रमांक ५८८/२०१० व अपील क्रमांक ५८९/२०१० ही सर्व अपीले मान्य करण्यांत येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत त्यांच्या सर्व अर्जावरील माहिती विनामुल्य व्यक्तिशः छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) त्याकरिता अपीलकर्ता यांनी हा निर्णय मिळाल्यावर २० व्या दिवशी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे व्यक्तिशः उपस्थित होऊन ४ ही अर्जाची माहिती विनामुल्य छायांकित प्रतीच्या स्वरुपात उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९०/२०१०.

श्री. विनोद विश्वनाथ भोयर,
ढोर दवाखान्याजवळ, नगीनाबाग वार्ड नं. १,
जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एस. गव्हाणकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. व्ही. एन. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा,
शाखा अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा द्वारा मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे हनुमान कंस्ट्रक्शन व तिरुबालाजी यांचे दिनांक ७.४.२००८ च्या तक्रारीवर चौकशी करुन आवश्यक कारवाईचे आदेश दिल्याचे संदर्भात मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांच्या दिनांक ७.१०.२००९ च्या पत्राची व आयुक्त, नागपूर यांचे दिनांक २९.१०.२००९ च्या पत्राची झेरॉक्स प्रत द्यावी. हनुमान कंस्ट्रक्शन व तिरुबालाजी कंस्ट्रक्शन, चंद्रपूर यांनी दिनांक ७.४.२००८ च्या तक्रारीच्या संदर्भातील कार्यवाहीची माहिती द्यावी. माहितीचा कालावधी एप्रिल २००७ ते ३१ डिसेंबर २००९ माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २१.१.२०१० रोजी अतिरिक्त खर्चाचेकरिता रुपये ६/- चा भरणा करावा व मुद्या क्रमांक २ च्या संबंधाने मागितलेली माहितीची नस्ती कार्यवाही करिता मुख्य

कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे पाठविण्यात आली असल्याचे संबंधित टेबलचे वरिष्ठ सहाय्यक यांनी कळविलेले आहे असे अपीलकर्ता यांना कळविलेले आहे. परंतु मद्या क्रमांक २ ची माहिती न मिळाल्यामुळे अपीलकर्ता यांनी उपमुख्य कार्यपालन अधिकारी, यांचेकडे प्रथम अपील दिनांक ८.२.२०१० रोजी दाखल केले व त्यानंतर प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २६.२.२०१० रोजी पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, चंद्रपूर कार्यालयाकडून कार्यवाही सुरु असल्यामुळे व अंतिम निर्णय व्हायचा असल्यामुळे त्याबाबतचे कारवाई अहवालाची झेरॉक्स प्रत सध्या देता येणार नाही. कार्यवाही प्रस्ताव प्राप्त होताच आपणास तारीख देऊन बोलाविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. द्वितीय अपीलाचे सुनावणीस अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना मुद्या क्रमांक १ ची माहिती मिळाली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, आता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे सदरच्या निर्णयातील आदेश झाले असल्यामुळे संबंधित नस्ती उपलब्ध झाली आहे व त्यातून माहिती अपीलकर्ता यांना दिनांक ५.६.२०१० रोजी देण्यात आली आहे ती सुध्दा अपीलकर्ता यांना उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अपेक्षित अशी माहिती त्यात नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे माहिती ही जशी उपलब्ध आहे तशीच पुरविणे अपेक्षित आहे. अर्जदाराचे मनात निर्णय जसा व्हावयास पाहिजे तशी अपेक्षित माहिती नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळाली आहे. अपील निर्णयाचे संदर्भात तक्रार असल्यास ती स्वतंत्रपणे सक्षम अधिकारी यांचेकडे करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९६/२०१०.

श्री. संदेश पंढरी रामटेके,
रा. मोहबाळा, पो. सुमठाणा,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर. .....
**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, भद्रावती,
जिल्हा चंद्रपूर.

श्री. व्ही. डी. धुर्वे,
जनमाहिती अधिकारी तथा,
ग्रामसेवक,
ग्राम पंचायत कार्यालय, मोहबाळा,
ता. भद्रावती, जि. चंद्रपूर.
**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. सी. पी. सोनवणे, कक्ष अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत मोहबाळा

यांचेकडे माझी लघु पाणी पुरवठा योजना मोहबाळा येथे निवड केल्याची साक्षांकित प्रत देण्यात यावी व वेतना संदर्भामध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २६.३.२०१० रोजी अपीलकर्ता यांना १५ दिवसांत माहिती पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु तरीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे किंवा माहिती कोणत्या तारखेला केला होता अर्जदाराने सुध्दा सांगितले नाही व त्यामुळे त्यांनी माहिती केंव्हा मागितली व काय माहिती मागितली याबद्दल काहीही सांगता आलेले नाही फक्त माहिती मिळाली नाही एवढेच त्यांनी सागितले. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहिती तयार होती. ती ग्रामपंचायत शिपाई तर्फे अपीलकर्ता यांचे घरी पाठविली होती. परंतु अर्जदार घरी मिळाले नाही. त्याकरिता त्यांना दिनांक ११.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी दिलेल्या पत्राची प्रत व त्यावर श्री. हरीदास रावजी तराळे, शिपाई यांनी शेरा दिलेला दिसून येतो. प्रथम अपीलाचे निर्णयानंतर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे दिसून येत नाही व प्रथम अपीलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११.१.२०१० चे पत्राचे उल्लेख दिसून येत नाही. अपीलकर्ता यांनी व्यक्तिशः माहिती मागितली परंतु ते माहिती घेण्यास गेले नाही. ग्राम पंचायत कार्यालय कायम बंद असते असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता दिसून येत नाही. कारण त्यांना त्यांच्या वेतनाकरिता मा. लोकआयुक्त यांचेकडे लेखी तक्रार केली होती व त्याप्रमाणे दिनांक ३.५.२०१० ला रक्कम मिळाली. थोडक्यामध्ये त्यांना माहितीपेक्षा वेतन हवे होते. त्यामुळे त्यांनी माहिती मागितली होती ते मिळाली असली तरी अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितलेली आहे ती त्यांना जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे समोर दिलेली आहे. त्यामुळे अपील हे निकाली काढण्यात येते.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९८/२०१०.

श्री. सुनिल भोजराज खत्री,
मु. पो. मुल, वार्ड नं. १५,
ता. मुल, जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, मुल
जिल्हा चंद्रपूर.

श्री. का. मा. रामटेके,
जनमाहिती अधिकारी तथा,
वरिष्ठ लिपिक,
नगर परिषद, मुल,
ता. मुल, जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. रमेश मोहुर्ले, कनिष्ठ अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, मुल यांचेकडे नगर परिषदने दिनांक ९.११.२००९ ला वार्ड नं. १५ मधील श्री. कुलदीप अवझे, श्री. आबाजी बावनवाडे, श्री. दामोधर निंबेकर, श्री. बालगोविंद आदे, चिंचोळकर यांना अवैध बांधकामाचे संदर्भात दिनांक २६.१०.२००९ रोजी दिलेल्या नोटीसच्या संदर्भात कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. तसेच किती दिवसात अतिक्रमण हटवून येण्याजाण्याचा मार्ग मोकळा करुन देणार आहात त्याची तपशीलवार माहिती देण्यात यावी व दिनांक ११.१.२०१० ला व दिनांक १६.१.२०१० च्या अर्जावर काय कार्यवाही केली हयाची माहिती मागितलेली दिसून येते. विहित

मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल करण्यात आलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. परंतु ते व्यक्तिशः माहिती घेण्यास गेले असता त्यांना आता पर्यंत कोणत्याही प्रकारची माहिती दिली नाही किंवा काय कार्यवाही केली याबद्यल सुध्दा पत्र व्यवहार केला नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २६.३.२०१० रोजी माहितीच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता श्री. आर. व्ही. मोहुर्ले, (जे.ई. रोज.) सहाय्यक जनमाहिती अधिकारी, नगर परिषद, मुल यांचेकडे माहिती उपलब्ध करुन द्यावी असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यांचेकडून माहिती उपलब्ध झ ााली नाही व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. मात्र मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी दिनांक २९.९.२००९ रोजी श्री. बालगोविंद आदे, दिनांक २६.१०.२००९ रोजी श्री. कुलदीप अवझे, दिनांक ९.११.२००९ रोजी श्री. बालगोंविद आदे, श्री. आबाजी बावनगडे, श्री. कुलदीप अवझे, श्री. दामोधर निंबेकर, दिनांक १३.११.२००९ रोजी श्री. गणेश नारायण गुरलुने, श्री. मारोतराव आडकुजी लेनगुरे व श्री. महादवे विठोबाजी चौधरी यांना अतिक्रमण काढण्याचे संदर्भामध्ये नोटीस दिली व कार्यालयामध्ये हजर व्हावे असे त्यांनी नोटीस दिलेले दिसून येते. परंतु अद्याप पर्यंत या सर्वांनी कोणत्याही प्रकारचे कागदपत्रे आणून दिलेली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, नगर परिषदेने बांधकामाची परवानगी दिली असली तरी त्याबद्यलची कोणत्याही प्रकारची कागदपत्रे दिली नाही व आता पर्यंत केलेल्या कार्यवाहीचा पत्र व्यवहार सुध्दा त्यांचेशी केलेला नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी तसेच श्री. आर. व्ही. मोहुर्ले हे दोषी आढळून येतात व अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे शास्तीस पात्र आहेत. जनमाहिती अधिकारी यांना माहितीचा अर्ज दिनांक १७.२.२०१० रोजी व दिनांक २६.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता श्री. पी. पी. भडके, लिपिक व श्री. आर. व्ही. मोहुर्ले, कनिष्ठ अभियंता यांचेकडे पाठविलेला होता. याचा अर्थ माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता कनिष्ठ अभियंता यांचे सहाय्य घेतले आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ५(४) प्रमाणे माहिती अधिकारी इतर अधिकारी व कर्मचारी यांचे सहाय्य माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता घेता येते व कलम ५(५) प्रमाणे ज्या अधिकाऱ्यांचे किंवा कर्मचाऱ्यांचे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता सहाय्य घेण्यात आलेले आहे ते अधिकारी व कर्मचाऱ्यास जनमाहिती अधिकारी समजण्यात येते व त्यामुळे कनिष्ठ अभियंता यांचे कार्यालयातून माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही म्हणून जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. आर. व्ही. मोहुर्ले, कनिष्ठ अभियंता हे दोषी आढळून येतात व शास्तीस पात्र आहेत. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून, अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने झालेल्या कार्यवाहीची कागदपत्रे छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तिशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरिता व्यक्तिशः अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून झ ालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य उपलब्ध करुन घ्यावी व पोच द्यावी.

२) अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.२.२०१० अर्जाचे अनुषंगाने अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. आर. व्ही. मोहुर्ले, कनिष्ठ अभियंता (रोज.) सहाय्यक माहिती अधिकारी यांनी अद्यापपर्यंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये २५०००/- शास्ती अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये लादण्यात येते.

३) सदरच्या शास्तीची वसुली मुख्याधिकारी, नगरपरिषद, मुल, जि. चंद्रपूर यांनी श्री. आर. व्ही. मोहुर्ले, कनिष्ठ अभियंता यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाचा निर्णय दिला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे व त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

५) सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>विभागीय आयुक्त, प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावे.

६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९९/२०१०.

श्री. आनंद रामभाऊ चिमूरकर,
रा. भानापेठ, वार्ड नं. २,
पोलीस लाईन जवळ, ता. जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

जनमाहिती अधिकारी तथा,
अधिक्षक,
शिक्षण विभाग (माध्यमिक),
जिल्हा परिषद, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत व माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. एच. पी. रॉय, सहाय्यक शिक्षण उपनिरिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २७.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, शिक्षण विभाग (माध्यमिक), जिल्हा परिषद, चंद्रपूर यांचेकडे वर्ग ११ मध्ये प्रवेश दिल्यामुळे त्यांना नियमबाहय रक्कमेची मागणी करीत असल्याबाबत दिलेली तक्रार दिनांक ८.१.२०१० ची तथा याविषयाचे संबंधाने दिलेली यापुर्वीची तक्रार दिनांक १६.१०.२००९, दिनांक १२.१०.२००९ व दिनांक २६.१०.२००९ ला दिलेल्या तक्रार संबंधात केलेली चौकशी अहवालाची प्रत मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ३०.१.२०१० रोजी आपण दाखल केलेल्या तक्रारीचे अनुषंगाने चौकशी होणे बाकी असल्यामुळे आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. चौकशी पूर्ण झाल्यानंतर आपणास प्रत पुरविण्यात येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा

देण्यात आलेला दिसून येत नाही. परंतु अपीलकर्ता यांना दिनांक ९.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. तरीही अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी माहितीचा अर्ज केला त्यावेळेस त्यांना माहिती उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांनी तक्रारीचे वेळी चौकशीचा अहवाल मागितलेला आहे व त्यावेळेस तक्रारीची चौकशी झालेली नव्हती व म्हणून त्यांना तो अहवाल पुरविता आला नाही. मात्र चौकशी संपल्यानंतर अहवाल झाल्यानंतर तो त्यांना पुरविण्यात आलेला आहे. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरचा चौकशी अहवाल समाधानकारक नाही. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी प्रमाणे कोणतीही कार्यवाही करुन मिळत नाही व त्यामुळे चौकशी अहवाल जसा आहे तसा उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध झाली असे गृहीत धरण्यात येते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९५/२०१०.

श्री. बबन सदाशिव समर्थ,
शासकीय दुध डेअरी पुलाजवळ,
रैतवाडी मार्ग, इंडस्ट्रियल वार्ड नं. १६,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०१. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. ए. डी. पेंदराम,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक,
भुमी अभिलेख, चंद्रपूर.

श्री. एस. जे. गौर,
जनमाहिती अधिकारी तथा,
तालुका निरिक्षक,
भूमी अभिलेख, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून भुमी अभिलेख अधिकारी, तालुका चंद्रपूर यांना दिनांक १.१०.२००७ च्या पत्राचे संदर्भात कार्यवाहीची माहिती मागितली. तसेच पुन्हा ७ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.१२.२००९ रोजी त्यांच्या सर्व मुद्यांच्या संदर्भामध्ये उत्तरे देण्यात आलेली आहेत. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २१.१.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांनी त्यांच्या मागितलेल्या माहितीचे संदर्भात त्यांनी खरेदी केलेल्या जागेच्या फेरफाराबाबत अर्ज करण्यास सांगितले व त्यानंतरच मोजणी करुन देण्यात येईल. त्याकरिता मोजणीचा अर्ज करावा लागेल. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता हे गैरहजर असल्यामुळे त्यांचा माहितीचा अर्ज, प्रथम अपील तसेच द्वितीय अपीलातील मुद्यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना त्यांच्या घराची मोजणी करुन पाहिजे आहे. त्याकरिता तहसीलदार यांनी तालुका निरिक्षक, भूमी अभिलेख यांना दिलेल्या पत्रावर केलेल्या कार्यवाहीची माहिती त्यांनी मागितलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांनी त्यांचया मुद्यांच्या संदर्भात दिनांक २१.१२.२००९ रोजी सर्व माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांची मुळ मागणी ही मोजणी करुन नावाचे संदर्भात फेरफार करुन घ्यावयाचे संदर्भात आहे. परंतु त्यांना सर्व नियमाची माहिती सांगण्यात आली. त्यामुळे त्यांनी आधी तलाठी यांचेकडे अर्ज करावा. तलाठी यांनी फेरफार केल्यानंतर भूमी अभिलेख कार्यालयामध्ये संबंधित भुखंडाची मोजणी करुन घेता येईल व मोजणी करुन घेतल्यानंतरच फेरफार करावे लागते. परंतु तहसीलदार यांनी जे पत्र दिले आहे ते वस्तुस्थितीची जाणीव न करुन दिलेले आहे व संबंधित खात्याने त्रयस्थ माणसाचे नावाने मोजणी करुन देता येत नाही. अर्जदाराचे नातेवाईकाकडे घरात गेले असले तरी जो पर्यंत तलाठी यांचेकडे फेरफार होत नाही तो पर्यंत तो तलाठी यांचेकडे तो त्रयस्थ पक्ष आहे.

४. अपीलकर्ता यांच्या सर्व मुद्यांच्या संदर्भामध्ये कार्यवाही करुन मागितलेली आहे किंवा मार्गदर्शन करुन मागितलेली आहे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कार्यालयात उपलब्ध झालेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती पुरविणे अपेक्षित आहे. कोणत्याही प्रकारची कार्यवाही करुन मिळत नाही किंवा जनमाहिती अधिकारी यांचे कोणतेही मत किंवा अभिप्राय कोणत्याही प्रकारच्या संदर्भात अभिप्रेत नाही. त्यामुळे मुळातच अपीलकर्ता यांच्या माहितीच्या अर्जातील मागणी हे अधिनियमाचे तरतुदीप्रमाणे नसल्यामुळे व जनमाहिती अधिकारी यांनी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांना योग्य ते उत्तरे मुदतीत दिली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९७/२०१०.

श्री. विजय केशवराव चन्ने,
जामा मस्जीद जवळ, गांधी चौक,
ता. राजूरा, जि. चंद्रपूर - ४४२ ९०५. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. शेखर गुल्हाणे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, राजूरा,
जिल्हा चंद्रपूर.

श्री. प्रभाकर एच. रायपुरे
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक निरिक्षक,
नगर परिषद, राजूरा,
जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. अनिल गिरडकर, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, राजूरा यांचेकडे दिनांक २१.१.२०१० ला केलेल्या अर्जाची व अर्जामध्ये नमुद केलेले पत्र क्र. जा.क्र. डब्ल्यु.एस.एम.सी.आर./२४१५/२००१, दिनांक २४.१०.२००१ याबाबतची सविस्तर माहिती व कागदपत्राची प्रमाणित प्रत मिळण्याबाबत. माहितीच्या वर्णनामध्ये त्यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद, राजूरा यांनी दिनांक २४.१०.२००१ ला जैनुद्दीन जव्हेरी यांना दिले होते. सदरहु पत्राप्रमाणे जैनुद्दीन जव्हेरी यांनी सुधारित ले आऊट नकाशा तयार करुन नगर परिषदेला ओपन स्पेस म्हणून ८१७.१४ चौ.मीटर जागा उपलब्ध करुन दिली असल्यास त्यासंबंधी जैनुद्दीन जव्हेरी यांनी ओपन स्पेस हस्तांतर करण्याबाबत नगर परिषदेला करुन दिलेल्या करारनाम्याची सुधारित ले आऊट नकाशाची अर्जदाराने दिनांक २१.१.२०१० ला केलेल्या अर्जाची प्रमाणित प्रती व सविस्तर माहिती मिळण्याबाबत अशी माहिती मागितलेली दिसून येते. माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. अर्जाचे

अनुषंगाने अपीलकर्ता यांना खर्चाचा भरणा करण्यास कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी रुपये २०/- दिनांक ५.३.२०१० रोजी भरलेले दिसून येतात. परंतु त्यानंतर अपीलकर्ता यांना दिनांक ५.३.२०१० ला श्री. जैनुद्दीन जव्हेरी यांना दिलेल्या पत्राची सत्यप्रत तसेच सदर ले आऊटचे आदेशाची व मंजूर नकाशाची प्रत सोबत जोडली आहे. अर्जदाराने दिनांक २१.१.२०१० ला दिलेल्या अर्जाची सत्यप्रत सोबत जोडली आहे अशी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २४.१०.२००१ रोजी मुख्याधिकारी यांनी जैनुद्दीन जव्हेरी यांना दिलेल्या पत्राची प्रत त्यांनी उपलब्ध करुन दिली. परंतु ती प्रत त्यांचेकडेच आहे व ती त्यांना मागितली नाही. तसेच जैनुद्दीन जव्हेरी यांच्या दिनांक ७.७.२००० च्या मंजूर नकाशाची झेरॉक्स प्रत दिली ती सुध्दा त्यांचेकडे आहे व त्यांनी जी माहिती मागितली ती दिली नाही. त्यांना सुधारित ले आऊट नकाशा प्रत तसेच मुख्याधिकारी यांनी जैनुद्दीन जव्हेरी यांना दिनांक २४.१०.२००१ पत्र दिले त्या पत्राप्रमाणे करारनाम्याची प्रत मागितली. परंतु ती माहिती न देता ज्या माहितीच्या आधारे त्यांना जी माहिती मागितली तीच माहिती त्यास दिली. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाकडे असे सांगितले की, प्रथम अपील त्यांचेकडे सादर झाले नाही व त्यांनी सादर केले नाही. त्यांना त्यांनी निर्देश दिले आहे. त्यानंतर दिनांक २८.५.२०१० रोजी आपल्या समोर या कार्यालयाचे संपूर्ण मूळ रेकॉर्ड आपल्याला हव्या त्या माहितीकरिता उपलब्ध करुनदेण्यात येत आहे. तेव्हा आपल्या पसंतीनुसार हव्या त्या प्रती आपण घ्याव्यात. मुख्याधिकारी यांनी दिनांक २८.५.२०१० व दिनांक ३.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना पत्र देण्यात आलेले दिसून येते. याचा अर्थ अपीलकर्ता यांना काय माहिती मागितली आहे याबद्यल मुध्याधिकारी यांनी त्यांच्या माहितीचे आकलन करुन घेतले नाही किंवा त्यांचे आकलन झाले नाही. त्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती लादणे आवश्यक आहे. माहितीच्या अर्जाचे व्यवस्थित वाचन केल्यास माहिती काय मागितलेली आहे त्याबद्यलचे आकलन नाही साधारण बुध्दीच्या माणसाला होऊ शकते. परंतु या प्रकरणात तसे दिसून आले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध झाली असल्यास छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी व माहिती उपलब्ध झ ाली नसल्यास तसे स्वतंत्रपणे अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे.

२) जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिली असल्यामुळे याचा अर्थ माहितीच उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येत असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची रक्कमेची वसुली ही त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून करण्यात येऊन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९३/२०१० व अपील क्रमांक ५९४/२०१०.

श्री. मनोहर धकाते,
अंचलेश्वर वार्ड,
ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

सौ. वसुधा प्रभाकर नाईक
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपसंचालक (सं),
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपुर.

जनमाहिती अधिकारी तथा
संशोधन अधिकारी,
अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती,
आदिवासी भवन, गिरीपेठ, नागपुर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ५९३/२०१० मध्ये दिनांक २८.११.२००९ रोजी व अपील क्रमांक ५९४/२०१० मध्ये दिनांक ४.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा संशोधन अधिकारी, अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, आदिवासी विकास भवन, नागपूर यांचेकडे श्री. प्रकाश विठ्ठल मसराम, वरिष्ठ श्रेणी लिपिक, आकाशवाणी केंद्र, नागपूर व श्री. विनायक लक्ष्मणराव मसराम, वडगांव (खुर्द), पो. जुवाडी, ता.सेलू, जि. वर्धा यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०१० रोजी माहिती अधिकारी, अनुसुचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती, नागपूर यांनी वरील अपीलामध्ये नमूद केलेली सर्व माहिती दिली. मिळालेल्या माहितीमुळे माझे समाधान झाले. माझी

कोणतीही तक्रार नाही व ती मागे घेत आहे असे निवेदन राज्य माहिती आयोगास सादर केले असल्यामुळे सदरची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०४/२०१०.

सौ. ज्योती गौतम वानखेडे,
१५५, नझुल ले आऊट, बेझनबाग,
नागपूर. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. एन. बी. वटी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
जिल्हा चंद्रपूर.

श्रीमती मिना निखारे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा खनिकर्म अधिकारी,
जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचेकडे मे २००९ च्या वेतन पत्रक जोडपत्र-१ प्रमाणे श्री. गौतम वानखेडे, खनिकर्म निरिक्षक, चंद्रपूर व मी दिलेल्या दिनांक १५.४.२००९ च्या पत्रावर काय कार्यवाही झाली जोडपत्र २ व ३ प्रमाणे. माहिती स्पीड पोस्ट घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक २१.५.२००९ रोजी माहितीच्या अतिरिक्त खर्चाकरिता वेतन प्रमाणपत्र प्रतीसाठी रुपये २/- प्रत प्रमाणे शासकीय भरणा करण्यात यावा व माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल. त्याप्रमाणे अपीलकर्ती यांनी दिनांक २६.६.२००९ रोजी वेतन प्रमाणपत्र उपलब्ध करुन देण्यात आले आहे. परंतु मुद्या क्रमांक २ ची माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी दिनांक २०.१०.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १०.११.२००९ रोजी देण्यात आला असून जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, चंद्रपुर यांनी अपीलार्थीस मागितलेली माहिती न देता चुकीची माहिती पुरविलेली आहे. त्यामुळे त्यांना याद्वारे निर्देशित करण्यांत येते की, अपीलार्थीने

मागणी केलेली माहिती ७ दिवसांचे आंत विनाविलंब पुरविण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, मुद्दा क्रमांक १ ची माहिती मिळाली आहे. परंतु त्यांच्या दिनांक १५.४.२००९ च्या पत्रावर काय कार्यवाही झाली ही माहिती त्यांना अद्याप पर्यंत देण्यात आलेली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ती यांच्या दिनांक १५.४.२००९ चा अर्ज पृष्ठांकन करुन जिल्हाधिकारी कार्यालय आस्थापना शाखेकडे पाठविण्यात आलेला आहे. परंतु जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी माहिती प्राप्त करुन देण्याच्या संदर्भात कोणताही पाठपुरावा केलेला दिसून येत नाही असा निष्कर्ष अप्पर जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांनी काढलेला आहे. यावरुन जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी, चंद्रपूर यांनी अपीलकर्ती यांना मुद्दा क्रमांक २ ची माहिती उपलब्ध करुन घेण्याकरिता जिल्हाधिकारी, आस्थापना शाखा यांचेकडे पाठपुरावा करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना हा निर्णय मिळाल्यापासून जनमाहिती अधिकारी यांनी १० दिवसाचे आंत जिल्हाधिकारी कार्यालय आस्थापना शाखा, चंद्रपूर यांचेकडून दिनांक १५.४.२००९ च्या अर्जाचे संदर्भात झालेल्या कार्यवाहीची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. अन्यथा त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादण्यात येईल व त्याची संपूर्ण जबाबदारी जनमाहिती अधिकारी यांची राहिल.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०५/२०१०.

श्री. भगवान हरिचंद्रजी चांदेकर,
द्वारा - श्री हरी किराणा स्टोर्सच्या वर,
रुम क्र. २, ता. सावनेर, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. निलेश बुटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी,
पंचायत समिती, सावनेर,
जिल्हा नागपूर.

श्री. माणिक लक्ष्मण चिटकुलवार,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, माळेगांव टाऊन,
ता. सावनेर, जि. नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत माळेगांव यांचेकडे सेवक नाखले, मु. माळेगांव यांनी आपला प्लॉट राकेश पुरनसिंग याला विकला. त्याबद्यलची सर्व तपशीलवार माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १.२.२०१० रोजी माहिती गोळा करणे सुरु आहे. कृपया यासाठी आपणाकडून मुदत वाढवून देण्यात यावी. असे पत्र अपीलकर्ता यांना पाठविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांना सदरचे पत्र मिळाले नाही व ते सचिव, ग्रामपंचायत यांचेकडे परत आलेले आहे ते त्यांनी आयोगापुढे दाखविले. त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात माहिती मिळाली नाही व ती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे जनमाहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित झालेले नाही किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे सुध्दा उपस्थित झालेले नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी दिनांक २२.३.२०१० रोजी अर्ज हा ग्रामपंचायत, माळेगांव (टा.) पाठविण्यात येत

आहे असे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले. परंतु त्यानंतरही माहिती माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मागितलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची असल्यामुळे व ती ग्रामपंचायत मध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्रयस्थ पक्षाकडून मागवून उपलब्ध करुन देता आली असती व त्यामुळेच त्यांना मुदत वाढ मागितली होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांचे पत्र परत आल्यामुळे पुढील कार्यवाही केली नाही. आज आयोगाने सुध्दा श्री. भगवान हरिचंद्रजी चांदेकर द्वारा-श्री हरी किराणा स्टोर्सच्या वर, रुम क्र. २, ता. सावनेर, जि. नागपूर या पत्त्यावर नोटीस काढण्यात आली होती. परंतु ते आज हजर नाही व त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०३/२०१०.

श्री. देवराव गंगाराम डेकाटे,
मु. पो. सिर्सी, ता. उमरेड,
जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. प्रदीप डांगे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अतिरिक्त जिल्हाधिकारी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
ता. उमरेड, जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, ता. उमरेड यांचेकडे कु. नेहा व कांचन हिचे हलबा जातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता दिनांक २५.८.२००९ रोजी संदर्भ कागदपत्राची पुर्तता करुनही व दिनांक १.७.१९४९ चे हलबा असल्याबाबतचे शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र व इतर प्रमाणपत्र दाखल करुनही मला माझ्या मुलींची नावाने हलबा जातीचे प्रमाणपत्र कां देण्यात आले नाही व कायदयाने कायदेशीर व उचित कार्यवाही कोणती करण्यात आली याविषयी सविस्तरपणे माहिती सादर करण्यात यावी. सोबत अर्ज दिनांक २५.८.२००९ दाखल केला. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता अपीलकर्ता यांनी नायब तहसीलदार, उमरेड कडे जो अर्ज दाखल केला होता. ते प्रकरण नायब तहसीलदार, उमरेड यांचेकडून या कार्यालयास प्राप्त होऊन प्रकरणाचे अवलोकन केले असता त्याकरिता दिनांक ९.१२.२००९ रोजी मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिर्सी, ता. उमरेड यांना पत्राद्वारे कळविण्यात आल्यावर त्यांनी श्री. गंगाराम सुदाम डेकाटे यांचा शाळा प्रवेश निर्गम रजिस्टर व

दाखला खारीज रजिस्टरची प्रत जनमाहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी यांचे कार्यालयात सादर करण्यास कळविले होते. त्याअन्वये मुख्याध्यापक दिनांक ५.२.२०१० रोजी सदर अभिलेख या कार्यालयात सादर केला. या अभिलेखाची तपासणी केली असता त्यात हलबा कोष्टी (बिनकरी) असा जातीचा उल्लेख आहे. परंतु ही जात शासन निर्णय १९५० अनुसूचित जमातीत मोडत नसल्यामुळे आपणांस हलबा (अनुसूचित जातीचे) प्रमाणपत्र निर्गमित करता येत नाही. प्राथमिक शाळा सोडण्याचे दाखल्यावरुन त्यांची जात कोष्टी आहे असे समजते. शासन निर्णय १९९५ विशेष मागास प्रवर्गात कोष्टी ही जात असल्यामुळे त्यांना सदर प्रमाणपत्र मंजूर करण्याबाबतचा अर्ज नामंजूर करण्यांत येत आहे अशी माहिती दिली व त्यानंतर त्यांना प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपीलकर्ता यांना दिनांक १०.२.२०१० रोजीचे पत्र प्राप्त झाले नाही. त्यामुळे अपीलार्थीस सदर पत्राची छायांकित प्रत तात्काळ देण्यात आली. माहिती अधिकारी यांनी अपीलार्थीस माहितीच्या अर्जाचे अनुषंगाने कळविलेले उत्तर किंवा दिलेली माहिती योग्य आहे. माहितीचा अधिकार कायद्यात उपविभागीय अधिकारी, उमरेड यांनी उक्त निर्गमित केलेले रद्य केलेले जात प्रमाणपत्र योग्य की अयोग्य हे ठरविण्याचे अधिकार माहितीच्या अधिकार या कार्यालयास नाही. जात प्रमाणपत्रा विषयी त्यांना सक्षम प्राधिकारी यांचा निर्णय चुकीचा वाटत असले तर अपीलार्थीने जात पडताळणी समिती, समाज कल्याण कार्यालय, नागपूर येथे संपर्क साधता येईल. त्यामुळे अपीलार्थीची अपील खारीज करण्यात आलेली दिसून येते. त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना हया प्रकरणाच्या गुणवत्तेवर केला जनमाहिती अधिकारी हे गैरहजर आहेत. परंतु प्रथम अपीलीय अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी अर्जामध्ये जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भामध्ये उपविभागीय अधिकारी, उमरेड हे प्रमाणपत्र देऊ शकत नसल्यामुळे माहिती ही नायब तहसीलदार किंवा तहसीलदार यांचेकडे मागणे आवश्यक होते. परंतु उपविभागीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना प्रमाणपत्र मिळण्याचे दृष्टिने दिनांक ७.१२.२००९ रोजी व दिनांक ९.१२.२००९ रोजी अनुक्रमे तहसीलदार, उमरेड व मुख्याध्यापक, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, सिर्सी यांना पत्र देऊन संबंधित अभिलेख घेऊन उपस्थित राहण्यास कळविले व त्याप्रमाणे त्यांनी स्वतःच ती चौकशी करुन दिनांक १०.२.२०१० रोजी निर्णय पारित केलेला आहे. वास्तविक माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणी कार्यवाही करुन मागता येत नाही. या प्रकरणात उपविभागीय अधिकारी यांनी गुणवत्तेच्या संदर्भात कार्यवाही करुन निर्णय दिलेला दिसून येतो. अर्थात तो निर्णय अपीलकर्ता यांना मान्य नसल्यामुळे त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी, नागपूर यांचेकडे अपील दाखल करावे त्याप्रमाणे ९० दिवसांमध्ये अपील करणे आवश्यक होते. परंतु उपविभागीय अधिकारी यांनीच सर्व मुद्यांची सरमिसळ केली आहे व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी काहीही माहिती आहे असे दिसून येत नाही व त्यामुळे त्यास त्यांनी ३० दिवसांचे आंत विहित मुदतीत अपीलकर्ता यांना कोणतीही माहिती कळविलेले दिसून येत नाही. त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे. जेणे करुन त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी हया माहिती करुन घेणे भाग पडेल व त्याप्रमाणे ते माहिती अर्जाची कार्यवाही करतील अशी अपेक्षा करण्यास हरकत नाही. त्यामुळे सदरचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

# **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.१२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने विहीत मुदतीत म्हणजे ३० दिवसांमध्ये अपीलकर्ता यांना कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.

२) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही जिल्हाधिकारी, नागपूर यांनी करावयाची आहे व त्यामुळे सदरच्या निर्णयाची एक प्रती स्वतंत्रपणे **जिल्हाधिकारी, नागपूर** यांचेकडे पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०७/२०१०.

सौ. ज्योती दिलीप जारोंडे,
बी ३७८, योगेश्वरनगर,
दिघोरी, उमरेड रोड, नागपूर. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. नासीर खान,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
वाहतुक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. नासीर खान,
जनमाहिती अधिकारी तथा
वाहतुक अभियंता,
नागपूर महानगरपालिका, नागपूर .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २५.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वाहतुक अभियंता, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे वंश निमय इंफ्राप्रोजेक्ट प्रा.लि.कंपनीबाबत एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती साधे पोस्टने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध नाही असे ३ मुद्यांचे संदर्भात कळविलेले दिसुन येते. सदरच्या निर्णयाने

... २

समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १७.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ४.३.२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध असल्यास आठ दिवसात द्यावी असे आदेश दिलेले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, करार केलेला आहे. त्या कराराप्रमाणे काही अटी आहे त्या अटीप्रमाणे कार्यवाही झाली किंवा नाही अशी माहिती मागितलेली आहे. परंतु माहिती उपलब्ध नाही असे उत्तर दिलेले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ३ मुद्यांच्या संदर्भामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही झाली नाही म्हणून माहिती उपलब्ध नाही असे उत्तर देण्यात आलेले आहे. वास्तविक प्रथम अपील केल्यानंतर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती व अर्जदाराची अपेक्षा याबाबत छाननी करणे आवश्यक असते. परंतु तशी काहीही छाननी न करता व उत्तर काय दिलेले आहे हे न पाहता अपीलाचा निर्णय दिलेला दिसतो. माहिती उपलब्ध नाही असे जनमाहिती अधिकारी यांनी कळविल्यानंतर माहिती उपलब्ध असल्यास ८ दिवसांत देण्यात यावी अशा प्रकारचा निर्णय देण्यात काय अर्थ होता हे फक्त प्रथम अपीलीय अधिकारी यांनाच समजलेले दिसून येते. अपीलकर्ती यांनी जर योग्यरित्या माहिती मागितली असेल तर त्यांना योग्यरित्या माहिती देणे आवश्यक असते. अपीलकर्ती यांनी तक्रार दिली आहे काय दिली असल्यास त्याची प्रत द्यावी. तक्रार दिली नसेल तर प्रत देण्याची आवश्यकता नाही असे अपीलकर्ती यांना शंका राहिली नसती. परंतु कोणतेही कर्तव्य हे गंभीररित्या घ्यावयाचे नाही अशा प्रकारची प्रवृत्ती जनमाहिती अधिकारी तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची दिसून येते. असे असल्यामुळे अपीलकर्ती यांना दिनांक १०.३.२०१० रोजी आपण मागितलेली माहिती या विभागात उपलब्ध नाही असे त्यांनी पुन्हा कळविलेले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये किरकोळ अर्ज क्रमांक ४/२०१०.

श्री. नागोराव दशरथजी ठाकरे,
मु. वाघोडा (गुजरखेडी) मकान नं. ३८२,
ता. सावनेर, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांना अपील क्रमांक ३१/२००८ आदेश दिनांक २४.२.२००९ च्या संदर्भामध्ये नोटीस प्राप्त झाली नाही या कारणास्तव पुन्हा त्यांना त्यांचे म्हणणे ऐकून घेण्याची संधी देण्यात यावी असे म्हटल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकून घेतले. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध करुन दिली आहे व त्यानंतरही जी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यावरुन त्यांचेकडे माहिती उपलब्ध झालेली आहे व त्यामुळे सदरचा किरकोळ अर्ज हा खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६०६/२०१०.

श्री. शकील अहमद व. गुलाम रसूल,
पिली हवेली, ता. कामठी,
जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, कामठी
नागपूर.

श्री. जावेद अख्तर,
जनमाहिती अधिकारी तथा
कार्यकारी कर अधिक्षक,
नगर परिषद, कामठी,

जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ११.६.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ११.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने श्री. सुर्यवेशी, लिपिक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून नगर परिषद कार्यालय, कामठी यांचेकडे डॉ. ममता र. दुबे को शुक्रवारी बाजारी मे लिज की दुकान की माहिती मिलनेबाबत ४ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक १.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली. याचा अर्थ आयोगाने नोटीस काढल्यानंतर अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याची उपरती कार्यालयास झालेली दिसून येते. अन्यथा माहितीच्या अर्जा प्रमाणे ३० दिवसांत माहिती दिली नाही व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नसून जनमाहिती करिता हे दोषी आढळून येतात व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करणे आवश्यक आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

# <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जनमाहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या दिनांक १३.१.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरची शिस्तभंगाची कार्यवाही ही मुख्याधिकारी, नगर परिषद, कामठी यांनी करावयाची आहे.

२) प्रथम अपीलीय अधिकारी यांचे विरुध्द प्रशासकी कार्यवाही करण्यात यावी. त्याकरिता सदरच्या निर्णयाची एक प्रत **<u>विभागीय आयुक्त, प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन, नागपूर विभाग, नागपूर</u>** यांचेकडे स्वतंत्रपणे पुढील कार्यवाहीसाठी पोस्टाने पाठविण्यात यावी.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१५/२०१०.

श्री. राजेंद्र महादेव रामटेके,
मु. पो. करटी बुजरुक,
ता. तिरोडा, जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांच्या वतीने श्री. मांडवगडे, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे दिनांक २९.१०.२००२ रोजीचे बेकायदेशीर निलंबन मागे घेण्यात यावे म्हणून मुंबई उच्च न्यायालय नागपूर खंडपीठ अंतर्गत माझे रिट पि. स्टॅम्प क्र. २३७०८/०२, दिनांक २१.१२.२००२ अन्वये मला Suspension Revoke order किंवा Dismissal order from service आदेश देण्यात यावे. तसेच माहे नोव्हेंबर २००२ पासून किती, केंव्हा, कधी, कसे व कोणत्या पदस्थापने (Posting) वर केंव्हापर्यंत वेतन उचल केलेली आहे. त्याबाबतचे माहे नोव्हेंबर २००२ पासूनचे वेतन प्रपत्र आणि उपस्थिती हजेरीपट, तसेच सन २००२ नंतर जिल्हा परिषद, गडचिरोली अंतर्गत कार्यरत असणाऱ्या किती उच्चश्रेणी सहाय्यक शिक्षकांना महाराष्ट्र नागरी सेवा नियम अंतर्गत पदोन्नती देण्यात आली ते सध्या कुठे व कुठल्या पदावर आहेतत्र त्याबाबतची तपशील यादी पुरविण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे किंवा व्यक्तिशः उपरोक्त पत्त्यावर घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३०.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भात आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही.

आपणास हवी असलेली माहिती आपण संबंधित कार्यालयातून मागविण्यात यावी. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात माहितीचे स्वरुप प्रश्नात्मक असून अस्पष्ट आहे. तरीही सन २००२ नंतर सहाय्यक शिक्षक, उच्च श्रेणी या संवर्गातील कर्मचाऱ्यांना दिलेल्या पदोन्नतीबाबतची माहिती तयार करण्यांत आलेली आहे. सदरची माहिती आपण व्यक्तिशः स्विकारीत असल्यास रुपये २/- व नोंदणीकृत टपालाने आवश्यक असल्यास टपाल खर्च रुपये ३०/- असे एकूण ३२/- रुपयेची चलान भारतीय स्टेट बँकेत भरावे व चलानची मुळ प्रत या कार्यालयास सादर केलयास आपणास उपरोक्त विवरणापैकी अ.क्र. ३ मधील माहिती देण्यांत येईल असे कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी चलानद्वारे रक्कम जमा केली नाही. परंतु दिनांक २२.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने दिनांक २७.४.२०१० अन्वये मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना पुढील कार्यवाही करण्याचे आदेश दिले. पुन्हा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, गडचिरोली यांना माहिती देण्यास दिनांक ५.५.२०१० रोजी कळविण्यात आले. तसेच शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांचे कार्यालयाचे पत्र दिनांक १३.५.२०१० अन्वये सदर प्रकरण जिल्हा परिषद, गोंदियाचे आस्थापनेशी संबंधित नसून आपले जिल्हा परिषद, गडचिरोली संबंधित असल्यामुळे सदर प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना परत केले. त्यामुळे सदरचे पत्र दिनांक २०.५.२०१० ला प्राप्त झाले. तत्पुर्वी अपीलकर्ता यांनी द्वितीय अपील दाखल केले होते.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना Dismissal order from service पाहिजे किंवा Suspension Revoke order सक्तीने सेवानिवृत्त केल्याचे आदेश दिले नाही हे योग्य नाही त्यामुळे इतर माहितीच्या संदर्भामध्ये त्यांना फारसा रस नसल्यामुळे ते पैसे भरुन माहिती घेण्यास गेले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यास मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे आदेश क्रमांक/जिपग/शिवि/स्था-३/५४९/०५, दिनांक ८.४.२००५ अन्वये सेवेतून सक्तीने सेवानिवृत्त केल्याने संबंधितांनी मागणी केलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. त्यामुळे यासंबंधीचे आदेश पुरविण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. वेतन पत्रक व हजेरी पत्रक हे संबंधित शाळेमध्ये उपलब्ध असते. उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) कार्यालयात उपलब्ध नसतात व त्यामुळे तसे त्यांना कळविण्यात आले होते व मुद्या क्रमांक ३ ची माहिती त्यांनी स्वतःच घेतली नाही असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांची अपेक्षा अशी दिसून येते की, गुणवत्तेच्याबाबत तपासणी होईल व त्यांना हवे ते आदेश देण्यात यावे. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत चौकशी करता येत नाही किंवा त्या प्रकारचे आदेश देता येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१२/२०१०.

कु. माया दुर्योधन बोपचे,
मु. डोंगरगांव, पो. कट्टीपार,
ता. आमगांव, जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया.

जनमाहिती अधिकारी तथा
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गोंदिया. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती हे हजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक ६.१०.२००८ रोजी जनमाहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे प्राथमिक शिक्षण सेवक भरतीबाबत शैक्षणिक सत्र २००३-०४ बाबत माहिती टपालाद्वारे मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक १६.१.२००९ रोजी ४९ पृष्ठासाठी रुपये २/- प्रमाणे ९८/- रुपये तसेच टपाल खर्च ५०/- रुपये असे मिळून एकूण रुपये १४८/- चालानद्वारे भरण्यात यावे जेणे करुन आपणांस माहिती पुरविणे सोयीचे होईल असे त्यांना कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. परंतु अपीलकर्ती यांनी दिनांक ३.१.२००९ रोजी कक्ष अधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, अवर सचिव तथा माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांच्या अधिकार क्षेत्रातील असल्याने आपला अर्ज त्यांचेकडे कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे असे कळविलेले आहे. त्यानंतर अपीलकर्ती यांनी शिक्षण संचालनालय, पुणे यांचेकडून सुध्दा अर्ज केला होता व अधिक्षक तथा

माहिती अधिकारी शिक्षण संचालनालय (प्राथमिक) पुणे यांनी दिनांक १०.७.२००९ रोजी पुन्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे संपर्क साधावा असे कळविलेले दिसून येते. दिनांक ३०.९.२००९ रोजी माहिती पुरविण्यात आलेली आहे अशा प्रकारे अवर सचिव व शिक्षण संचालनालय यांचे पत्राचे अनुषंगाने त्यांना कळविलेले आहे. त्यावर अपीलकर्ती यांचे म्हणणे असे आहे की, त्यांच्यावर झालेला अन्याय दुर करण्याची विनंती आहे. परंतु राज्य माहिती आयोगास कोणत्याही प्रकरणात गुणवत्तेबाबत चौकशी करण्याची किंवा आदेश देण्याचे अधिकार नाही. त्यामुळे माहिती जशी आहे तशी उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे व अपीलकर्ती यांची कार्यवाहीची विनंती मान्य करता येत नसल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**<br>**राज्य माहिती आयुक्त,**<br>**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१६/२०१० व अपील क्रमांक ६१७/२०१०.

श्री. हिरामन पुनवदास धकाते,
साई माऊली सहकारी गृह निर्माण संस्था मर्या.
फुलचुर टोला (औद्योगिक प्रशिक्षण संस्था मागे),
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण अधिकारी,
ता. जि. गडचिरोली.

श्री. एस. के. अग्रवाल,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र,
ता.जि. गडचिरोली.

जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
औद्योगिक प्रशिक्षण संस्था,
ता. जि. गडचिरोली. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २५.३.२०१० व दिनांक ७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १४.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. आर. एम. बारापात्रे, प्रबंधक हे हजर आहेत.

... २

२.	अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, शासकीय तंत्र माध्यमिक शाळा केंद्र, गडचिरोली यांचेकडे दिनांक २.१.२००८ रोजी मुख्य लिपिक पदावर रुजू झालो. अद्याप स्थानिक बदली प्रवास भत्त्याची रक्कम अप्राप्त आहे. त्याकरिता एकूण ५ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. सदर माहिती पोस्टाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १२.११.२००९ रोजी माहितीचे खर्चाकरिता रुपये १४/- भरावे असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. परंतु संबंधितांनी आजतागायत रक्कम जमा केलेली नसल्यामुळे माहिती घेऊन गेले नाही. मात्र माहिती घेऊन न जाता परत अपील दाखल केलेले आहे. त्याप्रमाणे दिनांक १५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा देण्यात आलेला नाही. परंतु दिनांक १५.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अपीलाचे सुनावणीस हजर राहण्यास कळविण्यात आले असता दोन्ही तारखांना अपील साक्ष सुनवाई करिता हजर राहिलेले नाही. यावरुन आपणांस सदर माहिती प्राप्त करण्यांस काही स्वारस्य नाही असे दिसून येते. त्याकरिता अपील खारीज करण्यात आले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३.	दुसऱ्या अर्जामध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी माहिती अधिकारी तथा प्राचार्य, औद्योगिक प्रशिक्षण संस्था, गडचिरोली यांचेकडे दिनांक १२.१०.२००६ रोजी आपले संस्थेत रुजू झालो. अद्याप बदली प्रवास भत्त्याची रक्कम अप्राप्त आहे असे नमुद करुन इतर ४ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ५.१२.२००९ रोजी अतिरिक्त माहिती करिता व टपाल खर्च रुपये ५/- त्वरित कार्यालयात भरावे असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. सदरच्या माहितीमुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यानंतर द्वितीय अपील दाखल केले.

४.	अपीलकर्ता यांच्या दोन्ही अपीलामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले. परंतु ती चुकीची व त्यांचेवर अन्याय करणारी माहिती आहे असे सांगितले. त्यांची अपेक्षा त्यांच्यावर अन्याय दूर करावा असे दिसून येते. परंतु माहिती आयोगास कोणत्याही प्रकरणाच्या गुणवत्तेच्या संदर्भात निर्णय देण्याची किंवा तपासण्याचे अधिकार नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१३/२०१०.

श्री. श्रीहरी सदाशिव पाऊलबुधे,
राम मंदिर जवळ, वार्ड नं. २,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

श्री. राजनहिरे,
जनमाहिती अधिकारी तथा
जिल्हा गटसाधन,
उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, गडचिरोली.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १४.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १४.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २२.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा गटसाधन, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, गडचिरोली यांचेकडे जिल्हा परिषद शाळा, वेलतूर तुकुम शाळेचे किचनशेड बांधकामाची अंतीम शेष निधी मिळण्याबाबत एकूण २ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २१.५.२०१० रोजी उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) सर्व शिक्षा अभियान, जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली असून अपीलकर्ता यांनी आज दिनांक २४.५.२०१० ला वरील प्रमाणे माहिती मिळाली करिता लिहून देत आहे व पोच दिलेली आहे. तसेच दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांनी माहिती प्राप्त झाल्याने प्रकरण निकाली निघाल्याने प्रकरण मागे घेत असल्याबाबतचे निवेदन कार्यालयास सादर केले असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ५९१/२०१० व अपील क्रमांक ५९२/२०१०.

श्री. कवडू जनार्धन येनप्रेड्डीवार,
मु. पो. ता. मुल, जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गृह, तुरुंग, राज्य उत्पादन शुल्क व
कामगार राज्यमंत्री यांचे कार्यालय,
मत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
गृह, तुरुंग, राज्य उत्पादन शुल्क व
कामगार राज्यमंत्री यांचे कार्यालय,
मत्रालय, मुंबई - ३२.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गृहमंत्री यांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ३२.

जनमाहिती अधिकारी तथा
गृहमंत्री यांचे कार्यालय,
मंत्रालय, मुंबई - ३२. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १४.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची पुढील सुनावणी आज दिनांक १५.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. आर. आर. अवस्थी, वाचक हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. मडावी, पोलीस उपअधिक्षक हे हजर आहेत.

... २

... २ ...

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.७.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा राज्यमंत्री, गृह, तुरुंग, राज्य उत्पादन शुल्क व कामगार यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई तसेच जनमाहिती अधिकारी तथा गृहमंत्री, मंत्रालय, मुंबई यांचेकडे मुल पोलीस स्टेशनचे ठाणेदार मुळे यांना निलंबित करण्याबाबत व प्रभारी ठाणेदार रिजवी यांची बदली करण्याबाबत दिनांक १०.६.२००९ ला आपणाकडे निलंबितबाबत व बदलीबाबत अर्ज दिला होता. त्यावर आपण कोणती कार्यवाही केली त्याबाबत माहिती देण्याबाबत. माहिती पोस्टाने पाठवावे टपाल खर्च व सर्व खर्च भरण्यास तयार आहे असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.८.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात सुध्दा सुनावणी न घेतल्यामुळे किंवा निर्णय न दिल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी गृह राज्यमंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकडे दिनांक १०.६.२०१० रोजी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीची चौकशी न झाल्यामुळे त्यांनी माहितीचा अर्ज दोन्ही कार्यालयामध्ये सादर केला होता. परंतु त्यातूनही त्यांना कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, गृह राज्यमंत्री यांचे कार्यालयात माहिती अधिकारी नियुक्त केलेला नाही व त्यामुळे त्यांचे कार्यालयात जे अर्ज येतात ते अर्ज संबंधित अधिकाऱ्यांकडे पुढील कार्यवाहीसाठी हस्तांतर केले जातात. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांचा माहितीचा अर्ज दिनांक ५.८.२००९ रोजी मंत्री गृह यांचे कार्यालयातून पुढील कार्यवाहीसाठी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे यांचेकडे दिनांक ३१.८.२००९ रोजी प्राप्त झाला. तसेच अपीलकर्ता यांनी पोलीस महासंचालक यांचेकडे अर्ज केला होता व त्याअर्जानुसार दिनांक १४.७.२००९ रोजी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे चौकशी कामी प्राप्त झालेला होता. सदरच्या अर्जाची चौकशी पोलीस उपअधीक्षक (मुख्या.) चंद्रपूर यांचेकडून करवून घेऊन चौकशी अहवाल पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांना दिनांक १२.८.२००९ रोजी सादर करण्यात आलेला होता व गृहमंत्री यांचे स्विय सहाय्यकाकडे दिनांक ७.१०.२००९ रोजी सादर करण्यात आला होता. त्याप्रमाणे दिनांक २५.९.२००९ रोजी अर्जदाराला विषयांकित अर्जाची चौकशी पूर्ण करुन पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचेकडे चौकशी अहवाल सादर करण्यात आलेला आहे असे कळविण्यात आले होते. अर्जदारास चौकशीचे निष्कर्ष अगर चौकशीत काय निष्पन्न झाले हे कळविले नव्हते. परंत चौकशी पूर्ण करुन अहवाल मात्र कळविण्यात आला होता. आता मात्र पोलीस उपअधिक्षक (मुख्यालय) चंद्रपूर यांचे पत्र क्रमांक पोउपअधी(मु.)/मा.अ./१०-३४५ अन्वये दिनांक ११.६.२०१० रोजी चौकशी अहवालाची प्रत माहिती पुरविण्यात आलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे लेखी निवेदन दिले असून त्यामध्ये मागितलेली माहिती दिली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी गृहमंत्री यांचे कार्यालय, मुंबई व प्रथम अपीलीय अधिकारी गृहमंत्री कार्यालय, मुंबई यांचे विरुध्द शास्ती लादण्यात यावी अशी विनंती केलेली आहे.

४. अपीलकर्ता यांनी तक्रार अर्ज जरी मा. गृहमंत्री व मा. गृहराज्यमंत्री यांचे कार्यालयात दिला असला तरी मंत्री महोदयांचे कार्यालयामध्ये कोणत्याही प्रकारची कार्यवाही होत नाही. कोणत्याही प्रकारची कार्यवाही ही त्या त्या विभागातील अधिकारी किंवा कर्मचाऱ्यांकडे होत असते. त्यामुळे सदरची माहिती त्या त्या विभागास मागणे आवश्यक असते. दिनांक १०.६.२००९ रोजी अर्ज हा मा.गृहमंत्री, मा.गृहराज्यमंत्री यांचे कार्यालयात दिसून येतो. त्या कार्यालयात त्या कर्मचाऱ्यांनी पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांना पाठविलेला असल्यास त्याबाबतची प्रत अपीलकर्ता यांना देणे आवश्यक होते. म्हणून अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी तथा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचे कार्यालयात माहिती मागता आली असती. परंतु त्याबाबतचा कोणताही उल्लेख न करता माहिती अर्ज हा पोलीस अधिक्षक, चंद्रपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात

आलेला आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांच्या अर्जाचे संदर्भात चौकशी झालेली आहे व चौकशी अहवाल पोलीस महासंचालक, म.रा. मुंबई यांचेकडे पाठविलेला आहे असे कळविले होते. त्यावर कार्यवाही झाली होती. परंतु अपीलकर्ता यांना कळविले नसल्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली दिसून येते.

५. वास्तविक तक्रारदार यांनी तक्रार केल्यावर त्या तक्रारीचा निष्कर्ष त्या तक्रारदारास मिळणे आवश्यक असते. परंतु शासकीय कार्यालयामध्ये तक्रारदाराच्या तक्रारीवर काय निर्णय झाला हा त्या तक्रारदारास कळविण्यात येत नाही. त्यामुळे विनाकारण माहितीचे अर्ज वाढत असतात. वेळीच अधिकाऱ्यांनी अर्जदारास माहिती कळविल्यास माहितीच्या अर्जाची संख्या कमी होईल. दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलकर्ता यांना अहवालातील निष्कर्ष कळविण्यात आलेला आहे. परंतु अहवाल जर त्यांना संपूर्ण उपलब्ध करुन दिला असता तर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती. आता अपीलकर्ता यांना अहवालाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. विलंबाचे संदर्भात कोणत्याही प्रकरणावर चौकशी करुन माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नसते व चौकशी करण्याकरिता विलंब होत असतो. त्यामुळे विलंबाचा मुद्या हा निकाली निघतो. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना चौकशी अहवालाची प्रत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६१८/२०१०, अपील क्रमांक ६१९/२०१० व अपील क्रमांक ६२०/२०१०.

श्री. नितीन नारायण गायकवाड,
मु. पो. सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपूर - ४४१ २१४. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. बा. ह. पाटील,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. श्रावण राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. सी. एम. आरघोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी,
ता. उमरेड, जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १५.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलांची सुनावणी आज दिनांक १५.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

२.	अपीलकर्ता यांनी अनुक्रमे दिनांक २२.१२.२००९, दिनांक ११.१२.२००९ व दिनांक १५.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपुर यांचेकडे १) अर्जदाराने दिनांक १७.१२.२००९ रोजी अंडर पोस्टींग ऑफ सर्टिफिकेटद्वारे शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे मुख्याध्यापिकेस ओव्हर ड्रॉप्टवर स्वाक्षरी करण्याचे निर्देश देण्याबाबत अर्जदाराने अर्ज केला होता. त्या अर्जदाराच्या अर्जावर केलेल्या निर्णयासहित केलेली कार्यवाही, विविध पत्रव्यवहार व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी. २) अर्जदाराने दिनांक १८.२.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे भविष्य निर्वाह निधीचे खाते उघडण्याबाबत अर्जदाराने अर्ज केला होता. त्या अर्जदाराच्या अर्जावर घेतलेल्या निर्णयासहीत केलेली कार्यवाही, विविध पत्रव्यवहार व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी. ३) अर्जदाराने दिनांक २६.११.२००९ तसेच दिनांक ८.१२.२००९ रोजी मुख्याध्यापिका यांचेकडे ओडी फाईलवर सही न करण्याचे कारण कळविण्याबाबत अर्ज केला होता. त्या अर्जदाराच्या अर्जावर घेतलेल्या निर्णयासहीत केलेली कार्यवाही, विविध पत्रव्यवहार व इतर दस्तऐवजांच्या साक्षांकित सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांनी अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक २.१.२०१० रोजी मुख्याध्यापक, वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी, ता. उमरेड यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरिता व अर्जावर नियमानुसार कार्यवाही करुन देण्याकरिता हस्तांतर केलेला दिसून येतो. परंतु सदरच्या अर्जाचे मुद्यांवर अपीलकर्ता यांना विहित मुदतीत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.१.२०१० रोजी, दिनांक २१.१.२०१० रोजी व दिनांक २१.१.२०१० रोजी प्रथम अपील शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे दाखल केले. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला दिसून येत नाही. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २६.२.२०१० रोजी पुन्हा दिनांक १६.२.२०१० रोजी सुनावणी घेऊन निर्णय देण्यात आलेला असून आपल्या अर्जातील मुद्या माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही असे कळविलेले असल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की. त्यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. मुख्याध्यापिकेकडे कोणताही अर्ज सादर केला तरी ते कार्यवाही करीत नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती ही मुख्याध्यापक स्तरावर असल्यामुळे त्यांचेकडे हस्तांतर केला. मुख्याध्यापिका यांचे म्हणणे असे आहे की, अर्जदार नौकरी करण्यास अपात्र आहे. वारंवार आचारसंहितेचा भंग करुन मला शिस्तभंगाची कार्यवाही करण्यास तो प्रवृत्त करीत असतो. नितीन गायकवाड हा सर्व शिपायात कनिष्ठ आहे. त्यामुळे त्याने नायकाच्या आदेशाचे पालन करावे हे गृहीत आहे. परंतु नायकाला मोठया आवाजात दरडावून आदेशाची अवहेलना करणे म्हणजे पर्यायाने मुख्याध्यापकाच्या आदेशाचा भंग करण्याचे कृत्य करीत असतो. स्वतः जातीचा उल्लेख करुन ॲक्ट्रासिटी लावण्याचा धाक दाखविण्याचा प्रयत्न करतो. शाळेत आणि शाळेबाहेर मारझोड करतो त्यामुळे शाळेची आणि संस्थेची प्रतिमा डागाळते. सन २००३ पासून जया पोलीस तक्रारी झाल्या आहेत त्यांचा विचार करता हा कर्मचारी शाळेय आचार संहितेच्या दृष्टिकोनातून नौकरी करण्यास अपात्र आहे. महाराष्ट्र राज्य खाजगी सेवा शर्ती नियमावली १९८१(२८)५(अ,ब,क,ड) अन्वये मी ज्या ज्या वेळी नितीन गायकवाडला लेखी पत्र देऊन खुलासेवार स्पष्टीकरण मागितले त्यावेळी मी दिलेले पत्र उध्दडपणाने माझ्याच समोर फाडून कचऱ्याच्या डब्यात टाकण्याचे प्रसंग घडले आहेत. अधिकाऱ्यांचे पत्राचे स्पष्टीकरण न देता उलट त्यांचे समोर फाडून फेकण्यास बेअदबशीर गुन्हा तो वारंवार करीत आहे. संबंधित कर्मचारी वयाने लहान असून सुध्दा आपल्यापेक्षा वयस्क (शिपाई, शिक्षक, लिपिक व इतर) यांचेशी बोलतांना स्वतःचे कर्तव्य आणि मर्यादा सोडुन बरोबरीच्या नात्याने आचरण करीत असल्याचे निदर्शनास येते. शाळेतील आपले काम सोडून परस्पर मुख्याध्यापिकांची परवानगी न घेता नागपूरला शिक्षणाधिकारी कार्यालय, वेतन पथक कार्यालय, धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालयात जाऊन संस्थेच्या आणि शाळेच्या गुप्त व्यवहारात हस्तक्षेप

करण्याचा प्रयत्न करतो असे माझ्या निदर्शनास येत आहे. अशा प्रकारे शिपायाचे वर्तन शाळेच्या भवितव्याच्या दृष्टिने घातक आहे. केंव्हाही सुट्टीचा अर्ज टेबलवर ठेवून सुट्टी मंजूर करवून न घेता आपल्या कामाची व्यवस्था लावण्यासंबंधी सूचना न करता परस्पर निघून जातो. त्यामुळे शालेय व्यवस्थापनात मला वेळेवर अडचण निर्माण होते. इत्यादी तक्रारी त्यांनी अध्यक्ष, लोकसेवा शिक्षण संस्था, सिर्सी यांना दिल्या आहेत व त्याची प्रत आयोगाचे निदर्शनास आणली आहे. यावरुन

अपीलकर्ता यांनी माहितीचा अर्ज करुन जी कार्यवाही करुन मागितली आहे त्याबाबत जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ओव्हर ड्रॉपवर सही करुन त्यांना फसावयाचे नाही. तसेच इतर बाबतीत सुध्दा संस्थेमध्ये वाद असल्यामुळे व दोन-तीन सचिव असल्यामुळे शालेय समितीचे कामकाज होत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना त्यांच्या प्रकरणी संस्थेने सुध्दा कोणताही निर्णय घेतला नाही. असे असले तरी शिक्षणाधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या अर्जाचे संदर्भात योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देण्याचे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांची तिन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी तिन्ही प्रथम अपीलाचे अर्जाचे माध्यमातून शिक्षणाधिकारी यांनी योग्य ती कार्यवाही करावी व अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्याकरिता अपीलकर्ता यांचे तिन्ही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची तिन्ही अपीले ही अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या तिन्ही अर्जाचे संदर्भात योग्य ती कार्यवाही जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर तसेच जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, वसंतराव नाईक कृषी विद्यालय, सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपूर यांनी योग्य ती कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३९/२०१०.

श्री. अरुण दुधरामजी डोकरीमारे,
प्लॉट नं. २७, शेषनगर, खरबी रोड,
मेश्राम यांचे घराजवळ, नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. संगीतराव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी,
रामटेक, जि. नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
तहसीलदार,
मौदा, जिल्हा नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे कु. विनिता लांजेवर, नायब तहसीलदार हया हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसील कार्यालय, मौदा यांचेकडे मौजा खात, प.ह.नं. ५९, ता. मौदा येथील शेती आजोबा नानोबा महादेव डोकरीमारे हयांचे नावाने होती. त्यांचे जिवंतपणी त्यांनी माझे नावानी रजिस्टर्ड मृत्युपत्र करुन ठेवले होते. त्याप्रमाणे फेरफार घेण्यासाठी ते माझे नांव, गाव नं. ७, ७ अ व १२ नोंद घेण्यासाठी अर्ज केला होता. त्याप्रमाणे पटवारी हयांने वादविवाद पंजीमध्ये नोंद करुन ते प्रकरण तहसीलदार, मौदा हयांच्या कार्यालयात सन २००१ ते २००२ मध्ये प्रकरण चालले व त्यावर तहसीलदार यांनी आदेश पारित केला. परंतु याबद्यलचे आदेश पारित केल्याबद्यल माहिती मिळाली नाही तर त्या आदेशाची सत्यप्रत मिळावी अशी माहिती मागितलेली दिसते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २९.४.२०१० रोजी अधिकार अभिलेख, जुना ७/१२, रा.मा.क्र. ५/आर.टि.एस.-५९/२००२ मौजा खातच्या आदेशाची प्रतचे प्रकरणाचा शोध घेणे सुरु असून प्रकरण प्राप्त होताच आपणास माहिती पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. माहिती

तहसीलदार, मौदा यांचेकडे पाठवून अर्जदारास तात्काळ माहिती उपलब्ध करुन देण्याचे निर्देश दिनांक १४.५.२०१० रोजी देण्यात आले. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे व त्यानंतरही दिनांक २५.५.२००९ च्या पत्रान्वये रामाक्र २७/आर.टी.एस.५९/२००९-१० मध्ये दिनांक२४.५.२०१० रोजी झालेल्या निर्णयाची प्रत घेऊन जावे असे कळविलेले दिसून येते.

३. अपीलकर्ता यांनी आयोगाकडे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, पुर्वी तहसीलदार यांनी चौकशी करुन आदेश प्रत घेऊन जावे असे कळविले होते. परंतु त्यानंतरही आदेशाची प्रत प्राप्त झाली नाही म्हणून त्यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केला होता. परंतु प्रकरणाचा शोध घेत आहे असे त्यांनी माहिती दिली व अद्याप पर्यंत माहिती त्यांना उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, शहानिशा केल्यानंतर तसेच तलाठी, खात यांचेकडे विचारणा केल्यानंतर उपरोक्त कोणतेही आदेश झाले नाही असे दिसून आले. त्यामुळे संबंधितांना तशी नोटीस काढून त्यांचे बयान घेत आहेत. प्रकरणाच्या कागदपत्रांचे अवलोकन केले असता प्रकरणात २ मृत्युपत्र दिसून आले. दिनांक २४.५.२०१० रोजी आदेश पारित करण्यात आले व अर्जदारास दिनांक २५.५.२०१० रोजी ते आदेश प्राप्त करुन दिले आहे. त्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये पुर्वी आदेश पारित झाले नसल्याने तसे अपीलकर्ता यांना कळविण्यात आले होते. त्यात माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ करण्याचा कोणताही प्रयत्न नव्हता व त्यामुळेच नव्याने सुनावणी घेऊन बयान घेऊन आदेश पारित केलेले आहेत. पुर्वीच्या नस्तीमध्ये कोणतीही मुळ कागदपत्रे नव्हती. फेरफाराचा अर्ज होता. यावरुन सुनावणी घेतली आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३८/२०१०.

श्री. दिनकर बैजनाथ जाधव,
प्लॉट नं. २०८, रेशिमबाग,
नागपूर - ४४० ००९. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
तहसीलदार,
नागपूर (शहर) नागपूर.

श्री. पी. एस. ठवकर,
जनमाहिती अधिकारी तथा
नायब तहसीलदार,
नागपूर (शहर) नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. डब्ल्यू. एस. पावसे, मंडळ अधिकारी हे हजर आहेत. जनमाहिती अधिकारी हे हजर

आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा तहसीलदार यांचे कार्यालयामध्ये रुपये ६०००/- वार्षिक उत्पन्नाचा दाखला अर्ज करण्याबाबत. परंतु तो मिळाला नाही त्यासंदर्भात एकूण ३ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

२. अपीलकर्ता यांच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.२.२०१० रोजी प्रत्यक्ष या कार्यालयास हजर राहून उपलब्ध असलेली माहिती स्वतः दोन दिवसात घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. तसेच जनमाहिती अधिकारी यांनी आयोगास असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा उत्पन्नाचा दाखल अर्ज हा त्यांनी स्वतः परत घेतला आहे. त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ३.३.२०१० कार्यालयीन टिपणीवर खोडतोड केलेली आहे. तसेच त्यांना दिनांक २५.२.२०१० रोजी तलाठी यांनी तपासलेला

अहवाल उपलब्ध करुन दिलेला आहे व त्या अहवालाप्रमाणे त्यांचे नावावर शेत आहे. मोबाईल आहे असा निष्कर्ष काढून उत्पन्नाचा दाखल देता येणार नाही असा अहवाल दिला. त्यावर अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यासंदर्भात ७/१२ पुरावा तसेच मोबाईल असेल तर मोबाईल नंबर पुरावा दाखल करावा. त्यांचेकडे शेत नाही व मोबाईल नाही असा खोटा अहवाल तयार केलेला आहे. त्यामुळे त्यांनी खोटी व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे असल्यामुळे सदरच्या संदर्भामध्ये चौकशी करणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीच्या संदर्भामध्ये पुन्हा शेती व मोबाईल संदर्भात चौकशी करुन त्यांना अहवाल उपलब्ध करुन द्यावा.
२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६४०/२०१०.

१) श्री. डी. एन. मंडलेकर,
२) श्री. ए. जे. बुन्दीवाल,
३) श्री. ए. एन. सहस्त्रबुध्दे,
४) श्री. विजय मेश्राम,
शिवगौरव इस्टेट, १ भगवाघर कॉलनी,
धरमपेठ, बारलिंगे मार्ग, नागपूर - ४४० ०१०. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

डॉ. आर. एम. गिरी,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आरोग्य अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर.

श्री. एफ. एस. उके,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक अधिक्षक,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा आरोग्य अधिकारी, मेडिसीन औषधोपचार विभाग, नागपूर महानगरपालिका, नागपूर यांचेकडे डॉ. व्ही. के. भागवतकर, शिवगौरव

... २

सहनिवास भुखंड क्र. १, धरमपेठ संकुलाचे पार्किंग जागेवर महानगरपालिकाचे आरोग्य विभागांतर्गत नोंदणी तथा गाळेधारक, बिल्डर व आरोग्य विभागाकडून गेली सात वर्षाचे कालावधीत ना हरकत प्रमाणपत्र घेतले होते काय ? २००४ ते २००९-१० व ते घेतले नसल्यास आतापावेतो कां घेतल्या गेले नाही. तसे घेतले असल्यास रजिस्ट्रेशन व ना हरकत प्रमाणपत्राची साक्षांकित प्रमाणित प्रत अर्जदारास देण्यात यावी. या दवाखान्यावर नियमानुसार किती दिवसात कोणती कार्यवाही कराल याचा सविस्तर तपशील न्यायालयाचे माहितीसाठी ३० दिवसाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.११.२००९ रोजी डॉ. व्ही. के. भागवतकर यांनी या विभागांतर्गत नोंदणी केलेली नाही. तसेच या ७ वर्षाचे कालावधीत आरोग्य विभागाद्वारे ना हरकत प्रमाणपत्र घेतले नाही अशी माहिती कळविली. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १०.२.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती उपलब्ध करुन दिली. परंतु संबंधित दवाखान्यावर काय कार्यवाही केली याबाबतची माहिती अपीलार्थीस ७ दिवसांचे आंत देण्यात यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक २.१.२०१० रोजी दिलेल्या नोटीसची प्रत अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, सदरची अनधिकृत दवाखाने व बोगस डॉ. यांचे विरुध्द महानगरपालिका कार्यवाही करीत नाही. असे दवाखाने तात्काळ बंद करण्यात यावे असे जिल्हाधिकारी यांनी आदेश द्यावे अशा प्रकारची लोकशाही दिनी अपीलकर्ता यांनी विनंती केली आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, संबंधित डॉ. यांनी महानगरपालिकाकडे कोणत्याही प्रकारची नोंदणी करीता अर्ज केला नसल्यामुळे त्यांची कोणतीही माहिती महानगरपालिकाकडे नाही व ती अपीलकर्ता यांना कळविले आहे. परंतु त्यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचे विरुध्द अनेक तक्रारी आरोग्य विभागाकडे केल्या आहेत तरी आरोग्य विभागाने त्यांचे विरुध्द कोणतीही कार्यवाही केली नाही. नोटीस दिली आहे पण कार्यवाही केली नाही. परंतु आरोग्य विभागाचे असे मत आहे की, विधी विभागाचे मत घेऊन कार्यवाही करण्यात येईल. नोटीस दिली त्यामुळे पुढील कार्यवाही करण्यात येईल एवढेच परंतु कारवाई केली नाही म्हणून अपीलकर्ता यांना माहिती मागणे भाग पडले आहे. तरीही आयोगाकडे सुनावणीस येण्यापुर्वी त्यांनी कोणतीही कार्यवाही केलेली नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे अपीलकर्ता अर्जदार यास सार्वजनिक प्राधिकरणाचे कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती कागदपत्राचे स्वरुपात पुरविणे असे माहिती या संज्ञेचा अर्थ अधिनियमात आहे. कोणतीही कार्यवाही करण्याचे अधिकार हया आयोगास नाही. तसेच कोणत्याही प्रकारचे कार्यवाहीचे आदेश देण्याचे अधिकार सुध्दा नाही व द्वितीय अपील मेमोमध्ये सुध्दा अपीलकर्ता यांनी जिल्हाधिकारी हे अपीलात उत्तरवादी नसल्याने त्यांना आदेश द्यावे असे नमुद करणे ही मागणीच आयोगाकडे असंबंध्द आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६३६/२०१०.

श्री. कैलास रामचंद्रराव श्रीरामे,
द्वारा - श्री. हिरामणजी वाघमारे,
३० म्हाडा कॉलनी, बोरनाल्याजवळ,
काटोल रोड, नागपूर - ४४० ०१३. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

श्री. श्रावण राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १६.६.२०१०)**

**<u>नि र्ण य</u>**

अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १६.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १६.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे सन १९९१ ते १९९५-९६ आणि २००९ या कालावधीतील नियमबाहयरित्या उचलण्यात आलेले वेतन अनुदानाची विकास विद्यालय, परसोडी, वर्धा रोड, नागपूरच्या व्यवस्थापनला देय वेतनेत्तर अनुदानातून झालेली/करण्यात आलेली वसूली आणि सदर शाळेची सप्टेंर २००९ मध्ये करण्यात आलेली चौकशी याबद्यल एकूण ३ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २४.३.२०१० रोजी मुद्या क्रमांक १ ची माहिती शाळा स्तरावर असून ती माहिती शाळेचे मुख्याध्यापक तथा जनमाहिती अधिकारी असल्यामुळे त्यांचेकडे अर्ज सादर करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी. त्यामध्ये आपण माहिती तयार करुन देण्यात यावी अशी मागणी केली आहे. याबाबत कायद्यात अशी तरतुद नाही. मुद्या क्रमांक २ व ४ ची माहिती आपण कार्यालयीन वेळेत उपस्थित राहून प्राप्त करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. परंतु

अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांच्या अर्जाचे संदर्भात कोणताही पत्र व्यवहार त्यांना दिलेला नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, कार्यालयीन पत्र क्रमांक जिपना/शिअ/माध्य./माअ/४१४८/१०, दिनांक २४.३.२०१० अन्वये अर्जदारास वर नमुद केल्याप्रमाणे कळविण्यात आले होते. अर्जदाराने व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन घेणार असे नमुद केलेले असल्यामुळे त्यांना मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती घेऊन जावे असे कळविले होते. परंतु ते माहिती घेऊन गेले नाही. अपीलकर्ता यांनी ते पत्र मिळाले नाही असे त्यांचे म्हणणे आहे. मात्र जावक नोंदवहीमध्ये पोस्टाचे यादीमध्ये अपीलकर्ता यांना पत्र पाठविल्याची नोंद आहे. यावरुन अपीलकर्ता यांना दिनांक २४.३.२०१० रोजीचे पत्र मुदतीत दिलेले आहे. मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये सन १९९५ ची माहिती असल्यामुळे ती उपलब्ध नाही असे आयोगापुढे जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले. परंतु सदरची माहिती अधिक्षक, वेतन पडताळणी पथक, नागपूर असून त्यांचेकडे उपलब्ध होऊ शकेल. त्याप्रमाणे त्यांना विचारणा करण्यात येईल. अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. मुद्या क्रमांक २ व ३ ची माहिती अपीलकर्ता यांना जनमाहिती अधिकारी यांचेकडून व्यक्तिशः उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या मुद्या क्रमांक १ च्या संदर्भामध्ये अधिक्षक, वेतन पडताळणी पथक, रविनगर, नागपूर यांचेकडे जनमाहिती अधिकारी यांनी विचारणा करुन माहिती उपलब्ध झाल्यास अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५४/२०१०.

श्री. अमृत दुधराम कुंभलकर,
रा. गोपीवाडा, पो. शहापूर,
ता. जि. भंडारा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. रत्नघोष का. सोनपिंपळे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गटशिक्षणाधिकारी,
पंचायत समिती, मौदा,
जि. नागपूर.

कु. स्वर्णलता नारायणराव जगताप,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
प्राथमिक शाळा, हिवरा,
ता. मौदा, जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, प्राथमिक शाळा, हिवरा, पंचायत समिती, मौदा यांचेकडे मौजा हिवरा येथे सन २००८-०९ ला प्राथमिक शाळा हिवरा येथील शाळेच्या खोलीच्या बांधकामावर झालेल्या खर्चाची माहिती मिळण्यात यावी. शिल्लक निधी, कोटेशन, कॅश बुक प्रत, व्हॉऊचर पत्राची सत्यप्रत, ठेकेदार यांना वेळोवेळी दिलेले रुपये वरील संपूर्ण लेखी स्वरुपाची माहिती मिळण्यात यावी. सदरची माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती मिळाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २.२.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांनी अतिरिक्त शाळेचे शुल्क रुपये ७०/- हे मुदतीत कळविले असल्यामुळे त्याचा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला

दिसून येतो. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांना अद्याप पर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही व कोणत्याही प्रकारे पत्र व्यवहार त्यांचेशी झालेला नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक २४.१२.२००९ रोजी त्यांचे कार्यालयात प्राप्त झाला होता व त्यामुळे दिनांक २२.१.२०१० रोजी खर्चाचा भरणा करण्यासाठी पोस्टाने पत्र पाठविण्यात आले होते. सदरच्या पोस्टाचा यु.पी.सी. चा पुरावा त्यांनी दाखल केलेला आहे. मात्र त्यानंतर त्यांनी खर्चाचा भरणा केलेला नाही व प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे सुनावणीत त्यांना पत्र पाठविल्याचे सांगण्यात आले व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश झालेले आहेत. त्याप्रमाणे त्यांना माहिती दिनांक १८.३.२०१० रोजी पाठविण्यात आली आहे. परंतु अपीलकर्ता यास अद्याप असे म्हणणे आहे की, त्यांना आता पर्यंत कोणतेही पत्र त्यांना मिळाले नाही. मात्र अपीलकर्ता यांस सुनावणीचे पत्र व आयोगाचे सुनावणीचे पत्र त्यांना मिळाले. जनमाहिती अधिकारी यांनी पाठविलेले पत्र हे यु.पी.सी.ने पोस्टाने पाठविले असल्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे. परंतु पुन्हा त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास हरकत नाही व त्याप्रमाणे जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी माहिती उपलब्ध करुन दिली व त्यांची पोच घेतली आहे. त्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५५/२०१०.

श्री. निलकंठ रामकृष्ण मेंढे,
मु. पो. विरली (बु.),
ता. लाखांदूर, जि. भंडारा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. वाय. एस. हरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, प्राथमिक विभाग, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे अर्जदार शिक्षक एन. आर. मेंढे, सेवानिवृत्त, पंचायत समिती, लाखांदूर च्या संदर्भामध्ये एकूण ११ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २७.११.२००९ रोजी उत्तर देण्यात आले. परंतु मुद्या क्रमांक १ ते ११ पैकी मुद्या क्रमांक १, ६ व ८ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे ती देता येणार नाही असे त्यांना कळविण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून सुनावणीत ठरल्या प्रमाणे त्यांना अहवाल देण्यात आलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे लेखी बयान दिलेले आहे ते खालील प्रमाणे अर्जदारानी मागितलेले माहितीतील मुद्दे क्रमांक १ ते ११ पैकी १ ते ६ व ८ ची माहिती प्रश्नार्थक स्वरुपाची असल्यामुळे पुरविता येत नाही असे दिले. मुद्या क्रमांक ९, १० व ११ चे संबंधी काही नाही. मुद्या क्रमांक ७ चे उत्तर पडताळणी करुन त्याची प्रत पाठविण्यात येईल असे उत्तर दिनांक २७.११.२००९ च्या पत्रातून देण्यात आले. परंतु माहिती दिली नाही. प्रकरण प्रलंबित पाडून ठेवले. अपीलीय अधिकारी तथा प्राथमिक शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद, भंडारा यांचेकडे दिनांक ८.१२.२००९ रोजी अपील केली. त्यांनी सुनावणी तारीख ५.१.२०१० ठेवली अर्जदार व इतर कर्मचारी उपस्थित होते. सेवाजेष्ठता आणि वेतन निश्चिती संबंधात संबंधित लिपिकाला तपासणी करावी याप्रमाणे सुनावणी झाली. वास्तविक सुनावणीमध्ये संबंधितांना निर्देश देणे (बरोबर) संयुक्तिक वाटत नसून कारवाई करणे अपीलीय अधिकाऱ्यांचे कर्तव्य ठरते. मुद्या क्रमांक ७ मधील शिक्षकांची सेवा पुस्तके मागवून पडताळणी संबंधी माहिती पत्र क्रमांक ८३४, दिनांक २३ फेब्रुवारी २०१० अन्वये उशिरा प्राप्त झाली दिनांक ८.३.२०१० रोजी. त्यातील दिलेली वेतन श्रेणी व सेवाजेष्ठते संबंधी माहिती चुकीची तथा दिशाभूल करणारी आहे. सेवाजेष्ठता यादी सन १९६२ चे अवलोकन केल्यास निदर्शनास येईल. ज्याअर्थी १ ते ४ शिक्षकांची तुलनात्मक दृष्टिनी सेवापुस्तके मागवून पडताळणी केली. त्यात सेवाजेष्ठता अर्जदाराची आहे. वेतन निश्चिती संबंधाने माहिती पुरविण्यात आलेली नाही. ती लपवून ठेवण्यांत आलेली आहे. महाराष्ट्र शासनाचे परिपत्रकांची तथा विभागीय आयुक्तांचे निर्देशित पत्राप्रमाणे अंमलबजावणी (कार्यवाही) करण्यात निष्काळजीपणा व टाळाटाळ झालेली आहे. विनंती की, वरील प्रमाणे माहितीचा अधिकार अंतर्गत कलम २०(१) प्रमाणे गुन्हयास पात्र संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी ही विनंती. वरील बयानानुसार व अपीलकर्ता यांनी मागितलेली मुद्या क्रमांक १ ते ६ व ८ च्या संदर्भात कागदपत्रे उपलब्ध असल्यास तशी कागदपत्रे उपलब्ध करुन देणे अपेक्षित असते. कोणत्याही मुद्यांमध्ये "कोणत्या" असा शब्द वापरला म्हणजे तो प्रश्नार्थक होत नाही त्यातून कागदपत्रे उपलब्ध असतील तर कागदपत्रे पुरविणे अभिप्रेत असते. ज्या प्रश्नातून मत विचारले असेल ते विचारता येत नाही. या मुद्यात कोणतेही प्रश्नार्थक मत विचारले नाही तर कागदपत्रे मागितली आहेत. त्यामुळे कागदपत्रे उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कायद्याचा व्यवस्थित अभ्यास करुन निर्णय देणे योग्य असते व त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १०.११.२००९ च्या अर्जातील मुद्या क्रमांक १ ते ६ व ८ व त्यांचे बयानातील मुद्या प्रमाणे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या. तसे न केल्यास विद्यमान जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५२/२०१०.

श्री. प्रमोद कुमार हरिचंद्र अग्रवाल,
मनोहर चौक, पोलीस लेन समोर,
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
जिल्हा सत्र न्यायालय,
भंडारा.

श्री. वाय. आर. साठवणे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रबंधक,
जिल्हा सत्र न्यायालय,
भंडारा.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे वतीने माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हा व सत्र न्यायालय, भंडारा यांचेकडे खालील प्रमाणे माहिती मागितलेली दिसून येते. १) Copy of Note Sheet & order sheet for the period of २००८ to २०१० in spl Execution No. ५/२००० filed in the Court of C.J.S.D. Gondia. २) Date-wise reason with justification for postponing the order in the above proceeding. ३) Maximum number of days required for passing order in all such type of cases when matter is fixed for order along with the reason for delay. List of all such pending cases. ४) Whether courts are doing justice with decree holders when the matter is urgent & same is fixed for order is delayed considerably due to which JD is benefited. सदरची माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २९.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती ही न्यायिक कार्यवृत्ताची माहिती असल्यामुळे मुंबई उच्च न्यायालय नियमाप्रमाणे नाकारण्यात आलेली आहे. त्यामुळे समाधान न

झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.४.२०१० रोजी देण्यात आलेला असून अपील फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती न्यायिक कामकाजामधील असल्यामुळे महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय, माहिती अधिकार अधिनियम, २००९ यात मा. मुख्य न्यायाधिश, मुंबई उच्च न्यायालय यांनी सक्षम अधिकारी म्हणून केलेल्या नियमातील नियम क्रमांक १०(३) व १३(फ) प्रमाणे नाकारण्यात आलेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांना दरखास्तीच्या कामकाजामधील अर्जावर दिलेल्या निर्णयाचे संदर्भात टिपणीची प्रत मागितलेली दिसून येते व त्यामुळे सदरच्या टिपणीची प्रत ही न्यायिक कामकाजाचा भाग होतो व त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी जो नमुना तयार केला आहे तो नमुना हा माहिती नाकारण्याचाच आहे व त्यात सुध्दा महाराष्ट्र राज्य जिल्हा न्यायालय, माहिती अधिकार अधिनियम, २००९ या नियमाचा उल्लेख नाही. माहिती नाकारतांना कोणत्या नियमाप्रमाणे ती नाकारण्यात आली आहे याबद्यलचा स्पष्ट उल्लेख कमीत कमी न्यायालयामधून करणे आवश्यक आहे. उडवाउडवीची उत्तरे देणे न्यायिक प्रक्रियेत बसत नाही. तसेही उच्च न्यायालय यांनी केलेल्या नियमाची माहिती नागरिकांना नाही. राजपत्रात प्रसिध्द केली म्हणजे सर्वसाधारण जनतेला माहिती झाली असे नाही. सर्वसाधारण जनतेला माहिती होण्याकरिता त्यास प्रसिध्दी द्यावी लागते व ती दिल्या गेली नसल्यामुळे अर्जदार हे न्यायिक कार्यवृत्तातून माहिती मागत असतात व विनाकारण पत्रे किंवा राज्य माहिती आयोगाकडे अपीले दाखल होतात. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी योग्य ती माहिती उपलब्ध करुन देण्याची काळजी घेतल्यास अपीलांची संख्या कमी होईल. असे असले तरी अपीलकर्ता यांचे अपील हे फेटाळण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे फेटाळण्यात येत आहे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५३/२०१०.

कु. जयमाला रामटेके (सौ. भालाधरे),
एम-१५, न्यु म्हाडा कॉलनी, रेल्वे लाईन समोर,
तकीया वार्ड, ता. जि. भंडार - ४४१ ९०४. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा.

श्री. वाय. एस. हरडे,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षणाधिकारी (प्राथमिक),
जिल्हा परिषद, भंडारा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक २४.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २२.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना प्रिती शिक्षण संस्थेच्या दिनांक १५.६.१९९८ व दिनांक २०.१२.१९९९ च्या जाहीराती वैध की अवैध याबाबत स्पष्ट अभिप्राय माहितीच्या अधिकारांतर्गत अर्जदारास कळविण्यात यावे अशी माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक २७.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर दिलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झ ााल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भात दिनांक २२.३.२०१० रोजी जाहीरात ही वैध आहे की, अवैध आहे याबाबत स्पष्ट अभिमत देता येत नाही. तसेच यापुर्वी जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा यांनी सुध्दा सदर जाहीरात वैध की अवैध याबाबत मत प्रदर्शित करता येत नसल्याचे आपणास दिनांक १२.१.२०१० चे पत्रान्वये कळविले आहे असा निर्णय दिलेला दिसतो. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांनी जाहिरात अवैध किंवा वैध हे मत देण्याचे टाळले आहे. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली आहे ती माहितीच्या संदर्भामध्ये योग्य असे आहे. सर्व प्रथम ही जाहिरात संस्थेची आहे. त्याबाबतचे अभिमत हे जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांना मागणे मुळातच गैर आहे. त्यातही जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा यांना विचारणा करण्यात आलेली आहे व त्यांनी सुध्दा अभिमत देता येणार नाही असे सांगितले आहे. त्यावर पुन्हा अपीलकर्ती यांनी अधिनियमाचे कलम २(च) मधील "माहिती" या संज्ञेची व्याख्या आयोगाचे निदर्शनास आणून त्यात अभिप्राय हा शब्द वापरला आहे, त्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे असे सांगितले. परंतु माहिती या संज्ञेच्या सुरवातीचा संदर्भ सोडून फक्त सदर मुद्यावर अभिप्राय मागता येतो. माहिती या संज्ञेच्या व्याख्येमध्ये कोणत्याही स्वरुपातील कोणतेही साहित्य असून त्यामध्ये अभिलेख, दस्तऐवज, ज्ञापने, ई-मेल, अभिप्राय, सूचना, प्रसिध्दीपत्रके इत्यादींचा समावेश होतो याचा अर्थ अभिप्रायाची प्रत असा नाही व त्यामुळेच त्यात साहित्य असा शब्द वापरला आहे. नस्तीमध्ये अभिप्राय उपलब्ध असेल तर त्याची प्रत देणे अभिप्रेत आहे. अपीलकर्ती यांना माहिती मिळाली ती योग्य असल्याने अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६५१/२०१०.

श्री. उमाकांत महादेवराव तायवाडे,
रा. धामकुंड, पो. जुनापाणी,
ता. कारंजा, जि. वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एम. जी. पोटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कारंजा,
जिल्हा वर्धा.

श्री. बी. एस. वरकडे,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, कारंजा,
जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ११.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून पंचायत समिती, कारंजा यांचेकडे सन २००८-०९ मध्ये मौजा धामकुंड येथील अंगणवाडीचे टिनपत्रे व फाडयाचे चौकशीचे संदर्भात एकूण ७ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे.
अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १, ६ व ७ ची माहिती दिनांक १२.३.२०१० रोजी दिली व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २३.४.२०१० रोजी देण्यात आला व उर्वरित मुद्यांची माहिती त्याच दिवशी देण्यात आली. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ६ ची माहिती योग्यरित्या मिळाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती त्रोटक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ६ मुद्यांची माहिती ही स्पष्टपणे मुद्येनिहाय उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १५.२.२०१० च्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३, ४, ५ व ६ ची माहिती स्पष्टपणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७४/२०१०.

श्री. नामदेव जागोबा जिवतोडे,
मु. पो. एकार्जुना, ता. वरोरा,
जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी,
सर्कल ऑफीस, विद्युत भवन,
बाबुपेठ, चंद्रपूर.

श्री. निलेश अष्टनकर,
जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियेता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लि.
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर असून माहिती अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड, वरोरा यांचेकडे सन २००६-२००७ या कालावधीतील श्री. पांडूरंग महादेव

... २

... २ ...

भोयर यांनी दिनांक २७.१२.२००६ रोजी मिलिंद नामदेव जिवतोडे यांचे विरुध्द कनिष्ठ अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड, वरोरा यांचेकडे तक्रार दाखल केली होती. याविषयी विद्यमान न्यायालय, चंद्रपूर येथे केस क्र. ५७/०७ मध्ये उल्लेख केला आहे. त्या तक्रारीची मला सर्टिफाईड कॉपी मिळण्यात यावी. सदरची माहिती टपालाने घेणार असे नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना कनिष्ठ अभियंता, वरोरा यांनी माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (का.) सं. व सु. विभाग, महावितरण, वरोरा यांना दिनांक ११.६.२०१० रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत पुरविण्यात आली आहे व त्यामध्ये रेकॉर्ड मध्ये शोधाशोध केली असता ती प्रत आढळून आलेली नाही. आढळून आल्यास त्वरित कळविण्यात येईल असा अहवाल सादर केला त्याची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आली होती. तत्पुर्वीच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले होते.

३. जनमाहिती अधिकारी यांचे तर्फे अधिक्षक अभियंता यांना व कनिष्ठ अभियंता यांना खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेडचा जनमाहिती अधिकारी कनिष्ठ अभियंता नसून जनमाहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता हा आहे. त्यामुळे सदर अधिनियमान्वये माहिती मिळविण्यासाठी अर्ज विहित नमुन्यात जनमाहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता यांचेकडे करावा लागतो व त्याप्रमाणे कार्यालयात बोर्ड सुध्दा लावण्यात आलेला आहे. अपीलार्थी अर्जदारांनी तथाकथित दिनांक १०.५.२००९ ला माहितीच्या अधिकाराखाली अर्ज जनमाहिती अधिकारी उपकार्यकारी अभियंता यांचेंकडे केलेला नाही. त्यामुळे तथाकथित दिनांक १०.५.२००९ चा अर्ज योग्य व समर्थनिय नाही. कनिष्ठ अभियंता हा जनमाहिती अधिकारी नाही तो टेकनिकल व्यक्ति आहे. त्यामुळे माहितीच्या अधिकाराखालील अर्ज कनिष्ठ अभियंता यास स्विकारता येत नाही. तसेच योग्य त्या माहितीच्या अधिकाऱ्याकडे अर्जदाराने माहितीच्या अधिकाराखाली अर्ज केलेला नसल्यामुळे ३० दिवसाचे आंत उत्तर देण्याची आवश्यकता नाही. तसेच अपीलार्थी अर्जदार यांनी प्रथम अपील ही अधिक्षक अभियंता, सं. व सु. मंडळ, चंद्रपूर यांचेकडे दाखल केली होती. परंतु अधिक्षक अभियंता, सं. व सु. मंडळ, चंद्रपूर अपीलीय अधिकारी नाही. अपीलीय अधिकारी कार्यकारी अभियंता आहे. त्यामुळे अर्जदार अपीलार्थींनी दाखल केलेली प्रथम अपील ही योग्य अपीलीय अधिकारी यांचेकडे दाखल न केल्यामुळे ती योग्य व समर्थनीय नाही. त्यामुळे अर्जदाराने दाखल केलेल्या पहिल्या अपील प्रकरणात उत्तर देण्याची आवश्यकता नाही. अपीलार्थीने द्वितीय अपील सोबत दिनांक १०.५.२००९ च्या माहितीच्या अधिकाराखालील म्हणून जी अर्जाची झेरॉक्स कॉपी जोडली आहे त्यावर महाराष्ट्र विज वितरण कंपनी लि. वरोराचे कार्यालयीन कोणत्याही अधिकाऱ्याची सही व शिक्का नाही. त्यावरुन अर्जदाराने माहितीच्या अधिकाराखाली अर्जाचा फॉर्म भरुन व त्याची झेरॉक्स काढून अपील सोबत जोडून अपील दाखल केली असल्याचे स्पष्ट निदर्शनास येते. प्रत्यक्षात अर्जदाराने माहितीच्या अधिकाराखाली दिनांक १०.५.२००९ ला तशा प्रकारचा अर्ज दिला असल्याचे कळून येत नाही व अर्जदाराचा सदर अर्ज खोटा व बनावटी असल्याचे निदर्शनास येते. दिनांक १०.५.२००९ च्या अर्जाच्या उपरोक्त झेरॉक्स कॉपीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की, श्री. पांडूरंग भोयर यांनी दिनांक २७.१२.२००६ रोजी अपीलार्थी अर्जदाराचा मुलगा मिलिंद नामदेव जिवतोडे यांचे विरोधात केलेल्या तक्रार अर्जावरुन त्यांचे विरुध्द चंद्रपूर न्यायालयात विज मंडळातर्फे पोलीसांनी मामला क्र. २७/०७ दाखल केला होता. सदर केसमध्ये तक्रार अर्जासह इतर कागदपत्रे दाखल करण्यात आलेली आहेत. केसचे संपूर्ण कागदपत्र न्यायालयात दाखल आहेत व त्याच्या कॉपीज आरोपीला कोर्टातर्फे मिळतात न मिळाल्यास त्याच्या प्रमाणित प्रति न्यायालयातून घेता येतात व या संपूर्ण बाबीची अपीलार्थीने सक्षम माहितीच्या अधिकाऱ्याकडे माहितीच्या अधिकाराखाली अर्ज न करता गैरअर्जदार नं. २ व ३ यांना विनाकारण त्रास देण्यासाठी खोटी व बनावट अपील दाखल केली आहे. अर्जदार अपिलार्थींनी पहिजे अपील योग्य त्या

अपीलीय प्राधिकाऱ्याकडे दाखल केलेली नसल्यामुळे विद्यमान कोर्टात दाखल केलेली सदर द्वितीय अपील कायद्याने चालण्यास पात्र नाही. तसेच ती बेकायदेशिर व असमर्थनिय आहे. सबब अपील खारीज करण्यात यावी ही विनंती. परंतु त्याबाबत अपीलकर्ता हे हजर नसल्यामुळे कोणताही खुलासा होत नसल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७०/२०१०.

श्रीमती सईबाई प्रभुदास ठमके,
वार्ड नं. १, मु. पो. विसापूर,
ता. बल्लारपूर, जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

श्री. हरीष माटे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संवर्ग विकास अधिकारी,
पंचायत समिती, चंद्रपूर,
जि. चंद्रपूर.

श्री. व्हि. ए. गाडगे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत, शेनगांव,
पो. पांढरकवडा, ता. जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक १७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती ही हजर असून त्यांचे तर्फे वकील उपस्थित झाले परंतु त्यांनी वकीलपत्र दाखल केले नाही. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक १७.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत कार्यालय, शेनगांव यांचेकडे मय्यत श्री. प्रभुदास महादेव ठमके यांचे शेनगांव येथील घर हे पक्के माती गोटयाचे

बंगलोर कवेलुचे घराचे घर टॅक्स पावती जुनी/चालू तसेच सदर घराचा मेन्टनन्स खसरा व तसेच सदर घराची नमुना ८ ची चालू प्रत मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना श्री. प्रभुदास ठमके हे मय्यत असल्यामुळे मयताची पत्नी श्रीमती मंदा प्रभुदास ठमके यांना विचारणा केली असता सदर माहिती माझ्या व्यतिरिक्त कोणालाही देण्यात येऊ नये असे

श्रीमती मंदा ठमके यांनी लेखी स्वरुपात ग्राम पंचायतला कळविले आहे. त्यामुळे सदर माहिती आपल्याला देता येणार नाही असे त्यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक ४.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय दिनांक २७.२.२०१० रोजी दिलेला असून जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवण्यात आलेला दिसून येतो. त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ती यांनी आयोगापुढे युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्या मय्यत श्री. प्रभुदास ठमके यांच्या पत्नी आहेत व मय्यत श्री. प्रभुदास ठमके यांचे घरावर दुसऱ्या बाईचे नाव लावण्यात आलेले आहे व त्यांचे कडून ग्रामपंचायत घराचे टॅक्स घेत नाही व त्यामुळे त्यांनी नावाने घर टॅक्सची माहिती मागितलेली आहे. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, मय्यत श्री. प्रभुदास ठमके मय्यत झाले तेंव्हा त्यांचे बरोबर श्रीमती मंदा ठमके राहत होत्या. त्यामुळे सौ. मंदा ठमके यांचे नावे नमुना नं. ८ मध्ये दाखल केलेले दिसून येते व त्यामुळे श्रीमती सईबाई यांचेकडून टॅक्स सुध्दा घेता येत नाही. श्रीमती सईबाई म्हणून श्री. प्रभुदास ठमकेची पत्नी असली तरी त्यांचा तो वाद न्यायालयातून सोडून घ्यावा. नमुना नं. ८ सुध्दा त्यांना देण्याची मनाई केले म्हणून मी दिले नाही. परंतु नमुना नं. ८ हा ग्रामपंचायतचा अभिलेखाचा भाग आहे. त्यामुळे तो सार्वजनिक दस्तऐवज आहे. तसेच सार्वजनिक दस्तऐवज हा कोणत्याही व्यक्तिची खाजगी माहिती होऊ शकत नाही. त्यामुळे नमुना नं. ८ ची छायांकित प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. घराचा मेंन्टेनेन्स खसरा संदर्भामध्ये ग्रामपंचायत अधिनियमाप्रमाणे असा कोणताही मेंन्टेनेन्स खसरा नाही. अपीलकर्ती यांना कदाचित महसूल कर अपेक्षित असावा. परंतु तो तलाठी यांचेकडे भरला जातो. त्यामुळे अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ती यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ती यांना घर टॅक्स बद्यल तसेच नमुना नं. ८ ची छायांकित प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७५/२०१०.

श्री. कचरु सदाशिव शंभरकर,
रा. जांभुळविहिरा, पो. जामगांव (कोमटी),
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. एस. एन. पांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, चिमूर,
जि. चंद्रपूर.

श्री. राजेंद्र सदाशिव कळस्कर,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव,
ग्राम पंचायत सावर्ला,
ता. चिमूर, जि. चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी २०.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सरपंच/सचिव, गट ग्रामपंचायत सावर्ला यांचेकडे माझे मालकीचे घरांवर दुसऱ्याचे नावाची नोंद कां करण्यात आली याबाबत एप्रिल १९९० ते

एप्रिल २०१० पर्यंतच्या घर करांच्या पावत्यांची झेरॉक्स प्रत मिळणे. घर नोंदणी रजिस्टरच्या पेजच्या प्रती १९९० ते २०१० पर्यंतच्या सर्व प्रती मिळण्याबाबत. गैरअर्जदार श्री. दशरथ सदाशिव शंभरकर यांचे नावाची नोंद माझे मालकीचे घरावर कोणत्या आधारावर करण्यात आली त्या संबंधीची सर्व कागदपत्राची झेरॉक्स प्रत मला मिळण्याबाबत. सन २००९-२०१० ची माझे घराची घर कर भरल्याची पावती मिळण्याबाबत माझे नावाचा घर कर भरलेला आहे. ही सर्व माहिती मला ताबडतोब उपलब्ध करुन देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २३.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे दिनांक २१.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. पुन्हा दिनांक ३०.४.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ३०.४.२०१० रोजी दिलेला दिसून येतो. त्यानुसार अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती १० दिवसात देण्यात यावी असा निर्णय दिलेला दिसतो. परंतु माहिती अपूर्ण दिली म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना आता पर्यंत कोणतीही माहिती उपलब्ध झाली नाही. तसेच प्रथम अपीलाचे सुनावणीस जनमाहिती अधिकारी हे कधीही उपस्थित झाले नाही. मात्र जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असें सांगितले की, अपीलकर्ता यांना दिनांक २३.२.२०१० रोजी माहिती दिली आहे. फक्त त्यांना २००९-२०१० ची घर कराची पावती भरणा न केल्यामुळे देण्यात आलेली नाही या अगोदरचा संपूर्ण रेकॉर्ड देण्यात आला आहे. यावरुन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असुन सुध्दा त्यांनी आयोगाची सुध्दा दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला आहे असे दिसते. जनमाहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७२/२०१० व अपील क्रमांक ६७३/२०१०.

श्री. श्रीनिवास परशुरामजी मेश्राम,
मु. पो. ता. सिंदेवाही, गौतम चौक,
जि. चंद्रपूर - ४४१ २२२. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. लेहगांवकर,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, चंद्रपूर.

श्री. एस. आर. कार्लेकर,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
बांधकाम विभाग,
जिल्हा परिषद, जि. चंद्रपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. त्यानंतर त्रूटींची पुर्तता करुन अपीलकर्ता यांनी दिनांक १२.५.२०१० च्या पत्रान्वये ही अपीले आयोगाकडे पाठविली. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

... २

... २ ...

२. अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७२/२०१० व अपील क्रमांक ६७३/२०१० मध्ये अनुक्रमे दिनांक १६.१०.२००९ व दिनांक २५.८.२००९ रोजी त्यांच्या १९८५ च्या बदली आदेशाच्या प्रती तसेच टिपणी व प्रस्तावाची प्रत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना अपील क्रमांक ६७२/२०१० दिनांक १५.९.२००९ रोजी व अपील क्रमांक ६७३/२०१० मध्ये दिनांक १४.१०.२००९ व दिनांक ११.९.२००९ रोजी, त्यांनी मागितलेल्या आदेशाच्या संदर्भात रेकॉर्ड रुमचे अवलोकन केले असता सन १९८५ चे बदलीची कोणतीही फाईल आढळून आलेली नाही. तसेच स्थापना ४ यांचे निवेदन दिनांक ७.९.२००९ अन्वये कळविल्यानुसार टिपणीची प्रत व प्रस्तावाची प्रत उपलब्ध नसल्यामुळे आपण मागितलेली बदली संबंधीची टिपणी व प्रस्तावाच्या प्रती पुरविता येणे शक्य नाही. तसेच या कार्यालयाच्या उपलब्ध दस्तऐवजाची तपासणी केली असता आपल्या नावाची कोणतीही नस्ती अथवा कागदपत्रे आढळून आले नाही असे त्यांना कळविण्यात आलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ६७२/२०१० मध्ये दिनांक १२.१२.२००९ रोजी व अपील क्रमांक ६७३/२०१० मध्ये दिनांक १६.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत.

२. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांची बदली झाली होती व त्याबद्यलचा आदेश मात्र त्यांना प्राप्त झालेला नाही व त्यामुळे त्यांनी माहिती मागितलेली आहे. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्जदार यांना ३ वर्ष निवृत्त होऊन झालेले आहे व १९८५ च्या बदलीच्या आदेशाची प्रत व टिपणीची प्रत ते मागत आहेत. परंतु त्यांची दिनांक २४.७.१९८५ च्या बदलीचे आदेशाची प्रत या ठिकाणी दाखल केलेली नाही. सर्व नस्तीमध्ये शोध घेतला तरी १९८५ ची माहिती असल्यामुळे ती उपलब्ध झाली नाही व वेळोवेळी ही बाब अपीलकर्ता यांना आता पर्यंत कळविण्यात आलेले आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही खारीज करण्यात येत आहेत.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६७१/२०१०.

सौ. नंदिनी प्रकाश चुनारकर,
सुमित्रा अपार्टमेंट, फ्लॅट क्र. १०१,
गोविंदस्वामी देवळाजवळ,
समाधी वार्ड नं. २, ता. जि. चंद्रपूर - ४४२ ४०२. .....

**अपीलकर्ती**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, चंद्रपूर,

श्री. अ. श्रा. चहांदे,
जनमाहिती अधिकारी तथा
नगर रचनाकार,
नगर परिषद, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ती यांनी दिनांक ५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ती व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ती ही हजर आहे. माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे श्री. एम. के. वनकर, शाखा अभियंता हे हजर आहेत.

२. अपीलकर्ती यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा नगर अभियंता, नगर परिषद, चंद्रपूर यांचेकडे श्री. स्वामी समर्थ बिल्डर्स अॅन्ड डेव्हलपर्स निर्मित सुमित्रा अपार्टमेंट, समाधीपूरा, चंद्रपूरच्या

संदर्भामध्ये बांधकाम सुरु करण्याचे दिलेले प्रथम प्रारंभ प्रमाणपत्राची प्रमाणित प्रत. बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्र प्रमाणित प्रत अशी एकूण ५ मुद्यांची माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ती यांना दिनांक ९.३.२०१० रोजी मुद्या क्रमांक १ ते ४ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आलेली दिसून येते. परंतु मुद्या क्रमांक ५ ची माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ती यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक

३०.३.२०१० रोजी देण्यात आलेला असून मुद्दा क्रमांक ५ ची माहिती जाणूनबुजून पुरविली नाही असे म्हणता येणार नाही. अपील अर्ज खारीज करण्यात आलेला आहे व त्यामुळे अपीलकर्ती यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ती यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना १ ते ४ मुद्यांची माहिती मिळाली. परंतु बांधकाम पुर्णत्वाचा दाखला/बांधकाम परिपुर्ती प्रमाणपत्राची माहिती मिळाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, डेव्हल्पमेंट कंट्रोल रुल्स प्रमाणे विकासकांनी किंवा वास्तुशास्त्रज्ञांनी पुर्णत्वाचा दाखला करावयाचा असतो तो अद्याप पर्यंत दाखल केला नसल्यामुळे बांधकाम पुर्णत्वाचा दाखला देण्यात आलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ती यांना माहिती पुरविता येणार नाही. जनमाहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांचे म्हणणे योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे. अपीलकर्ती यांनी विकासकाचे विरुध्द ग्राहक न्यायालयामध्ये न्याय मागणे संयुक्तिक राहिल.

## आ दे श

१) अपीलकर्ती यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ती व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६९/२०१०.

श्री. अभय विठोबाजी तम्मीवार,
सहाय्यक शिक्षक,
शिवानी अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, पावीमुरांडा,
ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
प्रकल्प अधिकारी,
एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
जि. गडचिरोली.

श्री. अतुल दिवाकर चन्नावार,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
शिवानी अनुदानित आदिवासी आश्रमशाळा,
पावीमुरांडा, ता. चामोर्शी, जि. गडचिरोली. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचेतर्फे श्री. एस. आर. शिंदे, सहाय्यक प्रकल्प अधिकारी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रभारी मुख्याध्यापक, शिवानी अनुदानित आदिवासी आश्रमशाळा, पावीमुराडा यांचेकडे वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती देयकाबाबत एकूण ५

मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २५.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आपण सादर केलेली वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके सादर करण्यात आलेले होते. पण सदर प्रतिपुर्ती देयकांच्या त्रृटींची पुर्तता परिपूर्ण केलेली नसल्यामुळे सदर वैद्यकीय खर्चाची प्रतिपुर्ती देयके आपणास परत करण्यांत येत आहे असे कळविलेले दिसते. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम

अपीलाच्या संदर्भामध्ये प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, वैद्यकीय खर्चाची प्रतीपुर्ती देयके त्रृटयांची पुर्ततेसह दिनांक १६.१.२०१० रोजी सादर केले परंतु अद्याप पर्यंत देयक मंजूर झाले नाही व त्याबद्यल माहिती मागितली असता माहिती सुध्दा देत नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, सदरच्या वैद्यकीय देयकाचे संदर्भात मुख्याध्यापक यांनी दिनांक १६.४.२०१० रोजी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांना कळविले आहे. त्यानंतर दिनांक ४.५.२०१० रोजी त्रृटयाचे संदर्भात अपीलकर्ता यांना कळविले आहे. तसेच दिनांक १.४.२०१० रोजी अध्यक्ष, सेमाना विद्या व वनविकास प्रशिक्षण मंडळ, गडचिरोली यांना कळविले आहे. तसेच दिनांक ११.६.२०१० रोजी सुध्दा त्याबाबत पत्र व्यवहार केलेला आहे. दिनांक ११.६.२०१० रोजी डॉ.निर्मल जयस्वाल, शुअर टेक हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, नागपूर यांचेकडे सुध्दा पत्र व्यवहार केलेला आहे. दिनांक ३०.५.२००९ रोजी मुख्याध्यापक यांनी प्रकल्प अधिकारी यांचेकडे पत्र व्यवहार केला आहे. पुन्हा प्रकल्प अधिकारी यांनी दिनांक १८.६.२००९ रोजी जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, गडचिरोली यांचेकडे पत्र व्यवहार केलेला आहे व त्यानंतर वेळोवेळी अपीलकर्ता यांना सर्व त्रृटया बद्यल माहिती दिली आहे व केलेल्या कार्यवाही प्रमाणे पुन्हा राज्य माहिती आयोगाकडे खुलासा दाखल केलेला आहे. शिवानी अनुदानित आश्रमशाळा, पावीमुरांडा येथील कर्मचारी श्री. अभय विठोबाजी तम्मीवार, सहशिक्षक यांची वैद्यकीय प्रतीपुर्ती फाईलमधील त्रृटींची निराकरण करण्याकरिता प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, गडचिरोली यांनी सदर फाईल दिनांक १८.१२.२००९ ला कार्यालयात पाठविली. नंतर ती फाईल दिनांक १६.१.२०१० ला पुनश्च कार्यालयात जमा केली व त्यात त्रृटींची पुर्तता केलेली नसल्यामुळे ती फाईल दिनांक २५.२.२०१० ला परत करण्यात आली. ती फाईल सदर कर्मचाऱ्याने त्रृटीची पुर्तता करुन दिनांक २७.३.२०१० ला मुख्याध्यापक यांच्याकडे जमा केली. त्या फाईलमध्ये आक्षेपार्थ त्रृटया असल्यामुळे ती फाईल दिनांक १.४.२०१० ला पडताळणीकरिता संस्था कार्यालय येथे पाठविण्यात आली होती. परंतु अध्यक्ष महोदयांनी खालील प्रमाणे त्रृटया आढळून आल्यामुळे ती फाईल मुख्याध्यापकाकडे पाठविली. १) दिनांक २५.३.२००९ ते ३.५.२००९ पर्यंत वैद्यकीय सुट्टीचा अर्ज दिलेला नाही. २) संस्थेच्या ठरावाची मुळप्रत नाही. ३) डॉ. निर्मल जयस्वालचे वेगवेगळे रजिस्ट्रेशन नंबर आहेत. याचा खुलासा मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करावे. वरील सर्व त्रृटयांची पुर्तता करुन मुख्याध्यापक यांच्याकडे सादर करण्याकरिता श्री. अभय विठोबाजी तम्मीवार, सहशिक्षक यांना जा.क्र. ४४३/१०, दिनांक ४.५.२०१० ला पत्र देऊन वरील त्रृटयांचे खुलासा सादर करण्यास सांगितले होते पण सदर कर्मचाऱ्याने खुलासा अजुनपर्यंत शाळेत सादर केलेला नाही. नंतर संस्थेच्या आदेशानुसार शाळेतर्फे दिनांक ११.६.२०१० जावक क्रमांक ४५७/१० नुसार डॉ. निर्मल जयस्वाल यांना दोन वेगवेगळे रजिस्ट्रेशन नंबर व सहिची शहानिशा करण्याकरिता डॉ. निर्मल जयस्वाल कडे फाईल पाठविण्यात आली व डॉ. जयस्वाल यांनी रजिस्ट्रेशन नंबर व सहीची शहानिशा करुन पत्र शाळेच्या मुख्याध्यापकांना दिले. डॉ. निर्मल जयस्वाल यांनी रजिस्ट्रेशन नंबर व सही आणि स्टॅम्प वेगळे आहेत हे स्वत: डॉक्टरनी हे खोटे आहे म्हणून लेटर पॅडवर लिहून दिले आहे. सदर छायांकित प्रत सोबत जोडलेली आहे. करिता माहितीस तथा उचित कार्यवाहीस सादर. वरील पत्रव्यवहार व खुलाशावरुन असे दिसून येते की, मुख्याध्यापक यांनी सदरच्या देयकाचे संदंर्भामध्ये सर्व प्रकारे पत्र व्यवहार करुन प्रयत्न केलेला दिसून येतो व त्रृटयांच्या संदर्भात सुध्दा अपीलकर्ता यांना वेळोवेळी त्यांना कळविले आहे. डॉ. निर्मल जयस्वाल यांनी दिलेले पत्र हे अत्यंत महत्वाचे आहे व त्यामुळे अपीलकर्ता हे त्रृटयांची पुर्ती करीत नाही तो पर्यंत देयकास मान्यता मिळाली असे दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी एकत्र बसून सदरच्या प्रस्तावाचे संदर्भात योग्य ती कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे निकाली काढण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६६२/2010 व अपील क्रमांक ६६३/२०१०.

श्री. कृष्णा उपासराव वाठ,
६८४, मरारटोली, रामनगर,
नागपूर - ४४० ०३३. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त (मुख्यालय)
नागपूर.

श्री. सुरेश सोने,
जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन)
पोलीस आयुक्त कार्यालय, नागपूर.

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
पोलीस उपआयुक्त,
परिमंडळ क्रमांक - १,
सिताबर्डी विभाग, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
सहाय्यक पोलीस आयुक्त,
सिताबर्डी विभाग, नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक १९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या दोन्ही द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक १९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत. माहिती अधिकारी यांचे तर्फे श्री. बाबाराव चव्हाण, पोलीस उपनिरिक्षक हे हजर आहेत. अपीलकर्ता सकाळी १०:०० वाजता आयोगाचे कार्यालयात हजर झाले. परंतु अत्यंत महत्वाचे काम असल्यामुळे सुनावणीस उपस्थित राहणे शक्य नाही असे निवेदन सुध्दा दिले व सही केली व निघुन गेले.

२.	अपीलकर्ता यांनी अपील क्रमांक ६६२/२०१० मध्ये दिनांक २०.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त (प्रशासन) नागपूर यांचे कडे पोलीस निभा रहे है गुंडो की भूमिका जाहीर सूचना व निवेदन (पत्रक) बाबत दिनांक १८.१२.२००२ या कालावधीची माहिती मागितलेली दिसून येते. अपील क्रमांक ६६३/२०१० मध्ये दिनांक १८.२.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त, सिताबर्डी, नागपूर यांचेकडे पुलीसवाले निभा रहे है गुंडो की भूमिका जबरन कब्जा, चोरी, नुकसान हानी प्रकरण दिनांक २७.१२.२००८ चे तक्रार पत्र त्याबद्यल केलेल्या कार्यवाहीची माहिती द्यावी अशी माहिती मागितलेली आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ३.३.२०१० रोजी आपण दिलेल्या तक्रारी संबंधाने आपणास वेळोवेळी मा. न्यायालयामार्फत कार्यवाही करण्याची समज देण्यात आली आहे व आपले अर्ज पोलीस स्टेशनला फाईल करण्यात आले आहे. ही माहिती आपणास देण्यात येते असे कळविलेले दिसते. सदर माहितीने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १७.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ११.४.२०१० रोजी देण्यात आला असून माहिती पुरविली असल्यामुळे कोणताही नवीन मुद्या उपस्थित केला नसल्यामुळे अपील निकाली काढण्यात येते असे कळविलेले दिसते. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३.	जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना वेळोवेळी माहिती उपलब्ध करुन दिली आहे. आयुक्तांच्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे व नस्ती सुध्दा उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता हे वारंवार काहीच विषयाचे संदर्भात अनेक प्रकारे अर्ज करीत असतात. त्याप्रमाणे त्यांना माहिती दिलेली आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा आयोगाकडे खालील प्रमाणे खुलासा दाखल केलेला आहे. अपीलकर्ता यांना दोन लहान भाऊ १) गणेश उपासराव वाठ, वय ४५ वर्षे, २) जितेंद्र उपासराव वाठ, वय ४७ वर्षे दोन्ही रा. ऑर्डनन्स फॅक्ट्री, अंबाझ री असे आहे. त्यांचे रामनगर, मरारटोली, नागपूर येथे वडीलोपार्जित घर असून कारर्पोरेशन घर टॅक्स पावती प्रमाणे क्रमांक ६८४ असा आहे. दोनही भावांचे घर क्रमांक ६८४(अ), ६८४(ब) असे कारर्पोरेशन रेकॉर्ड प्रमाणे दिसून येते. आपल्या भावांनी मिळून आपल्या ताब्यातील हिस्यातील घर दिनांक १० जुलै २००३ रोजीच्या विक्रीप्रमाणे श्री. दिलीप कृष्णराव फुलेवार यांना विक्री करुन दिली आहे. सध्यास्थितीमध्ये घराचा ताबा श्री. फुलेवार यांचेकडे आहे. तत्पुर्वी सदर घर हे सन २००० मध्ये श्री. सुनिल नायडू यांना विक्री केल्याचे कागदपत्रावरुन दिसून येते. दिनांक १६.९.२००२ रोजी गैरअर्जदार सुनिल बलराज नायडू, रा. मोहननगर, नागपूर यांच्या विरुध्द दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस स्टेशन, अंबाझरी, नागपूर येथे अपराध क्रमांक २७०/२००२ कलम ४४८, ४२७ भा.द.वि. प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन पोलीस उपनिरिक्षक श्री. एल. एस. पांडे यांनी केला असून तपासाअंती आपण दिलेली तक्रार खोटी असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांनी सदर प्रकरणामध्ये दिनांक ११.११.२००२ रोजी ब वर्ग अहवाल मा.मुख्य दंडाधिकारी यांच्या न्यायालयात दाखल केला असून मा. न्यायालयाने ब वर्ग अहवाल दिनांक १५.२.२००३ रोजी मंजूर केला आहे. वरील प्रमाणेच्या कार्यवाही नंतर आपण पोलीस वाले निभा रहे है, गुंडो की भुमिका, जबरन कब्जा, चोरी, नुकसान हानी प्रकरण अशा विषयाचे सतत अर्ज देत आहात. आपण आपल्या तक्रारीबाबत रितसर मा.न्यायालयामार्फत कार्यवाही करण्याबाबत लेखी कळविण्यात आले. आपण नेहमी एकाच विषयाचे व आशयाचे अर्ज देण्याच्या सवयीचे असल्याने व आपल्या तक्रारीबाबत न्यायालयामार्फत कार्यवाही करण्याबाबत वेळोवेळी कळविले आहे. तरी देखील अर्ज पाठविणे सुरुच आहे. आपल्या अर्जामध्ये नमुद केल्याप्रमाणे अर्ज पाठविणे सुरुच असल्याने ते अर्ज चौकशी करुन निकाली काढून आपणांस त्याबाबत संयुक्तिक उत्तर देऊन दप्तरी जमा करण्यांत आले. हे देखील आपणांस कळविण्यात आले आहे. तसेच मा. राज्य माहिती आयुक्त समोर झालेल्या सुनावणी दरम्यान गुन्हयांचे संबंधित उपलब्ध कागदपत्रे पाहणी करुन आवश्यक पेपरच्या छायांकित प्रती पुरविण्याचे निर्देश झाल्याने आपणास दिनांक

५.१२.२००९ रोजी कागदपत्रे दाखविण्यात आली आहे. कागदपत्राचे अवलोकन करुन ब वर्ग अहवालाच्या केस पेपरच्या अनुक्रमणिकेची प्रत मागितल्याने आपणास पुरविण्यात आली आहे. त्यावेळी आपण संदर्भीय पत्राप्रमाणे मुद्दा उपस्थित केलेला नाही.

४. अपील क्रमांक ६६२/२०१० मध्ये अपीलकर्ता यांनी दिनांक २०.३.२०१० रोजी तशाच प्रकारची माहिती पुन्हा तोच अर्ज सादर करुन मागितलेली असल्यामुळे त्या अपीलाच्या संदर्भात निर्णय करण्याची आवश्यकता नाही. तसेच अपीलकर्ता हे आयोगाचे कार्यालयात येतात व सुनावणीस उपस्थित राहत नाही. यावरुन सुध्दा त्यांचा पोलीसांना त्रास देण्याचा उद्देश दिसून येतो. त्यांच्या प्रकरणी त्यांना न्यायालयाकडून न्याय मिळवून घेता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले ही खारीज करण्यास पात्र आहेत

## आ दे श

१) अपीलकर्ता यांची दोन्ही अपीले खारीज करण्यात येतात.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९६/२०१०.

श्री. विजय उमराव डोंगरे,
वार्ड क्र. ३, पंचशील झेंडा चौक,
मु. पो. कटंगीकला, ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. पी. गोगुलवार,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया.

श्री. डी. एस. चौधरी,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी,
पंचायत समिती, गोंदिया.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १९.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी, पंचायत समिती, गोंदिया यांचेकडे दिनांक ६.१.२०१० रोजी दिलेल्या भ्रष्टाचार चौकशीचे अर्जाचे संदर्भाने माहिती मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील आहे. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २४.३.२०१० रोजी ग्रामपंचायत कटंगी (कला) चे रेकॉर्डची काटेकोरपणे चौकशी करणे सुरु आहे. चौकशी पूर्ण होताच उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, गोंदिया यांचेकडे चौकशी अहवाल सादर करण्यात येईल व निर्णयाची प्रत आपणास पुरविण्यात येईल असे कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ११.५.२०१० रोजी देण्यात आला असून पंचायत विभाग, पंचायत समिती, गोंदिया कडून प्राप्त माहिती जशीची तशी अपीलकर्तास देण्यात आलेली आहे. खोटी माहिती दिल्याचे निदर्शनास येत असल्याने अपीलकर्ताचे अपील

अमान्य करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला आहे. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना तक्रार अर्जाची चौकशी केलेली नसल्यामुळे दप्तर दिरंगाई कायदा २००६(१) प्रमाणे ४५ दिवसामध्ये खंड विकास अधिकारी यांची जबाबदारी समजून घेतलेला निर्णय ३० दिवसांचे आंत व्यक्तिशः पुरविण्याची माहिती मागितली होती. परंतु त्यांनी चौकशी पुर्ण न करता चौकशी सुरु आहे अशी खोटी माहिती दिली. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, माहितीच्या अधिकारामध्ये अर्ज आल्यानंतर ३० दिवसाचे कालावधीत जी वस्तुंस्थिती असते त्या वस्तुस्थितीची माहिती त्यांनी दिलेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झालेली आहे. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती व त्यांना उपलब्ध करुन दिलेली माहिती याचे अवलोकन केले असता जनमाहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही योग्य असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८०/२०१०.

श्री. संजय विठ्ठलराव सत्येकार,
जे. एन. रोड, कन्हान,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डी. के. बालपांडे,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग, (विशेष प्रकल्प),
बंगला क्रमांक ३९/१, सिव्हील लाईन, नागपूर.

श्रीमती व्ही. एम. वाठ,
जनमाहिती अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
बांधकाम विभाग, (विशेष प्रकल्प),
बंगला क्रमांक ३९/१, सिव्हील लाईन, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी म्हणून श्री. डी. के. बालपांडे, बांधकाम विभाग, विशेष प्रकल्प, नागपूर यांचेकडे सार्वजनिक बांधकाम (कृषी बांधकाम) या नागपूर कार्यालयात सध्या कार्यरत कर्मचाऱ्यांची माहिती नांव, तसेच कुठल्या पदावर कार्यरत आहेत व मागील केंव्हा पासून या कार्यालयात कार्यरत आहेत एकूण ५ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १६.६.२०१० रोजी दिलेला आहे. त्यामुळे अपीलकर्ता अपीलाचे सुनावणीस उपस्थित नसल्यामुळे मागितलेली माहिती शुल्क रुपये ६०/- भरणा केल्यास आपणांस माहिती पुरविणे शक्य होईल असे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीच्याकरिता रुपये ६०/- भरणा करावा असे कळविण्यात आले होते. त्यासंबंधातील दिनांक १६.३.२०१० चे पत्र दाखल करण्यात आलेले आहे. प्रथम अपीलाचे निर्णयात सुध्दा रुपये ६०/- चा भरणा केल्यावर माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल असे कळविण्यात आले होते. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना त्यांचा कोणताही पत्र व्यवहार अद्याप पर्यंत प्राप्त झाला नाही. असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, माहिती तयार आहे व त्यामुळे त्यांना ती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यास त्यांची हरकत नाही व त्यांनी अपीलकर्ता यांना आयोगाचे समक्ष माहिती उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला. परंतु अपीलकर्ता यांनी ती माहिती घेतली नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहितीची आवश्यकता नाही असाच निष्कर्ष काढून सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७०१/२०१०.

श्री. भास्कर मिठुजी डोंगरे,
कस्तुरबा वार्ड, पंचशील झेंडयाजवळ,
ता. जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षण उपसंचालक,
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. एम. बी. राहांगडाले,
जनमाहिती अधिकारी तथा
प्राचार्य,
अध्यापक विद्यालय, दांडेगांव,
ता. जि. गोंदिया.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. कुकडे, शास्त्र सल्लागार हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य, अध्यापक विद्यालय, दांडेगांव यांचेकडे एकूण १२ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती यु.पी.सी.ने घेणार असे

नमुद केलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २१.७.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.२.२०१० रोजी देण्यात आला असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्राचार्य तथा माहिती अधिकारी अद्यापक विद्यालय, दांडेगांव यांनी विनामुल्य माहिती उपलब्ध करुन द्यावी असा आदेश दिलेला दिसून येतो. त्याप्रमाणे दिनांक १७.३.२०१० रोजी माहिती प्राप्त करण्याकरिता अध्यापक विद्यालय, दांडेगांवच्या

कार्यालयात येऊन माहिती घेऊन जावी असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी जनमाहिती अधिकारी यांना दोन पत्रे दिलेली दिसून येतात. परंतु त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती त्यांना अद्याप पर्यंत उपलब्ध झाली नाही. त्यावर जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांना पत्र देऊन २ वेळ कार्यालयात बोलाविण्यात आले. परंतु ते कार्यालयात माहिती घेण्यास आले नाही. परंतु ३० दिवसाचे कालावधीत माहिती दिली नाही त्याबद्यल त्यांच्याकडे अर्ज प्राप्त झाला नाही असे त्यांनी सांगितले. परंतु अपीलकर्ताचा अर्ज हा पोस्टाने पाठविलेला आहे व त्यांचे कार्यालयात स्विकारलेला दिसून येतो. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे म्हणणे अर्ज प्राप्त झाला नाही हे योग्य नाही. जनमाहिती अधिकारी यांनी ३० दिवसामध्ये माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द रुपये ५००/- ची शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर सुध्दा त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यापेक्षा अपीलकर्ता यांना बोलाविले याला जास्त महत्व दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी माहिती ही यु.पी.सी.ने घेणार असे नमुद केले असल्यामुळे ती त्यांना पोस्टाने पाठविणे आवश्यक होते. त्यामुळे त्यांना शास्ती बद्यल विचारणा केली असता अपीलकर्ता यांना बोलाविण्यात आले होते यावर भर दिला . परंतु ती कार्यवाही प्रथम अपीलीय अधिकारी यांचे आदेशानंतरची आहे त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. अपीलकर्ता यांना माहिती सुध्दा उपलब्ध करुन देणे आवश्यक असल्यामुळे सदरचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## **<u>आ दे श</u>**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी त्यांना मागितलेल्या माहितीची सर्व कागदपत्रे मुद्येनिहाय छायांकित प्रतीच्या स्वरुपात विनामुल्य यु.पी.सी.ने. पाठविण्यात यावी. तसे न केल्यास जनमाहिती अधिकारी हे पुन्हा शास्तीस पात्र राहतील याची नोंद घ्यावी.

२) जनमाहिती अधिकारी तथा प्राचार्य यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.५.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे ३० दिवसांत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. कोणताही पत्र व्यवहार केला नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे वेतनातून शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांनी करावयाची असून लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९८/२०१०.

श्री. मधुकर विठ्ठलराव बोडे,
रा. नवेगांव (मुरखळा) मोरेश्वर पेट्रोल पंपाजवळ,
पो. मुडझा, ता. जि. गडचिरोली - ४४२ ६०५. ..... **अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय व्यवस्थापक,
अतिशित रेत प्रयोगशाळा,
तेलंगखेडी, नागपूर.

श्री. डॉ. महेश माधवराव कापगते,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रक्षेत्र व्यवस्थापक,
वळूमाता प्रक्षेत्र, वडसा (देसाईगंज)
ता. वडसा (देसाईगंज), जि. गडचिरोंली - ४४१ २०७. .....
**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक २०.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या तर्फे श्री. डॉ. पी. एन. शिंदे हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा प्रक्षेत्र व्यवस्थापक, वळू माता प्रक्षेत्र, वडसा (देसाईगंज) जि. गडचिरोली यांचेकडे वरिष्ठ सहाय्यक संवर्गातील कर्मचाऱ्यांचे जेष्ठता यादीची सत्यप्रत पुरविणेबाबत माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २६.३.२०१० रोजी या कार्यालयास जेष्ठता सूची प्रकाशित करण्याचे अधिकार नसल्यामुळे वरिष्ठ सहाय्यक या संवर्गातील यादीची सत्यप्रत हे कार्यालय आपणास पुरवठा करु शकणार नाही. असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २०.४.२०१० रोजी देण्यात आलेला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचा निर्णय कायम ठेवून अपील फेटाळण्यात आलेले आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, जनमाहिती अधिकारी यांना या कार्यालयास जेष्ठता सूची प्रकाशित करण्याचे अधिकार नसल्यामुळे वरिष्ठ सहाय्यक या संवर्गातील यादीची सत्यप्रत हे कार्यालय आपणास पुरवठा करु शकणार नाही असे कळविले आहे. याचा अर्थ जनमाहिती अधिकारी यांचेकडे माहिती आहे असा होतो. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचे कार्यालयात दोनच वरिष्ठ सहाय्यक आहेत व जेष्ठता यादी ही मुख्यालयी असते. त्यामुळे त्यांनी मुख्यालयी जेष्ठता यादी मागणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, जेष्ठता यादी त्यांनी मुख्यालयी मागितली होती. त्यांना याच जनमाहिती अधिकारी कार्यालयाकडे माहिती मिळेल असे कळविले. यावरुन माहिती ही जनमाहिती अधिकारी सुध्दा देणार नाही व वरिष्ठ कार्यालय सुध्दा देणार नाही, त्यामुळे माहिती सुध्दा मिळू शकणार नाही असे दिसते. अशा परिस्थितीत जनमाहिती अधिकारी यांनी वरिष्ठ कार्यालयाकडून माहिती उपलब्ध करुन घेऊन अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

... ३

... ३ ...

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून जनमाहिती अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत वरिष्ठ कार्यालयाकडून जेष्ठता सुची प्राप्त करुन घेऊन अपीलकर्ता यांना विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७०३/२०१०.

श्री. राधेश्याम गोविंदराव बडवाईक,
मु.पो. सातगांव, साकरीटोला,
ता. सालेकसा, जि. गोंदिया. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. मुकेश गणात्रा,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वनअधिकारी,
उपवनसंरक्षक, वनविभाग,
गोंदिया.

श्री. आर. जी. बिसेन,
जनमाहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनविभाग, ता. सालेकसा,
जि. गोंदिया. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २२.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनक्षेत्र अधिकारी, सालेकसा यांचेकडे दिनांक १ ऑगष्ट ते १५ ऑगष्ट २००७ पर्यंतचे वेतन मिळण्याकरिता दिनांक ५.१२.२००७ पासून आजपावेतो. दिनांक १.१.२००६ ते डिसेंबर २००७ पर्यंतचे वेतन विवरण पत्रक. जानेवारी २००५ ते डिसेंबर २००५ पर्यंतचे प्रवास भत्ता बिले मिळालेली नाही त्याची कारणे. सदरची माहिती व्यक्तिशः घेणार असे नमुद केले आहे. माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १२.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे निर्णयावर माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले.

३. अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, विवरण पत्र दिले परंतु त्यात त्रृटया आहेत व त्यात नोंदी नाही.

त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी खालील प्रमाणे खुलासा दाखल केला आहे. श्री. आर. जी. बडवाईक, वनपाल (निलंबित) यांनी पुन्हा दिनांक १२.५.२०१० ला १०/- रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प जोडून माहितीचा अधिकार अंतर्गत माहिती मिळण्याकरिता विभागीय वन अधिकारी, गोंदिया यांचे नावाने अर्ज या कार्यालयास सादर केले. सदर अर्जावर अपील अर्ज म्हणून नमुद केलेले नव्हते. तसेच अपीलाचे कार्यपध्दतीनुसार अपीलीय अधिकारी यांचेकडे अपील अर्ज करतांना अर्जावर २०/- रुपयाचे कोर्ट फी किंवा २०/- रुपये कार्यालयात रोखीने भरुन ती पावती जोडावयाची आहे किंवा २०/-रुपये डिमांड ड्राफ्ट/बँकर्स चेक या कार्यालयाचे नावाने काढून अर्जासोबत जोडावयाचा असतो. परंतु अर्जावर फक्त १०/- रुपयाचे कोर्ट फी जोडलेले दिसून आले. त्या अनुषंगाने अर्जानुसार मागितलेल्या माहिती प्रमाणे माहिती अधिकारी तथा उपविभागीय वन अधिकारी, गोंदिया यांनी त्यांचेकडील पत्र क्रमांक कक्ष/उपविवअ/माअ/ दिनांक १९.५.२०१० अन्वये अर्जदार श्री. आर. जी. बडवाईक यांना अर्जाप्रमाणे माहितीकरिता माहिती अधिकारी तथा वनक्षेत्राधिकारी, सालेकसा यांचेकडे संपर्क साधण्यास कळविण्यात आलेले होते. श्री. आर. जी. बडवाईक,

वनपाल (निलंबित) यांना त्यांनी मागितलेली माहिती मिळाली नसल्यास संबंधित वनपरिक्षेत्राचे प्रथम अपील अधिकारी, सहाय्यक वनसंरक्षक (रो.ह.यो.) गोंदिया यांचेकडे २०/- रुपयाचे कोर्ट फी स्टॅम्प जोडून अर्ज सादर करावयास पाहिजे होते किंवा २०/- रुपये कार्यालयात रोखीने भरुन किंवा २०/- रुपये डिमांड ड्राफ्ट/बँकर्स चेक या कार्यालयाचे नावाने काढून अर्जासोबत जोडावयास पाहिजे होते. परंतु संबंधित अर्जदार यांनी तसे अपील अर्ज या कार्यालयास केलेले नाही. अर्जदाराने दिनांक १२.५.२०१० ला त्यांचे अर्ज या कार्यालयास ज्याला कथीत अपील अर्ज समजावे तो दिनांक १३.५.२०१० रोजी या कार्यालयास प्राप्त झाला. त्या अर्जाचे अनुषंगाने

या कार्यालयाचे पत्र क्रमांक कक्ष-५/आस्था-१/१४३२, दिनांक १५.६.२०१० अन्वये दिनांक २२.६.२०१० ला या कार्यालयात उपस्थित राहण्यास कळविण्यात आलेले होते. अर्जदार हे दिनांक १५.६.२०१० ला काही कामानिमित्त प्रत्यक्ष या कार्यालयात येऊन निम्न स्वाक्षरीकर्ते यांचेकडे उपस्थित झाले असता त्यांच्याशी माहितीचा अधिकार अंतर्गत मागितलेल्या माहितीबाबत सुनावणी करण्यात आली. अर्जदार यांनी अर्जामध्ये मागितलेली माहिती ही माहिती नसून प्रश्न विचारलेले होते. अशा प्रकारचे प्रश्नाचे उत्तर देणे अपेक्षित नाही व आपण मागितलेली माहिती ही देण्यात आलेली आहे असे कळविण्यात आले. असे असले तरी पुर्वी उपलब्ध झ ालेल्या माहितीच्या आधारावर अपीलकर्ता यांनी पुन्हा तक्रार दाखल केलेली आहे व त्या तक्रारीची चौकशी करुन त्यांना न्याय मिळेल अशी त्यांना अपेक्षा आहे. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## **आ दे श**

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांच्या तक्रारीची चौकशी मुद्येनिहाय करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९७/२०१०.

श्री. रमेश रामभाऊ जोशी,
आकांशा, १३ प्रतापनगर,
जुने आरटीओ ऑफीस मागे,
वर्धा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. सालम बीन सईद,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (आरोग्य),
पंचायत समिती, देवळी, जि. वर्धा.

श्री. कैलास विठ्ठल आघाव,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्रामपंचायत टाकळी (चनाजी),
पो. वायगांव (नि.), ता. देवळी,
जि. वर्धा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत. उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्रामपंचायत टाकळी (चनाजी) यांचेकडे ग्रामपंचायत हद्दीतील घर क्रमांक (श्री. नारायण देवराव इंगोले) हयांच्या घराचे बांधकाम व मोकळया जागेचे क्षेत्रफळ (लांबी x रुंदी) इ. सन १९९१ व २००१ प्रमाणे फेर कर आकारणी फार्म नं. २९ व त्यानुसार नमुना ८ अ (मकान कर आकारणी रजिस्टर) नमूना ९ (कराचे मागणी वसूल रजिस्टर) च्या झेरॉक्स प्रती राजपत्रित अधिकाऱ्यांच्या स्वाक्षरीसह माहिती व्यक्तिशः मिळण्यास अडथळा असल्यास नोंदणीकृत पंजीबध्द डाकेने घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २१.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आलेला नाही. कारण प्रथम अपील प्रकरणात अर्जदारास विनामुल्य माहिती सुनावणीच्या वेळेस माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यामुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अतिरिक्त खर्चाची रक्कम न दिल्यामुळे त्यांना माहिती पुरविता आली नाही. मात्र प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर त्यांना माहिती मिळाली आहे व त्यांनी पोच दिली आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती ग्रामपंचायत हद्दीतील श्री. नारायण देवराव इंगोले यांचे घराबद्दल आहे व ती मालकी हक्काचे निर्धारीत जागेची नोंद नियमानुसार नसल्यामुळे अतिक्रमण केलेल्या जागेची नोंद वैध दस्ताऐवज संबंधितांच्या नावावर असल्याचे सांगून स्वतःचे नावावर करुन घेण्याकरिता दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. वास्तविक प्रकरण मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समोर सुरु आहे. तसेच न्यायप्रविष्ट सुध्दा आहे असेच अर्जदारास उत्तर देण्यात आले. तसेच अर्जदाराने माहिती मिळाल्याचे सुध्दा दिले आहे. मात्र माहिती दिली नाही याकरिता जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, ते नविन आहेत व त्यांना अजून प्रशासकीय कामकाजाची व या कायद्याची माहिती नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी अतिरिक्त खर्चाचा भरणा केला नसल्यामुळे माहिती दिली नाही असे त्यांनी पुन्हा सांगितले. परंतु नंतर माहिती दिली आहे व पोच सुध्दा दिलेली दिसून येते. त्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

... ३

... ३ ...

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७०२/२०१०.

श्री. प्रभाकर रामराव वराडे,
मनोरम, विद्यानगर कॉलनी,
टी. बी. टोली, गोंदिया - ४४१ ६०१. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.वि.),
जिल्हा परिषद, गोंदिया.

श्री. एस. आर. खोत,
जनमाहिती अधिकारी तथा
कक्ष अधिकारी, (सा.प्र.वि.)
जिल्हा परिषद, गोंदिया.

.....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांचे कार्यालयात राज्य माहिती आयुक्त यांनी अपील क्रमांक २६४४/०७ मध्ये दिनांक १०.२.२००९ रोजी दिलेल्या आदेशाचे अनुपालनबाबत दिनांक १०.२.२००९ नंतरच्या कालावधीची माहिती व्यक्तिशः घेणार, अशी मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळेच अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे असे सांगितले की, त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालयात माहिती मागितली होती व ती त्यांना सामान्य प्रशासन विभागाकडून अपेक्षित होती. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अर्ज त्यांनी सामान्य प्रशासन विभागाकडे केलेला असला तरी संबंधित माहिती ही शिक्षण

विभागाशी संबंधित असल्यामुळे शिक्षणाधिकारी यांचेकडे अर्ज हस्तांतर केला होता. परंतु शिक्षणाधिकारी यांनी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नाही व त्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. परंतु आयोगाकडे जी कागदपत्रे दाखल केली आहेत त्यामध्ये आयोगाचे निर्णयाचे अनुपालन करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गोंदिया यांना दिनांक १२.६.२००९ रोजी गटशिक्षणाधिकारी, पंचायत समिती, तिरोडा श्री. वाय. बी. रंगारी व उपशिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, भंडारा श्री. एम. एल. मोहबंशी यांना शिस्तभंगाची कार्यवाही लागू असलेल्या सेवानियमाप्रमाणे एक वेतनवाढ कायम स्वरुपी कां रोखण्यात येऊ नये अशी कारणे दाखवा नोटीसेस मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सामान्य प्रशासन विभागाकडून दिलेली दिसून येते. त्यामुळे संपूर्ण माहिती ही सामान्य प्रशासन विभागाने उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही व जी माहिती अपीलकर्ता यांनी मागितली ती त्यांना न देता आयोगाचे कार्यालयात मात्र ती त्यांनी दाखल केली. परंतु अपीलकर्ता यांना अद्यापपर्यंत काय कार्यवाही झालेली आहे हेही

कळालेले नाही. त्यामुळे ज्यांनी माहिती मागितली त्यांना ती द्यावयाची नाही व आयोगाचे कार्यालयात माहिती दिली किंवा नाही एवढेच तपासले जाते. त्यांना माहिती द्यावयाची एवढे सामान्य ज्ञान जनमाहिती अधिकारी यांना दिसून येत नाही. त्यामुळे सुरुवातीलाच माहिती उपलब्ध करुन दिली असती तर अपीलकर्ता यांना प्रथम अपील व द्वितीय अपील करण्याची आवश्यकता नव्हती व अपीलकर्ता यांना नागपूर येथे येण्याची आवश्यकता नव्हती. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी गोंदिया येथून येण्याजाण्याचा खर्च अपीलकर्ता यांना देणे आवश्यक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून ३ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना केलेल्या कार्यवाहीच्या छायांकित प्रती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात याव्या व गोंदिया ते नागपूर व नागपूर ते गोंदिया असा प्रवास खर्च त्यांना देण्यात यावा.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८०/२०१०.

श्री. संजय विठ्ठलराव सत्येकार,
जे. एन. रोड, कन्हान,
ता. पारशिवनी, जि. नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विशेष प्रकल्प अधिकारी,
पेंच प्रकल्प, वैनगंगानगर, अजनी,
नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
उपविभागीय अभियंता,
पेंच पाटबंधारे व्यवस्थापन,
उपविभाग, टेकाडी, ता. पारशिवनी,
जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २८.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २८.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत. उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, पेंच पाटबंधारे व्यवस्थापन, उपविभाग, टेकाडी यांचेकडे मौजा सिहोरा, कन्हान, खंडाळा, गहूहिवरा, कांद्री, टेकाडी या क्षेत्राच्या लाभक्षेत्रांतर्गत पाणी वापर संस्थांची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी प्रकल्प अधिकारी, भू व जल व्यवस्थापन पथदर्शी प्रकल्प, नागपूर यांना मी मागितलेली संपूर्ण माहिती मला मिळाली. त्याबद्यल माझा कसलाही आरोप, आक्षेप नाही. अशी पोच दिल्यामुळे व दिनांक २८.६.२०१० रोजी माहिती मिळाल्याचे तोंडी निवेदन सांगून रोजनाम्यावर सही केली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८५/२०१०.

श्री. विठ्ठलराम रामलाल डोंगरे,
बी-२१-१६७, हुडको क्वार्टर,
राणी दुर्गावती नगर, बिनाकी,
नागपूर - ४४० ०१७. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. लि.,
डिव्हीजन गड्डीगोदाम, नागपूर.

जनमाहिती अधिकारी तथा
कनिष्ठ अभियंता,
महाराष्ट्र राज्य विज वितरण कं. लि.,
लष्करीबाग सब डिव्हीजन, कामठी रोड,
नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे दिनांक २१.६.२०१० रोजी उपस्थित होते. परंतु आज गैरहजर आहेत व उत्तरवादी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, लष्करीबाग उपविभाग, महाराष्ट्र राज्य विज वितरण कं.लि. नागपुर यांचेकडे दिनांक १९.११.२००८ ला नाव बदलविण्यासाठी दिलेला अर्ज ग्राहक क्र. ४१००१२००३०५० पी.सी.क्र. ३/०६/५७१५/०१३० डि. सी. क्र. ४६८०५८७ अशी माहिती टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. परंतु अपीलकर्ता यांनी त्यांच्या अपील मेमोमध्ये माहिती उपलब्ध झाली नाही असे दिले असल्यामुळे त्यांना माहिती दिली नाही असे गृहीत धरावे लागते व जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली

नसल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केलेले आहे. तसेच शासन निर्णयाचे सुध्दा उल्लंघन केलेले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही होणे आवश्यक आहे व त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांच्या दिनांक ८.४.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेली माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.
२) अपीलकर्ता यांच्या दिनांक ८.४.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने अधिनियमाचे कलम ७(१) प्रमाणे विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे तत्कालीन जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये २५०००/- शास्ती लावण्यात येते. (जनमाहिती अधिकारी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० च्या नोटीस अन्वये दिनांक २१.६.२०१० रोजी उपस्थित राहण्याकरिता कळविण्यात आले होते. परंतु उत्तरवादी हे दिनांक २१.६.२०१० व तसेच दिनांक २९.६.२०१० रोजी दोन्ही तारखांना उपस्थित राहिले नाही यावरुन त्यांना पुरेपुर संधी देण्यात आली होती. )
३) सदरच्या शास्तीची वसुली मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड, नागपूर यांनी जनमाहिती अधिकारी यांचे दरमहाचे वेतनातून वसूल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावी.
४) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची दखल घेतली नसल्यामुळे त्यांनी अधिनियमाचे तरतुदीचे उल्लंघन केले आहे. त्यामुळे मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड, नागपूर यांनी त्यांचेवर प्रशासकीय कार्यवाही करावी.
५) सदरच्या निर्णयाची एक प्रत मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य विज वितरण कंपनी लिमिटेड, नागपूर यांचेकडे पुढील कार्यवाहीसाठी स्वतंत्रपणे पोस्टाने पाठविण्यात यावी.
६) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७११/२०१०.

श्री. भागवत तुळशीरामजी दिघोरे,
मु. पो. पिंपळगांव (निपाणी),
ता. पवनी, जि. भंडारा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
खंड विकास अधिकारी,
पंचायत समिती, पवनी,
जि. भंडारा.

श्री. कावळे,
जनमाहिती अधिकारी तथा
सचिव, ग्राम पंचायत,
पिंपळगांव (निपाणी),
ता. पवनी, जि. भंडारा. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा सचिव, ग्राम पंचायत पिंपळगांव (निपाणी) यांचेकडे सर्व ग्राम पंचायत सदस्यांच्या मकानाचे सन २००८-२००९ व २००९-२०१० च्या कराचा भरणा रक्कम, दिनांक, पावती क्रमांक माहिती. सन २००८-०९ व २००९-१० च्या जमा खर्चाचा तपशील. राखीव जागेवर निवडून आलेल्या ग्रामपंचायत सदस्यांचे जात पडताळणी प्रमाणपत्र सत्यप्रत. सदरची माहिती व्यक्तिशः हवी आहे. दारिद्र रेषेखालील प्रमाणपत्र जोडलेले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये दिनांक १६.३.२०१० रोजी खंड विकास अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेश दिलेले दिसून येते. त्यानंतरही माहिती प्राप्त झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना अद्याप पर्यंत माहिती प्राप्त झाली नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, ते सेवेमध्ये नवीन असल्यामुळे व त्यांना अधिनियमाची माहिती नसल्यामुळे त्यांना माहिती उपलब्ध करुन देता आली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी हे २००९ पासून कंत्राटीने ग्राम विकास अधिकारी आहेत. त्यांना माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यकआहे. परंतु त्यांनी दिलगीरी व्यक्त केलेली आहे. असे असले तरी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आदेश दिल्यावर सुध्दा माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, माहिती तयार आहे व मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती उपलब्ध करुन देता येईल. मुद्या क्रमांक ३ ची माहिती तहसीलदार यांचेकडे असते. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती छायांकित प्रतीच्या स्वरुपात तसेव ज्या ग्रामपंचायत सदस्यांनी कराचा भरणा केला नसेल त्यांच्या नावासहित माहिती उपलब्ध करुन द्यावी. (राजकीय दबाव आल्यास नावे कळविण्यात यावी.)

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८४/२०१०.

श्री. अशोक रायभान चिमनकर,
प्लॉट नं. १७६, शिक्षक कॉलनी,
भरतनगर, कळमना मार्केट रोड,
नागपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी, (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर

श्री. श्रावण राऊत,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,
शिक्षण विभाग (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक २९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.१२.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, नागपूर यांचेकडे उपसंचालक यांचे पत्र क्र. माध्य/अ/५०७८/९९, दिनांक ३० मार्च १९९९ नुसार श्री. लक्ष्मी विद्यालय येथील शासकीय दस्तावेज माझे मुळ सेवापुस्तकाची प्रमाणित प्रत द्यावी. दिनांक ३० जून २००९ पासून शाळांना चपराशी पदाकरिता दिलेल्या अप्रुव्हलच्या प्रमाणित प्रती देण्यात याव्या. माहिती स्पीड पोस्टाने घेणार असे नमुद केलेले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.१.२०१० रोजी मुद्या क्रमांक १ ची माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. मुद्या क्रमांक २ च्या संदर्भामध्ये मोघम स्वरुपाची माहिती असल्यामुळे नेमक्या कोणत्या शाळेच्या संदर्भात माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २६.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचे संदर्भामध्ये निर्णय दिलेला नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली नसल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. जनमाहिती अधिकारी यांचेतर्फे असे सांगण्यात आले की, सदरच्या माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना नेमकी कोणती माहिती पाहिजे ती माहिती विचारुन उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन निर्णय देणे संयुक्तिक राहील. त्याकरिता द्वितीय अपील हे प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे परत करणे संयुक्तिक राहिल.

# आ दे श

१) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांचे कडून निश्‍चित माहितीचे वर्णन घेऊन माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९३/२०१०.

श्री. नरेंद्र मधुकर साखरकर,
रा. सुमठाणा, पो. कोसरसार,
ता. वरोरा, जि. चंद्रपूर. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. हेमंत छाजेड,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
विभागीय वन अधिकारी,
(मुख्यालय व नियोजन)
दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर.

श्री. एस. डी. गिरी,
जनमाहिती अधिकारी तथा
अधिक्षक,

दक्षिण चंद्रपूर वनवृत्त, चंद्रपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०१०)**

## निर्णय

अपीलकर्ता यांनी दिनांक १.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १८.२.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा वनसंरक्षक, दक्षिण चांदा वनविभाग, चंद्रपूर यांचेकडे दिनांक ११.१.२०१० ला झालेल्या लेखी परीक्षेत माझे नांव होते ते लेखी परीक्षेच्या नंतरच्या यादीत कमी कां करण्यात आले. प्रकल्पग्रस्त उमेदवाराची वर्ग ३ ची किती पदे रिक्त आहेत त्याचा नामावलीनुसार माहिती पुरवावी. कोणत्या शासन निर्णयानुसार संबंधित भरती प्रक्रिया करण्यात येत आहे त्या शासन निर्णयाची प्रत देण्यात यावी. यादीतील प्रकल्पग्रस्त उमेदवाराच्या उत्तर प्रत देण्यात यावी. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन देण्यात यावी अशी माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे

अनुषंगाने दिनांक १८.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २०.४.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात आले. त्यांना वनपाल पदासाठी जी सेवा नियम शासनाने मान्य केले आहे त्याची एक प्रत उपलब्ध करुन देण्यात यावी असा आदेश दिलेला आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांना इतर माहिती मिळाली. परंतु प्रकल्पग्रस्त रोस्टर त्यांनी मागितले होते ते मिळाले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, प्रकल्पग्रस्त यादी असते. परंतु रोस्टर नसते त्यामुळे माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी असे सांगितले की, त्यांना २००८ पुर्वी स्पर्धा परिक्षा कशी घेतली याबद्यलची माहिती दिली नाही. परंतु त्यांच्या अर्जामध्ये ती मागणी केलेली नाही. असे असले तरी जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देता येईल असे आयोगापुढे सांगितले. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत अपीलकर्ता यांना प्रकल्पग्रस्तच्या स्पर्धा परीक्षा सन २००८ पुर्वी कशा पध्दतीने घेण्यात येत होत्या याबद्यलची माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९४/२०१०.

श्री. डॉ. देवानंद ईश्वर शहारे,
जे. एम. पटेल कॉलेज, भंडारा. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. डॉ. अजित देशमुख
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
सहसंचालक (उच्च शिक्षण)
नागपूर विभाग, नागपूर.

श्री. ज. ना. सहारे,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रशासन अधिकारी,
सहसंचालक (उच्च शिक्षण)
नागपूर विभाग, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक २९.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक २९.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे गैरहजर आहेत व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २९.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा विभागीय सहसंचालक, (उच्च शिक्षण) नागपूर विभाग, नागपूर यांचेकडे निवड श्रेणीत वेतननिश्चिती करतांना पी.एच.डी. च्या दोन वेतनवाढीबाबत शासन आदेशाची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमुद केलेले दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना शासकीय आदेश अजूनपर्यंत प्राप्त झालेला नाही. त्यामुळे सदर पत्राची प्रमाणित प्रत देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी प्रथम अपील दाखल केले. सुनावणीचे वेळी यु.जी.सी.चे दिनांक २४.७.२००२ चे पत्र व दिनांक ६.२.२००३ चे शासन पत्राची प्रत देण्यात आली व अपील खारीज करण्यात आले व त्यामुळेच अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यास पात्र आहे.

## आ दे श

१) अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली असल्यामुळे सदरचे अपील हे खारीज करण्यात येते.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६८७/२०१०, अपील क्रमांक ६८८/२०१० व अपील क्रमांक ६८९/२०१०.

श्री. जमील अहमद गुलात रसुल कुरैशी,
प्लॉट नं. ८२६, हसनबाग, मोठया मस्जीद जवळ,
नागपूर - ४४० ००९. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. पी. डब्ल्यू. धांडे
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
आरोग्य पर्यवेक्षक,
पंचायत समिती, नागपूर.

श्री. पी. एम. जातगडे,
जनमाहिती अधिकारी तथा
ग्राम विकास अधिकारी,
ग्रामपंचायत, बुट्टीबोरी,
ता. जि. नागपूर.

**..... उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक २४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये तीन द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी तिन्ही अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या तिन्ही द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक ३०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत. अपीलकर्ता यांच्या वतीने श्री. रमेश रामदासजी भांडे, वकील हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी वरील तीनही अपीलांमध्ये दिनांक ६.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, बुट्टीबोरी, नागपूर यांचेकडे घर क्रमांक १४६/१, घर क्रमांक १४६/२ व घर क्रमांक १४६/३ च्या संदर्भामध्ये ज्या आधारे फेरफार घेण्यात आलेले आहे त्या फेरफार संदर्भामध्ये दाखल केलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती मागितलेल्या दिसून येतात. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.२.२०१० रोजी तीन प्रथम अपीले दाखल केली आहेत. तीनही प्रथम अपीलांची सुनावणी दिनांक १८.३.२०१० रोजी घेण्यात आली असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांना देण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांना पुन्हा दिनांक १०.५.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी यांनी अपीलीय अधिकारी यांना पाठविलेल्या पत्राची प्रत उपलब्ध करुन दिलेली आहे व त्यामध्ये श्री. जमिल अहमद गुलाम रसुल कुरेशी यांना घर क्रमांक १४६/२ व १४६/३ ची माहिती देण्यात आली.

परंतु घर क्रमांक १४६/१ च्या माहितीबाबत ग्रामपंचायत दप्तरी कागदपत्राचा शोध घेतला असता कागदपत्र दप्तरी उपलब्ध दिसले नाही. त्यामुळे माहिती देता आली नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांचे तर्फे श्री. रमेश भांडे, वकील यांनी युक्तिवाद केला. युक्तिवादामध्ये त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली त्या तीनही अर्जामधील माहिती त्यांना विलंबाने उपलब्ध करुन दिलेली आहे. त्यातही घर क्रमांक १४६/१ च्या संदर्भात कोणत्याही प्रकारची माहिती उपलब्ध करुन दिली नाही व फेरफार कोणत्या कागदपत्राचे आधारे केली आहे त्याबद्यलची कोणत्याही माहितीची कागदपत्रे दिली नाही व कागदपत्रे आढळून येत नाही अशा प्रकारे कळविण्यात आलेले आहे. घर क्रमांक १४६/२, १४६/३ च्या संदर्भामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध करुन दिली आहेत ती दिशाभूल करणारी आहेत. त्या कागदपत्रांचे आधारे फेरफार होऊ शकत नाही त्यामुळे ती अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती दिली असे त्यांचे म्हणणे आहे.

४. जनमाहिती अधिकारी यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, ग्राम पंचायतची अभिलेखे ही रुम मध्ये ठेवलेली असून ती अस्ताव्यस्त ठेवलेली आहेत. त्यामुळे माहिती देण्यास विलंब झालेला आहे. संपूर्ण फेरफार घेतला त्यामध्ये कोणतेही कागदपत्रे आढळून येत नाही व घर क्रमांक १४६/२, १४६/३ च्या संदर्भामध्ये अभिलेखामध्ये जी कागदपत्रे उपलब्ध होते ती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहेत. परंतु विलंब झालेला आहे हे त्यांनी मान्य केले. विलंबाचे कारण त्यांनी शोध घेण्यास विलंब झाला आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा प्रकारचे आदेश दिलेले आहेत. वास्तविक प्रथम अपीलीय अधिकारी यांनी प्रथम अपीलाची सुनावणी घेऊन चौकशी करुन माहिती त्याच वेळेस उपलब्ध होईल अशा प्रकारे निर्णय देणे आवश्यक असते. परंतु या प्रकरणामध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी या पलिकडे कोणतीही चौकशी केली नाही व त्यांनी अधिनियमाचे तरतुदचे उल्लंघन केलेले आहे. वकीलांनी युक्तिवाद केला त्यामध्ये त्यांनी असे सांगितले हे फेरफार करण्यात आले ते चुकीचे करण्यात आले आहे. परंतु वकीलांचा युक्तिवाद हा गुणवत्तेबाबत असल्यामुळे माहिती आयोगास गुणवत्तेबाबत आदेश देण्याचा कोणताही अधिकार नाही. फेरफार ग्रामपंचायत अधिनियमाप्रमाणे फेरफार संबंधामध्ये खंड विकास अधिकारी यांस फेरफार करण्याची तरतूद आहे. त्यामुळे उपलब्ध झालेल्या माहितीच्या आधारावर फेरफार

करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती मिळालेली आहे. परंतु ती विलंबाने मिळालेली असल्यामुळे जनमाहिती अधिकारी हे दोषी आढळून येतात. अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक ६.१.२०१० चा आहे व त्यांना माहिती ही दिनांक २२.३.२०१० रोजी देण्यात आलेली आहे. याचा अर्थ विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नाही. विलंबाचे कारणावर जनमाहिती अधिकारी यांना विचारले असतात त्यांनी शोध घेण्यास विलंब झाला असे त्यांचे म्हणणे आहे. परंतु ते कारण असू शकत नाही. ग्राम पंचायत कार्यालयात माहितीचा शोध घेण्यास ३ महिन्याचा कालावधी लागावा हे बरोबर नाही. त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यामुळे अपीलकर्ता यांची तीनही अपीले हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहेत.

# आ दे श

१) अपीलकर्ता याची तींनही अपीले ही अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना तीनही अपीलांचे अर्जाचे संदर्भात दिनांक ६.१.२०१० च्या अर्जात विलंबाने माहिती म्हणजे विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे ते अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये दोषी आढळून येतात. त्यांचे म्हणणे परंतुकाप्रमाणे ऐकून घेतले आहे. त्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५००/- शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली ही त्यांचे दरमहाचे वेतनातून खंड विकास अधिकारी यांनी वसुल करुन लेखाशिर्ष "००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या लेखाशिर्षामध्ये जमा करावे.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ८०१/२०१०.

श्री. पॅथर यशवंत बळीराम अंबागडे,
मु. पो. सिर्सी, ता. उमरेड,
जि. नागपूर - ४४१ २१४. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (माध्यमिक)
जिल्हा परिषद, नागपूर.

सौ. चित्रा मधुकरराव आरघोडे,
जनमाहिती अधिकारी तथा
मुख्याध्यापिका,
वसंतराव नाईक कृषि विद्यालय,
सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०१०)**

## <u>नि र्ण य</u>

अपीलकर्ता यांनी दिनांक १३.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता हे हजर आहेत व माहिती अधिकारी हे हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांच्या वतीने श्री. श्रावण राऊत, अधिक्षक हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी जनमाहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, वसंतराव नाईक कृषि विद्यालय, सिर्सी, ता. उमरेड यांचेकडे सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना व इतर शिष्यवृत्तीचे खाते क्रमांक २१ मधून वाटप केलेल्या धनादेश कान्टर चेक सन २००३-०४ ते २००९ पर्यंतची सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी. सन २००३-०४ ते २००९ पर्यंतचा अंकेक्षण लेजरबुक मधील शिष्यवृत्ती हिशोबाच्या सत्यप्रती पुरविण्याची व्यवस्था करावी अशी माहिती व्यक्तिशः मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १९.१२.२००९ रोजी दिनांक २२.१.२००९ जावक क्रमांक ६०८/०९ कार्यालयीन नोंदीनुसार आमच्याकडे उपलब्ध असलेली माहिती रजिस्टर ए.डी. ने पाठविलेली आहे. दिनांक ४.१२.२००९ आवक क्रमांक ५६९४/०९ ला प्राप्त झालेल्या पत्राची माहिती संचालक मंडळाचे परवानगी शिवाय नियम क्र. ८ अन्वये देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक

६.१.२०१० रोजी शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांचेकडे प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांची मुलगी त्या शाळेमध्ये शिकत आहे व सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजनेनुसार शिष्यवृत्ती अनुदान आले तरी मुलींना वाटत नाही त्यामुळे त्यांनी ही माहिती मागितलेली आहे. परंतु त्यातून काहीही माहिती त्यांना मिळाली नाही. परंतु जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, दिनांक २२.१.२००९ रोजी माहिती पाठविली. परंतु त्यामध्ये अपीलकर्ता यांनी पुन्हा सांगितले की, त्यामध्ये माहिती अपूर्ण आहे. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी असे सांगितले की, दोन्ही वेळेस सुनावणी ठेवण्यात आली. परंतु दोन्ही वेळेस अपीलकर्ता व जनमाहिती अधिकारी हे गैरहजर असल्यामुळे निर्णय देता आला नाही. अशा परिस्थितीत प्रथम अपीलीय अधिकारी यांनी जनमाहिती अधिकारी यांचेकडून माहिती उपलब्ध होईल असा निर्णय देणे आवश्यक असते. परंतु अपील हे खारीज करता कामा नये.

परंतु जनमाहिती अधिकारी हे त्यांचेकडे उपस्थित झाले नाही तर त्यांचे अधिकारात त्यांचे विरुध्द कार्यवाही करणे आवश्यक असते परंतु त्यांनी ती केलेली नाही. अंकेक्षण अहवालाचे संदर्भामध्ये संचालक मंडळ आवश्यक नाही. अधिनियमाचे कलम ८ मध्ये माहिती देण्याचे स्पष्ट केले आहे. परंतु अंकेक्षण अहवाल कलम ८ मध्ये येत नाही ते सार्वजनिक अभिलेख आहे त्यामुळे जनमाहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अपीलाची सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना दोन्ही मुद्यांचे संदर्भामध्ये सुनावणीच्या दिवशी माहिती उपलब्ध होईल अशा प्रकारे आदेश करुन माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहिल. त्याकरिता अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील हे अंशतः मंजूर करण्यात येत असून माहिती अधिकारी यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसाचे आंत सुनावणी घेऊन अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. जनमाहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन न दिल्यास त्यांचे विरुध्द प्रशासकीय कार्यवाही करण्यात यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ६९५/२०१०.

श्री. सुरेश शालीकराम दुरुगकर,
श्रीनगर, चंद्रशेखर वार्ड, बब्बाभवनच्या जवळ,
ता. जि. गोंदिया - ४४१ ६०१. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

श्री. राव,
प्रथम अपीलीय अधिकारी तथा
निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया.

श्री. के. बी. मिश्रा,
जनमाहिती अधिकारी तथा
प्रभारी अधिक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक १८.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २८.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची पुढील सुनावणी आज दिनांक ३०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी जनमाहिती अधिकारी तथा जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांचेकडे श्री. एन. एन. दिघोरे, तहसीलदार, गोंदिया यांची शासनाने दिलेले सेवा पुस्तकाची व जाती पडताळणी प्रमाणपत्र व वर्ग ४ ची शाळा प्रमाणपत्राची छायांकित प्रत. श्री. एस. ए. वैकुंठी, धान्य खरेदी निरिक्षक, तहसील कार्यालय, गोंदिया यांची शासनाने दिलेले जाती पडताळणी प्रमाणपत्र व वर्ग ४ ची शाळा प्रमाणपत्राची छायांकित प्रत तसेच श्री. पारधी, गोदाम किपर, शासकीय गोदाम, रामनगर यांची जाती पडताळणी प्रमाणपत्र, वर्ग ४ची सेवा पुस्तकाची छायांकित प्रत व इतर ३ मुद्यांवर माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने जनमाहिती अधिकारी जिल्हाधिकारी कार्यालय, गोंदिया यांनी दिनांक २१.१.२०१० रोजी तहसीलदार, गोंदिया यांनी अर्जाच्या प्रतीसह अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यास कळविण्यात आले आहे व मुद्या क्रमांक १ व मुद्या क्रमांक ३ शुल्क भरण्याबाबत व मुद्या क्रमांक ४ ची माहिती या कार्यालयास उपलब्ध नाही असे दिनांक ६.२.२०१० नुसार अपीलकर्ता यांना कळविण्यात आलेले आहे. परंतु अपीलकर्ता यांनी शुल्क न भरता दिनांक २.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक

१.४.२०१० रोजी देण्यात आलेला असून निवासी उपजिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी, गोंदिया यांनी प्रथम अपील हे अमान्य केलेले दिसून येते व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले आहे.

३. अपीलकर्ता यांनी युक्तिवाद करतांना असे सांगितले की, त्यांनी जी माहिती मागितलेली आहे त्या माहितीच्या संदर्भात त्यांना आता पर्यंत कोणतेही कागदपत्र उपलब्ध करुन देण्यात आलेले नाही. जनमाहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असे सांगितले की, अपीलकर्ता यांना तहसीलदार व धान्य खरेदी निरिक्षक यांची जी माहिती मागितलेली आहे ती तहसील कार्यालयात असते त्यामुळे तहसीलदार, गोंदिया यांना ती माहिती उपलब्ध करुन देण्यास पत्र हे मुदतीत दिलेले आहे. मुद्या क्रमांक १ व ३ च्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना शुल्क भरण्यास कळविले होते. परंतु अपीलकर्ता यांनी अद्याप पर्यंत शुल्क भरले नाही. त्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना विचारले असता मी शुल्क भरणार आहे. परंतु कोणत्याही प्रकियेमध्ये ती प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर प्रथम अपील किंवा द्वितीय अपील दाखल करावे लागते. अपीलकर्ता यांना एकूण ८६८/- रुपये भरणा करावयास सांगितले. परंतु त्यांनी तो भरणा केला नाही हे त्यांनी मान्य केलेले आहे. त्याबाबत काहीही न बोलता इतर मुद्यांच्या संदर्भामध्ये युक्तिवाद करतात. मुद्या क्रमांक ४ ची माहिती माहिती या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. कोणत्याही कार्यालयामध्ये भ्रष्टाचाराबाबत माहिती उपलब्ध नसते व ती माहिती माहिती या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. त्यामुळे भ्रष्टाचाराचे माहितीबाबत जनमाहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर बरोबर आहे. मुद्या

क्रमांक ३ च्या संदर्भामध्ये व मुद्या क्रमांक ४ ची माहिती मागितली ती देण्यात आलेली नाही असे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यावर प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगाचे निदर्शनास असे आणले की मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भामध्ये कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध आहे व ती फक्त पाहण्यास उपलब्ध होऊ शकते. अर्जाचे माध्यमातून ती उपलब्ध करुन देणे अपेक्षित नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांना ती पाहण्यासाठी उपलब्ध करुन द्यावी असे सांगितले व त्यामुळे त्यांना माहिती देता आली नाही. तहसीलदार, गोंदिया यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही असे आयोगाचे पुढे अपीलकर्ता यांनी सांगितले. त्यामुळे तहसीलदार, गोंदिया हे दोषी

आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही करणे आवश्यक आहे. जनमाहिती अधिकारी यांना तहसीलदार यांनी माहिती उपलब्ध करुन देण्यास आदेश दिले असल्यामुळे उपलब्ध असलेली माहिती (सेवापुस्तकाची माहिती वगळून) अपीलकर्ता यांना जात पडताळणी संदर्भात व मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपीलकर्ता त्रयस्थपक्ष असल्यामुळे कोणत्याही शासकीय सेवापुस्तकाची माहिती त्यांना उपलब्ध होऊ शकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.

## <u>आ दे श</u>

१) अपीलकर्ता याचे अपील हे मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आत तहसीलदार, गोंदिया यांनी मुद्या क्रमांक १, २, ५, ७ ची माहिती (सेवापुस्तकाची माहिती वगळून) विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी. इतर माहितीच्या संदर्भामध्ये अपीलकर्ता यांना दिनांक ६.२.२०१० रोजी त्यांना कळविल्याप्रमाणे रुपये ८६८/- चा भरणा करावा व माहिती उपलब्ध करुन घ्यावी.
२) तहसीलदार, गोंदिया यांनी जनमाहिती अधिकारी यांना आदेश दिल्याप्रमाणे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाचे कार्यवाहीची शिफारस करण्यात येते.
३) सदरची शिस्तभंगाची कार्यवाही **<u>जिल्हाधिकारी, गोंदिया</u>** यांनी करावयाची आहे.
४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर.**

# राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील क्रमांक ७९६/२०१०.

श्री. लंकेश्वर बाबुराव चांदेकर,
प्लॉट नं. ३९५, दादाजी धुनिवाले चौक,
जुना बगडगंज, नागपूर - ४४० ००८. .....

**अपीलकर्ता**

**वि रु ध्द**

प्रथम अपीलीय अधिकारी तथा
संचालक,
पुरातत्व व वस्तुसंग्रहालय विभाग,
सेंट जॉर्ज हॉस्पीटल परिसर,
सी.एस.टी. रोड, मुंबई - ४०० ००१.

जनमाहिती अधिकारी तथा
अभिरक्षक,
मध्यवर्ती संग्रहालय,
सिव्हील लाईन, नागपूर. .....

**उत्तरवादी**

**(आदेश पारित दिनांक ३०.६.२०१०)**

## नि र्ण य

अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, नागपूर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलाचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत यु.पी.सी.ने कळविण्यात आले होते. सदरच्या द्वितीय अपीलाची सुनावणी आज दिनांक ३०.६.२०१० रोजी घेण्यात आली. अपीलकर्ता व उत्तरवादी हे हजर आहेत.

२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.२.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा अभिरक्षक, मध्यवर्ती संग्रहालय, नागपूर यांचेकडे मोची पदाकरिता झालेल्या मुलाखतीच्या निवड समितीच्या सर्व सदस्यांच्या अभिप्रायाची प्रत मिळण्याबाबत माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांनी दिनांक २५.६.२०१० रोजी मला दिनांक ३.६.२०१० रोजी अभिप्रायाची प्रत प्राप्त झाली. माझ्या मागणी अर्जानुसार मला माहिती प्राप्त झाल्यामुळे माहिती मिळण्याबाबत माझी तक्रार नाही. त्यामुळे अपील मागे घेत आहे असे निवेदन आयुक्तांकडे सादर केले असल्यामुळे सदर अपील खारीज करण्यात येत आहे.

**नागपूर.**

**(विलास पाटील)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ, नागपूर**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १३/२०१०

१) श्री मदन राधाकिसन दुबे,
पोलीस क्वार्टस मागे, सिंधी हिंदी शाळेजवळ,
गांधीबाग, नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा सिरस्तेदार,
उपविभागीय अधिकारी कार्यालय, नागपूर. गैरतक्रारदार

(आदेश पारित दिनांक ८.६.२०१०)

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ९१२/२००९ चे आदेश पारित दिनांक ६.११.२००९ प्रमाणे माहिती १० दिवसांचे आंत उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २३.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ११.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ५.५.२०१० रोजी तक्रारीचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. परंतु गैरतक्रारदार यांनी मुदत मागितल्यामुळे सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक ८.६.२०१० रोजी घेण्यात आली. तक्ररकर्ता गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. जन माहिती अधिकारी तथा गैरतक्रारदार यांनी सांगितले की, सदरची माहिती ही पुर्वी उपलब्ध झाली होती परंतु त्यांना अवार्डची प्रत हवी होती व सदरचा रेकार्ड दिनांक १८.१२.१९८५ रोजी रेकार्ड रुम किपर यांचेकडे पाठविण्यात आला होता. व त्यामध्ये अथक प्रयत्नाने शोधून तो मिळाला व आता तक्रारदार यांना उपलब्ध करुन देता येईल. तत्पुर्वी जिल्हा अभिलेखागारात जमा केलेला रेकार्ड दिनांक ५.११.२००९ अन्वये मागितला असता तो प्राप्त न**

**झाल्याने पुन्हा दिनांक १०.२.२०१० रोजीचे पत्रान्वये जिल्हा अभिलेखागाराला रेकार्डची मागणी करण्यात येवून त्यापुर्वी पुरविण्यात आलेली माहिती बरोबर असल्याबाबत तक्रारदार यांनी दिनांक १४.१२.२००९ ला तपासणी केली आहे. परंतु तक्रारदार यांना मुख्यतः जमीन संपादनाच्या अवार्डची प्रत पाहिजे असल्यामुळे व सदर मुळ रेकार्ड प्रकरण अभिलेखागाराकडून प्राप्त न झाल्यामुळे अवार्डची प्रत पुरविता आली नाही. त्यामुळे जिल्हा अभिलेखागारात रेकार्डचा मी प्रत्यक्ष अथक प्रयत्न करुन शोध घेतला असता तो रेकार्ड मला दिनांक ३.५.२०१० रोजी सापडला असून त्यातील जमीन संपादनाची अवार्डची छायांकित प्रत आपले समक्ष पुरविण्यास अनुमती देण्यात यावी अशी आयोगास विनंती केली. त्याप्रमाणे तक्रारदार यांना रजिस्टर पोस्टाने माहिती पुरविण्यात यावी. तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार निकाली काढण्यात येत आहे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**
**जावक क्रं. दिनांक**

**मा.राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांच्या मुळ निर्णयाची प्रमाणित प्रत.**
**निवड नस्ती.**

**उपसचिव,**
**राज्य माहिती आयोग,खंडपीठ, नागपूर**

**ordeMayl१०-Balki**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ५७२/नाग/२०१०

१)श्री लहु अर्जून नंदनवार,
मु.पो.अ-हेर नवरगांव, ता.ब्रम्हपूरी, जि.चंद्रपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सचिव,
रामधन धकाते विद्यालय, सासरा पो.सासरा ता.साकोली,
जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,
रामधन धकाते विद्यालय, सासरा, पो.सासरा, ता.साकोली,
जिल्हा भंडारा. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ८.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक/सचिव यांचेकडे सन ९५-९६ पासून वेगवेगळी माहिती तसेच अपीलकर्ता यांच्या स्वतःच्या राजिनामा बाबतची माहिती एकुण ११ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ११.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या नंतर दिनांक १३.३.२०१० रोजी माहितीसाठी लागणारा खर्च रुपये २५०/- अपीलकर्ता यांनी बँकेत भरणा केलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना रजिस्टर पोस्टाने माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु सदरची माहिती ही माहितीची कागदपत्रे नसून लोकमतच्या दैनिकाची रद्दी त्यात पाठविण्यात आली असे अपीलाचे कारण दिलेले असून पेपरची रद्दी निघाली त्याचा पंचनामा सुध्दा आयोगाकडे पाठविला आहे. पंचनाम्यावर अपीलकर्ता यांचा मुलगा प्रशांत लहुजी नंदनवार, पत्नी सौ. लता लहुजी नंदनवार यांच्या सहया असून साक्षीदार म्हणून सुभाष नामदेव ठेंगरे यांची स्वाक्षरी आहे. परंतु अपीलकर्ता आज गैरहजर असल्यामुळे व दोनही साक्षीदार हजर नसल्यामुळे त्याबाबत चौकशी करता आली नाही. मात्र जन माहिती अधिकारी हजर आहे. व त्यांनी सांगितले की, त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु ती विलंबाने उपलब्ध करुन दिली. कारण सुरुवातीला शाळा कियाराचे खोलीत सूरु होती. व त्यानंतर सन २००६ मध्ये स्वतःच्या इमारतीत स्थलांतरीत झाली. अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती १९८५ ची असल्यामुळे माहितीचा शोध घेण्यास विलंब झाला आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता व रामधन धकाते विद्यालयाचे श्री रामधन धकाते हे नातेवाईक आहे. व त्यांच्या वादातून ही माहिती मागीतली आहे. व त्यामुळे त्यात कोणत्याही प्रकारचे सार्वजनिक हिताच्या दृष्टीने माहिती मागितली नाही. तरी सुध्दा अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. अपीलकर्ता यांनी त्यांच्या दिलेल्या कारणाच्या संदर्भात आयोगापुढे येवून सिध्द करणे आवश्यक होते. परंतु, तसे न केल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ५७९/नाग/२०१०

१)श्री रमेश बाबुरावजी येरावार,
धरमपुरी वार्ड क्रं.४, अहेरी, ता.अहेरी,जि.गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख गडचिरोली, कॅम्प एरिया, ता.जि. गडचिरोली. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालय, गडचिरोली,
कॅम्प एरिया, ता.जि. गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ८.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, जिल्हा भूमी अभिलेख कार्यालय यांचेकडे, आखिव पत्रिका मिळण्याबाबत तथा नांव चढविण्याबाबत माहितीचा विषय दिलेला असून दिनांक १७.७.२००७ ला सर्व कागदपत्र दिलेल्या अर्जाच्या संदर्भात काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १९.५.२००९ रोजी आपल्या संदर्भिय अर्जामध्ये कोणत्या नगर भूमापन क्रमांकावर फेर फार करुन पाहिजे या चा उल्लेख केलेला नाही. त्यामुळे दिलेली तक्रार निश्चित काय आहे, याचा अर्थ बोध होत नाही. तसेच माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २(च) प्रमाणे आपणास कोणत्या अभिलेखाच्या प्रती आवश्यक आहे याचा उल्लेख आपल्या संदर्भियत अर्जात नसल्यामुळे तीही माहिती आपणास पुरविता येत नाही असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ६.११.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. व त्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी फेरफार करण्याचा अर्ज दिला होता. परंतु आतापर्यंत त्यावर कोणतीही कार्यवाही झाली नाही म्हणून माहितीच्या अधिकारात कार्यवाहीची माहिती मागितली होती. परंतु माहितीचा अर्थबोध होत नाही असे उत्तर आल्यामुळे प्रथम अपील दाखल केले होते, त्याचा निर्णय देण्यात आला नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांच्या अर्जामध्ये प्रत्यक्ष काय माहिती पाहिजे हे त्यांनी म्हटलेले नाही. त्यांनी दिनांक १७.७.२००७ रोजी फेरफार अर्ज केला आहे व त्या संदर्भात आरोप करणारे निवेदन लिहिलेले आहे. व त्यामुळे त्याचा अर्थबोध जन माहिती अधिकारी यांना झालेला नव्हता. असे असल्यास अपीलकर्ता यांच्या दिनांक १७.७.२००७ च्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक १६.५.२००९ रोजी जी कार्यवाही झालेली आहे त्याबाबतच्या त्रुटींची माहिती अपीलकर्ता यांना देण्यात आलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, तशी माहिती त्यांना दिलेली नाही. त्रुटींची पुर्तता करणे ही माहितीच्या अधिकारातील कार्यवाही नाही. परंतु अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात अर्ज केल्यानंतरच त्यांच्या दिनांक १७.७.२००७ च्या अर्जाची कार्यवाही सुरु करण्यात आलेली दिसून येते. अर्जदाराने स्पष्ट माहिती मागितली असती तर हा प्रश्न आला नसता. विनाकारण वेगवेगळया पध्दतीने आरोप करुन अर्जामध्ये संभ्रम निर्माण केल्यास जन माहिती अधिकारी यांना त्याचा फायदा मिळतो. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक असल्यामुळे अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १७.७.२०० च्या फेरफार अर्जावर आतापर्यंत काय कार्यवाही केलेली आहे त्याबाबतच्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलबध करुन देण्यात याव्या. अन्यथा जन माहिती अधिकारी यांचे विरुध्द रुपये २५,०००/-ची शास्ती लादण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ५७८/नाग/२०१०

१) सौ.संगिता शेषरावजी खोडणकर
मु.कोंढाळी(तेलीपूरा), ग्रा.पं.रोड, पो.कोंढाळी,
ता.काटोल, जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परिषद, नागपूर, ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)(i)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

(ii)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक
मागासवर्गीय वस्तीगृह(मुलांचे)कोंढाळी,
पो.कोंढाळी, ता.काटोल, जिल्हा परिषद,नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ८.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १२.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, समाज कल्याण विभाग यांचेकडे, अधीक्षक मागासवर्गीय वसतीगृह कोंढाळी यांचेकडून झालेल्या अन्यायामुळे जि.प.नागपूर यांचे पत्र क्रमांक जिपना/सकवि/अनुवग्रह/४२५/०९ दिनांक ३१.८.२००९ चे पत्रावर मा.अधीक्षक व मा.व.गृह कोंढाळी यांनी अर्जदाराचे बाबत वरील जिल्हा परिषदेने दिलेल्या पत्रानुसार मागितलेले अभिप्राय काय पाठविले, याबाबत माहिती अधिकारी(गृह) कोंढाळी व माहिती अधिकारी तथा अधीक्षक, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, नागपूर यांना ठराविक फार्म मध्ये शासकिय मुद्रांक लावून माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १.६.२०१० रोजी अधीक्षक, जिल्हा परिषद मागासवर्गीय वसतीगृह यांनी, आपले अपील क्रमांक-१ माहिती अधिकार अधिनियम, २००५ दिनांक १२.१२.२००९ अन्वये अर्जदाराविषयी मा. खंड विकास अधिकारी, पंचायत समिती, काटोल यांचे पत्र दिनांक १४.९.२००९ अन्वये संबंधीत अर्जाविषयीची स्वयंस्पष्ट सत्यप्रत आपणास माहितीस्तव सादर करण्यात येत आहे. सादर केलेली सत्यप्रत दिनांक ४.१२.२००९ अन्वये सादर केली आहे. सदरची माहिती अपीलकर्ता यांना आता देण्यात आली आहे असे अपीलकर्ता यांनी सांगितले. याचा अर्थ माहिती विलंबाने दिली आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी सुध्दा माहिती विलंबाने दिली असे आयोगास सांगितले. विलंबाच्या संदर्भात त्यांना शास्ती कां लावण्यात येवू नये असे विचारले असता त्यांनी असे सांगितले की, त्यांना ३० दिवसात माहिती द्यावयाची असते हे त्यांना माहिती नाही. व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक १२.१२.२००९ च्या अर्जाचे अनुषंगाने ३० दिवसांचे आंत माहिती उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक हे दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधीनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये १०००/- (रुपये एक हजार फक्त) ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली त्यांचे दर महिन्याचे पगारातून वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासीक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".

**या लेखाशिर्षात जमा करावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३६५/नाग/२०१०

१)श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर,
रामनगर वार्ड क्रं. २०, पोटेगांव रोड, गडचिरोली
ता.जिल्हा गडचिरोली. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, गडचिरोली. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
जिल्हा परिषद कार्यालय, गडचिरोली. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ११.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ६.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर होते. उत्तरवादी तर्फे कार्यकारी अभियंता, व गट विकास अधिकारी यांचे तर्फे कक्ष अधिकारी हजर होते.**

**२. अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ६०४/२००९ अन्वये शास्ती केलेल्या अभियंत्याच्या कार्यवाहीचा अहवाल मिळण्याबाबत माहिती मागितली. अपील क्रमांक ६०४/२००९ च्या निर्णयामध्ये उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) यांचेकडे निर्णयाची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी दिली होती. परंतु ते सुनावणीस उपस्थित राहीले नाही म्हणून आज रोजी आयोगापुढे उपस्थित राहाण्याकरीता नोटीस काढण्यात आली होती. व त्याप्रमाणे आज उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, गडचिरोली हे हजर झाले.**

**३. अपीलकर्ता यांनी दिनांक ८.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ, नागपूर यांचे समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) प्रमाणे अपील क्रमांक ६०४/२००९ अन्वये शास्ती केलेल्या अभियंतच्या कार्यवाहीचा अहवाल हा जन माहिती अधिकारी म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांना मागितला होता. माहिती स्वत: घेणार असे नमूद केलेले दिसून येते.**

**४. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.१.२०१० रोजी कार्यकारी अभियंता(बांधकाम), जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी अपीलकर्ता यांना उत्तर दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केले आहे.**

**५. वर नमूद केल्याप्रमाणे व्दितीय अपीलाच्या सुनावणीस उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य प्रशासन) हजर नसल्यामुळे व त्यांचेवर निर्णयाप्रमाणे जबाबदारी निश्चित करण्याचे आयोगाने आदेश दिलेले असल्यामुळे आज ते सुनावणीस हजर झाले व त्यांनी आयोगापुढे अहवाल दाखल केला आहे तो खालीलप्रमाणे-**

**"उपरोक्त संदर्भिय विषयाचे अनुषंगाने सादर करण्यात येते की, अपील क्रमांक ३६५/नाग/२०१० दिनांक १३.४.१० चे नोटीस मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे दिनांक १६.४.१० ला प्राप्त झाली. प्राप्त नोटीसचे अवलोकन केले असता अर्जदार श्री मुनीश्वर गोमाजी बोरकर, रा.गडचिरोली यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांना माहितीच्या अधिकाराखाली दिनांक ८.१.२०१० ला अर्ज दाखल केल्याचे दिसून आले. चौकशी अंती सदर अर्ज मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे स्विय सहाय्यक यांचे कडून कार्यकारी अभियंता(बांधकाम) यांचेकडे मार्क झाला. तसेच श्री बोरकर अपीलकर्ता यांचे प्रथम अपील अर्ज दिनांक २०.२.२०१० हा सुध्दा मा.मु.का.अ. यांचे नावाने दाखल अर्ज कार्यकारी अभियंता(बांधकाम), जिल्हा परिषद गडचिरोली यांचेकडे मार्क झाला. दोन्ही माहितीच्या अधिकाराखाली दाखल अर्ज कार्यकारी अभियंता(बांधकाम), जिल्हा परिषद गडचिरोली यांचे स्तरावर असल्यामुळे सुनावणीस ते उपस्थित झाले.**

**(२) राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर यांचेकडील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) प्रमाणे अपील क्रमांक ६०३/२००९ च्या अनुषंगाने खालील प्रमाणे अहवाल सादर करण्यात येत आहे.**

**१) अपील क्रमांक ६०३/२००९**

**सदर प्रकरणात श्री मुनिश्वर बोरकर, अपीलकर्ता (निर्णयात नमूद केल्याप्रमाणे) यांनी दिलेल्या पत्रामध्ये त्यांचे जवळ उपलब्ध असलेली माहिती द्यावी असे कळविले आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी रुपये ९०००/- चा भरणा करण्याऐवजी संबंधित नस्तीची पाहाणी करणे संयुक्तिक राहील व त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती खर्च भरुन उपलब्ध करुन घेणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे असे नमूद केले आहे.**

**अपीलकर्ता श्री मुनिश्वर गोमाजी बोरकर, रा. गडचिरोली यांनी संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली यांना दिनांक १९.११.०९ ला दिलेल्या अर्जाचे अनुषंगाने या कार्यालयाचे पत्र क्रमांक साप्रवि/पंचा/अधि/मा.अ./४१३०/०९ दिनांक ९.१२.२००९ अन्वये संवर्ग विकास अधिकारी, पं.स.गडचिरोली मार्फत श्री ए.बी. चौव्हाण, शाखा अभियंता, पंचायत समिती, गडचिरोली यांना अपील क्रमांक ६०३/२००९ दिनांक १७.९.२००९ नुसार दिनांक ११.१२.२००९ रोजी सकाळी ११.०० वाजता सदरहु नस्त्या उपलब्ध करुन देण्यास उपस्थित राहाण्याचे निर्देश देण्यात आले, व त्याची प्रत अपीलकर्ता यांना सुध्दा देण्यात आली.**

**संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती, गडचिरोली यांचे कार्या.पत्र क्रमांक/पसग/स्था-१/२३९७/०९ दिनांक १८.१२.२००९ अन्वये श्री मुनिश्वर गोमा बोरकर यांना दिनांक ११.१२.२००९ ला कार्यालयाकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती पूर्ण दस्ताएवज, मोजमाप पुस्तीका व नस्त्यासह पाहणी केली. पाहणी अंती मागणी केलेल्या दस्ताऐवजाची छायांकित प्रत काढून माहिती पुरविण्याची कार्यवाही करण्यात आलेली आहे. तसेच संवर्ग विकास अधिकारी, पंचायत समिती गडचिरोली यांचे कार्यालयीन पत्र क्रमांक/पसग/कक्ष/७५४/२०१० दिनांक १८.३.२०१० अन्वये केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल आपणास सादर करण्यात येत आहे. सदर प्रकरणात अपीलकर्ता श्री मुनिश्वर बोरकर, यांनी केलेल्या विनंतीनुसार कार्यवाही केल्यामुळे व मागणी केल्याप्रमाणे रकार्ड उपलब्ध करुन दिल्याने श्री ए.बी. चव्हाण, शाखा अभियंता, पंचायत समिती, गडचिरोली यांचेवर शास्ती लादणे संयुक्तिक होणार नाही.**

**सबब वरील प्रमाणे केलेल्या कार्यवाहीचा अहवाल सादर करण्यात येत आहे.**

**सहपत्रः पृष्ठ क्रमांक १ ते २४."**

**६. यावरुन आयोगाचे निर्णयामध्ये उपमुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य प्रशासन) यांना जबाबदारी निश्चित करण्याचे जे आदेश दिलेले होते त्याप्रमाणे त्यांनी चौकशी न करता ती संबंधीत गट विकास अधिकारी यांनाच चौकशी करण्याचे आदेश दिले व ते योग्य नसल्यामुळे उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, गडचिरोली यांनीच चौकशी करुन जबाबदारी निश्चित करुन व शास्तीची अंमलबजावणी करुन अपीलकर्ता यांस माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य प्रशासन), जिल्हा परिषद, गडचिरोली यांनी आयोगाचे अपील क्रमांक ६०३/२००९ व ६०४/२००९ च्या दिनांक १७.९.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक २ प्रमाणे स्वतः चौकशी करुन दोषी आढळून येत असलेल्या शाखा अभियंता यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन शास्तीची वसुली करण्यात येवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास उप मुख्य कार्यकारी अधिकारी(सामान्य प्रशासन) हे शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६००/नाग/२०१०

१)श्री आनंद अजाबराव धानोरकर
तुकाराम सभागृह चौक, धाडीवाल ले आऊट, बौध्द विहाराजवळ,
रिंग रोड, नागपूर-२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी ,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ११.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता उशिराने हजर झाले. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे, नोव्हेंबर, २००६ डी.एड. प्रथम वर्षाच्या माझ्या गुणपत्रिकेवरील मजकुराबाबत. तसेच मा. उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठाच्या याचिका क्रमांक १८१७/०७ च्या निर्णयानुसार तथापि मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अधिन राहून असा उल्लेख होता. करीता सर्वोच्च न्यायालयात जाण्याकरीता आपणास प्राप्त महाराष्ट्र शासनाच्या पूर्व परवानगीची छायांकित प्रमाणित केलेली प्रत व आपण मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या शपथ पत्राची छायांकित प्रमाणित केलेली प्रत, अशी माहिती मागितलेली दिसून येते.**

**३. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २.३.२०१० रोजी निकालाच्या प्रती करीता रुपये ४/- चे चालन भरावे व माहिती उपलब्ध करुन घ्यावी. तसेच याचिका क्रमांक १८१७/०७ या क्रमांकाची कोणतीच याचिका या कार्यालयात उपलब्ध नाही. व त्याअनुषंगाने मा. सर्वोच्च न्यायालयात सादर केलेल्या शपथ पत्राची प्रत नाही, असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झ ाल्यामुळे दिनांक ११.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ३१.३.२०१० रोजी प्रथम अपीलीय अधिकारी यांनी पुर्वी दिलेले पत्र त्यांना पाठविण्यात आलेले दिसून येते. मात्र अपीलकर्ता यांचे समाधान न झ ाल्यामुळे त्यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**४. द्वितीय अपीलाच्या सुनावणीत जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांनी मागितलेल्या याचिकेच्या संदर्भात कोणतीही माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नाही व त्यावूर्वी सुध्दा त्यांना सांगितले होते. आताही त्यांना त्याप्रमाणे पुर्वी दिलेले पत्र उपलब्ध करुन देता येईल. परंतु ते पत्र अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेले असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-अपील क्रं. ६०१/नाग/२०१०

१)श्री मजहिदुल हक अन्सारी र.मो.हनीफ अन्सारी,
इस्माईलपूरा, कामठी, ता. कामठी, जि. नागपूर-२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी ,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ११.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर झाले. जन माहिती अधिकारी हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य यांचेकडे, सन २००९-१० सत्र मे. नागपूर विभाग मे उर्दु माध्यम की डी.टी.एड. प्रथम वर्ष की सूची मिलनेबाबत (२२) सूची की सत्यप्रत (३) प्रथम फेरी की प्रवेश की सूची, द्वितीय फेरी की सूची तथा तीसरी फेरी की उर्दू की सूची.. वगैरे एकुण १० मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. ३.**

**सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना एकुण १ ते १० मुद्यांच्या संदर्भात माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १५.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी सुनावणी उपस्थित राहाण्याकरीता अपीलकर्ता यांना कळविलेले दिसून येते. परंतु ते उपस्थित न झाल्यामुळे प्रकरण एकतर्फी निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व सदरच्या निर्णयाविरुध्द अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी सांगितले की, मागितलेली माहिती त्यांना अपूर्ण मिळालेली आहे. सर्व आदेशाची माहिती त्यांना मिळालेली नाही. त्यांनी प्रवेश फे-यांची माहिती मागितली होती. परंतु त्यांना दिली नाही. त्याचप्रमाणे मुद्या क्रमांक ८ ची माहिती दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांना सुरुवातीलाच त्यांच्या मुद्या क्रमांक १ ते ४ चे संदर्भात पाहिजे असलेल्या माहितीचा स्पष्ट बोध होत नाही असे कळविले होते. परंतु त्याबाबत त्यांनी माहिती अधिकारी यांचेकडे कोणताही खुलासा सादर केला नाही. व त्यामुळे त्यांना संपूर्ण प्रवेश फे-यांची माहिती उपलब्ध करुन दिली आहे व ती टेबल फार्म मध्ये दिलेली आहे. त्यात संपूर्ण माहिती आहे. परंतु अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्येनिहाय माहिती दिलेली नाही. त्यावर पुन्हा जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, मुद्या क्रमांक ८ ते १० ची माहिती ही संचालक, म.रा.शै.सं. व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचे कार्यालयाशी संबंधीत असल्यामुळे त्यांचेकडे संपर्क साधावा असे कळविले आहे. त्यावर पुन्हा अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांचेकडे माहिती मागितल्यावर ते नागपूर कार्यालयाशी संपर्क करावा असे सांगतात. व मुद्या क्रमांक ७ च्या संदर्भात त्यांनी मार्गदर्शन मागितले आहे व तसे अपीलकर्ता यांना कळविले आहे. मुद्या क्रमांक ९ च्या संदर्भात सुध्दा जन माहिती अधिकारी यांचे कार्यालयात कोणतीही माहिती उपलब्ध नसते. सर्व प्रक्रिया ही संचालक, म.रा.शै.सं. व प्रशिक्षण पूणे यांचे कार्यालयातून होत असते. व त्या कार्यालयातून फक्त प्रवेश देणे यापुढे कोणत्याही प्रकारची माहिती किंवा प्रक्रिया नसते. त्यामुळे मुद्या क्रमांक ९ व १० ची माहिती ही त्यांचे कार्यालयातून उपलब्ध होऊ शकते. असे असेल तर जन माहिती अधिकारी यांनी जे मार्गदर्शन मागितले आहे त्याकरीता पुन्हा स्मरणपत्र पाठवून ते उपलब्ध झाल्यावर अपीलकर्ता यांना पुरविणे संयुक्तिक राहील. तसेच मुद्या क्रमांक ८ मध्ये दिनांक २९.१०.२००९ चे निवेदन जन प्राचार्य यांचेकडे दिलेले असेल तर त्याबाबत संचालक यांचेकडून माहिती उपलब्ध करुन घेवून अपीलकर्ता यांना देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून २० दिवसांचे आंत संचालक, म.रा.शै.सं. व प्रशिक्षण परिषद, पुणे यांचेकडून मार्गदर्शन उपलब्ध करुन घेवून, तसेच दिनांक २९.१०.२००९ च्या निवेदनाच्या संदर्भात संचालक यांचेकडून काय कार्यवाही झाली याबाबतची माहिती विना मुल्य रजिस्टर पोस्टाने अपीलकर्ता यांना देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं.६०२/नाग/२०१०

१)श्री डॉ. रविंद्र शामराव वासनिक,
डॉ. आंबेडकर मार्ग, पंजाब नॅशनल बँक जवळ, इंदोरा चौक,
नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहसंचालक,
उच्च शिक्षण, नागपूर
मॅरिस कॅालेज इमारत, सिताबर्डी, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा प्राचार्य,
पी.डब्ल्यू.एस.कॅालेज, नागपूर, कामठी रोड, नागपूर-२६. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ११.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १५.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.८.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, युजीसी कडून लेडीज होस्टेल बांधकामाकरीता जे अनुदान आले त्या दिनांक ७.१२.२००७ ते ३१.७.२००९ या कालावधीतील बांधकामाची प्रगतीची माहिती मागितलेली दिसून येते. माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २८.७.२००९ रोजी अपीलकर्ता यांचा सचिव पदाचा कार्यकाळ दिनांक २४.७.२००९ रोजी संपलेला असताना सुध्दा व व्यवस्थापन मंडळाच्या सभेत उपस्थित असताना सुध्दा त्यांनी संस्थेचे सचिव म्हणून या पदाच्या अंतर्गत मागितलेल्या कोणत्याही पत्राची उत्तर देण्यात येवून नये असे अध्यक्ष यांचेकडून आदेश आले व त्याप्रमाणे त्यांना कळविण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक १५.९.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती उपलब्ध करुन द्यावी अशा आशयाचे पत्र दिनांक २९.९.२००९ रोजी महाविद्यालयास प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडून देण्यात आले. त्यानंतर पुन्हा दिनांक २४.९.२००९ रोजी अपीलकर्ता अर्जदार यांनी सामान्य नागरिक म्हणून पत्र पाठविले. व त्यामुळे सहसंचालक यांचे आदेशानुसार दिनांक २९.४.२००९ च्या पत्रान्वये अर्जदाराला दिनांक १६.१०.२००९ रोजी माहिती पाठविण्यात आली. तरीही अपूर्ण माहिती मिळाली म्हणून दोन पत्रे पाठविली.**

**३. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी महाविद्यालयास बँक ऑफ महाराष्ट्र, भरतनगर शाखेची माहितीच्या अधिकारा अंतर्गत पत्रान्वये माहिती मागितली होती. सदरचे पत्र दिनांक २६.११.२००९ रोजी प्राप्त झाले व त्या पत्राचे उत्तर महाविद्यालयातर्फे संबंधीतास युजीसी अकाऊंटसच्या बँक स्टेटमेंटसह व बँक ऑफ महाराष्ट्र, भरतनगर नागपूरच्या शाखा प्रबंधकाकडून निर्गमित करण्यात आलेल्या पत्रासह दिनांक २१.१२.२००९ रोजी महाविद्यालया तर्फे सादर करण्यात आले. तरी अपीलकर्ता यांनी माहिती खोटी व अपूरी असल्याचे पत्र महाविद्यालयास पाठविले. पुन्हा अपीलकर्ता यांना दिनांक ११.२.२०१० रोजी योग्य ते स्पष्टीकरण देण्यात आले. पुन्हा त्यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी पत्र पाठविले. परंतु ते महाविद्यालयाच्या अधिकारात नसल्यामुळे उत्तर देण्यात आले नाही. व सर्व माहिती अपीलकर्ता यांना सर्व पत्रांप्रमाणे देण्यात आली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आले. त्यामुळे अपीलकर्ता यांनी त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना जे अकाऊंट स्टेटमेंट दिले त्या अकाऊंट स्टेटमेंटमध्ये युजीसी कडून आलेल्या ग्रान्टची रक्कम दिसून येत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी आयोगापुढे सांगितले की, संस्थेची व महाविद्यालयाची रक्कम त्या अकाऊंट मध्ये असल्यामुळे युजीसी कडून आलेली रक्कम स्पष्टपणे दिसून येत नाही. तरी सुध्दा ३.५० लक्ष रुपये दिनांक २०.१०.२००९ रोजी अकाऊंटमध्ये टाकण्यात आले व ते स्टेटमेंट मध्ये दिसून येते. त्यामुळे अपीलकर्ता यांना कोणत्याही प्रकारची चुकीची माहिती दिलेली नाही. तसेच त्यांनी खालीलप्रमाणे खुलासा दाखल केला आहे.**

**"अपील अर्जावर योग्य कार्यवाही करण्यात येवून ते खारीज करण्यात आल्यावरही डॉ. आर.एस.वासनिक यांनी माहिती अधिकाराची पायमल्ली करुन वारंवार तीच ती माहिती पत्रान्वये मागितलेली आहे.त्यांनीवारंवार लेडीज हॉस्टेल संदर्भातील ग्रॅन्टस व त्याचा उपयोग या विषयी माहिती मागितली आहे. वास्तविक त्यांना यु.जी.सी. अकाऊंटच्या बँक स्टेटमेंट व बँकेच्या पत्रासह समाधारकारक उत्तरे पाठविण्यात आलेली आहेत.**

**(२) डॉ. आर.एस. वासनिक यांनी माहिती अधिकारा अंतर्गत दिनांक २४.११.२००९ रोजी यु.जी.सी. अकाऊंटच्या बँक स्टेटमेंट संदर्भात माहिती मागितली होती. हे पत्र महाविद्यालयास दिनांक २६.११.२००९ रोजी प्राप्त झाले. या पत्राचे उत्तर डॉ. आर.एस. वासनिक यांना मागणी केलेल्या यु.जी.सी. अकाऊंटच्या बँक स्टेटमेंट व शाखा प्रबंधकाच्या अधिकृत पत्रासह त्यांना दिनांक २१.१२.०९ रोजी पाठविण्यात आले.**

**(३) त्यानंतर दिनांक ३०.३.२०१० रोजी श्री वासनिक यांनी महाविद्यालयाचे माजी प्राचार्य डॅा. वाय.सी. गणवीर यांच्याबाबत झ ालेल्या आर्थिक गैरव्यवहाराची माहिती पत्रान्वये मागितली होती. हे पत्र महाविद्यालयास दिनांक ५.४.२०१० रोजी प्राप्त झाले. श्री वासनिक यांनी मागितलेली माहिती ही पत्रान्वये डॅा. आर.एस. वासनिक यांना महाविद्यालयातर्फे दिनांक २१.४.२०१० रोजी पाठविण्यात आली.**

**(४) यासोबत डॅा. आर.एस. वासनिक यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी माहिती अधिकाराअंतर्गत वर्ग ३ व वर्ग ४ च्या कर्मचा-यांच्या प्रमोशन संदर्भात माहिती मागितली होती. हे पत्र महाविद्यालयास दिनांक ५.४.२०१० रोजी प्राप्त झाले. या पत्राचे उत्तर डॅा. आर.एस. वासनिक यांना योग्य विवरणासह दिनांक २१.४.२०१० रोजी पाठविण्यात आले.**

**(५) तसेच डॅा. आर.एस. वासनिक यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी माहिती अधिकाराअंतर्गत पत्र महाविद्यालयास पाठविले. हे पत्र महाविद्यालयास दिनांक ५.४.२०१० रोजी प्राप्त झाले. या पत्राचे उत्तर देखील महाविद्यालयातर्फे योग्य स्पष्टीकरणासह व बॅंक स्टेटमेंटसह डॅा. आर.एस. वासनिक यांना दिनांक २२.४.२०१० रोजी पाठविण्यात आले.**

**यासोबतच डॅा. आर.एस. वासनिक यांनी दिनांक २७.१२.०९ रोजी दूसरा अपील अर्ज केला होता. या अर्जावर देखील सहसंचालक कार्यालय दिनांक २२.१.२०१० रोजी सुनावणी ठेवण्यात आली.या सुनावणीमध्ये डॅा. आर.एस. वासनिक यांना महाविद्यालयाने मागितलेली माहिती विहित मुदतीत दिल्याने अपील खारीज करण्यात येत आहे असे दिनांक २.२.२०० रोजी पत्र पाठविण्यात आले. हे पत्र महाविद्यालयास दिनांक ९.२.२०१० रोजी प्राप्त झाले.**

**अशाप्रकारे संस्थेचे माजी सचिव डॅा. आर.एस. वासनिक यांनी माहिती देण्यास नकार दिल्याचे योग्य माहिती न पुरविल्याबाबत व माहिती वेळेच्या आत न दिल्याबाबत लावलेले सर्व आरोप खोटे सिध्द होतात. प्रत्येक वेळी पाठविलेल्या माहिती अधिकार अर्जाचे योग्य उत्तरे त्यांना पाठविण्यात आलेली आहेत व महाविद्यालयातर्फे कोणतीही खोटी किंवा अपूर्ण माहिती डॅा. आर.एस. वासनिक यांना देण्यात आलेली नाही."**

**५. वरील खुलाशावरुन व प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ३५३/नाग/२०१०

१)श्री महमंद सलीम महमंद ईशाक,
C/o अविनाश पान सेंटर, बस स्टॉप, चिमूर,
ता.चिमूर, जिल्हा चंद्रपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, चंद्रपूर,
ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी वर्ग अधिकारी,
महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, ताडोबा रोड, तुकूम,
चंद्रपूर, ता.जिल्हा चंद्रपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ११.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ११.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, एस.टी.कर्मचा-यांना वार्षिक वेतन वाढ नियमानुसार दिनांक ३.४.२००८ मिळायला पाहिजे होती ती दिनांक ७.१.२०१० मिळाली याचे कारण काय ते सविस्तर कळवावे. तसेच वर्ष संपल्यानंतर किती दिवसांनी मिळायला पाहिजे याबाबत माहिती मागितलेली दिसून यते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १८.१.२०१० रोजी अतिरिक्त खर्चाकरीता रुपये ६०/- चा भरणा करावा असे कळविलेले दिसून येते व त्याप्रमाणे रुपये ६०/- चा भरणा केलेलो दिसून येतो. व त्यांना दिनांक २५.१.२०१० रोजी सदरच्या दोनही माहितीच्या संदर्भात विभाग नियंत्रक, विभागीय कार्यालय, चंद्रपूर यांचेकडे अर्ज करुन माहिती उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. विभाग नियंत्रक, चंद्रपूर यांनी संबंधीत माहिती विभागीय कर्मचारी अधिकारी, चंद्रपूर यांचेकडे अर्ज करुन उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. त्याप्रमाणे अपीलकर्ता यांनी अर्ज केला नाही. दिनांक ६.३.२०१० रोजी माहिती अधिकारी तथा विभागीय कर्मचारी अधिकारी, चंद्रपूर यांनी आपणास दिनांक ३.४.२००९ अन्वये देय झालेली वार्षिक वेतन वाढ आस्था आदेश क्रं. १२३५/०९ नुसार देय करण्यात आलेली आहे, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. प्रादेशिक व्यवस्थापक यांनी दिनांक २२.३.२०१० रोजी आपण मागितलेली माहिती आपल्याला कळविण्यात आलेली आहे. तथापि या व्यतिरिक्त माहिती आवश्यक असल्यास आपण अपीलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, रा.प. चंद्रपूर यांचेकडे रितसर अर्ज करुन उपलब्ध करुन घ्यावी असे कळविलेले दिसून येते. प्रथम अपीलाची सुनावणी दिनांक ३०.३.२०१० रोजी झालेली असून अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे निर्णय झालेला नाही असे दिसून येते. अपीलकर्ता यांचे तर्फे वकील यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना जी माहिती पाहिजे होती ती मिळाली नाही. परंतु, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती वार्षिक वेतन वाढ केव्हा देय होणार अशी माहिती मागितली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी असे सांगितले की, त्यांना देय झालेल्या वार्षिक वेतनवाढीची माहिती दिलेली आहे. परंतु केव्हा देय होणार ही माहिती वरिष्ठ कार्यालयात उपलब्ध असते. त्यामुळे तसा अर्ज करावा असे सांगितले. अपीलकर्ता यांनी प्रथम अपील सुध्दा वरिष्ठांकडे दाखल केले नाही. त्यामुळे सदरचे अपील हे त्यांनी पुन्हा प्रथम अपीलीय अधिकारी यांचेकडे पाठविले. त्याकरीता अपीलकर्ता यांना त्यांनी दाखल केलेल्या अपीलीय अधिकारी यांनीच अपीलाची सुनावणी घेतली पाहिजे असा आग्रह धरता येणार नाही. तसेच त्यांनी मागितलेली माहिती ही माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे कलम २(च) मधील माहिती या संज्ञेच्या व्याख्येत येत नाही. व त्यामुळे जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती योग्य आहे. त्याकरीता अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ ाागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिाियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ५७४/नाग/२०१०

१)श्री शांतीलाल राजाराम दखने
भगवती कृपा निवास, मातामंदिर गोविंदपूर रोड,
सिव्हील लाईन्स, गोंदिया-४४१६०१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी अध्यक्ष,
श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था, गोंदिया,
गणेश नगर, टि.व्ही.रिले सेंटर जवळ,
ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३) जन माहिती अधिकारी तथा सचिव,
श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था गोंदिया,
कन्हारटोली, ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ८.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २०.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ८.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे तर्फे ॲड. विकास डी. खानोरकर हजर आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी गैरहजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २०.२.२०१० रोजी राज्य जन माहिती अधिकारी श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था, गोंदिया यांचेकडे (१) गर्व्हनींग कमेटीच्या सभेचे तारीखवार मिनिटस व प्रोसिडींग, विषय व मंजूर ठरावासह, प्रत्येक सभेला उपस्थित सदस्यांचा नांवासह (२) सन २००५ ते २००७ च्या ऑडीट रिपोर्टमधील गंभीर आक्षेपांची यादी (३) (i) उत्पन्न खर्चाची देयके (ii) ताळेबंद (balance sheet) (४) जिंदगीच्या बाजूचा अचल संपत्तीची अद्यावत बाकीसह बँकचे पासबुकची झेरॉक्स इ. माहिती टपालाद्वारे आवश्यक आहे, असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक ८.४.२०१० रोजी देण्यात आला असून अपील मंजूर करण्यात आले असून अपीलकर्ता यांना एक आठवडयाचे आंत माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय देण्यात आलेला दिसून येतो. परंतु प्रथम अपीलाच्या निर्णयाप्रमाणे मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता आज सुनावणीस गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांचे वकील श्री विकास डी. खानोरकर यांनी युंक्तीवाद करताना आयोगापुढे सांगितले की, मा.उच्च न्यायालय मुंबई, खंडपीठ, नागपूर यांचे पुढील याचिका क्रमांक ५२९४/२००८ मध्ये दिनांक २८.४.२००९ रोजी निर्णय दिलेला असून सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होत नाही. परंतु सदरच्या याचिकेतील याचिकाकर्ता हा धार्मिक मठ आहे, व त्यास शासकिय अनुदान मिळत नाही. व सार्वजनिक विश्वस्थ संस्था असली तरी उद्येश वेगवेगळे असल्यास त्यांच्या स्वरुपात बदल होतो. व श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था ही सार्वजनिक विश्वस्थ संस्था असून मुंबई सार्वजनिक विश्वस्थ संस्था अधिनियमाच्या प्रमाणे पंजिबध्द झ ाालेली असल्यामुळे संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतूदी लागू होणार नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केली नाही किंवा प्रथम अपीलीय अधिकारी यांची सुध्दा नियुक्ती केलेली नाही. परंतु त्याच मा.न्यायमुर्ती श्री सी.एल. पांगारकर यांच्या निर्णयामध्ये परिच्छेद-८ मध्ये "Any person seeking to establish that a particular public trust is covered by the provisions of the Right to Information Act will have to first prove that it is a public trust created by Government or Parliament or** is substantively financed by the government**." असे नमूद आहे. तसेच मा.न्यायमुर्ती श्री अे.बी.चौधरी यांचे पुढील याचिका क्रमांक ५१३२/२००८ मध्ये दिनांक २०.८.२००९ रोजी दिलेल्या निर्णयाप्रमाणे, "संस्था, ही सार्वजनिक विश्वस्थ संस्था आहे. व त्यांना कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही किंवा शासनाचे नियंत्रण नाही व त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होणार नाही. व परिच्छेद-८ मध्ये सदरची संस्था ही माहितीच्या अधिकारात येत नाही" असा निर्णय दिलेला आहे. व त्यामुळे सदरचा निर्णय हा विनाअनुदानित संस्थेच्या संदर्भात असल्यामुळे श्री समर्थ न्यू शिक्षण संस्था, गोंदिया या संस्थेस लागू होणार नाही.**

**४. तसेच शासकिय नवीन शाळा मंजूर करतांना जी संस्था मुंबई सार्वजनिक विश्वस्त संस्था अधिनियम, १९५० च्या प्रमाणे तसेच सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० प्रमाणे नोंदणी**

**झालेली आहे अशाच संस्थांना शाळा सुरु करण्याची मंजूरी मिळते. वैयक्तिक व्यक्तीला शाळा सुरु करण्याची मंजूरी दिली जात नाही. माध्यमिक शाळा संहिता ही शासनाने प्रसिध्द केली आहे. सदरच्या माध्यमिक शाळा संहिता, अशासकिय माध्यमिक व उच्च**

माध्यमिक शाळांना अनुदानासाठी शासनाकडून लागू करण्यात आलेली संहिता आहे. व ही संहिता १९६३ पासून अंमलात आलेली आहे. सदरच्या संहितेमध्ये माध्यमिक शाळा, उच्च माध्यमिक शाळा सुरु करण्यासाठी परवानगी मिळविण्याचा अर्ज परिशिष्ट-१ मध्ये दिलेल्या नमून्यात करावा असे मान्यतेच्या शर्ती, मंजूरी, मान्यता नाकारणे व काढून घेणे या भागात दिलेले आहे. तसेच २.८ मध्ये - नवीन माध्यमिक/उच्च माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत खालील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाचीच शिफारस करण्यात येईल.

(१) संस्था नोंदणी अधिनियम १८६० आणि किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी. संस्थेत मागील सलग दोन वर्षात किमा तीस हजार रुपये निधी शिल्लक असावा. आदिवासी उपयोजना क्षेत्रातील जी संस्था आदिवासी उपयोजना क्षेत्रात माध्यमिक शाळा सुरु करु इच्छिते अशा संस्थांच्या बाबतीत रुपये १०,०००/- चा निधी संस्थेत शिल्लक असावा किंवा वरील रकमे इतके संबंधीत संस्थेबाबत बँकेमार्फत हमीपत्र दिले गेले असावे.
संस्थेने मागील सतत किमान दोन वर्षाचा सनदी लेखपालामार्फत लेखा परीक्षा अहवाल सादर केलेला असावा.

(२) ज्या ठिकाणी नवीन शाळा सुरु करावयाची आहे त्या ठिकाणी शाळेसाठी संस्थेच्या मालकीची किंवा भाडयाची किमान जागा वा इमारत उपलब्ध असावी.

(३) संस्थेच्या एकूण सदस्यांपैकी किमान ३० टक्के सदस्य महिला असाव्यात.

(४) संस्थेतील कोणत्याही सदस्यास भारतीय दंड संहितेच्या तरतुदीनुसार गंभीर गुन्हयाबाबत तुरुंगवासाची शिक्षा झालेली - नसावी.

वरील निकष पूर्ण करणा-या व्यवस्थापनाची शिफारस करण्यात येईल अशी तरतुद आहे. यावरुन नवीन शाळा सुरु करावयाची परवानगी ही फक्त नोंदणीकृत संस्थांना मिळते हे स्पष्ट होते. त्याचप्रमाणे आदानासाठी अर्ज, अशा प्रकारची जी तरतुद आहे त्यामध्ये सुध्दा ८६.२ मध्ये सहाय्यक आदानाची पात्रता देण्यात आली आहे. त्याप्रमाणे- खाजगी मालकीच्या शाळा(म्हणजे १८६० चा संस्था नोंदणी अधिनियम क्रमांक एकवीस किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० किंवा शासनाने याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या अन्य कोणत्याही अधिनियमानुसार नोंदणी केलेल्या शाळा, जातीय शाळा आणि शासनाने बिगर सहाय्यक अनुदान तत्वावर परवानगी दिलेल्या शाळा) हया लोकनिधीतून कोणतेही सहाय्यक अनुदान मिळण्यास पात्र असणार - नाहीत. तसेच अनुदानाचे प्रकार-८७ यामध्ये- मान्यता प्राप्त शाळा मंजुरी प्राधिका-याच्या स्वेच्छा निर्णयानुसार निधी उपलब्ध असेल तर खालील प्रकारची अनुदाने मिळण्यास पात्र असतील. मात्र ज्या संस्था अशा शाळा चालवीत असतील त्या संस्थांची वेळोवेळी दुरुस्त केलेल्या मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी केलेली असली पाहिजे.

(१) वेतन अनुदान
(२) वेतनेतर अनुदान
(३) इमारत अनुदान आणि
(४) शासकिय वेळोवेळी मंजूर करील अशी इतर अनुदाने

तसेच अनुदानातील कपात-९७.१ मध्ये व्यवस्थापन या संहितेत नमूद केलेल्या नियमांचे यथोचितरित्या पालन करीत नसल्याचे आणि शाळेच्या सर्वसाधारण कार्यक्षमतेचा -हास
झाला असल्याचे आढळून आल्यास व्यवस्थापनास स्पष्टीकरण देण्याची यथोचित संधी दिल्यानंतर संबंधीत उपसंचालक अनुदान कपात करु शकतील. ९७.२ मध्ये अक्षम्य गैरव्यवहार कार्यक्षमता व शिस्त यांचा दर्जा गंभीरपणे खालावला असल्यास विभागाचे आदेशाचा भंग इ. कारणास्तव अनुदान कमी करण्याची तरतूद आहे. ९७.३ मध्ये व्यवस्थापनास संचालकांकडे अपील करण्याची तरतूद आहे.

तसेच वेतन अनुदान जरी शाळेस मिळत असले तरी संस्था असल्याशिवाय शाळा नाही व संस्थेकडे ज्यांना वेतन मिळते त्यांच्या नियुक्ती, बडतर्फी व सेवाविषयक निर्णय करण्याचे अधिकार आहेत व त्यामुळे त्या बद्दलची माहिती ही अर्जदारास मिळालीच पाहिजे, कारण शैक्षणिक संस्था ही सुध्दा एक प्राधिकरण (Authority) आहे.

५. यावरुन शैक्षणिक संस्थांनी अटी व शर्ती पूर्ण केल्याानंतरच अनुदान मंजूर होते. व त्यामुळे सदरचे अनुदान प्रत्यक्ष शाळेस देण्यात आलेले असले तरी ते संस्थेच्या माध्यमातून देण्यात येते. याचा अर्थ सदरचे अनुदान हे मान्यताप्राप्त किंवा अटी व शर्ती पूर्ण करणा-या सार्वजनिक विश्वस्थ संस्थेसच असते असा निष्कर्ष काढावयास हरकत नाही. त्यातही नियंत्रणाचा विचार केल्यास माध्यमिक शाळा संहितेमध्ये खाजगी शाळेच्या संदर्भात कशा प्रकारचे नियंत्रण आहे याबद्दलचे संपूर्ण नियम दिलेले आहेत. तसेच महाराष्ट्र खाजगी शाळेतील कर्मचारी (सेवेच्या अटी व शर्ती विनियमन अधिनियम, १९७७) यामध्ये सुध्दा खाजगी शाळेच्या संदर्भात तरतुद करण्यात आलेली आहे. व त्यामुळे शाळेला अनुदान मिळते परंतु, संस्थेला अनुदान मिळत नाही हे म्हणणे बरोबर - नसल्यामुळे संस्थेस व्यस्थापनाच्या शैक्षणिक संबंधातील कामकाजाबाबत उदा. शिक्षक/कर्मचारी नियुक्ती, बडतर्फी सेवाविषयक इ. संदर्भात माहिती मागितली तर संस्थेच्या माहिती अधिका-यांनी ती देणे आवश्यक आहे.

८. मा. उच्च न्यायालय, दिल्ली मा.न्यायमुर्ती संजीव खन्ना यांनी नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया वि. केंद्रिय माहिती आयोग आयोग या याचिका क्रं. ४७४८/२००७ मध्ये दिनांक १५ एप्रिल, २०१० रोजी दिलेला निर्णय हा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम २ (ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरण" या संज्ञेच्या व्याख्येचे विश्लेषण केले असून त्यातील प्रत्येक संज्ञेच्या अर्थानुसार कोणकोणती संस्थेचा सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येत समावेश होतो याबाबत निर्णय दिलेला आहे. व त्या व्याख्येतील प्रत्येक निकषाचे विश्लेषणानुसार शैक्षणिक सार्वजनिक विश्वस्थ संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येत समाविष्ट होते.

नॅशनल स्टॉक एक्सचेंज हया संस्थेस शासनाचे आर्थिक सहाय्य नाही. तसेच securities contracts (Regulations) Act,१४५६ खाली पंजीबध्द असून सुध्दा माहितीचा अधिकार, २००५ चे कलम २(ज) मधील "सार्वजनिक प्राधिकरणाचे व्याख्येप्रमाणे सार्वजनिक प्राधिकरण आहे" असा निर्णय दिला आहे.

९. निर्णयाच्या परिच्छेद १३ मध्ये मा. सर्वोच्च न्यायालयाच्या (२००५) ६ SCC ६५७ या निर्णयाचा आधार घेतलेला आहे तो खालीलप्रमाणे-

**१३. More recently in Binny Limited and Another versus V.V. Sadasivan, (२००५) ६ SCC६५७, the Supreme Court has reiterated that Article २२६ of the Constitution is couched in a way that even a Writ can be issued against a body which is discharging public function and the decision sought to be corrected or enforced must be in discharge of a public function. A body is performing a public function when it seeks to achieve some collective benefit for the public or a section of the public and is accepted by the public and is accepted by the public or that section of the public as having authority to do so. Bodies, therefore, exercise public functions when they intervene or participate in social or economic affairs of public interest. In the said judgment, the Supreme Court quoted the following passage on what are regarded as public functions from De Smith, Woolf and Jowell in the book Judicial Review of Administrative Action, Fifth Edition in Chapter ३, paras ०.२४, which reads as under:-**

( पान ५ वर..)



"A body is performing a 'public function' when it seeks to achieve some collective benefit for the public or a section of the public and is accepted by the public or that section of the public as having authority to do so. Bodies therefore exercise public functions when they intervene or participate in social or economic affairs in the public interest. This may happen in a wide variety of ways. For instance, a body is performing a public function when it provides 'public goods' or other collective services, such as health care, education and personal social services, from funds raised by taxation. A body may perform public functions in the form ofadjudicatory services (such as those of the criminal and civil courts and tribunal system). They also do so if they regulate commercial and professional activities to ensure compliance with proper standards. For all these purposes, a range of legal and administrative techniques may be deployed, including rule making, adjudication (and other forms of dispute resolution); inspection; and licensing.

Public functions need not be the exclusive domain of the State.Charities, self-regulatory organizations and other nominally private institutions (such as universities, the Stock Exchange, Lloyd's of London, churches) may in reality also perform some types of public function. As Sir John Donaldson, M.R. urged, it is important for the courts to 'recognize the realities of executive power' and not allow 'their vision to be clouded by the subtlety and sometimes complexity of the way in which it can be exerted'. Non-governmental bodies such as these are just as capable of abusing their powers as is Government."

तसेच **Dharasing Girls Highschool v/s State Government of Uttar Pradesh & Others (AIR २००८ Allahabad ९२)** या याचिकेच्या मा. उच्च न्यायालय, अलाहाबाद निर्णयात-

**"Right to Information Act, २००५, ५२ (४) (d) (ii)- Public Authority - Defination-Non-Government Educational Institution recognized under U.P.Highschool and Intermediate Education Act, १९२९ and receiving grant-in-aid**

**from State Govt. falls within definition of "Public Authority" and amenable to provisions of Act"** **असा निर्णय दिलेला आहे.**

**१०. यावरुन शैक्षणिक संस्था हया सार्वजनिक विश्वस्थ संस्था असल्यातरी व अनुदानित/विना अनुदानित असल्यातरी शिक्षणाचे सार्वजनिक कामकाज करतात, व त्यावर शासनाचे नियंत्रण आहे, व त्यामुळे अनुदानित शैक्षणिक सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस माहितीचा अधिकार लागू होतो. व सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत येत असल्याने माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे बंधनकारक आहे.**

**११. त्यामुळे आुदानित शिक्षण संस्था ही सार्वजनिक प्राधिकरणाच्या व्याख्येत समाविष्ट होते, अशी आयोगाचे मत झालेले आहे. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी हे संस्थेचेच अध्यक्ष आहे व**
**त्यांनी दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय योग्य दिसून येत असल्यामुळे सदरचे अपील अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून श्री समर्थ न्यू शिक्षण सस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ हा लागू होतो. त्यामुळे सचिव, यांना जन माहिती अधिकारी नियुक्त करावे.**

**२) संस्थेचे अध्यक्ष यांनी प्रथम अपीलीय अधिकारी म्हणून दिलेला प्रथम अपीलाचा निर्णय हा योग्य असल्यामुळे त्या निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी तथा सचिव यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना मागितलेली सर्व माहिती विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील अपील क्रं. ६०८/नाग/२०१०

१)श्री भारत प्रभाकरभाई राजगुरु
पाल चौकाजवळ, रेलटोली, गोंदिया,
ता.जि. गोंदिया. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा निवासी उपजिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय गोंदिया, ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अधीक्षक,
जिल्हाधिकारी कार्यालय (नझुल विभाग) गोंदिया,
ता.जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ४.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, गोंदिया**
**नझूल सीट १-३२ तक रिन्यू किये पटटे की जमीन हस्तांतरण पर अनअर्जित रक्कम मांगे जाने से संबंधित कानून नियम के दस्ताऐवज उपलब्ध कर दे, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना त्या अर्जानुसार अर्जाशी निगडीत माहिती जी या कार्यालयात उपलब्ध आहे ती दिनांक १८.१.२०१० च्या पत्राप्रमाणे रुपये २२/-चा भरणा करुन घेण्यास कळविलेले दिसून येते. व त्याप्रमाणे रुपये २२/-चा भरणा करुन दिनांक २७.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन घेतली. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक २.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २.३.२०१० रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यात यावी व त्याप्रमाणे माहिती पुरविल्याचे अंतिम सुनावणीत स्पष्ट**
**झाल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. व त्यामध्ये मा. उच्च न्यायालयाने शासन निर्णय रद्द करुन कायदयाप्रमाणे अधिकार असल्यास अर्नजित रक्कम घेता येईल, असा निर्णय दिलेला असल्यामुळे त्यांनी त्याबाबत असलेल्या कायदयाची मागणी केली. परंतु त्यांना पुन्हा शासन निर्णय देण्यात आला व त्यामुळे त्यांनी प्रथम अपील व द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, नागपूर/अमरावती विभागातील भाडे पटटयाने दिलेल्या नझूल/शासकिय जमीनीबाबत सुधारित धोरणाच्या संदर्भात जो शासन निर्णय आहे त्या शासन निर्णयाच्या प्रती तसेच भडारा/गोंदिया येथील स्थायी पटटयावर दिलेल्या नझूल जमीनीच्या भाडेपटयाचे नुतनिकरणाबाबत ज्ञापन दिनांक १८.१०.९६ चे ज्ञापन भंडारा जिल्याच्या संदर्भात व renewal as leases नागपूर/अमरावती डिव्हीजन या संदर्भातील सर्व कागदपत्रे/ परिपत्रके व शासन निर्णय उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे. तरी अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे कायदयाची प्रत उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते. परंतु, जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, असा कोणताही कायदा पारित झालेला नाही. त्यामुळे जी माहिती उपलब्ध आहे ती तशी उपलब्ध करुन दिलेली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २ (ज) प्रमाणे सार्वजनिक प्राधिकरणाकडे ज्या साहित्याच्या स्वरुपात उदा. अभिलेखे, कागदपत्रे, टिपणी, शासन निर्णय इ. स्वरुपात जी माहिती उपलब्ध असते ती म्हणजे माहिती, व माहितीचा अधिकार या संज्ञेच्या व्याख्येप्रमाणे ती त्यांच्या नियंत्रणात असलेली माहिती असा अर्थ आहे व त्यामुळे जी माहिती जशी उपलब्ध आहे तशी ती उपलब्ध करुन दिली आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, शासनाने मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाप्रमाणे एखादा कायदा केला आहे काय याबाबत त्यांना माहिती नाही व त्याप्रमाणे सदरची माहिती जशी आहे तशी उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**
**अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना जशी उपलब्ध आहे तशी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६१४/नाग/२०१०

१)श्री हरिश सुधाकर रेहेकवार,
किल्ला वार्ड, जूनी वस्ती, तिरोडा
ता. तिरोडा, जिल्हा गोंदिया-४४१९११. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, तालुका तिरोडा, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सचिव,
विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.तिरोडा,
ता. तिरोडा, जिल्हा गोंदिया. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १४.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक १९.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक निबंधक सहकारी संस्था यांचेकडे, वि.का.से.स.संस्था तिरोडा मला सभासद का बनवित नाही त्याबद्दल सविस्तर माहिती देणे. (२) सचिव श्री खोब्रागडेजी मला सभासद बनविण्यास इच्छुक नाही, त्याबद्दल सविस्तर माहिती देणे, अशी माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २०.१.२०१० रोजी सहाय्यक निबंधक सहकारी संस्था, तालुका तिरोडा यांनी मुळ अर्ज हा आपणांकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात येत आहे. त्यानुसार आपले स्तरावरुन नियमाप्रमाणे आवश्यक ती कार्यवाही करुन तसे अर्जदारास परस्पर कळवावे व त्याची प्रत या कार्यालयास सादर करावी असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १२.३.२०१० रोजी प्रथम अपील सहय्यक निबंधक यांचेकडेच दाखल केलेले दिसून येते. त्यानुषंगाने दिनांक ५.३.२०१० रोजी सहाय्यक निबंधक यांनी माहिती त्वरीत पुरवावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्याप्रमाणे दिनांक १५.३.२०१० रोजी सहाय्यक निबंधक यांनी अध्यक्ष/सचिव, वि.का.से.स.संस्था मर्या. यांना कारणे दाखवा नोटीस जारी केली आहे. समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांनी दिनांक ३१.१२.२००९ रोजी सभासद होण्याकरीता अर्ज केला होता. व त्यांना सभासद करुन घेतले नसल्यामुळे त्यांनी दिनांक १९.१.२०१० रोजी माहितीच्या अधिकारात माहिती मागितली. परंतु जन माहिती अधिकारी यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांचेकडे दोन-तीन गावाच्या वि.का.से.स.संस्थेचा कार्यभार आहे. व सभासद करुन घेण्याकरीता संस्थेची बैठक बोलवावी लागते. त्याप्रमाणे त्यांनी अध्यक्ष यांनी सूचित केल्याप्रमाणे बैठक बोलाविली व अपीलकर्ता यांना सभासद करुन घेण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांची अपेक्षा १५ दिवसात बैठक बोलावून सभासद करुन घ्यावयाची दिसते. व त्याचमुळे त्यांनी १९ दिवसांतच माहितीचा अर्ज दाखल केला. परंतु बैठक बोलाविण्याकरीता प्रक्रिया असते व त्यासाठी प्रत्येक सभासदास नोटीस देण्यासाठी कालावधी लागतो. व त्यामुळे अपीलकर्ता यांना नंतर जरी सभासद करुन घेण्यात आले असले तरी, त्यांचा उद्देश सफल
झालेला असल्यामुळे व त्यांनी अर्ज लवकर दाखल केलेला असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांना संस्थेचे सभासद करुन घेतले असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे**

**.२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. ८०/२०१०

१) श्री दिलीप शिवनारायण अग्रवाल,
वार्ड नं.२४, गौशाला वार्ड, गोंदिया, जिल्हा गोंदिया. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा
नगर परिषद (बांधकाम विभाग)गोंदिया, जि. गोंदिया. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १४.६.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ६१२/२००९ मधील दिनांक ४.९.२००९ च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक १९.१.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. तक्रारकर्ता हजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. तक्रारदार यांनी युक्त्तीवाद करताना सांगितले की, त्यांना आदेशाप्रमाणे माहिती अजूनपर्यंत देण्यात आली नाही व पुढील कार्यवाही केली नाही. परंतु, राज्य माहिती आयोगाकडील अपील क्रमांक ६१२/२००९ या निर्णयामध्ये अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले नाही. अपीलकर्ता यांच्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली परंतु ती विलंबाने उपलब्ध झाली म्हणून शास्ती करण्यात आली होती. व शास्तीच्या अंमलबजावणीची माहिती अपीलकर्ता यांना द्यावी असे आदेश दिलेले नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांची तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

**३. अपीलकर्ता यांचे पुन्हा म्हणणे असे आहे की, त्यांनी जी कार्यवाही करुन मागितली होती ती झालेली नाही. परंतु जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, मे.रघुवरदयाल अग्रवाल यांना महानगरपालिका अधिनियम, १९६५ चे कलम १९४ ब, १९५(१) (२) (३) आणि (४) अन्वये नोटीस दिलेली होती व ते राहात असलेले मकान पाडून टाकावे किंवा न पाडल्यास नगर परिषद कार्यवाही करतील अशी नोटीस दिली होती. व त्याबाबत अपीलकर्ता यांचा आग्रह दिसून येतो. परंतु नगर परिषदेने पुढील कार्यवाही केली किंवा नाही याबाबत राज्य माहिती आयोग आदेश देवू शकत नाही. जी कार्यवाही केलेली आहे, म्हणजेच नोटीस दिलेली आहे, त्याची माहिती अपीलकर्ता यांना दिलेली असल्यामुळे तक्रार खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार खारीज करण्यात येत आहे.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २९५/२००९

१) श्री विलास शंकरराव भागवत,
निर्मल टॉकीजच्या मागे, बजाज राईस मिल जवळ,
शास्त्री वार्ड, गोंदिया, जिल्हा गोंदिया. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा उपशिक्षणाधिकारी (माध्य.)
जिल्हा परिषद, गोंदिया, जिल्हा गोंदिया. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १४.६.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक ६११/२००९ च्या दिनांक ४.९.२००९ रोजी दिलेल्या आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक ५.१०.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.मे.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १४.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक १४.६.२०१० रोजी घेण्यात आली. तक्रारकर्ता हजर आहे. गैरतक्रारदार हजर आहेत.**

**२. तक्रारीमध्ये अपीलकर्ता यांचे म्हणणे असे आहे की, त्यांना मुद्या क्रमांक १ व २ ची माहिती मिळाली होती. परंतु मुद्या क्रमांक ३ ची माहिती मिळाली नाही. मुद्या क्रं. ३ मध्ये नियुक्तीचा प्रस्ताव जो संस्थेने शिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविला आहे त्या प्रस्तावाची प्रत मिळाली नाही. परंतु प्राचार्य यांनी दिनांक १८.४.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली. तसे उपशिक्षणाधिकारी यांचे कार्यालयामध्ये सुध्दा माहिती दिली असे पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी सचिव, श्री समर्थ न्यू एज्युकेशन सोसायटी यांना माहिती मिळाली असे लेखी दिलेले आहे व मला कोणतीही तक्रार करावयाची नाही अशी पोच दिलेली दिसून येतात. परंतु आज आयोगापुढे त्यांनी सांगितले की, त्यांचेकडून पोच जबरदस्तीने लिहून घेण्यात आली होती. व त्यांना नियुक्ती प्रस्तावाची प्रत मिळाली नाही. असे असल्यास प्राचार्य, सालेकसा कनिष्ठ महाविद्यालय यांनी अपीलकर्ता यांना त्यांच्या नियुक्तीच्या संदर्भातशिक्षणाधिकारी यांचेकडे पाठविलेल्या प्रस्तावाची प्रत उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीत तक्रार मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत तक्रारदार यांना संस्थेनी त्यांच्या नियुक्ती प्रस्तावाची प्रत जी शिक्षणाधिकारी यांना पाठविण्यात आली होती, त्या प्रस्तावाची छायांकित प्रत तक्रारदार यांना विनामुल्य रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन द्यावी. तसे न केल्यास जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६२३/नाग/२०१०
अपील क्रं. ६२४/नाग/२०१०
अपील क्रं. ६२५/नाग/२०१०
अपील क्रं. ६२६/नाग/२०१०
अपील क्रं. ६२७/नाग/२०१०
अपील क्रं. ६२८/नाग/२०१०
अपील क्रं. ६२९/नाग/२०१०
अपील क्रं. ६३०/नाग/२०१०

श्री विकास पांडुरंग ठाकरे,
रा. ५०, शास्त्री ले-आऊट, सुभाष नगर, नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

प्रथम अपीलीय अधिकारी तथा अति.उपायुक्त,
नागपूर महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी क्रं.१
जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी,
नागपूर महानगरपालिका, नागपूर, जि.नागपूर. उत्तरवादी क्रं.२

( आदेश पारित दिनांक १६.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये आठ द्वितीय अपीले दाखल केलेली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. राहुल देशमुख हजर आहेत. विद्यमान जन माहिती अधिकारी हजर आहेत. तत्कालीन जन माहिती अधिकारी मानस सरोवर यात्रेला गेले आहेत. प्रथम अपीलीय अधिकारी यांचे तर्फे कागदपत्रे दाखल झालेली आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी वरील सर्व द्वितीय अपीलांच्या मध्ये जन माहिती अधिकारी, जाहिरात विभाग, महानगरपालिका नागपूर यांचेकडे एकुण ८ अर्जाच्या माध्यमातून (तारीख निरंक) नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात आऊटडोअर ॲडव्हरटाईझिंग पॉलिसी २००१ अंतर्गत परवानगी दिलेल्या जाहिरात फलकाचे संदर्भात मे. कार्टेल ॲडव्हरटाझिंग कंपनीला जाहिरात विभागाद्वारे वाटप केलेल्या फलकाच्या संदर्भात व सहयोगी कंपनीच्या संदर्भात प्रत्येक अर्जामध्ये वेगवेगळया मुद्यांचे संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती ही आऊटडोअर ॲडव्हरटाईझिंग पॉलीसी २००१ अंतर्गत परवानगी दिलेल्या नियमांचे काटेकोर अंमलबजावणीच्या संदर्भामध्ये मागितलेली आहे. अपीलकर्ता यांच्या प्रत्येक अर्जाचे संदर्भात तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांनी दिनांक २३.१२.२००९ रोजी त्या त्या अर्जातील जी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक १५.१.२०१० रोजी एकुण आठ प्रथम अपीले दाखल केलेली दिसून येतात. प्रथम अपीलांचे निर्णय दिनांक २७.१.२०१०, २५.१.२०१०, २७.१.२०१०, १०.२.२०१०, १०.२.२०१०, १०.२.२०१०, २५.१.२०१० व १०.२.२०१० रोजी देण्यात आले असून सर्व प्रथम अपीले ही मंजूर करण्यात आलेली दिसून येतात व त्यामध्ये अपीलकर्ता यांच्या अर्जाचे पुन्हा विभागानी शहानिशा करुन त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहती त्वरीत द्यावी असा निष्कर्ष काढलेला आहे. तसेच काही माहिती अधिकारी यांना स्पेसिफीक डायरेक्शन देण्यात यावे. विभागांनी सर्व नस्तीमध्ये मुद्या क्रमांक २० ॲडव्हरटाईझिंग पॉलीसी नुसार काय कार्यवाही करण्यात आली याची उपलब्ध असलेली माहिती १५ दिवसांचे आंत देण्यात यावी. काही प्रथम अपीलाच्या निर्णयामध्ये माहितीच्या अधिकारात माहिती तयार करुन देणे अपेक्षित नाही. परंतु नस्तीमध्ये जी माहिती उपलब्ध आहे ती माहिती मागणी केल्याप्रमाणे मुद्येनिहाय देणे अभिप्रेत नाही असे विवेचन केलेले आहे. परंतु त्यानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु त्यामुळे समाधान न झाल्यामुळे व अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांचे तर्फे ॲड. राहुल देशमुख यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, प्रत्येक अर्जाच्या संदर्भात उपलब्ध करुन दिलेली माहिती ही जवळ जवळ माहिती उपलब्ध नाही अशा पध्दतीनेच उत्तरे दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. मात्र, प्रथम अपीलाच्या निर्णानंतर मुद्येनिहाय जी माहिती उपलब्ध करुन दिली ती जरी संपूर्ण माहिती नसली तरी जी नस्तीमध्ये पूर्वीच उपलब्ध होती ती नंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनीच म्हणजे त्याच माहिती अधिका-यांनी मुद्येनिहाय उपलब्ध करुन दिली आहे, हे आयोगाचे निदर्शनास आणले. व त्यात तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन**

**देण्याची टाळाटाळ केलेली आहे हेही त्यांनी आयोगाचे निदर्शनास आणले. पुन्हा युक्तीवाद करताना सांगितले की, आउटडोअर ॲडव्हरटाईझिंग पॅालीसी २००१ अंतर्गत जे जाहिरात फलम ज्या ज्या कंपनींना दिल्या जातात त्या जाहिरात फलकाच्या परवानगीच्या संदर्भात महानगरपालिकेच्या अधिका-यांना जे अधिकार आहेत त्या अधिकाराच्या अंतर्गत जे निकष दिलेले आहेत त्या निकषाच्या अनुषंगाने परवानगी देणे आवश्यक असते. तसेच परवानगी दिल्यानंतर सदरच्या जाहिरात फलकाची प्रत्येक वर्षामध्ये प्राधिकरणाने तपासणी करण्याची तरतुद आहे. अशाप्रकारे तरतुदी असून सुध्दा माहिती उपलब्ध नाही असे उत्तर देणे हा बेजबाबदारपणा आहे असे त्यांनी आयोगास सांगितले. जी माहिती त्यांना कार्यालयात किंवा नस्तीमध्ये तयार करुन ठेवणे किंवा वेळच्या वेळी नोंद घेणे हे बंधनकारक आहे तरी सुध्दा माहिती संकलीत केली नाही असे उत्तर देणे म्हणजे त्या बाय- लॅा प्रमाणे त्यांनी त्यांची जबाबदारी टाळलेली आहे. व जी माहिती बॅाय लॅा च्या तरतुदीप्रमाणे प्राधिकरणाकडे उपलब्ध असणे आवश्यक आहे ती तयार करुन देता येत नाही असे जे प्रथम अपीलीय अधिकारी यांनी त्यांच्या निर्णयामध्ये म्हटलेले आहे ते सुध्दा दिशाभूल करण्यासारखे आहे असे त्यांनी आयोगापुढे सांगितले.**

**४. विद्यमान जन माहिती अधिकारी हे आज नवीनच माहिती अधिकारी म्हणून उपस्थित झालेले आहे. त्यांनी नस्तीमध्ये जी माहिती आहे ती उपलब्ध करुन दिली अशाप्रकारे आयोगापुढे समर्थन केले, याचा अर्थ त्यांना या नस्तीमधील किंवा माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीबाबत काही माहिती आहे असे दिसून येत नाही. अपीलकर्ता यांचे वकील यांनी आउटडोअर ॲडव्हरटाईझिंग पॅालीसी २००१ बाय लॅा हे आयोगाचे निदर्शनास आणले व त्यावरुन आयोगाचे असे मत झालेले आहे की, आउटडोवर ॲडव्हरटाईझिंग फलक वाटप करताना जी यादी निकषाप्रमाणे प्राधिकरणाकडे असायला पाहिजे व असे असताना संकलीत केली नाही किंवा तयार करुन देता येत नाही असे म्हणणे म्हणजे शुध्द माहिती देण्याची टाळाटाळ करणे असे आहे किंवा संबंधीत जबाबदार अधिका-यांनी बाय लॅा प्रमाणे त्यांचे कर्तव्य पार पाडलेले नाही असा निष्कर्ष काढावा लागतो. माहिती अधिकारी अपूर्ण व त्रोटक माहिती देतात व प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर तेच माहिती अधिकारी अधिक माहिती देतात. यावरुन तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे, जी माहिती ३० दिवसांत देणे बंधनकारक असते. त्यातही त्या माहितीच्या संदर्भातील कागदपत्रे उपलब्ध करुन दिलेली नाही. व त्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी हे मानस सरोवर यात्रेला गेलेले असल्यामुळे व आज आयोगापुढे हजर झालेले नसल्यामुळे त्यांचे म्हणणे ऐकुण घेता येत नाही, जे ऐकुण घेणे बंधनकारक आहे. व त्यामुळे त्यांचे विरुध्द शास्ती करावयाची झाल्यास त्यांचा खुलासा घेणे बंधनकारक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

१) अपीलकर्ता यांचे **अपील क्रं. ६२३/नाग/२०१०, अपील क्रं. ६२४/नाग/२०१० अपील क्रं. ६२५/नाग/२०१०, अपील क्रं. ६२६/नाग/२०१०, अपील क्रं. ६२७/नाग/२०१०,अपील क्रं. ६२८/नाग/२०१०,अपील क्रं. ६२९/नाग/२०१० व अपील क्रं. ६३०/नाग/२०१०** मंजूर करण्यात येत असून तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या सर्व माहितीच्या अर्जाच्या संदर्भात चुकीची, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे (प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर दिलेल्या माहिती वरुन) त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये प्रत्येक अपीलांमध्ये रुपये ३०००/- ची शास्ती कां करण्यात येवू नये याबाबतचा खुलासा हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत आयोगाकडे सादर करावा अन्यथा प्रत्येक अपीलात रुपये ३०००/- ची शास्ती कायम करण्यात येईल व ती तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा स्थावर अधिकारी यांचे दर महिन्याचे वेतनातून वसूल करण्याचे आदेश आयुक्त, महानगरपालिका, नागपूर यांना देण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपी अपील क्रं. ६२१/नाग. ६२२/नाग/२०१०

१)श्री प्रकाश सखाराम झाडे,
मु.पो.सिर्सी, ता.उमरेड, जि.नागपूर-४४१२१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी(माध्यमिक विभाग) ,
जिल्हा परिषद, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी,
शिक्षण विभाग माध्यमिक, जिल्हा परिषद नागपूर,
ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १५.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १७.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १५.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी दोन अर्जाच्या माध्यमातून जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी यांचे कार्यालयात त्यांच्या दिनांक ११.८.२००८ च्या पत्रान्वये पंकज नंदकिशोर उमाळे यांस कनिष्ठ लिपिकाचे पदावर मंजूरी न देण्याबाबत सादर केलेल्या अर्जावर आपण घेतलेल्या निर्णयाची/केलेली कार्यवाही, टिपणी, पत्रव्यवहार इ. माहिती. अर्जदाराचे दिनांक १३.३.२००९ चे पत्रानुसार शिक्षणाधिकारी, नागपूर यांना प्रतिलीपी सादर केल्यावरुन केलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. तसेच दूस-या अर्जात अर्जदाराने दिनांक ३०.४.२००७ च्या अर्जान्वये लिपिक पदावर पदोन्नती मिळण्याबाबत सादर केलेल्या अर्जावरील कार्यवाहीची माहिती मागितली आहे.**

**३ दोनही अर्जाच्या संदर्भात दिनांक २७.१.२०१० रोजी, संदर्भिय पत्रानुसार मागितलेली माहिती कार्यालयात उपलब्ध आहे असे कळवून ती घेवून जाण्यात यावी असे कळविलेले दिसून येते. मात्र त्यानंतर अपीलकर्ता यांनी दिनांक ३.२.२०१० रोजी दोन प्रथम अपीले दाखल केली आहेत. दोनही प्रथम अपीलांच्या संदर्भात सुनावणीची तारीख देण्यात आलेली दिसून येते परंतु निर्णय दिलेला दिसून येत नाही. दिनांक २७.१.२०१० चे पत्रावर अपीलकर्ता यांनी दिनांक २३.२.२०१० रोजी सुनावणीत माहिती देण्यात आली अशी पोच दिलेली दिसून येते. परंतु त्यानंतर राज्य माहिती आयोगाकडे माहिती अपूर्ण दिली या कारणास्तव दोन द्वितीय अपीले दाखल केली आहेत.**

**४. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना आयोगापुढे असे सांगितले की, लिपिक पद रिक्त झाल्यानंतर पदोन्नती मिळावी म्हणून अर्ज केला होता, परंतु विचार झाला नाही. तसेच त्यानंतर आणखी एक लिपिक पद रिक्त झाले परंतु त्यावर त्याच पदावर असलेल्या कर्मचा-यांचे संदर्भात अनुकंपा तत्वावर नियुक्ती करण्यात आली व त्यामुळे त्यांनी सदरची माहिती शिक्षणाधिकारी यांचेकडे मागितली होती. शिक्षणाधिकारी यांनी सदरची माहिती ही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांचे स्तरावर उपलब्ध असल्यामुळे त्यांना आज उपस्थित ठेवण्यात आले होते. परंतु जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी आयोगापुढे सांगितले की, संस्थेमध्ये वाद आहे. संस्थेत २-२, ३-३ कार्याध्यक्ष व २-२, ३-३ सचिव आहेत व ते मुख्याध्यापकांचे कॅबीनमध्ये येवून भांडत असते. त्यामुळे हा विषय शाळा समितीचे विषय सूचिवर घेतला जात नाही. किंवा बैठक पण होऊ शकत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांचे पदोन्नतीचे संदर्भात आतापर्यंत कोणताही निर्णय झालेला नाही. त्यातही जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक यांनी सांगितले की, संस्थेमधील कर्मचारी हे विनाकारण भांडणे करतात व मुख्याध्यापक यांना त्रास देतात. तसेच अॅट्रासिटीच्या तक्रारी सुध्दा पोलीसांकडे करतात. वास्तविक अर्जदार यांची दृष्टी अधू आहे. तसेच आता अपीलकर्ता यांचे तर्फे ज्यांनी त्यांचे म्हणणे आयोगापुढे मांडले ते माजी मुख्याध्यापक आहे. व अशा पध्दतीने संस्थेमध्ये गटातटाचे राजकारण चालते व त्यामुळे कोणत्याही प्रकारचा निर्णय घेणे शक्य होत नाही. अशा परिस्थितीमध्ये प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दोनही प्रथम अपीलांची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना माहिती मिळतील असे पाहाणे संयुक्तिक राहील. त्याकरीता दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांची दोनही अपीले अंशतः मंजूर करण्यात येत असून प्रथम अपीलीय अधिकारी यांनी हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत दोनही प्रथम अपीलांची सुनावणी घेवून अपीलकर्ता यांना योग्य ती माहिती सुनावणीतच उपलब्ध होईल, असा निर्णय घ्यावा.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४४/नाग/२०१०

१)श्री विंग कमांडर(से.नि.) अमिताभ भट्टाचार्य,
प्लॉ नंबर १४३, विवेकानंद नगर, ना.सु.प्र.उद्यानाजवळ,
वर्धा रोड, नागपूर-१५. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
नागपूर सुधार प्रन्यास, स्टेशन रोड,
किंग्जवे नागपूर-०१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी
नागपूर सुधार प्रन्यास, स्टेशन रोड,
किंग्जवे, नागपूर-०१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ६.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १७.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे NIT letter No.क्रं/इ.वि.(प.)/मा.अ./No.५१२२ dated १० Sep.२२९ intimated that amalgamation of plots is under action and on completion of action separate communication will follow. The communication is still awaited. अशा प्रकारची माहिती तसेच आतापर्यंत amalgamation कां करण्यात आले नाही याबाबतची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १५.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता रक्कम रुपये २९/- टपाल खर्च जमा करावे असे कळविलेले दिसून येते. परंतु तसे न करता अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १३.४.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलार्थीस अपेक्षित माहिती माहितीच्या अधिकारात अपेक्षित नाही. तरी सुध्दा अर्जदाराचा प्लम्बींगचा अर्ज त्वरीत निकाली काढावा असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना त्यांचा भूखंड एकत्रिकरणाच्या अर्जाच्या संदर्भात वर्षानुवर्षे निर्णय घेतला जात नाही व त्यामुळे तो केव्हा करणार अशी माहिती त्यांनी माहितीच्या अधिकारात विचारलेली आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, माहितीचा खर्च भरण्यास अपीलकर्ता यांना कळविले होते परंतु त्यांनी खर्चाचा भरणा केला नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती मुळात माहितीच्या अधिकारात येत नाही. ते कार्यवाही करुन मागत आहे व त्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय त्याप्रमाणे दिला आहे. तरी कार्यवाही करण्याचे आदेश सुध्दा दिले होते. प्रथम अपीलाचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४३/नाग/२०१०

१) गं.भा. गुणाबाई रामदासजी मुंडले,
रा.मांगरुळ ता. भिवापूर जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अप्पर पोलीस अधीक्षक,
नागपूर जिल्हा ग्रामीण पोलीस नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
पोलीस स्टेशन उमरेड. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.१०.२००९ रोजी जन माहिती अधिकारी जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे, पोलीसाकडे तक्रार केली असता गुन्हयाची नोंद कां करण्यात आली नाही याबाबत माहिती एकुण ८ मुद्यांमध्ये मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.१२.२००९ रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ५.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ५.२.२०१० रोजी अपीलकर्ता यांना आठही मुद्यांवर पुन्हा माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांचे तर्फे युक्तीवाद करताना प्रतिनिधी यांनी आयोगापुढे सांगितले की, तक्रारीमध्ये स्वयंस्पष्टता असताना सुध्दा गुन्हा दाखल करुन घेत नाही, याबाबतचे कारण व शासन निर्णय विचारलेले आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अर्ज प्राप्त झाल्यानंतर चर्चेसाठी बोलाविले होते. परंतु अपीलकर्ता हजर झाले नाही. त्यामुळे दिनांक ४.२.२०१० रोजी त्यांनी मुद्येनिहाय माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे. दिनांक ४.२.२०१० च्या पत्राचे अवलोकन केले असता तसेच माहितीच्या संदर्भातील दिलेल्या उत्तराचे अवलोकन केले असता अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिली आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. परंतु, अपीलकर्ता यांची अपेक्षा प्रत्येक घेटनेबाबत कारण विचारण्याची दिसून येते. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्यांचा दिवाणी न्यायालयात वाद सुरु आहे व त्याबाबत निर्णय होतील. व त्यामुळे त्यांनी विचारलेली सर्व प्रश्न माहितीच्या अधिकारात येत नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४५/नाग/२०१०

१)श्री गणेश प्रसाद,
प्लॉट नंबर २५, मंदार अपार्टमेंट प्रेरणा नगर,
काटोल रोड, नागपूर-४४००१३. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी
उपसंचालक शिक्षण विभाग, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी,
जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, रविनगर, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, Staff profile of teaching staff with nature of appointment & location of Adhyapak Vidhyalaya च्या संदर्भात एकुण ८ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती नोंदणीकृत टपालाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २०.२.२०१० रोजी माहिती अधिकारी यांनी प्राचार्य, कौशल्यादेवी बजाज अध्यापक विद्यालय यांना अपीलकर्ता यांना माहिती पुरविण्यासाठी सादर करावी व त्यांना तशी पुरवावी असे पत्र व त्या पत्राची प्रतिलीपी अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. परंतु माहिती उपलब्ध झाली नाही या कारणास्तव अपीलकर्ता यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात त्यांना श्री के.सी.बजाज अद्यापक विद्यालय यांचेकडून माहिती प्राप्त करुन घ्यावी असे कळविले आहे. त्यात के.सी. बजाज विद्यालय यांचे प्राचार्य यांनी जन माहिती अधिकारी, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था यांचेकडे चिरायु श्रीमती कौशल्यादेवी बजाज अद्यापक विद्यालय या संस्थेला कायम विनाअनुदानित मान्यता प्राप्त असल्यामुळे शासनाकडून कोणत्याही प्रकारचे अनुदान मिळत नाही. त्यामुळे मुंबई हायकोर्ट नागपूर खंडपीठ रिट पिटीशन ५१३२/२००८ नुसार दिलेल्या निर्णयाप्रमाणे माहितीचा अधिकार या संस्थेला लागू होत नाही, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, मागितलेली माहिती ही महाविद्यालयाच्या स्तरावरील असल्यामुळे व ती त्यांचेकडे उपलब्ध नसल्यामुळे व महाविद्यालय हे विनाअनुदानित**

**( पान २ वर..)**

// २ //

**तत्वावर असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ला लागू होत नाही. त्यावर माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांचेकडे सदरच्या महाविद्यालयाची वेगळी माहिती होती व जी माहिती उपलब्ध आहे ती त्यांना उपलब्ध करुन दिली आहे. परंतु तो अर्ज आज आयोगापुढे नाही. मात्र उपसंचालकांनी त्याबाबतची माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले. त्यामुळे सदरच्या प्रकरणात विनाअनुदानित महाविद्यालय असल्यामुळे व त्यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी लागू होत नसल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**
**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४१/नाग/२०१०

१)श्री अब्दुल रफिक ऊर्फ मुन्न रफिक,
क्वार्टन नं.५/८२, राजे रघुजी नगर, नागपूर/४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, नागपू. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१, सदर नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १०.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २०.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१ यांचेकडे, वर्ष १९९५ ते २००९ पर्यंत विधान भवन, आमदार निवास, रविभवन नाग भवन, देशपांडे हॅाल, रविनगर १६० खोल्यांचे गाळे, रामगिरी बंगला, देवगिरी बंगला, तसेच मेडीलकल महाविद्यालय व रुग्णालयातील भिंतींच्या संदर्भात व कंत्राटदाराच्या संदर्भात माहिती मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.२.२०१० रोजी मागितलेली माहिती अतिशय विस्तृत स्वरुपात आहे. आपण विविक्षीत स्वरुपात माहिती मागितली तर ती देता येईल असे कळविल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १०.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.४.२०१० रोजी देण्यात आला असून, अपीलकर्ता यांनी प्रश्नार्थक स्वरुपात खुलासा केल्याचे दिसून येते व त्या कारणास्तव मुद्या क्रं. ३ ची माहिती फक्त देण्यात यावी व बाकी मुद्यांच्या संदर्भात अपील निकाली काढण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी मागितलेली माहिती विस्तृत स्वरुपात जरी असली तरी ती निश्चित स्वरुपाची आहे व त्यामुळे ती उपलब्ध करुन देण्यास कोणत्याही प्रकारची अडचण येण्याचे कारण नव्हते. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी विस्तृत स्वरुपात माहिती मागितली आहे या कारणास्तव माहिती नाकारलेली आहे. याचा अर्थ माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे. तसेच अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा त्यांनी माहिती नाकारताना उल्लेख केलेला नाही. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा मुद्या क्रं. ४ वगळून कोणतेच मुद्दे प्रश्न नसताना प्रश्नार्थक माहिती मागितली आहे असा निष्कर्ष काढून माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे.**

**४. अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्याचे अवलोकन केले असता मुद्या क्रं. ४ वगळून कोणत्याही मुद्यांमध्ये प्रश्नार्थक माहिती मागितलेली दिसून येत नाही. त्यामुळे प्रथम अपीलीय अधिकारी यांना प्रश्नार्थक माहिती विचारलेली आहे असा शोध कसा लागला व त्यांनी कोणत्या आधारावर तसा निर्णय दिला हे अनाकलनीय आहे. प्रत्येक मुद्यांमध्ये अपीलकर्ता यांना**

**कागदपत्रे अपेक्षित दिसून येते व ती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. माहिती विस्तृत प्रमाणात मागितली म्हणून नाकारणे याचा अर्थ माहिती उपलब्ध करुन द्यावयाची नाही असाच काढावा लागतो. मुद्या क्रमांक २ ची माहिती जर वेगळया माहिती अधिका-यांकडे असतील तर त्या माहिती अधिका-यांकडे अर्ज हस्तांतर करणे ही तरतुद अधिनियमात आहे व तसेही केलेले नाही. व त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी माहितीच्या अर्जाच्या संदर्भात कोणत्याही प्रकारचे योग्यरित्या हस्तांतरण केलेले नसल्यामुळे ते दोषी आढळून येतात व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये शास्ती लादावयाची असल्यास त्यांचे म्हणणे ऐकुण घेणे आयोगास बंधनकारक आहे. आज ते आयोगासमोर हजर नाही. व त्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करणे आवश्यक आहे.**

**५. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी सुध्दा कोणताही विचार न करता प्रश्नार्थक माहिती आहे या कारणास्तव प्रथम अपील फेटाळणे हे माहिती उपलब्ध न करुन देण्याचेच लक्षण आहे असे दिसून येते. अपीलकर्ता यांनी जर विस्तृत प्रमाणात माहिती मागितली असतील तर त्या संदर्भात माहितीची पृष्ठे व त्यासाठी येणारा खर्च अपीलकर्ता यांना कळविणे आवश्यक असते. परंतु याबाबत सार्वजनिक बांधकाम विभागातील अधिकारी यांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदींची माहिती आहे असे दिसून येत नाही. कमीत कमी अधीक्षक अभियंता यांना ही माहिती असणे आवश्यक होते, परंतु त्यांनाही ती आहे असे दिसून येत नाही. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, माहिती विस्तृत प्रमाणात असल्यामुळे अपीलकर्ता यांनी माहितीचे निरीक्षण केल्यास त्यातून आवश्यक त्या कागदपत्रांची माहिती त्यांना उपलब्ध करुन देता येईल. त्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील हे अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांनी कामकाजाचे दिवशीची तारीख व वेळ लेखी जन माहिती अधिकारी यांना कळवून त्या दिवशी व त्यावेळी जन माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन मागितलेल्या माहितीच्या संदर्भातील अभिलेख्यांचे क्रमवार निरीक्षण करुन त्यातून आवश्यकत त्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती विनामुल्य उपलब्ध करुन घ्याव्यात.**

**२) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्ता यांच्या अर्जाच्या संदर्भात अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे कोणतीही कार्यवाही न करता विस्तृत प्रमाणात माहिती आहे म्हणून नाकारण्यात येत आहे असे जे उत्तर दिलेले आहे ते योग्य नसल्यामुळे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही मुख्य**

**अभियंता यांनी करावयाची आहे. त्याकरीता निर्णयाची एक प्रत स्वतंत्रपणे मुख्य अभियंता यांचेकडे पाठविण्यात यावी.**

**३) प्रथम अपीलीय अधिकारी यांनी अधिनियमाच्या तरतुदींची माहिती करुन घेणे आवश्यक आहे व माहिती उपलब्ध करुन देणे हे हे नियम पाळणे आवश्यक आहे.**

**४) विद्यमान संबंधीत जन माहिती अधिकारी यांनी, अपीलकर्ता यांनी त्यांना लेखी कळविल्यानंतर विना मुल्य छायांकित प्रतीचे स्वरुपात माहिती उपलब्ध करुन न दिल्यास ते शास्तीस पात्र राहातील, याची नोंद घ्यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६४२/नाग/२०१०

१)श्री धनराज माहादेवजी लारोकार,
मच्छीसाथ तीन नल चौक, इतवारी, नागपूर-२. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा मुंबई-०१. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी,
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, शहिद भगतसिंग मार्ग,
कुलाबा मुंबई-०१. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २६.९.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, पोलीस महासंचालक यांचे कार्यालयात, तहसिल पोलीस स्टेशन नागपूरचे पोलीस निरीक्षक सुधीर पी. नंदनवार यांनी कोणत्या जाती आरक्षणामध्ये नोकरी मिळविली त्यासाठी कोणत्या जातीचे प्रमाणपत्र जोडले त्याची सत्यप्रती व संपूर्ण माहिती मिळणेबाबत, माहिती व्यक्तीशः घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १९.१२.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे व प्रथम अपीलाचा निर्णय झाला नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांना ३० दिवसांत कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही किंवा पत्रव्यवहार सुध्दा केला नाही. मात्र दिनांक ९.११.२००९ रोजी आपण मागणी केलेली पोलीस निरीक्षक श्री सुधीर पी. नंदनवार यांची बाबतची माहिती आपणास माहितीचा अधिकार कायदा कलम ११ नुसार पोलीस निरीक्षक श्री सुधीर पी. नंदनवार यांचे सहमतीशिवाय देता येणार नाही. सदरची सहमतीस त्यांचेकडून घेण्यात येत असून त्यांनी सहमती दिल्यास माहिती पुरविण्याची तजविज ठेवली आहे असे कळविले. परंतु ती सार्वजनिक अभिलेख्याचा भाग असल्यामुळे ती माहितीसाठी श्री नंदनवार यांना सहमती मागण्याची आवश्यकता नाही व तसाही ३० दिवसांत त्यांनी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. व प्रथम अपीलाचा निर्णय सुध्दा दिलेला नाही. परंतु दिनांक २७.१.२०१० रोजी ..पोलीस निरीक्षक श्री नंदनवार यांना नियमानुसार विचारणा करण्यात आली होती व त्याप्रमाणे त्यांनी दिनांक ८.१२.२००९ च्या पत्रान्वये मागितलेली माहिती देण्यात येवू नये असे कळविल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. व पुन्हा दिनांक ९.२.२०१० रोजी अपीलीय अधिकारी यांनी अपीलकर्ता यांना त्याप्रमाणे कळविलेले दिसून येते.**

**४. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी मागितलेली माहिती पोलीस महासंचालनालय, यांचे कार्यालयात नसल्यामुळे ती संबंधीत कार्यालयाकडून मागणे आवश्यक होते. तसेच पोलीस निरीक्षकाची माहिती असल्यामुळे व पोलीस निरीक्षक हे पोलीस स्टेशन तहसिल नागपूर शहर या ठिकाणी असल्यामुळे त्यांच्याशी अधिनियमाचे कलम ११ प्रमाणे पत्रव्यवहार करुन त्यांची स्विकृती घेणे आवश्यक असल्यामुळे विलंब झालेला आहे. परंतु पोलीस महासंचालनालय किंवा पोलीस महानिरीक्षक आस्थापना यांचे कार्यालयात माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ ची कोणतीही माहिती आहे असे दिसून येत नाही. त्रयस्थ पक्षाची निश्चित माहिती आहे परंतु अधिनियमाचे कलम ११(१) प्रमाणे अर्ज प्राप्त झाल्यापासून १० दिवसांचे आंत त्रयस्थ पक्षाची सहमती उपलब्ध करुन घेण्याची प्रक्रिया पुर्ण करावी लागते व त्या प्रत्येक पत्रव्यवाराची प्रतिलीपी ही अपीलकर्ता यांना देणे आवश्यक असते. व तशी कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपीलकर्ता यांनी३० दिवसांत काहीही पत्रव्यवहार झालेला नाही असे सांगितले. दुदैवाने मुंबई येथील कार्यालयातील अधिकारी मनाला येईल त्याप्रमाणे माहितीच्या अधिकारातील अर्जाची प्रक्रिया करीता असतात. त्यांना प्रश्न दिलेले दिसून येत नाही किंवा आयोगाच्या निर्णयाच्या माध्यमातून सुध्दा त्यांचे प्रबोधन होत आहे असे दिसून येत नाही. व त्यामुळे अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणीची काटेकोरपणे होताना दिसून येत नाही.**

**५. असे असले तरी श्री सुधीर पी. नंदनवार, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी श्री टी.के. घुगे, शासकिय माहिती अधिकारी, वरिष्ठ उप सहाय्यक पोलीस महानिरीक्षक आस्थापना यांनी दिनांक ११.१२.२००९ रोजी पाठविलेल्या पत्रामध्ये संबंधीत अर्जदार यांचे विरुध्द पोलीस स्टेशन तहसिल येथे अपराध क्रमांक १८८/०९ क, ४२०, ४६८, ४७१ भा.द.वि.प्रमाणे दाखल असून सदर गुन्हयात त्यांना अटक झालेली आहे. वैयक्तिक वैमनस्यामुळे आमची खाजगी माहिती आम्हाला त्रास देण्याचे हेतूने मागितलेली**

**दिसून येते. कृपया आमच्या खाजगी वैयक्तिक माहितीचा कोणताही दस्तऐवज अर्जदाराला प्राप्त करुन देण्यात येवू नये असे अर्जदारास कळविलेले दिसून येते. त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती नाकारलेली दिसून येते. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांचेविरुध्द जे गुन्हे दाखल करण्यात आले आहे, ते खोटे गुन्हे दाखल करण्यात आले आहे. असे असल्यास अपीलकर्ता यांनी न्यायालयात त्याबाबतचा पुरावा सादर करुन त्यांची मुक्तता करुन घेता येईल. त्यामुळे तपास अधिका-यांच्या संदर्भात माहिती मागणे हे अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे. पुन्हा युक्तीवाद करताना सांगितले की, जातीचे प्रमाणपत्र मिळविले ते हलबा हे मिळविले आहे व ते मुळात कोष्ठी आहे. त्याप्रमाणे अपीलकर्ता हे त्रयस्थ पक्ष यांचे म्हणण्याप्रमाणे वैयक्तिक वैमनस्यातून माहिती मागत आहे असे दिसून येते. त्रयस्थ पक्षाची माहिती मागितली असल्यास सार्वजनिक हित हे त्रयस्थ पक्षाच्या होणा-या हानीपेक्षा प्रभावी असल्यास माहिती उपलब्ध करुन देणे आवश्यक असते. परंतु या प्रकरणात अपीलकर्ता यांनी कोणतेही सार्वजनिक हितार्थ माहिती**

**मागितली नाही तर ती वैयक्तिक द्वेषातून मागितलेली दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी व प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१)** **प्रथम अपीलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय योग्य असल्यामुळे अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२)** **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. २४/२०१० व तक्रार क्रं.२५/२०१०

१) श्री विरेंद्र चंपालाल संकलेचा,
रा.गणपती वार्ड आर्वी, ता. आर्वी, जि.वर्धा. — तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी, नगरपालिका, आर्वी, जि.वर्धा. — गैरतक्रारदार

२)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, आर्वी, जिल्हा वर्धा. — गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १७.६.२०१० )

निर्णय

**तक्रार क्रमांक २४/२०१० मध्ये तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक १४६/२००९ मधील निर्णय दिनांक १३.७.२००९ मधील आदेश क्रं.१ प्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. आयोगाचे कार्यालयाने दिनांक २५.१.२०१० रोजी खुलासा मागितला होता. त्याप्रमाणे खुलासा दिनांक २२.२.२०१० रोजी दाखल करण्यात आला आहे. त्यामध्ये अर्जदारास माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र घेवून गेले असता पत्र घेण्यास नकार दिला. त्यामुळे दिनांक २४.७.२००९ रोजी यु.पी.सी.ने पाठविले. व त्यानंतर सुध्दा माहिती उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आले. तक्रारदार यांनी सांगितले की, आतापर्यंत त्यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. तसेच विशिष्ट रस्त्याचे काम नगरपरिषदेकडून घेण्यात येते तेव्हा ठराव होतो व त्याप्रमाणे अंदाजपत्रक व नकाशे तयार होतात. व तशा प्रकारचे अंदाजपत्रक व नकाशे त्यांना अपेक्षित आहे. व तसे त्यांना कळविण्यात आले होते. तसे कां करण्यात आले असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांना सांगितले की, अपीलकर्ता यांनी विकास आराखडयातील रस्त्याचे नकाशे मागितले आहे. परंतु बांधकाम विभागात अंदाजपत्रकांमध्ये नकाशे उपलब्ध आहे त्याशिवाय इतर कोणतेही नकाशे नगर परिषदेमध्ये उपलब्ध नाही, असे कळविल्यामुळे त्यांनी तसे कळविले आहे. त्यावर पुन्हा तक्रारदार यांनी सांगितले की, त्यांनी इतरही रेकॅार्डची माहिती मागितली होती. परंतु उपलब्ध करुन दिली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी पुन्हा आयोगाचे निदर्शनास आणून दिले की, जी माहिती बांधकाम विभागाकडून आलेली आहे तीच माहिती त्यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. याचा अर्थ बांधकाम विभागाने माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली आहे. जन माहिती अधिकारी यांना मागितलेली माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी इतर अधिकारी/कर्मचारी यांचे सहाय्य अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे घेता येते. व अशा सहाय्य घेतलेल्या अधिकारी/कर्मचारी यांस अधिनियमाचे पोटकलम ५ प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. व या प्रकरणात जन माहिती अधिकारी यांनी बांधकाम विभागाचे अधिकारी/कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन घेण्याकरीता सहाय्य घेतले असल्यामुळे बांधकाम विभागातील संबधीत अधिकारी हे माहिती अधिकारी आहे व त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५०००/-ची शास्ती लादणे आवश्यक आहे. परंतु सदर शास्तीच्या संदर्भात माहिती अधिकारी, नगर परिषद यांनी बांधकाम विभागातील ज्या अधिकारी/कर्मचारी यांचे माहिती उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी असतील त्याबाबत आधी निश्‍चिती करावी व त्यानंतरच संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे दर महिन्याचे वेतनातून शास्तीची रक्कम वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करणे संयुक्तिक राहील. तसेच अपीलकर्ता यांच्या मुळ अर्जात रेकार्ड व नकाशाची जी माहिती मागितली आहे व अंदाजपत्रकासोबत जो नकाशा आहे ती माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

**२. तक्रार क्रमांक २५/२०१० मध्ये तक्रारदार यांनी, अपील क्रमांक ८७९/०८ मधील निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिली नाही म्हणून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १८(१) प्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २.११.२००९ रोजी तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात आयोगाचे कार्यालयातून दिनांक २५.१.२०१० रोजी खुलासा मागविण्यात आला. व त्याप्रमाणे दिनांक २४.२.२०१० रोजी खुलासा आयोगाकडे दाखल करण्यात आला तो खालीलप्रमाणे आहे.**

**खुलासा : "संबंधीत बांधकामाकरीता नगरपालीकेने जागेच्या संदर्भात हस्तांतरीत केलेल्या कागदपत्राच्या छायांकित प्रती तसेच सां.बां.विभागाने संबंधीत काम पूर्ण झाल्यानंतर संबंधीत काम नगरपालीकेकडे संपूर्ण बांधकाम हस्तांतरीत केल्याचे सर्व पत्रांच्या छायांकित प्रती निर्णय मिळाल्यापासून अपीलकर्त्याला १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात याव्या असे आदेशीत आहे. त्या अनुषंगाने सदर बांधकामासाठी लागणारी जागा हस्तांतरणाबाबत स्वतंत्र कागदपत्रे नगरपालिका, आर्वी यांनी या विभागास दिली नाहीत. परंतु साईट प्लॅानवर दर्शविल्याप्रमाणे जागा बांधकामासाठी घेण्यात आली. सदर कागदपत्रे अपीलकर्त्याला या कार्यालयाचे पत्र क्रं.४९२० दिनांक ११.११.०८ रोजी देण्यात आले व तसे पुनश्च अपीलकर्त्याला सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सा.बां.उपविभाग, आर्वी यांचे पत्र क्रं.८३१/०९ दिनांक ३.९.२००९ रोजी युपीसी मार्फत व या कार्यालयाचे पत्र क्रं. ५६९६ दिनांक १०.९.०९ रोजी कळविण्यात आले आहे. तसेच सा.बां. विभागामार्फत काम पुर्ण झाल्यावर संबंधीत काम हस्तांतरीत करुन घेण्याबाबत या**

**कार्यालयाचे पत्र क्रं.६१५३ दिनांक १४.१०.०९ अन्वये पुर्णत्वाचे उपयोगिता प्रमाणपत्र व ताबा पावती मुख्याधिकारी नगर परिषद आर्वी यांना सादर करण्यात आली असून अद्यापर्यंत ताबा घेतल्याची पोच अप्राप्त आहे. सदर पोच या कार्यालयास प्राप्त झाल्यावर अपीलकर्त्याला देण्यात येईल."**

**वरील खुलाशाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, आतापर्यंत नगर परिषद अधिका-यांना दोन वेळा चर्चेसाठी बोलावले व त्यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे सांगण्यात आले. परंतु त्यांनी कोणतीही कार्यवाही आतापर्यंत केलेली नाही. त्यामुळे अयोगानी १० दिवसांची मुदत दिल्यास त्या मुदतीत हस्तांतरण करण्याची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल व तसे हस्तांतरण करुन न घेतल्यास हस्तांतरण करुन दिले असे समजण्यात येवून अपीलकर्ता यांना हस्तांतरणाच्या छायांकित प्रती उपलब्ध करुन देण्यात येतील. व त्याकरीता तक्रारदार यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार क्रमांक २४/२०१० मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत तक्रारदार यांना बांधकाम विभागाकडून संबंधीत रस्त्याचे अंदाजपत्रक व त्यात उपलब्ध असलेला नकाशाची छायांकित प्रत विना मुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) आयोगाचे निर्णयाप्रमाणे जन माहिती अधिकारी यांना बांधकाम विभागाच्या संबंधीत अधिका-यांनी माहितीची कागदपत्रे अर्जदारास पुरविण्यासाठी उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द रुपये ५,०००/-ची शास्ती लादण्यात येते. सदर शास्तीच्या वसुलीच्या संदर्भात मुख्याधिकारी, नगर परिषद यांनी संबंधीत माहिती पुरविण्याची जबाबदारी असणा-या अधिका-यांची निश्चिती करुन त्या संबंधीतांचे दर महिन्याचे वेतनावतून शास्तीची रक्कम वसुल करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)". **या लेखाशिर्षात जमा करावी.**

**३) तक्रार क्रमांक २५/२०१० अंशतः मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी यांनी सांगितल्याप्रमाणे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत योग्य ती कार्यवाही करुन छायांकित प्रतीच्या स्वरुपात माहिती विनामुल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील- अपील क्रं. ७०७/नाग/२०१०

१)श्री भाऊराव झिंगूजी गोहत्रे,
५९, बंडू सोनी ले आऊट, परसोडी, नागपूर.
ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द२) प्रथम अपीलीय अधिकारी

अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नागपूर
गिरीपेठ, नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक प्रकल्प अधिकारी,
अपर आयुक्त, आदिवासी विकास कार्यालय, नागपूर,
गिरीपेठ, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी कार्यालय अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांचेकडे कु. वैशाली भा. गोहत्रे, प्रभारी गृहपाल, शासकिय मुलींचे वसतीगृह एटापल्ली प्रकल्प भामरागड यांचेवर कार्यालयीन कर्मचारी व अधिकारी यांनी जाणून बुजून केलेल्या अन्यायाबाबत एकुण ९ मुद्यांमध्ये माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २२.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २५.६.२०१० रोजी देण्यात आला असून अर्जातील माहिती संबंधी प्रत्यक्ष चर्चा करुन अर्जानुसार हवी असलेली माहिती व या कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती देण्याचे ठरले. सदरची माहिती आपण एक दोन दिवसांत दिली तरी चालेल असे नमुद केल्यानुसार सदरची माहिती यासोबतचे विवरणपत्रानुसार देण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. सदरचे पत्र अपीलकर्ता यांना दिनांक २५.६.२०१० रोजी प्राप्त झाले याबाबतची पोच अपीलकर्ता यांनी दिलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. परंतु त्यामध्ये उपलब्ध झालेल्या माहितीबाबत कोणत्याही प्रकारचे कारण दिलेले नाही. त्यात पत्रव्यवहाराचा तपशिल दिलेला आहे व कारण दिलेले नाही. व आज अपीलकर्ता गैरहजर असल्यामुळे त्याबाबत खुलासा सुध्दा केलेला नाही. परंतु अपीलकर्ता यांनी दिनांक ९.३.२०१० रोजी जो माहितीचा अर्ज दिलेला आहे त्या अर्जाप्रमाणे त्यांना विहित मुदतीत माहिती उपलब्ध झालेली नाही. त्याबाबत जन माहिती अधिकारी यांना विचारले असता त्यांनी असे सांगितले की, अपीलकर्ता यांचा अर्ज हा दिनांक १८.३.२०१० रोजी कार्यासन-४, आस्थापना शाखा संबंधीत कर्मचारी, अपर आयुक्त आदिवासी विकास नागपूर यांचेकडे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता हस्तांतरीत करण्यात आला होता. दिनांक ९.३.२०१० चा अर्ज दिनांक १५.३.२०१० रोजी प्राप्त झाला होता. त्या दरम्यान माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २६.४.२०१०, १७.४.२०१० व १७.५.२०१० रोजी स्मरणपत्रे दिले होते. माहिती अधिकारी यांनी सुध्दा खुलासा दाखल करताना अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे आस्थापना शाखेकडे माहिती मागितली व ती दिली नाही म्हणून स्मरणपत्र देण्यात आले होते. यावरुन आस्थापना शाखेतील संबंधीत कर्मचारी/अधिकारी यांचे अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे सहाय्य घेण्यात आले होते. व त्यामुळे त्यांना अधिनियमाचे कलम ५(५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येते. परंतु तरी सुध्दा त्यांनी माहिती पुरविली नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) अन्वये रुपये ५,०००/- ( रुपये पाच हजार फक्त) ची शास्ती लादणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशत: मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक ९.३.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने (दिनांक १८.३.२०१० च्या हस्तांतरणाप्रमाणे) विहित मुदतीत म्हणजे ३० दिवसांचे आंत संबंधीत कर्मचारी किंवा अधिकारी, आस्थापना शाखा यांचे माहिती अधिकारी यांनी अधिनियमाचे कलम ५(४) प्रमाणे सहाय्य घेतले, त्यांना माहिती अधिकारी समजण्यात येते. व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे रुपये ५,०००/- ची शास्ती लादण्यात येत आहे. सदरच्या शास्तीची वसुली ही संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांचे विरुध्द जबाबदारी निश्चित करुन त्यांचे दर महिन्याचे वेतनातून वसुल करुन ती या लेखाशिर्षात जमा करण्यात यावी.**

**२) सदरची कार्यवाही ही अपर आयुक्त, आदिवासी विकास विभाग, नागपूर यांनी करावयाची आहे.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६८३/नाग/२०१०

१)श्री विनोद रामदासजी बुरडकर
मित्रा नगर, प्लॉट नं.९५, मानेवाडा रोड(पश्चिम बालाजी नगर जवळ)
नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त उपायुक्त-१,
महानगरपालिका, नागपूर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त,
हनुमान नगर झोन क्रं.३, महानगरपालिका, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १३.१.२०१० रोजी जन माहिती अधिकारी महानगरपालिका यांचेकडे दिनांक १७.७.२००७ रोजी भरणा केलेल्या तथा दिनांक १.४.२००६ ते ३१.३.२००८ या कालावधीचे रुपये १९७८/- ॲक्स घेणा-या वसुली अधिका-यांचे नांव व डेसीगनेशनसह माहिती व प्रत्यक्ष व्यक्तीशः माहिती पाहिजे आहे असे नमूद करुन माहिती मागितलेली दिसून येते. अपीलकर्ता यांनी दारिद्रय रेषेखालील असल्याबाबत कार्ड जोडले नसून रेशन कार्डची छायाप्रत जोडली आहे. अर्जाचे अनुषंगाने दिनांक २२.१.२०१० रोजी अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे समाधान न झाल्याने अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यामध्ये टॅक्स पावती चुकीची दिली असे कारण दिलेले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक २२.२.२०१० रोजी देण्यात आलेला असून माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यात आलेले दिसून येते. व त्यामुळेही समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे. द्वितीय अपीलमध्ये टॅक्स पावतीवर एकच नांव असून इतर नांवाने टॅक्स पावती फाडलेली नाही. दोन वेळा टॅक्स घेतला त्यामुळे खरी पावती कोणती ते कळून येत नाही असे अपीलाचे कारण दिलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, टॅक्स भरताना त्यांचे व श्रीमती सोनाबाई परसोडकर यांचे नांवाने टॅक्स भरणे आवश्यक होते. परंतु त्यांचे नांव त्या टॅक्स पावतीवर आता नाही. तशी दूसरी पावती आहे. त्यावर त्यांचे व श्रीमती सोनाबाई यांचे नांव आहे व त्यामुळे कोणती पावती खरी हे कळून येत नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, महानगरपालिकेमध्ये घर टैंक्स घेताना ते निरनिराळया केंद्रामध्ये घेतला जातो. एखाद्या घराच्या संदर्भात केंद्रावर टॅक्स भरण्यास गेल्यावर जूनी पावती दाखविली तर टॅक्स घेतला जातो व त्यामुळे सदरच्या घराच्या संदर्भात दोन वेळा टॅक्स घेतलेला दिसून येतो, ती वस्तुस्थिती अपीलकर्ता यांना कळविलेली आहे. असे असले तरी अपीलकर्ता यांना संबंधीत अधिका-यांवर कार्यवाही करावी अशी अपेक्षा आहे असे दिसून येते. परंतु माहितीच्या अधिकारात फक्त कागदपत्रांच्या स्वरुपात माहिती मिळते. कार्यालयातील अधिका-यांवर त्यांनी केलेल्या चुकीमुळे कोणतीही कार्यवाही करण्याचे अधिकार आयोगास नाही. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील खारीज करण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७०४/नाग/२०१०

१)श्री विठ्ठल पांडुरंग रेवतकर,
पेठ वार्ड २, देवी मोहल्ला नरखेड,
पो.ता.नरखेड, जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी,
नगर परिषद नरखेड, ता.नरखेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी, नगर परिषद, नरखेड,
ता.नरखेड, जिल्हा नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक ११.११.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ६.४.२००९ रोजी कनिष्ठ अभियंता तथा जन माहिती अधिकारी यांचेकडे गैरअर्जदार भागवत भाऊ देवराव रेवतकर व लिलाधर देवराव रेवतकर यांचे विरुध्द नगर परिषदेने दिलेले पत्र दिनांक १८.५.२००८ नुसार दिलेली तक्रार दिनांक ४.८.२००८ व दिनांक ३१.३.२००९ चे तक्रार अर्जावर केलेल्या कार्यवाहीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ४.५.२००९ रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक ३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. सदरच्या प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक ९.४.२०१० रोजी निर्णय देण्यात आला असून श्री विठठल रेवतकर यांचे प्रकरणातील सखोल चौकशी करुन ती माहिती प्रादेशिक संचालक, नगर परिषद प्रशासन नागपूर यांचेकडे सादर केली असता त्या दस्तऐवजांची त्यांनी पडताळणी करुन प्रकरण नस्तीबध्द केलेले असल्याचे दस्तऐवजासह सुनावणीच्या वेळेस सांगितले. तसेच अपीलार्थी यांनी मागणी केलेली माहिती माहितीच्या अधिकारात मोडत नसल्याचे लेखी पत्र त्यांनी दिले व अपील खारीज केलेले दिसून येते. त्यामुळेही अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना त्यांना माहिती मिळाली असली तरी प्रश्नाची सोडवणुक झालेली नाही व कार्यवाही करुन मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, हे सर्व शेजारी-शेजारी व घराच्या दोनही बाजूने अवैद्य वापर करीत असल्यामुळे एकमेकाला त्रास होतो, त्याबाबतच्या त्यांच्या तक्रारी आहे. मोका चौकशी केली असता नगर परिषदेने कार्यवाही करावी अशी परिस्थिती नाही. त्यामुळे त्यांना जशी उपलब्ध आहे तशी माहिती उपलब्ध झालेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७०९/नाग/२०१०

१)श्री जनार्दन गुलाबराव मून,
केंद्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
७९१, नागसेन वन, नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नागपूर शहर, नागपूर, ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी,
नागपूर शहर नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २६.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २५.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, प्रादेशिक परिवहन महामंडळ, नागपूर यांचेकडे वरिष्ठ लिपिक श्री राजुरकर यांच्या संबंधात नियुक्ती पासून आतापर्यंत महाराष्ट्रातील परिवहन कार्यालयात कुठे कुठे किती किती दिवस कार्य करीता आहे, याबाबतची माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ६.४.२०१० रोजी मागितलेली माहिती ही प्रशासकिय बाब आहे. उपरोक्त बाब जनहितास्तव नाही करीता आपण मागितलेली माहिती देता येत नाही असे कळविलेले दिसून येते. त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक ९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक ५.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यात आली. त्यानंतर पुन्हा दिनांक ८.६.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु तत्पुर्वी माहिती उपलब्ध इ ाली नाही म्हणून व विहित मुदतीत अपीलाचा निर्णय दिला नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, कोणत्याही कर्मचा-याची सेवाविषयक माहिती ही प्रशासकिय बाब जरी असली तरी ती गोपनिय नाही व त्यामुळे माहिती देण्याची टाळाटाळ केलेली आहे. मात्र प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती देण्याचे आदेश दिल्यानंतर जी माहिती देण्यात आली आहे त्यावरुन असे दिसून येते की, वरिष्ठ लिपिक श्री राजूरकर हे १९७२ पासून ते अर्जाच्या तारखेपर्यंत नागपूर शहर कार्यालयात कार्यरत असल्यामुळे ती माहिती प्रकट होऊ नये या कारणास्तव माहिती अधिकारी तथा उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी माहिती लपविल्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते. व त्यामुळे जन माहिती अधिकारी दोषी आढळून येतात. व त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) प्रमाणे शिस्तभंगाची कारवाईची शिफारस करणे आवश्यक आहे. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांच्या दिनांक २५.३.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याची टाळाटाळ केलेली असल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शिस्तभंगाच्या कारवाईची शिफारस करण्यात येत आहे. सदरची शिस्तभंगाची कारवाई ही प्रादेशिक परिवहन अधिकारी नागपूर शहर किंवा सक्षम प्राधिकारी यांनी करावयाची आहे. सदरची कार्यवाही ९० दिवसांचे आंत पुर्ण करावयाची आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७०८/नाग/२०१०

१)श्री जनार्दन गुलाबराव मून,
केंद्रिय अध्यक्ष, नागरी हक्क संरक्षण मंच,
७९१, नागसेन वन, नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,
नागपूर जिल्हा ग्रामिण, नागपूर, ता.जिल्हा नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी,
कामठी विभाग, कामठी, ता.कामठी, जिल्हा नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ३०.३.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे पोलीस स्टेशन खापरखेडा येथील पोलीस अधिकारी कर्मचा-यांच्या वेतराबाबत माहिती, त्यात खापरखेडा पोलीस स्टेशनमध्ये कार्यरत सर्व अधिकारी, कर्मचा-यांचे माहे मार्च, २००९ व माहे फेब्रुवारी, २०१० या दोन महिन्याच्या पगार बिलाची सत्यप्रत याबाबतची माहिती टपालाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २९.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाचा निर्णय हा दिनांक १७.५.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत निर्देश देण्यात आले. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक १७.५.२०१० रोजी तसेच २७.५.२०१० रोजी माहिती पुरविली आहे व त्यामुळे अपील निकाली काढण्यात आले. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २९.४.२०१० रोजी रुपये ९६/- भरणा करावा व माहिती घेवून जावी असे पत्र दिले होते. मात्र तत्पुर्वीच प्रथम अपील दाखल केले होते. प्रथम अपीलाच्या सुनावणीच्या संदर्भात खर्चाचा भरणा करुन माहिती उपलब्ध करुन द्यावी असे ठरले व त्याप्रमाणे खर्चाचा भरणा केला व माहे मार्च, २००९ व फेब्रुवारी, २०१० ची पगार पत्रकाची २४ पृष्ठे दिनांक २७.५.२०१० रोजी प्राप्त झाली. परंतु त्यात कर्मचा-यांचे नांव, मुळ वेतन व एकुण वेतन किती मिळते एवढेच दिले आहे. इतर भत्ते व कपाती याबाबची सर्व रकाने ही कोरी ठेवण्यात आलेली आहे. व त्यामुळे ती पगार पत्रकाचीमाहिती होत नाही व त्यांची दिशाभूल करण्यात आली आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, प्रत्येक कर्मचा-यांची जी कपात आहे ती त्यांची वैयक्तिक माहिती असल्यामुळे देण्यात आली नाही. त्यावर अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना मुळात घरभाडे भत्ता किती मिळतो याबाबतची माहिती आवश्यक होती. कारण बरेच पोलीस कर्मचारी हे म.रा.वि.वि.कंपनीच्या गाळयात राहातात. तसे असले तरी सुध्दा सार्वजनिक सेवेतील कर्मचारी हे सार्वजनिक सेवक असल्यामुळे त्यांना मिळणारे वेतन व इतर सवलती हा वेतनाचा भाग असल्यामुळे ती वैयक्तिक माहिती होत नाही. त्यामुळे पगारपत्रक जसे आहे तसे ते उपलब्ध करुन देणे आवश्यक होते. अपीलकर्ता यांनी ज्या कारणास्तव माहिती मागितली आहे त्याच कारणाच्या संदर्भात माहिती देण्याची टाळाटाळ करण्यात आलेली आहे अशी आयोगाची खात्री**

**झालेली आहे व त्यामुळे अपीलकर्ता यांना दिलेल्या पगार पत्रकाच्या संपूर्ण छायांकित प्रती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. अपीलकर्ता यांचेकडून जो खर्च घेण्यात आला तो परत करणे संयुक्तिक राहील. व नव्याने येणार खर्च हा संबधीत जन माहिती अधिकारी यांनी स्वत: करावयाचा आहे. तो शासनाच्या निधीतून करता कामा नये. अपीलकर्ता यांचे अपील हे मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत त्यांनी दिनांक ३०.३.२०१० च्या अर्जाप्रमाणे मागितलेली माहितीच्या संपूर्ण छायांकित प्रती विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने देण्यात याव्या.**

**२) नवीन छायांकित प्रतीसाठी येणार खर्च हा जन माहिती अधिकारी यांनी स्वतः सोसावयाचा आहे. शासकिय निधीतून तो करता कामा नये.**

**३) अपीलकर्ता यांना दिशाभूल करणारी माहिती दिलेली असल्यामुळे त्यांना रुपये ९६/- हे हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत परत करण्यात यावे.**

**४) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १५/२०१०

१) श्री ज्ञानेश्वर गो. डायगव्हाणे,
प्लॅाट नंबर १०, मंगलधाम सोसायटी,
रामकृष्ण हॅाल समोर, दत्तवाडी, नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

२)जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका,
स्वामी विवेकानंद हायस्कुल वडधामना, ता.हिंगणा,
जिल्हा नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

निर्णय

**तक्रारकर्ता यांनी दिनांक ४.३.२०१० रोजी अपील क्रमांक ७९५/२००९ मधील आदेशाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक २९.१२.२००९ रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. परंतु त्या तक्रारीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा गैरतक्रारदार यांनी दिनांक ११.२.२०१० रोजी खुलासा दाखल केला होता व त्यात त्यांचेकडे माहिती उपलब्ध नाही व प्रशासक अ.बा. उमरेडकर, उपशिक्षणाधिकारी(मा.), जिल्हा परिषद नागपूर यांचेकडे सल्लागर समीती सभेच्या ठरावाच्या प्रती हस्तगत केल्याचे निदर्शनास येते. व तत्कालीन प्रशासक यांनी घेतलेल्या सभेच्या संदर्भात जबाबदार प्रशासक व समितीच आहे असा आयोगाकडे खुलासा केलेला असल्यामुळे सदरचा खुलासा हा तक्रारदार यांना पाठवून तक्रार खारीज केलेली होती. परंतु पुन्हा तक्रारदार यांनी वर नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे तक्रार केली व प्रशासक शालेय दस्तऐवज स्वतःसोबत घेवून जात नाही व त्यामुळे प्रशासकानी तसे पत्र सुध्दा प्रशासक/सल्लागार सदस्य यांनी स्वतः सदर ठराव बुक बाळगलेले नसून मुख्य लिपिक यांचे अखत्यारीतच सदर अभिलेखे ठेवण्यात आलेली होती असे पत्र दिले आहे. त्या तक्रारीच्या संदर्भात सुध्दा खुलासा मुख्याध्यापक यांचेकडून मागविला व त्यात त्यांनी पुन्हा त्यांचेकडे माहिती उपलब्ध नसून देता आली नाही व त्यामुळे अपील ७९५/०९ मधील निर्णयाचे पुनर्विलोकन करावे असे आयोगाकडे लेखी दिले. परंतु सदरच्या तक्रारीच्या संदर्भात पुन्हा श्री अ.बा. उमरेडकर, गटशिक्षणाधिकारी तथा तत्कालीन प्रशासन यांनी आज आयोगापुढे शपथपत्र लिहून दिले की, प्रशासक किंवा सल्लागार सदस्य यांनी ठराव स्वतः बाळगलेला नसून मुख्याध्यापक/लिपिक यांचे अखत्यारित सदर अभिलेखे ठेवण्यात आली होती. व यावरुन सदरची माहिती ही स्वामी विवेकानंद हायस्कुल या संस्थेतच असावयास पाहिजे होती. माहिती अधिकारी हे माहिती उपलब्ध करुन देत नाही या कारणास्तव ते दोषी आढळून येते व त्यांचे विरुध्द पुन्हा शास्ती लादणे आवश्यक आहे. त्यांनी अपील क्रमांक ७९५/०९ मध्ये पुनर्विलोकनाचा अर्ज केला असला तरी आयोगाने दिलेला निर्णय अंतिम असतो व पुनर्विलोकनाचे अधिकार अधिनियमात नाही. त्यामुळे सदरच्या पुनर्विलोकन अर्जाचा विचार करता येत नाही. परंतु तत्कालीन प्रशासक व सल्लागार सदस्य यांचे शपथेवरुन माहिती शाळेतच उपलब्ध असल्यामुळे सदरची तक्रार पुन्हा मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार मंजूर करण्यात येत असून जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका यांनी वारंवार आदेश देवून माहिती उपलब्ध करुन देत नसल्यामुळे त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(१) प्रमाणे पुन्हा रुपये ५,०००/- ची शास्ती लादण्यात येते. सदरच्या शास्तीची वसुली शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांनी त्यांचे दरमहिन्याचे वेतनातून करुन ती** "००७०-इतर प्रशासाकि सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रक्कमा,(१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)".
**या लेखाशिर्षात जमा करावी. तसेच अपीलकर्ता यांना तत्कालीन प्रशासक श्री उमरेडकर यांचे शपथपत्रावरुन माहिती ही शाळेत उपलब्ध असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६८२/नाग/२०१०

१)श्री शिवकुमार सुरेंद्र मिश्रा,
तर्फे सुरेंद्र रामप्रसाद मिश्रा
१३, बच्छुसिंग ले आऊट(पंच्यांशी प्लॉट एरीया),
नरेंद्र नगर, नागपूर-२७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त,
परिमंडळ क्रमांक ४, अजनी विभाग, नागपूर,
ता.जि. नागपूर. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त,
अजनी विभाग, नागपर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १९.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २७.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३१.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २१.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १०.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, कार्यालय अप्पर पोलीस आयुक्त (गुन्हे) यांना दिनांक २२.१.२०१० रोजी दिलेल्या तक्रारीबाबत कार्यवाहीची माहिती उपलब्ध करुन देण्याबाबत मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक ९.३.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी दिनांक २३.३.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २१.४.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध झाली व तसेच कोणतीही कागदपत्रे माहिती पाहिजे नसल्यामुळे अपील फेटाळण्यात आल्याचा निर्णय दिलेला दिसून येतो. व निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांनी तक्रार केली होती. परंतु त्या तक्रारीची नोंदणी केलेली नाही. नंतर नोंदणी करुन माहिती उपलब्ध करुन दिली आहे. व त्यामुळे त्यांनी सुरुवातीला जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे ती दिशाभूल करणारी आहे. तसेच इतरही प्रश्नांची माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांच्या तक्रारीची नोंद केलेली नसल्यामुळे तसे त्यांना दिनांक १५.३.२०१० रोजी कळविले होते. परंतु त्यानंतर तक्रारीची चोकशी केली व चौकशीच्या दरम्यान बयाण घेतलेले आहे. परंतु या संपूर्ण प्रकरणामध्ये त्यांच्या मुलाची मोटर सायकल चोरीला गेली होती अशी तक्रार केली होती. त्यासंदर्भात अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना कोणत्याही कागदपत्राची आवश्यकता नाही. त्यांच्या मुलाची गाडी अभीषेक पांडे यांनी छिंदवाडा येथून आणली आहे ती परत पाहिजे आहे असे सांगितले व त्यांच्या मुलांनी सुध्दा तसे लेखी दिले आहे. चौकशी मध्ये सदरची गाडी चोरीस गेली नसून ती पत्नी दिपमाला हिला चालविण्याकरीता दिली असून ती गाडी सुध्दा त्यांचेकडे आहे असे सांगितले. श्री सुरेंद्र मिश्रा यांनी सुध्दा गाडी चोरी गेली नसून ती पत्नी दिपमाला हिला चालविण्याकरीता दिली असे सांगितले.**

**अशा प्रकरणात अपीलकर्ता यांनी माहिती मागितलेली दिसून येते, तो अधिनियमाच्या तरतुदींचा गैरवापर आहे असा निष्कर्ष काढावा लागतो. अशा प्रकारे अपीलकर्ता व त्यांच्या मुलाने लेखी दिले असून सुध्दा त्यांना अनेक प्रश्नांची उत्तरे पाहिजे आहे. याचा अर्थ त्यांना पोलीस यंत्रणेला वेठीस धरावयाचे आहे. त्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील- अपील क्रं. ७०५/नाग/२०१०

१)श्री इमरान इनायतुल्ला चिश्ती
हॅाटेल अल-जम-जम मागे, आझमशाह चौक,
मस्जिदजवळ, सी.ए.रोड, नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,
नागपूर सूधार प्रन्यास, नागपूर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता(मुख्यालय)
नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर, ता.जि. नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२०१०रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ३.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक २९.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.११.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, ना.सु.प्र.चे. पत्र दिनांक १८.२.२००९ यामध्ये सेन्ट्रल रोड सेक्शन-२ ची लेआऊटमधील प्लॅाट क्रं. बी हा प्रन्यासचा नियमित भूखंड आहे असे कळविले तेव्हा तो प्लॅाट कोणत्या तारखेला व कोणाकडून भूसंपादन करण्यात आला व अवार्ड नंबर अशा स्वरुपाची माहिती साधारण पोस्टाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक ७.१२.२००९ रोजी मागितलेल्या माहितीच्या संदर्भात निवाडा व दावा पत्राची प्रत नासूप्रकडे उपलब्ध नाही. कारण सेन्ट्रल रोड सेक्शन २-बी या योजनेचा भूसंपादनाबाबतचा अभिलेख टि.एस.क्रमांकाप्रमाणे आहे(ट्रस्ट सिरिअल नंबर). या योजनेचे भूसंपादनाचे रेफरन्स रजिस्टर व नकाशा अवलोकनार्थ उपलब्ध आहे. आपण कार्यालयीन कामकाजाचे दिवशी कार्यालयीन वेळेत येवून या रजिस्टरचे व नकाशाचे अवलोकन करावे व टि.एस.क्रमांक उपलब्ध करुन दिल्यास त्यानुसार उपलब्ध दस्तऐवज आपणास देण्यात येतील, कृपया नोंद घ्यावी. सदरच्या उत्तराने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय देण्यात आला असून सदर भूखंड कोणत्या कागदपत्राव्दारे नासूप्रचा आहे याचा शोध घ्यावा. विभागाने कार्यालयात दस्तऐवज उपलब्ध नसल्यास टि.एस.मुल्यांकन विभागाला कळवावे जेणेकरुन मुल्यांकन विभागातून माहितीचा शोध घेता येईल व त्याप्रमाणे मालकी हक्काचे दस्तऐवज अपीलार्थीस उपलब्ध करुन द्यावे, असा निर्णय दिलेला आहे. परंतु त्या निर्णयाप्रमाणे दिनांक ८.२.२०१० रोजी कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांना अभिलेख्यात शोध घेतला असता दिनांक १८.२.२००९ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे भूखंड रोड सेक्शन २-बी हा नासूप्रच्या मालकीचा असल्याबाबत दस्तऐवज आढळून आले नाही. तसेच सदर भूखंड असलेल्या जागेच्या टि.एस.बाबत माहिती विभागीय कार्यायात उपलब्ध नाही असे कळविण्यात आले व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना देण्यात आली आहे. त्यानंतर दिनांक १०.३.२०१० रोजी अपीलकता यांनी कार्यकारी अभियंता यांना पत्र दिले आहे. त्यानंतर दिनांक २६.५.२०१० रोजी भूखंडावर आपली मालकी संबंधी दस्तावेज विभागीय कार्यालयास सादर करावे असे कळविले व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी आयोगापुढे सांगितले की, सदरच्या भूखंडाच्या संदर्भात त्यांना अनाधिकृत बांधकामाच्या संदर्भात त्यांना नोटीस काढण्यात आली होती व त्यामुळे त्यांनी ही माहिती मागितली आहे व त्या पुर्वी सुध्दा कार्यालयातील अधिका-यांनी त्या भूखंडाच्या संदर्भात उलट सुलट माहिती उपलब्ध करुन दिली आहे. तसेच उलटपक्षी अपीलकर्ता यांची मालकी आहे किंवा नाही, अशाप्रकारची माहिती ते अपीलकर्ता यांनाच मागत आहे. वास्तविक अर्जाच्या अनुषंगाने अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे अशी आयोगाची खात्री झालेली आहे. परंतु पुर्वी उलट सुलट माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे सदरच्या प्रकरणामध्ये मुख्य अभियंता यांनी चौकशी करुन योग्य तो निर्णय घेवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून मुख्य अभियंता, नागपूर सुधार प्रन्यास यांनी सदर प्रकरणात पुर्वीचा पत्रव्यवहार व नंतर उपलब्ध करुन दिलेली माहिती याबाबत चौकशी करुन सदरच्या भूखंडाच्या संदर्भात निश्चित अशी माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७९९/नाग/२०१०

१)श्री प्रदिप शंकर उके
लहान इंदोरा, पो.जरीपटका,
१६, गीरणी विहिर, इलेक्ट्रीक पोल नं.५४, नागपूर-१४. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक(आस्थापना विभाग)
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक २१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १४.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे अनुकंपा तत्वावर सन २००२ ते २००९ या दरम्यान शासकिय सेवेत नोकरीसाठी बांधकाम विभाग, मंत्रालय अनुकंपा (१३०४१) प्रक्र-२/सेवा-४ पत्रानुसार आपल्या कार्यवाहीची माहिती, टपालाने घेणार असे नमूद करुन मागितलेली दिसून येते. अर्जदार दारिद्रय रेषेखालील असल्याचे नमूद आहे. अर्जाच्या अनुषंगाने दिनांक १९.१२.२००९ रोजी विषयांकित माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतचा तपशिल व कालावधीचा परिपूर्ण बोध होत नाही. तसेच पुर्णपणे खुलासा केलेला नाही. सबब कार्यालयास कळविण्यात आल्यावर माहिती उपलब्ध करुन देणे सोईचे होईल असे कळविलेले दिसून येते. परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक २९.१.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक १६.३.२०१० रोजी अतिरिक्त जिल्हाधिकारी तथा प्रथम अपीलीय अधिकारी नागपूर यांच्या आदेशानुसार जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अनुकंपा तत्वावरील गट-क व गट-ड संवर्गातील समायिक सूचीचे अवलोकन केले असता, सदर सूचिमध्ये आपले नांव समाविष्ट नाही, असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना संगितले की, अनुकंपा तत्वावर त्यांचे वडीलाच्या जागी त्यांना नियुक्ती मिळावी म्हणून त्यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाकडे अर्ज केला होता. व त्यानुसार जिल्हाधिकारी यांचेकडे त्यांचे नांव पाठविण्यात आले आहे असे सांगितले होते. व त्यामुळे त्यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात माहिती मागितली होती, परंतु उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, त्या त्या विभागामधील अनुकंपा तत्वावरील आलेले अर्ज व त्याप्रमाणे तयार केलेली यादी ही जिल्हाधिकारी कार्यालयाकडे येते व त्यातून संपूर्ण जिल्हयाकरीता उमेदवारांची यादी तयार केली जाते. ज्याअर्थी त्यांचे नांव यादीत नाही त्याअर्थी त्यांचे नांव त्यांच्या मुळ विभागाकडून आले नाही. अपीलकर्ता यांनी जे पत्र दाखविले त्यात सहाय्यक अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांना पत्र दिलेले पत्र आहे. याचा अर्थ सदरच्या नांवाच्या संदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाचा पत्रव्यवहार झाला आहे. परंतु जिल्हाधिकारी कार्यालयाशी झालेला पत्रव्यवहार दिसून येत नाही. त्यामुळे अपीलकर्ता यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या संबंधीत अधीक्षक यांना माहिती विचारणे संयुक्तिक राहील. जन माहिती अधिकारी यांनी दिलेले उत्तर योग्य असल्यामुळे व प्रथम अपीलीय अधिकारी यांचा निर्णय योग्य असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ८००/नाग/२०१०

१)श्री गुरुदत्त जोगेन्द्रजी मेश्राम
१५५, नझुल ले आऊट बेझनबाग, नागपूर
ता.जिल्हा नागपूर. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा तहसिलदार नझुल,
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर, ता.जि.नागपूर. — उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा तहसिलदार नझुल
जिल्हाधिकारी कार्यालय, नागपूर. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २९.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २८.५.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, विदर्भ विभागीय मच्छीमार सह.संघ मर्या.नागपूर मौजा सिताबर्डी खसरा क्रंज२८२ ची जागेची मंजूरी बाबत एकुण ६ मुद्यांमध्ये दिनांक ६.२.१०८७ ते अर्जाच्या तारखेपर्यंत या कालावधीची माहिती मागितलेली दिसून येते. सदरची माहिती व्यक्तीशः आवश्यक आहे असे नमूद केले आहे. अर्जाच्या अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक २८.६.२००९ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना आतापर्यंत माहिती उपलब्ध झाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे त्या माहितीच्या संदर्भात निधी उपलब्ध होत नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही. त्याकरीता नगर भूमापन अधिकारी क्रं.३ यांचेकडून खसरा क्रं.२८२ या जागेची खसरा कॅापी व आखिव पत्रिका, ही जागा कोणत्या नांवाने मंजूर करण्यात आली याबाबत पत्र दिनांक १६.६.२००९ ला दिले. त्यानंतर दिनांक २३.७.२००९ रोजी स्मरणपत्र सुध्दा दिले आहे व त्या पत्राची प्रत अपीलकर्ता यांना दिलेली दिसून येते. दिनांक १०.७.२००९ रोजी सुध्दा अपर जिल्हाधिकारी(महसुल) यांना माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने पत्र दिलेले दिसून येते. अपर जिल्हाधिकारी यांनी रेकार्डचा शोध घेवून माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. दिनांक २२.७.२००९ रोजी जन माहिती अधिकारी, नगर भूमापन क्रं.३ यांनी नझुल नायब तहसिलदार नागपूर यांना माहिती उपलब्ध करुन दिली व ती माहिती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन दिलेली आहे. परंतु अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे व त्यांचे म्हणणे असे आहे की, नगर भूमपान यांचेकडील माहिती त्यांचेकडे आहे. परंतु त्यांना नझुल कडून माहिती पाहिजे. नस्ती आढळून येत नसल्यास महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेखे अधिनियम, २००५ च्या कलम ९ प्रमाणे तहसिलदार यांनी पोलीसांकडे तक्रार दाखल करावी व त्याप्रमाणे चौकशी झाल्यास व नस्ती उपलब्ध झाल्यास माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक २८.५.२००९ च्या अर्जाप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याकरीता व नस्तीचा शोध घेण्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक अभिलेखे अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे योग्य ती कार्यवाही करावी व नस्ती उपलब्ध झाल्यास माहिती छायांकित प्रतीचे स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७९८/नाग/२०१०

१)श्री व्ही.बी. भगत, सहा.प्रबंधक,
म.रा.विद्युत वि.कं.लि., विद्युत भवन, काटोल रोड,
नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा महाव्यवस्थापक(क),
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या. एस्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१, धारावी रोड, माटुंगा, मुंबई-४०००१९. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा व्यवस्थापक(क अतांआ)
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.मर्या, प्रकाशगड मुंबई. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ५.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, सन २००५-०६, ०६-०७ व ०७-०८ या कालावधीच्या गोपनिय अहवालाची झेरॉक्स प्रत मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने दिनांक १७.२.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिली परंतु समाधान न झाल्यामुळे दिनांक २३.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केलेले दिसून येते. प्रथम अपीलाच्या संदर्भात दिनांक २.३.२०१० रोजी अपीलकर्ता यां सुनावणीस हजर राहाण्यासाठी पत्र दिलेले दिसून येते. त्यानंतर अपीलकर्ता यांनी गोपनिय अहवाल विषयक विहित नमुन्यातील प्रपत्र ज्यामध्ये गोपनिय अहवालाचे मुल्यांकन केले आहे त्याची छायांकित प्रत २००९ पर्यंतची पुरविण्यात यावी. परंतु जन माहिती अधिकारी यांनी मागितलेली माहिती न देता विषयास सोडून मुल्यांकन कळविले. कृपया मागितलेली माहिती त्वरीत द्यावी असे कळविलेले दिसून येते. महाव्यवस्थापक (क) तथा अपीलीय अधिकारी यांनी गोपनिय अहवालामध्ये प्रतीवेदन अधिकारी/प्रतीस्वाक्षरी अधिकारी व स्विकृती अधिकारी यांनी त्यांच्या वैयक्तिक मताप्रमाणे प्रतिवेदन केलेले असते. त्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ११(१) प्रमाणे त्रयस्थ पक्षाने नोंदविलेले अभिप्राय असावे असे उत्तर देणे उचित नाही. तथापि, एखाद्या नियमाप्रमाणे गोपनिय अहवालाचे मुल्यांकन पाठविण्यात येतात व त्याप्रमाणे ते दिनांक १२.२.२०१० रोजी पाठविले व त्या उत्तराशी सहमत असल्यामुळे अपील खारीज करण्यात येत आहे असा निर्णय दिलेला दिसून येतो. सदरच्या निर्णयाने समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, त्यांचे पुर्वीचे गोपनिय अहवाल चांगले आहे. परंतु ते नागपूर येथे काम करतात व गोपनिय अहवाल मुंबई येथील अधिका-यांनी लिहीलेले असल्यामुळे ही माहिती मागितली होती. प्रथम अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देता येणार नाही हे जरी म्हटलेले योग्य असले तरी दिलेले कारण योग्य नाही. सदरची माहिती त्रयस्थ पक्षाची माहिती नाही. त्रयस्थ पक्षाशी संबंधीत जर माहिती तसेल तर ती माहिती ही विश्वासाच्या संबंधाने तसेच गोपनियतेच्या कारणास्तव गोपनियरित्या कार्यवाही होणे आवश्यक असते व त्याप्रमाणे ती केलेली असल्यामुळे अधिनियमाचे कलम ८(१)(ड) प्रमाणे तसेच (छ) प्रमाणे प्रकट करणे योग्य नसल्यामुळे ती प्रकट करता येणार नाही. गोपनिय अहवालात प्रतिवेदन अधिकारी यांनी कर्मचा-यांच्या वर्षभराच्या कामकाजाचे जे निरीक्षण केलेले असतात त्या आधारावर अभिप्राय दिलेले असतात व प्रतिस्वाक्षरी अधिकारी यांनी सुध्दा त्याच आधारावर प्रतिवेदन अधिकारी यांचे अभिप्राय योग्य आहे किंवा नाही ते दिलेले असते. व वरिष्ठ अधिकारी यांचे जे निरीक्षण असते ते अर्थातच त्यांचे वैयक्तिक असे मत असते व त्यामुळे प्रतिवेदन करताना ते विश्वासार्ह पध्दतीने करणे आवश्यक असते व त्याप्रमाणे केलेले प्रतिवेदन हे प्रकट केल्यास त्यांच्यामध्ये वैमनस्य येण्याची शक्यता असते. अशा प्रकारे प्रतिवेदन अधिकारी व प्रतिस्वाक्षरी अधिकारी यांचे अभिप्राय प्रकट केल्यास प्रतिवेदन अधिकारी किंवा प्रतिस्वाक्षरी अधिकारी हे वर नमूद केल्याप्रमाणे गोपनिय अहवाल लिहू शकणार नाही व त्यामुळे ते प्रकट करणे योग्य नाही. मात्र प्रतिवेदन अधिकारी व प्रतिस्वाक्षरी अधिकारी यांची नांवे प्रकट करण्यास हरकत नाही व त्यामुळे अपीलकर्ता यांना सदरचे नांवे वर्षनिहाय उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीत अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १५ दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना त्यांच्या दिनांक १५.२.२०१० च्या अर्जाचे अनुषंगाने मागितलेल्या माहितीच्या संदर्भात त्यांचे गोपनिय अहवाल लिहिणारे अधिकारी व प्रतिस्वाक्षरी करणारे व स्विकृती करणारे अधिकारी यांची नांवे याची माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ८०२/नाग/२०१०

१)श्री हरिश्चंद्र दिनेश वारणे
नेन्शननगर, पोलीस लाईन टाकळी, पोलीस क्वॉर्टरच्या मागे,
नागपूर, ता.जिल्हा नागपूर. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अधीक्षक,
भूमी अभिलेख कार्यालय नागपूर, जि.नागपूर. उत्तरवादी
३)जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी क्रं.३,
६ वा माळा, प्रशासकिय इमारत, सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक ३१.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १६.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, अधीक्षक भूमी अभिलेख नागपूर यांचे कोर्टातील अपील क्रमांक ३७९/०३ मधील दिनांक १४.१०.२००३ चे निर्णयाप्रमाणे आपणाकडून कार्यवाही करणे अबाध्य होते, त्याप्रमाणे काय कार्यवाही केली व प्रलंबीत ठेवण्याचे कारण यासह एकुण तीन मुद्यांमध्ये तसेच मोजणी दुरुस्ती नकाशा दिनांक १४.३.२००५ रोजी मिळालेल्या नकाशाप्रमाणे अभिलेखात दुरुस्ती व दुरुस्त नकाशा मिळण्याबाबत माहिती शिघ्र पोस्टाने मागितलेली दिसून येते. अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक १६.१.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न**

**झाल्यामुळे दिनांक ११.२.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १२.४.२०१० रोजी देण्यात आला असून अर्जदार यांचे अपील मान्य करण्यात येवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असा निर्णय दिलेला दिसून येतो. व त्याप्रमाणे अपीलकर्ता यांना दिनांक ३०.४.२०१० रोजी माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. परंतु समाधान न झ ााल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता गैरहजर आहे. जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, अपीलकर्ता यांनी माहितीच्या अधिकारात कार्यवाही करुन मागितली आहे. त्यांनी महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या अंतर्गत अपील करुन कार्यवाही करणे आवश्यक होते. परंतु तसे न करता माहितीच्या अधिकारात माहिती मागितली असल्यामुळे त्यांना दुरुस्तीची कार्यवाही जिल्हाधिकारी यांचे परवानगीशिवाय करता येणार नाही असे कळविले आहे. व त्यामुळे महाराष्ट्र जमीन महसुल संहिता, १९६६ च्या तरतुदीप्रमाणे अपील केल्यास त्या अपीलाच्या माध्यमातून मा. जिल्हाधिकारी यांचेकडून मान्य झाल्यावर कार्यवाही करता येईल. त्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन दिलेली असल्यामुळे अपील खारीज करण्यास पात्र आहे.**

**अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ७९७/नाग/२०१०

१)श्री संजय देविदास रोडगे(यांत्रिकी)
मार्फत- वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
म.जि.प्रा.इमारत, दुसरा माळा, तेलंगखेडी रोड,
सिव्हील लाईन्स, नागपूर-१. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा अतिरिक्त संचालक,
संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा,
भूजल भवन, कृषि विद्यापीठ परिसर, शिवाजी नगर, पुणे-५. उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी,
संचालनालय, भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा
भूजल भवन, कृषी विद्यापीठ परिसर, शिवाजी नगर, पुणे-५. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ३०.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.६.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक ९.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ३०.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. जन माहिती अधिकारी हजर आहेत**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक २४.२.२०१० रोजी जन माहिती अधिकारी, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे-५ यांचेकडे, एकुण ३७ कनिष्ठ अभियंता यांच्या दिनांक १७.१२.२००८ च्या पदोन्नतीची यादी व माहिती मागितलेली दिसून येते. माहिती स्पिड पोस्टाने घेणार असे नमूद केले आहे. अर्जाचे अनुषंगाने विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक ८.४.२०१० रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक २६.४.२०१० रोजी देण्यात आला असून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना जी माहिती उपलब्ध झाली ती अपूर्ण असल्यामुळे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केलेले दिसून येते.**

**३. अपीलकर्ता यांनी सांगितले की, त्यांना जी माहिती उपलब्ध झालेली आहे ती संपूर्ण ३७ उमेदवारांची नाही. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी सांगितले की, ही संपूर्ण माहिती त्यांचे कार्यालयात उपलब्ध नव्हती. त्यामुळे त्यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी प्रादेशिक उपसंचालक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा यांचेकडे पत्र देवून अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले दिसून येतात. परंतु, असे आदेश दिले तरी अपीलकर्ता यांना माहिती मात्र उपलब्ध झालेली नाही. व प्रथम अपीलाच्या नंतर अतिरिक्त संचालक तथा अपीलीय अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश जरी दिलेले असले तरी दिनांक २७.४.२०१० रोजी उपलब्ध झालेली माहिती ही अपीलकर्ता यांचेकडे पुर्वीच उपलब्ध असल्यामुळे पुन्हा ती देण्याचा प्रश्न उदभवत नाही, असे कळविलेले दिसून येते. व त्यातही बरीचशी माहिती कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली आहे, असे जन माहिती अधिकारी यांनी कळविलेले दिसून येते. परंतु अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्यास टाळाटाळ केलेली आहे असा जन माहिती अधिकारी यांचेवर आरोप केलेला दिसून येतो. परंतु जी माहिती उपलब्ध करुन दिलेली आहे त्याचे अवलोकन केले असता निश्चितपणे अपूर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली दिसून येते. वास्तविक पदोन्नतीच्या संदर्भातील माहिती असल्यामुळे ती मुख्यालयात असणे आवश्यक असते. परंतु जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे असे आहे की, त्यांचेकडे तपशिलात माहिती उपलब्ध नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी सदरची माहिती संकलीत करुन उपलब्ध करुन देणे संयुक्तिक झाले असते. प्रादेशिक कार्यालयाने परस्पर माहिती उपलब्ध करुन द्यावी असे आदेश दिलेले असल्यामुळे व ती माहिती त्या कार्यालयाने उपलब्ध करुन दिलेली नसल्यामुळे सदरच्या प्रादेशिक कार्यालयातील संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे जन माहिती अधिकारी समजण्यात येवून त्यांचे विरुध्द अधिनियमाचे कलम २०(२) अन्वये शास्ती लादणे आवश्यक आहे. सदरची कारवाई ही शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस असल्यामुळे अतिरिक्त संचालक तथा अपीलीय अधिकारी, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे-५ यांनी त्या त्या अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन त्यांचे विरुध्द शिस्तभंगाची कार्यवाही करणे संयुक्तिक राहील. व त्याकरीता अपील मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१)** **अपीलकर्ता यांचे अपील मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत अपीलकर्ता यांना उर्वरित माहिती तपशिलात छायांकित प्रतीचे स्वरुपात विनामुल्य, रजिस्टर पोस्टाने उपलब्ध करुन देण्यात यावी. तसे न केल्यास विद्यमान जन माहिती अधिकारी हे शास्तीस पात्र राहातील याची नोंद घ्यावी.**

**२)** **जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ६.३.२०१० रोजी ज्या प्रादेशिक उपसंचाल, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा यांना माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी पत्र दिले आहे व ज्यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही त्यांना अधिनियमाचे कलम ५(४) व (५) प्रमाणे माहिती अधिकारी समजण्यात येत असून त्यांचे विरुध्द शिस्तभंगाच्या कार्यवाहीची शिफारस करण्यात येते. सदरच्या शिस्तभंगाची कार्यवाही ही अतिरिक्त संचालक, भूजल सर्व्हेक्षण आणि विकास यंत्रणा, पुणे यांनी करावयाची आहे.**

**२)** **अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. १५८/२००९

१) श्री सुरेंद्र पुंडलीकराव रेवतकर,
प्लॅाट नं.३४५ हनुमान मंदीर मागे,
आय.यु.डी.पी. काटोल, जिल्हा नागपूर. तक्रारकर्ता

विरुध्द

३)जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार,
पोलीस स्टेशन सिताबर्डी, नागपूर. गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक २९.६.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी दिनांक २४.११.२००९ रोजी त्यांचे तक्रार क्रमांक १५८/२००९ मधील आदेश पारित दिनांक ६.१०.२००९ प्रमाणे वारंवार आदेश करुन सुध्दा माहिती पुरवित नसल्याबाबत राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. सदरच्या तक्रारीच्या संदर्भात दिनांक १९.१२.२००९ रोजी जन माहिती अधिकारी तथा ठाणेदार यांचा खुलासा मागविला होता. परंतु खुलासाही प्राप्त झाला नाही व चौकशीसाठी जन माहिती अधिकारी हे हजर झाले नाही. त्यामुळे दिनांक ६.१०.२०१० रोजी पुर्वीच्या दिनांक २२.३.२०१० रोजी तोंडी आदेश पारित केल्याप्रमाणे हजर न झाल्यामुळे अटक अधिपत्र कां काढण्यात येवू नये अशा प्रकारची नोटीस आयोगाकडून काढण्यात आली होती. व त्याप्रमाणे आज वरिष्ठ पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन सिताबर्डी हजर झाले. त्यांनी आयोगापुढे खुलासा करताना तक्रारदार यांनी अर्ज दाखल केल्यापासून सदर प्रकरण हाताळणारे अधिकारी व कर्मचारी बदलत राहीले. त्यामुळे माहितीच्या संदर्भात संभ्रम निर्माण**

**झाला होता. मातृत्व सेवा संघ यांचेकडून मागणी केलेली माहिती आयोगाने यापूर्वी दोन वेळा नाकारुन अर्जदार यांचा अर्ज निकाली काढला आहे. सद्यस्थितीत अर्जदार यांनी दाखल केलेल्या न्यायालयीन प्रकरणात ब फायनल मा. न्यायालयात दाखल करण्यात येवून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे. आता ठाणेदार, पोलीस स्टेशन सिताबर्डी हे माहिती अधिकारी नाही. शासनाच्या निर्देशानुसार सहायक पोलीस आयुक्त, सिताबर्डी हे माहिती अधिकारी आहे. तसेच सदरच्या प्रकरणात शास्ती लादण्यात आली होती परंतु शास्ती वसुलीचे आदेश वरिष्ठ अधिकारी यांनी दिलेले नसल्यामुळे शास्तीची वसुली झाली नाही असे सागितले.**

**२. आयोगाकडील तक्रार क्रमांक १५८/२००९ मधील दिनांक ६.१०.२००९ च्या निर्णयातील आदेश क्रमांक २ प्रमाणे कार्यवाही झालेली नसल्यामुळे आयोगाचा निर्णय पोलीस विभाग पालन करीत नाही असे दिसून येते. व ते स्पष्टपणे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सुध्दा आयोगापुढे सादर केले आहे. सदरची शास्ती वसुली ही पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रं.१ यांनी करणे आवश्यक आहे. तसेच अपीलकर्ता यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात मा.न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे चौकशी करुन जो अहवाल मा.न्यायालयात सादर झालेला आहे त्याबाबतच्या सर्व अहवालाच्या प्रती अपीलकर्ता यांना उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता तक्रार अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून तक्रारदार यांना त्यांच्या तक्रारीच्या संदर्भात कळविलेल्या कार्यवाहीच्या संदर्भात मा. न्यायालयाचे आदेशाप्रमाणे जो अहवाल दाखल करण्यात आलेला आहे त्या अहवालाच्या प्रती हया जन माहिती अधिकारी म्हणून सहाय्यक पोलीस आयुक्त यांनी अपीलकर्ता यांना हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात यावी. त्याकरीता तक्रारदार यांनी हा निर्णय मिळाल्यापासून ३० दिवसांचे आंत व्यक्तीशः सहाय्यक पोलीस आयुक्त तथा माहिती अधिकारी यांचेकडे उपस्थित होऊन माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**२) तक्रार क्रमांक १५८/२००९ मधील आदेश क्रमांक २ ची अंमलबजावणी म्हणजे वसुली ही पोलीस उपआयुक्त, परिमंडळ क्रं.१ यांनी तातडीने द्यावी.**

**३) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ५६६ /नाग/२०१०

१)श्री डॉ. रविंद्र शामराव वासनिक,
डॉ. आंबेडकर मार्ग, पंजाब नॅशनल बँके जवळ, इंदोरा चौक, नागपूर
ता.जि. नागपूर-१७. अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा धर्मदाय उप आयुक्त,
धर्मदाय आयुक्त कार्यालय, नागपूर,
सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

३)(i)जन माहिती अधिकारी,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

३)(ii)जन माहिती अधिकारी, पिपल्स वेलफेअर सोसायटी,
११, शांती विहार को-ऑप.हाऊसिंग सोसायटी,
सिव्हील लाईन, नागपूर. उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक ७.६.२०१० )

नि र्ण य

**अपीलकर्ता यांनी दिनांक १५.४.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक १३.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक ७.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक १५.६.२००९ रोजी जन माहिती अधिकारी म्हणून चेअरमन, पिपल्स वेलफेअर सोसायटी, नागपूर यांचेकडे दिनांक ४.८.२००८ व १५.६.२००९ या कालावधीतील झालेल्या व्यवस्थापन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त मागितले असून माहिती व्यक्तीश: घेणार असे नमूद केले आहे. विहित मुदतीत माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी दिनांक १६.७.२००९ रोजी प्रथम अपील हे सह धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल केले आहे. व त्यानंतरही माहिती उपलब्ध झ ाली नाही म्हणून अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, ते संस्थेचे सदस्य आहे. परंतु त्यांना कोणत्याही प्रकारची कागदपत्रे उपलब्ध होत नाही किंवा बैठकीचे इतिवृत्त सुध्दा चेअरमन लिहित नसून ते सरचिटणीस यांना उपलब्ध करुन देत नाही. सरचिटणीस असूनही कोणतीही कागदपत्रे त्यांचे कब्ज्यात नाही. त्यामुळे त्यांनी माहिती मागितली आहे. परंतु ती त्यांना मिळाली नाही. संस्थेचे चेअरमन यांनी आयोगापुढे लेखी निवेदन सादर केले आहे व त्यामध्ये सदरची संस्था ही सोसायटी रजिस्ट्रेशन ॲक्ट, १८६० तसेच मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० च्या अंतर्गत पंजिबध्द झालेली आहे. व त्या संस्थेमध्ये जन माहिती अधिकारी यांचे पद नाही. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या तरतुदी सार्वजनिक विश्वस्त संस्थेस लागू होत नाही. व त्याकरीता त्यांनी मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, नागपूर यांचे पुढील याचिका भाष्करराव शंकरराव कुळकर्णी विरुध्द राज्य माहिती आयोग तसेच नागपूर युवक शिक्षण संस्था विरुध्द राज्य माहिती आयोग या दोन याचिकेतील निर्णय सादर केलेले आहेत. दोनही याचिकेतील निर्णयामध्ये सार्वजनिक विश्वस्त संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम लागू होत नाही असा निर्णय दिलेला असून राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ नागपूर यांचा निर्णय रद्य करण्यात आलेला आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांना माहिती उपलब्ध करुन देण्याचे कोणतेही प्रयोजन नव्हते व नाही. प्रथम अपील हे अपीलकर्ता यांनी सह धर्मदाय आयुक्त यांचेकडे दाखल केले आहे. परंतु प्रथम अपीलाचा निर्णय हा दिलेला दिसून येत नाही व धर्मदाय उपआयुक्त, नागपूर यांचे उस्मानाबाद येथे स्थानांतर झाल्यामुळे प्रकरणी पुढील तारीख देण्याची कृपा करावी अशी विनंती केली आहे. परंतु उप धर्मदाय आयुक्त यांची बदली झालेली असल्यामुळे व रिक्त पद असल्यामुळे प्रथम अपीलाचा निर्णय दिलेला दिसून येत नाही. मात्र अपीलकर्ता यांनी धर्मदाय आयुक्त कार्यालयाकडे दिनांक २४.११.२००९ रोजी माहितीच्या अर्ज केल्याचे संदर्भात माहिती अधिकारी सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, नागपूर यांनी मा. उच्च न्यायालय खंडपीठ, नागपूर यांचे पुढील रिट याचिका क्रमांक ५२९४/०८ व याचिका क्रमांक ५१३२/०८ मध्ये अनुक्रमे दिनांक २८.४.२००९ व दिनांक २०.८.२००९ चे निर्णयानुसार संस्था/न्यासाला माहितीचा अधिकार कायदा लागू होत नाही त्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता येत नाही असे कळविलेले दिसून येते.**

**४. यावरुन अपीलकर्ता यांनी आयोगापुढे युक्तीवाद करताना असे सांगितले की, सदरची संस्था ही धर्मदाय आयुक्त यांचेकडे पंजीबध्द असली तरी सदरच्या संस्थेस अनुदान प्राप्त होते. व अनुदान ज्या सार्वजनिक विश्वस्थ संस्थेस प्राप्त होते त्या सार्वजनिक विश्वस्त संस्थेस माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होईल असे याचिका क्रमांक ५२९४/२००८ च्या निर्णयामध्ये नमूद केले आहे. "Any person seeking to establish that a particular public trust is covred by the provisions of the Right to Information Act will have to first prove that a it is a public trust created by Government or Parliament or is substantively financed by the government. Until that is done, it must be held to be falling outside the scope of the Right to Information**

**Act." तसेच याचिका क्रमांक ५१३२/२००८ मधील निर्णय हा विना अनुदानित अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या संस्थेच्या संदर्भात असल्यामुळे तो अनुदानित विश्वस्त संस्थेस लागू होणार नाही. संस्थेला शासनाकडून अनुदान मिळते. त्यावर चेअरमन यांनी आयोगापुढे सांगितले की, अनुदान हे संस्थेला मिळत नाही तर ते महाविद्यालयाला किंवा शाळांना मिळते. परंतु महाविद्यालय किंवा शाळा ही शासनाकडून मंजूर होताना ती वैयक्तिकरित्या कोणत्याही व्यक्तीस मंजूर होत नाही, तर ती संस्था जर मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० च्या अंतर्गत पंजिबध्द असेल व सोसायटीज रजिस्ट्रेशन ॲक्ट खाली पंजिबध्द असेल तरच शाळा ही स्कुल कोड प्रमाणे किंवा महाविद्यालय हे मंजूर करण्यात येते. तसेच शाळा संहिता प्रमाणे अनुदानाचा अर्ज हा संबंधीत संस्थेनीच करावयाचा असतो. तसेच महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम १९९४ च्या कलम २ (५) प्रमाणे विद्यापीठाकडे नवीन महाविद्यालय सुरु करण्यासाठी जे अर्ज व्यवस्थापनाने केलेले असतील व विद्यापीठाने शासनाला शिफारस केलेली असेल त्या महाविद्यालयास शासनास परवानगी देण्याचे अधिकार दिलेले आहे. विद्यापीठाकडे हा अर्ज व्यवस्थापन समितीने द्यावयाचा आहे. याचा अर्थ संस्थेने अर्ज करावयाचा आहे. व अशा प्रकारच्या प्रकरणामध्ये शासनाच्या अंदाजपत्रकीय स्त्रोताप्रमाणे व व्यवस्थापन समितीच्या योग्य अयोग्यतेच्या संदर्भात परवानगी देण्याचे अधिकार आहे. व त्याप्रमाणे शासनाने आदेश काढल्याशिवाय शाळा किंवा महाविद्यालय संस्थेस सुरु करता येत नाही. याचा अर्थ महाविद्यालयाकरीता सुध्दा अनुदान मिळत असले तरी ते संस्थेच्या माध्यमातून महाविद्यालयास मिळते असा त्याचा अर्थ होतो, म्हणजे पर्यायाने ते संस्थेला मिळते. व त्यामुळे सार्वजनिक विश्वस्थ संस्था ही मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियमाच्या तरतुदीप्रमाणे न्यास म्हणून पंजीबध्द असली तरी सार्वजनिक विश्वस्त संस्था ही कोणत्या उद्येशासाठी स्थापन झालेली आहे याचा विचार करणे आवश्यक आहे. सार्वजनिक विश्वस्त संस्थेच्या व्याख्येमध्ये धार्मिक किंवा धमार्थ या उद्येशाकरीता स्थापन होत असले तर त्या संस्थेस अनुदान मिळते किंवा नाही हे पाहाणे संयुक्तिक राहील. व अपीलकर्ता यांच्या युक्तीवादाप्रमाणे तसेच त्यांनी दाखल केलेल्या पत्रव्यवहारातील दिनांक ६.४.२००९ च्या पत्रामध्ये लेडीज होस्टेल बांधकामा करीता सुध्दा अनुदान संस्थेस मिळालेले आहे असे दिसून येते. व त्यामुळे संस्थेस अनुदान मिळत असल्याने सदरच्या अधिनियमाच्या तरतुदी संस्थेस लागू होतील. व त्यामुळे संस्थेमध्ये माहिती अधिकारी यांची नियुक्ती करणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत पिपल्स वेलफेअर सोसायटी नागपूर यांनी अधिनियमाचे कलम ५ प्रमाणे जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती करावी. तसेच प्रथम अपीलीय अधिकारी यांची सुध्दा नियुक्ती अधिनियमाचे कलम १९(१) प्रमाणे करण्यात यावी.**

**२) संस्थेने जन माहिती अधिकारी यांची नियुक्ती केल्यानंतर अपीलकर्ता यांना कळविण्यात यावे व १० दिवसांचे आंत मागितलेल्या माहितीच्या छायांकित प्रती विनामुल्य व्यक्तीशः उपलब्ध करुन देण्यात याव्या. त्याकरीता अपीलकर्ता यांनी व्यक्तीशः संस्थेने नियुक्त केलेल्या माहिती अधिकारी यांचेकडे संपर्क साधून माहिती उपलब्ध करुन घ्यावी.**

**३) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

# मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. ६५७/नाग/२०१०

१)श्री पी.एम. पदमावार
बी-१/२०२, शिवराया सोसायटी, समृध्दी संकुल,
सिव्हील लाईन्स अमरावती रोड, नागपूर-०१. — अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उपसचिव,
सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग,
मंत्रालय मुंबई-३२. — उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा कक्ष अधिकारी
सहकार, वस्त्रोद्योग व पणन विभाग,
मंत्रालय, मुंबई-३२. — उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक १८.६.२०१० )

<u>नि र्ण य</u>

**अपीलकर्ता यांनी दिनांक २.५.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक २८.५.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १८.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता हजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक ७.५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे, माझे वार्षिक गोपनिय अहवाल व त्यासोबतचे स्वयंमुल्यांकन अहवाल २००१ ते २००२ व २००७ ते २००८ (२) सहनिबंधक संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी झालेल्या डिपार्टमेंटल प्रमोशन कमेटी मिटींगचे प्रोसिडींग व सभांच्या नोटीसेस सन २००५ जानेवारी पासून (३) ऑक्टोंबर, २००६ मधील डीपीसी सभेसमोर सर्व अधिका-यांचा सरासरीचा ठेवलेला गोषवारा (४) गोपनिय अहवाल सरासरीसाठी असलेली स्थायी आदेश (५) सहनिबंधक संवर्गातर्फे पदोन्नतीसाठी मी दिलेली निवेदने वरिष्ठांना सादर करणा-या व त्यावर वरिष्ठांनी दिलेल्या निर्णयाच्या टिपणीच्या प्रती, इ.माहिती मागितलेली दिसून येते. सदरच्या अर्जाचे अनुषंगाने अपीलकर्ता यांना दिनांक २३.६.२००८ रोजी विषयास अनुलक्षून आपणास हवी असलेली माहिती पाठविण्यात येत आहे असे कळविलेले दिसून येते. परंतु उपलब्ध झालेल्या माहितीमुळे अपीलकर्ता यांचे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी दिनांक १.९.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले आहे. प्रथम अपीलाचा निर्णय दिनांक १७.१०.२००८ रोजी देण्यात आला असून मुद्या क्रं.१ च्या संदर्भात मुख्य माहिती अधिकारी यांनी एका प्रकरणात या विषयाच्या अनुषंगाने दिलेले आदेश माहितीचा अधिकार अधिनियमा अंतर्गत गोपनिय अहवाल देता येणार नाही. मुद्या क्रमांक ३ च्या संदर्भात त्यांना स्पष्टीकरण देण्यात आले. मुद्या क्रमांक ४ च्या संदर्भात स्थायी आदेश हे सामान्य प्रशासन विभागाचे आहे. व ते वेब साईटवर टाकण्यात आले आहे असे सांगितले. मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भात आवश्यक ती माहिती अपीलकर्ता यांना देण्यात यावी असे आदेश दिलेले दिसून येते. व त्या आदेशाप्रमाणे दिनांक २४.१०.२००८ रोजी अपीलकर्ता यांच्या दिनांक ७.५.२००८ च्या अर्जातील मुद्या क्रमांक ५ ची माहिती सोबत पाठवित आहे असे कळविलेले दिसून येते. व त्यामुळे समाधान न झाल्यामुळे अपीलकर्ता यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील दाखल केले आहे.**

**३. अपीलकर्ता यांनी युक्तीवाद करताना सांगितले की, द्वितीय अपील त्यांनी विलंबाने दाखल करण्याचे जे कारण दिलेले आहे त्यात प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर ते शासन सेवेत होते व जबाबदारी महत्वाची समजल्यामुळे सुमारे १३ महिन्याचा विलंब झालेला आहे, तो क्षमापित करुन माझे अपील स्विकृत करावे अशी विनंती केली आहे. त्यामुळे द्वितीय अपील स्विकृत करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांचेकडे मागितलेली माहिती ही त्याच पदोन्नतीची आहे असे आयोगाचे निदर्शनास आणले आहे. परंतु कोणत्याही प्रकारची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही. व दिनांक २३.६.२००८ रोजी जी माहिती पुरविण्यात आली आहे असे म्हटलेले आहे त्यामध्ये कोणत्याही प्रकारची मागितलेली माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. व मुद्या क्रमांक २ अंतर्गतची माहिती अंशिक स्वरुपात पुरविली. संबंधीत सभेच्या नोटीस पुरविल्या नाहीत. उर्वरित चार मुद्यांची माहिती पुरविली नाही. त्यानंतर मुद्या क्रमांक ५ ची माहिती प्रथम अपीलाच्या निर्णयानंतर मिळाली. अद्याप मुद्या क्रमांक १,३,४ व मु२ ची माहिती अप्राप्त आहे. त्यावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे सांगितले की, अपीलकर्ता यांनी जी माहिती मागितली आहे ती माहिती ही गोपनिय स्वरुपाची असून मुख्य माहिती आयुक्त यांनी दिलेल्या निर्णयाप्रमाणे C.R. need not be given under R.T.I. असा निर्णय दिलेला असल्यामुळे ती दिलेली नाही. तसेच केंद्र शासनाच्या दिनांक २१.९.२००७ चे कार्यालयीन परिपत्रक जे आहे त्यात वैयक्तिक माहिती उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता नाही असे म्हटलेले आहे. तसेच गोपनिय अहवालाच्या संदर्भात सुध्दा अधिनियमाचे कलम ८(१)(जे) प्रमाणे ती प्रकट करण्यापासून संरक्षण देण्यात आलेले आहे. तरी सुध्दा सार्वजनिक प्राधिकरणास वार्षिक गोपनिय अहवाल हे प्रकट करण्यास स्वयंनिर्णयाप्रमाणे सार्वजनिक उद्येशासाठी प्रकट करणे आवश्यक असल्यास ते प्रकट करता येतील अशी तरतूद आहे. व त्यामुळे अपीलकर्ता यांच्या माहिती मागण्याच्या संदर्भात सार्वजनिक उद्येश हा**

**महत्वाचा नसल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देण्यात आली नाही. परंतु अपीलकर्ता यांनी सांगितले की, जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही प्रकारचे कारण अपीलकर्ता यांना कळविलेले नाही.**

**४. अपीलकर्ता यांनी मागितलेल्या माहितीचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, त्यांनी मागितलेली माहिती ही वार्षिक गोपनिय अहवाल व त्याबाबतचे स्वयंमुल्यांकन अहवाल हे मागितले आहे. तरी त्याबाबत वार्षिक गोपनिय अहवालाची प्रतवारी ही प्रत्येक शासकिय कर्मचा-यास कळविली जाते व त्यामुळे त्यात गोपनिय असे काहीही नाही. तसेच स्वयंमुल्यांकन अहवाल हा त्यांनीच दाखल केलेला असल्यामुळे त्याबाबतच्या प्रती उपलब्ध करुन देणे यात गोपनिय असे काहीही नाही. डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटीच्या मिटींगच्या संदर्भात सभेच्या नोटीसेस त्यांना उपलब्ध करुन देण्याच्या संदर्भात कोणतीही गोपनियता नाही. परंतु डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटीचे इतिवृत्त हे उपलब्ध करुन देणे मात्र गोपनियतेमध्ये समाविष्ट होते. डिपार्टमेंटल प्रमोशन समितीच्या बैठकीमध्ये संबंधीत अर्जदाराशिवाय आणखी इतरही कर्मचा-यांच्या संदर्भात निर्णय झालेला असतो व त्यामुळे ती माहिती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक नाही. तसेच डिपार्टमेंटल प्रमोशन कमिटी समोर सर्व अधिका-यांच्या सरासरीचा गोषवारा सुध्दा उपलब्ध करुन देणे हे योग्य नाही. मुद्या क्रमांक ५ च्या संदर्भात अपीलकर्ता यांनी जे निवेदन दिलेले असेल व त्यावर जो निर्णय झालेला असेल त्याची टिपणी ही गोपनियतीच्या कक्षेत येत नाही. व त्यामुळे ती उपलब्ध करुन देणे संयुक्तिक राहील. त्याकरीता अपील अंशतः मंजूर करण्यास पात्र आहे.**

<u>आदेश</u>

**१) अपीलकर्ता यांचे अपील अंशतः मंजूर करण्यात येत असून अपीलकर्ता यांना मुद्या क्रमांक १ मधील वार्षिक गोपनिय अहवालची प्रतवारी तसेच स्वयंमुल्यांकन अहवाल, तसेच सभेचे नोटीसची प्रत व मुद्या क्रमांक ५ मधील सहनिबंधक संवर्गामध्ये पदोन्नतीसाठी झालेली निवड व त्यावर वरिष्ठांनी दिलेल्या निर्णयाची प्रत, हा निर्णय मिळाल्यापासून १० दिवसांचे आंत उपलब्ध करुन देण्यात यावी.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. /नाग/२०१०

१)श्री अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९(३) अंतर्गत अपील-

अपील क्रं. /नाग/२०१०

१)श्री अपीलकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा उत्तरवादी

३)जन माहिती अधिकारी तथा उत्तरवादी

( आदेश पारित दिनांक.६.२०१० )

निर्णय

**अपीलकर्ता यांनी दिनांक.२०१० रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १९(३) अन्वये अपील दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक.६.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक.६.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे अपीलकर्ता गैरहजर आहे. उत्तरवादी हजर आहेत.**

**२. अपीलकर्ता यांनी दिनांक रोजी जन माहिती अधिकारी यांचेकडे**

आदेश

**१) अपीलकर्ता यांचे अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**२) अपीलकर्ता व उत्तरवादी यांना निर्णयाची प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)

**राज्य माहिती आयुक्त,**

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**

## मा.राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग,खंडपीठ नागपूर यांच्या समोरील माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १८(१) अंतर्गत तक्रार-

तक्रार क्रं. /

१) तक्रारकर्ता

विरुध्द

२) प्रथम अपीलीय अधिकारी तथा गैरतक्रारदार

३)जन माहिती अधिकारी तथा गैरतक्रारदार

( आदेश पारित दिनांक १९.६.२०१० )

नि र्ण य

**तक्रारकर्ता यांनी अपील क्रमांक /२०० च्या दिनांक च्या निर्णयाप्रमाणे माहिती उपलब्ध झाली नाही म्हणून दिनांक रोजी राज्य माहिती आयोगाकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ च्या कलम १८(१) अन्वये तक्रार दाखल केली आहे. अपीलकर्ता व उत्तरवादी यांना आयोगाचे कार्यालयातून दिनांक .४.२०१० रोजी नोटीस काढून दिनांक १९.५.२०१० रोजी अपीलांचे सुनावणीस उपस्थित राहाण्याबाबत युपीसीने (under certificate of posts) कळविण्यात आले होते. सदरच्या तक्रारीची सुनावणी दिनांक .५.२०१० रोजी घेण्यात आली. तक्ररकर्ता हजर/गैरहजर आहे. गैरतक्रारदार हजर/गैरहजर आहेत.**

आदेश

**१) तक्रारकर्ता यांची तक्रार अंशतः मंजूर करण्यात येत असून**

**२) तक्रारकर्ता व गैरतक्रारदार यांना निर्णयाची एक प्रत देण्यात यावी.**

नागपूर

(विलास पाटील)
**राज्य माहिती आयुक्त,**
**राज्य माहिती आयोग, खंडपीठ,नागपूर.**